
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका


महाराष्ट्र साहित्य परिषद
~ ग्रंथालय ~
ग्रंथकार महाराष्ट्र साहित्य पत्रिका
ग्रंथनाम जानेवारी ते डिसेंबर २०११
दाखल अंक अंक ३३६ ते ३३८

अनुक्रमणिका

महाराष्ट्र साहित्य पत्रिका
जानेवारी ते डिसेंबर २०११
अंक ३३६ ते ३३८
(३३६ जोड अंक)


महाराष्ट्र साहित्य पत्रिका
अंक क्र. ३३६
एप्रिल ते जून २०११
मराठी वाङ्मयाचा इतिहास
खंड सातवा : १९५० ते २०००
भाग पहिला
मराठी वाङ्मयाचा इतिहास
खंड सातवा : १९५० ते २०००
भाग दुसरा
मराठी वाङ्मयाचा इतिहास
खंड सातवा : १९५० ते २०००
भाग तिसरा
मराठी वाङ्मयाचा इतिहास
खंड सातवा : १९५० ते २०००
भाग चौथा
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
येणें वाग्यज्ञें तोषावें
महाराष्ट्र
साहित्य
परिषद

अनुक्रमणिका



महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ■ सन २०११ ते २०१६

विश्वस्त मंडळ

ॲड. भास्करराव आव्हाड
अध्यक्ष, विश्वस्त मंडळ

डॉ. शिवाजीराव कदम
कार्यकारी विश्वस्त

आमदार उल्हास पवार
सदस्य

पदाधिकारी

प्रा. द.मा. मिरासदार
अध्यक्ष

डॉ. द.ता. भोसले
उपाध्यक्ष

डॉ. प्र.चिं. शेजवलकर
उपाध्यक्ष

डॉ. माधवी वैद्य
कार्याध्यक्ष

पदाधिकारी

प्रा. मिलिंद जोशी
प्रमुख कार्यवाह

श्री. सुनील महाजन
कोषाध्यक्ष

डॉ. सु.प्र. कुलकर्णी
पत्रिका संपादक व
अहमदनगर जिल्हा प्रतिनिधी

स्थानिक कार्यवाह

श्री. दीपक करंदीकर

स्थानिक कार्यवाह

श्री. प्रकाश पायगुडे

श्रीमती नंदा सुर्वे

सौ. सुनीताराजे पवार

श्री. अनंत जोशी

ॲड. प्रमोद आडकर

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

☐ अंक क्र. ३३६ : एप्रिल ते जून २०११

•••

संपादक :
डॉ. सु. प्र. कुलकर्णी

•••

प्रकाशक :
प्रा. मिलिंद जोशी
प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष - ०२०-२४४७५९६३

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

मुद्रक-प्रकाशक
प्रा. मिलिंद जोशी,
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०.

अक्षरजुळणी
मेघा ग्राफिक सर्व्हिसेस,
स.नं. १४/२३/४, घर नं. १५९८,
मोती बेकरीमागे, धायरी, पुणे - ४११ ०४१

मुद्रणस्थळ
जंगम ऑफसेट प्रा. लि.,
२५/१० नांदेड फाटा, सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०४१

किंमत १५/- रुपये

प्रकाशन : जून, २०११

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक आणि संपादन-समिती, सल्लागार मंडळ अथवा प्रकाशक सहमत असतीलच, असे नाही.

मुखपृष्ठाविषयी

मराठी वाङ्मयाचा इतिहास– खंड सातवा (भाग १ ते ४)

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्या एकमेव वाङ्मयीन संस्थेने मराठी साहित्याच्या इतिहासलेखनाचे कार्य सातत्याने केले आहे. मराठीच्या पहिल्या वाक्याविष्कारापासून ते १३५० पर्यंतच्या (पहिल्या खंडाच्या) लेखनापासून पुढे १९५० पर्यंतच्या सहाशे वर्षांच्या मराठी साहित्याच्या इतिहासाचे सहा खंड बारा विभागांमध्ये प्रकाशित झाले. १९५० नंतरच्या सातव्या खंडाच्या (१९५० ते २००० च्या) इतिहासलेखनाचे वेध, डॉ. गं. ना. जोगळेकर (कार्याध्यक्ष म.सा.प., पुणे) यांच्या प्रेरणेने, परिषदेस लागले; आणि प्रत्यक्ष लेखनाची परिश्रमपूर्वक पूर्वतयारीही त्यांनी पूर्ण केली. इतिहासलेखनाच्या भक्कम पायाभरणीचे कार्य करून डॉ. जोगळेकरांनी इहयात्रा संपविली. डॉ. स. गं. मालशे, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. गो. म. कुलकर्णी आणि डॉ. व. दि. कुलकर्णी ह्या भूतपूर्ण संपादकांच्या मालिकेला साजेशी अभ्यासपूर्ण पूर्वतयारी, आपल्या अभ्यासू हाती घेऊन विद्यमान संपादक डॉ. रा. ग. जाधव ह्यांनी मराठी वाङ्मयाच्या सातव्या खंडाच्या लेखनाचे कार्य (चार भागांमध्ये विभागून) निष्ठेने पूर्ण केले; यावद्दल मराठी साहित्याचे अभ्यासक त्यांचे ऋणी आहेत.

१९५० ते २००० मराठी साहित्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक पार्श्वभूमीचा कालपट वसंत आबाजी डहाके यांनी लिहिला आहे. तो अभ्यासकांना दिग्दर्शन करणारा असा आहे.

वाङ्मयेतिहास-संकल्पनेच्या तात्त्विक स्वरूपाचे लेखन डॉ. द. दि. पुंडे यांनी वेळोवेळी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतून केलेले आहे. डॉ. जोगळेकरांनी त्यांच्याशी या विषयावर वेळोवेळी चर्चा केलेली आहे. ह्या अप्रत्यक्ष कार्यांचा उल्लेखही टाळता येणार नाही.

वाङ्मयाच्या इतिहासाचा दुसरा खंड (भाग १ व २) नुकताच प्रकाशित झाला असून सदर आवृत्ती ही सुधारित आहे. त्याला डॉ. लीला गोविलकर यांची अभ्यासपूर्ण पुरवणी जोडण्यात आलेली आहे. हा खंडही वरील चार खंडांबरोबर उपलब्ध आहे.

ह्या इतिहासलेखनाच्या कार्याला म्हणजे १९५० ते २००० पर्यंतच्या सातव्या खंडाच्या १ ते ४ विभागांच्या सुमारे तीन हजार पृष्ठांच्या छपाईस दानशूर व्यक्तींचे आणि संस्थांचे बहुमोल सहकार्य लाभले; त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे परिषदेला आवश्यक वाटते. मलपृष्ठ दोन वर त्यांची छायाचित्रे छापली आहेत. अक्कलकोट स्वामी संस्थान पुणे, भारती विद्यापीठ संस्था, श्री. रघुनाथराव चितळे (चितळे बंधू मिठाईवाले), आणि श्री. वि. ग. कानिटकर यांनी भरीव देणगी देऊन सहकार्य केले आहे. या देणग्या मिळवून देण्यात डॉ. कल्याणी दिवेकर, श्री. ह. ल. निपुणगे आणि प्रा. मिलिंद जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

अन्य भाषिकांना मराठी साहित्याचे स्वरूप कळावे, ह्या उद्देशाने श्री. राजेंद्र बनहट्टी आणि डॉ. गं. ना. जोगळेकर ह्यांनी A History of Modern Marathi Literature Vol. 1 & 2 हा ग्रंथ इंग्रजी भाषेतून संपादित केला आहे. महाराष्ट्र साहित्यपरिषदेने तो यापूर्वीच प्रकाशित केला आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद आणि मराठी वाङ्मयाचे अभ्यासक ह्या सर्वांचे कायम ऋणी राहतील.

महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, पुणे–४११ ०३०.
फोन:– २४४७५९६३

संपादक
महाराष्ट्र साहित्य पत्रिका. पुणे ३०.

अनुक्रमणिका

संपादकीय

मराठी समीक्षेचा पाया

डॉ. सु. प्र. कुलकर्णी

कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित केले-गेल्यानंतर मराठीचा विजयध्वज जोमाने फडकू लागला. त्यातूनच 'मराठी दिना'ची संकल्पना साजरी होऊ लागली. 'भाग्य लाभले आम्हा... मी बोलतो मराठी... मी जाणतो मराठी' अशी काव्य-भावना, मराठी भाषिकांच्या अभिमानाची-अस्मितेची ठरली! 'मराठी-भावनेचा' जयजयकार करीत असताना भूतकाळातील मराठीच्या दिग्विजयाचे विस्मरण होते आहे की काय? सातशेवीस वर्षांपूर्वीच संस्कृतच्या निबिडवनात अडकलेल्या ज्ञानाला मुक्त करून ते ज्ञानदेवांनी मराठीत आणले, त्यास पैठण/काशीच्या पंडितांनी, मान्यता दिली; तो दिवस मराठीच्या विजयाचा होय ! पैठण ते आळंदी हा मराठी भाषेचा विजयपथ 'ज्ञानेश्वरी-पथ' आहे. पंढरपूर ही मराठीची राजधानी आहे. आषाढी-कार्तिकीला मराठीचे महासंमेलन भरते! संत-पंत-तंतांची मराठी, महानुभावांची मराठी, 'आज्ञापत्र'कार छ. शिवरायांची मराठी, समर्थांची मराठी अव्वल इंग्रजीदर्जाच्या-काळातील 'माला'कार विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, लोकमान्य टिळक-आगरकर-म. फुले यांची आणि 'काळ'कर्त्या शि. म. परांजपेंची उपहास उपरोधगर्भ मराठी! भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 'प्रबुद्ध भारताची' मराठी!! सत्यशोधकांची मराठी. यांनी महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय सुधारणांचे रान उठविले. ह्या प्रत्येकाला मराठी मनाने मनोमन 'ज्ञानपीठ'पद बहाल केले आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या-पानापानावर ते नोंदले गेले आहे. भरजरी मराठी काव्यावर मोहून 'जितुक्या वोविया, तितुक्या सुवर्णमुद्रा देववीन... परंतु हे काव्य माझ्या नावावर कर!' असे आमीष दाखविणाऱ्या राजाला- 'ना राजेहो ! आमुचिया कविकुळा बोलु लागैल' असे म्हणून अस्मिता जपणाऱ्या निर्मोही कवीचीही मराठी. मराठीचा विजयध्वज, यांच्यापासूनच आपल्यापर्यंत हातोहाती, स्फुरतच आलेला आहे. मुस्लिम व इंग्रजी राजवटीतसुद्धा जिची भरभराट झाली; ती मायमराठी! इतिहास, संशोधन आणि समीक्षेचा पाया घालणारी इतिहासाचार्य राजवाडे, भारताचार्य चिंतामणराव वैद्य, दत्तो वामन पोतदारांची मराठी इ. चा स्वतंत्र इतिहास लिहावा लागेल.

मराठीच्या वाङ्मयीन समीक्षेची, नियतकालिकांद्वारे निष्ठेने जपणूक करणाऱ्यांची आज 'मराठी-दिना'च्या निमित्ताने आठवण जागविली पाहिजे. त्या पहिल्या पावलांचा थोडक्यात आठव...

विविधज्ञानविस्तार (केवळ वाङ्मयाला वाहिलेले पहिले मासिक-पुस्तक)

१८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' हे प्रारंभी पाक्षिक आणि पुढे ते साप्ताहिकाच्या स्वरूपात-वृत्तपत्राच्या स्वरूपात, प्रसिद्ध होऊ लागले. ज्ञान आणि मनोरंजनाचा हेतू डोळ्यांसमोर ठेवून ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, ज्ञानप्रसारक, पुणे शालापत्रक इ. नियतकालिके १८४२ ते १८६१ पर्यंत 'दर्पण'च्या पावलावर पाऊल ठेवून प्रकट झाली. केवळ भाषासुधारणा आणि मराठी भाषेची अभिवृद्धी हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून रा. गुंजीकरांनी 'विविधज्ञान विस्तार'चा पाया घातला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांची- 'निबंधमाला' हेही भरगच्च वाङ्मयीन 'मासिक पुस्तक' 'विस्तारा'पाठोपाठ १८७० पासून सुरू झाले. 'विविधज्ञानविस्तार' आणि 'निबंधमाला' यांच्या जन्माने, केवळ वाङ्मयीन समीक्षा, भाषाविषयक आणि व्याकरणविषयक धोरण, वाङ्मयाचा इतिहास, शब्दसृष्टीतील घडामोडी, सामाजिक व राजकीय समस्या, साहित्यातील वादविषय (उदा.- श्लीलता-अश्लीलता इ.) यांच्या चर्चेने 'विस्तार' आणि 'निबंधमाले'ने मराठी मनाची

सद्भिरूची जोपासली.

रावसाहेब मोरमकर

विविधज्ञानविस्ताराचे संपादक म्हणून १८९८ पासून रावसाहेब रामकृष्ण रघुनाथ मोरमकर काम पाहू लागले. १८९८ ते १९२३ अशी २५ वर्षे त्यांनी विस्ताराचे स्पृहणीय कार्य केले. पंचवीस वर्षांच्या अंकात मराठी वाङ्मयाचा टीकात्मक इतिहास साठविला आहे. पंचवीसवर्षांत असे एकही पुस्तक नाही- की ज्यावर समीक्षालेखन झाले नाही. निबंधमाला सोडल्यास 'विस्तारा'च्या तोडीचे वाङ्मयसमालोचनाचे कार्य कुणीही केले नाही. सूक्ष्मदृष्टी, सतत वाचन, उपजतच असलेला मार्मिकपणा, मराठी वाचकांच्या उत्कर्षाची तळमळ यामुळे वाङ्मयीन नियतकालिक कष्टसाध्य वाटले नाही. प्रसंगी पदरमोड करून रावसाहेबांनी ही वाङ्मयीन समीक्षा चळवळ जागविली.

'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' प्रारंभी विविध ज्ञानविस्ताराची पुरवणी म्हणून प्रकाशित होई. रावसाहेबांच्यामुळेच ते शक्य झाले.

इतिहासाचार्य राजवाडे आणि वासुदेवशास्त्री खरे

मराठेशाहीच्या उत्तरार्धाचा चालताबोलता इतिहास असे राजवाडे यांनी वासुदेवशास्त्रींबाबत लिहिले; ती अतिशयोक्ती नाही. पटवर्धनांच्या दप्तरांच्या आधारे शास्त्रीबुवांनी लेखन केले. मराठ्यांचा इतिहास जागता ठेवण्याचे लेखनकार्य राजवाडे-खरेंनी केले. एकीकडे गव्हर्नर साहेबांनी आपल्या संस्थानाला भेटी द्याव्यात म्हणून लक्षावधी रुपये उधळणाऱ्या संस्थानिकांनी खरे किंवा राजवाडेंना मदत केली नाही. इतिहासलेखनाची ही निष्ठा मराठी वाङ्मयासाठी उपकारक ठरली. राजवाडे अविवाहित राहिले; आणि खरेशास्त्री दारिद्र्यात राहिले. राजवाडे यांनी उद्वेगाने काढलेले उद्‌गार सर्वांना ज्ञात आहेत.- 'वासुदेवशास्त्री खऱ्यांनी आपले घरदार विकून पटवर्धन दप्तर छापावे; आणि मिरजकर, सांगलीकर, जमखिंडीकर यांनी खुशाल झोपा काढाव्यात! शिवाजी महाराज, दमाजी गायकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन हे आम्हा संशोधकांचे आजेपणजे आहेत; आणि संस्थानिकांचे कोणी नाहीत, असेच म्हणण्याची पाळी आली आहे.' मराठ्यांच्या इतिहासाचे अनेक खंड राजवाड्यांच्या लेखणीने अमर केले. मराठेशाहीच्या इतिहासलेखनास पूरक असे कार्य करण्यात राजवाडे यांनी हयात घालविली. मराठी भाषेच्या विजयध्वजाला त्यांचाही हात लागला- हे विसरता येणार नाही.

मालव साहित्य (१९२८)


महाराष्ट्र साहित्य पत्रिकेसमकालीन मराठी साहित्य आणि संस्कृतीला वाहिलेले इंदूर येथून प्रकाशित होणारे (१९२८) 'मालव साहित्य' हे त्रैमासिक मुखपत्र मराठीचाच झेंडा घेऊन कार्यरत होते. महाराष्ट्र साहित्यसभा, इंदूरचे अध्यक्ष श्री. मा. वि. किबे यांच्या अध्यक्षतेखालील संपादक मंडळाने सजविलेला 'इंदूर विशेषांक' अव्वल इंग्रजी कालखंडातील बृहन्महाराष्ट्राच्या मराठीच्या कार्याचा सज्जड पुरावा आहे. १९२८ साली महाराष्ट्र साहित्य पत्रिका डगमगत्या आर्थिकपायावर प्रकाशित होत होती. परंतु 'मालव साहित्याचा' इंदूर विशेषांक सुमारे २०४ पानांचा आहे. त्यात बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषेच्या अनेक विद्वानांनी लेख लिहिले आहेत. साहित्यसम्राट न. चिं. केळकर, धों. के. कर्वे, भारताचार्य चिं. वि. वैद्य, गो. स. सरदेसाई, लोकनायक-माधव हरी अणे इत्यादींनी हजेरी लावली आहे. मराठीभाषेचे कार्य यातून प्रकट झाले आहे. श्रीमंत होळकरांनी ह्या कार्याला आश्रय दिला होता. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेलाही 'हिज हायनेस' होळकरांची रु. १०,०००/- ची मदत झाली. मालव साहित्याचे सगळेच अंक अभ्यासपूर्ण आहेत. बृहन्महाराष्ट्राचे हे कार्य विसरून चालणार नाही.

करमणूकप्रधान ललित नियतकालिकांच्या बोलबाल्यात मराठी समीक्षा आणि संशोधनपर नियतकालिकांचे कार्य खूप खडतर होते व आहे. करमणूकप्रधान नियतकालिकांनी नेत्रदीपक प्रगती केली; परंतु संशोधन आणि समीक्षापर मराठी नियतकालिकांचा पाया जिथे रूजला; त्याला विसरू नये. मराठीच्या विजयपताकेचा तो स्तंभ आहे.

अनुक्रमणिका

'ऐवज' : एक जीवन-संहिता

जी माणसे जिवंतपणी सत्कार्य करतात, त्यांना मृत्यूनंतर देवतापद मिळते. त्यांना वेदात 'ऋभु' असे नाव दिले आहे. ग्रहताऱ्यांच्या रूपाने ते आकाशगंगेत राहतात. पृथ्वी हीच त्यांची जन्मभूमी ! आपल्या जन्मभूमीच्या दर्शनासाठी, हे ऋभुगण आपले आकाशगंगेतील स्थान सोडून कधीतरी पृथ्वीवर येतात. आपल्या सारख्याच सत्कर्म करीत असलेल्या मानवांच्या अंतःकरणातील ऋभु-भावना पाहून ते आनंदित होतात; आणि विश्वशांतीचे आनंदगायन करतात. मानवाच्या सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीच्या अहंकाराला छेद देत हे सामगायन तटस्थपणे करतात. त्यात सत्कृत्याबद्दलचा सूक्ष्म अहंकार नसतो की; यशाचा उर्मट अहंकारही नसतो. असते ते विशुद्ध विश्वशांतीचे गायन ! संवेदनाशील मानवाला ते समजते. प्रत्येकाच्या मनात ही ऋभुभावना असतेच. जीवनाच्या विविधतेतील अशा विधायक सत्प्रवृत्ती शोधण्याचे आणि तिला ग्रंथित करण्याचे कार्य करणे; ही साहित्याची मूळ प्रेरणा आहे. संपादक अरुण शेवते ह्यांनी १९९३ ते २००९ ह्या १७ वर्षांत प्रकाशित केलेल्या 'ऋतुरंग' दिवाळी अंकातील ४७७ लेखांमधील ८६ लेख निवडून, माणसाच्या जीवनाचा आणि मनाचा शोध घेऊ पाहणारी 'ऐवज' ही सुमारे ६८० पृष्ठांची जीवनसंहिता- संपादित केली आहे. माणसाच्या मनाचा सर्वांत मोठा आकर्षणाचा आणि कुतूहलाचा विषय 'माणूस' हाच आहे. माणूस माणसाचाच शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याचा धर्म, त्याचे तत्त्वज्ञान, त्याचा आनंद आणि त्याचे दुःख, त्याने अनुभवलेली मैत्री, सहजीवन, त्याचे घर, त्याचे गाव, गावातली नातीगोती, त्याच्या प्रेरणा, ज्ञान आणि रंजन, त्याचा जयापजय, त्याची स्वप्ने आणि वास्तव, जन्म-मृत्यू आणि त्यामधील जगणे- अशी असंख्य घटिते आणि त्यातील संवेदना ह्यांचा एक 'कोलाज्' म्हणजेच संपादक अरुण शेवते ह्यांचा जीवनानुभवांचा 'ऐवज' ! जीवनाच्या प्रत्येक घटकावर अनेकांच्या डोळ्यांनी पाहिलेली, बुद्धीला समजलेली आणि मनाला भावलेली अनेकमुखी आत्मनिवेदने माणसाची जीवन संहिता साकार करू पाहतात. जगण्याचे प्रयोजन शोधू पाहतात. कुणी चाकोरीत तर कुणी चाकोरीबाहेरचे जीवन जगतो. जगता-जगता सुंदर आणि आनंदी जीवन जगण्याचे मार्ग शोधतो. इतरांनाही दाखवितो.



अरुण शेवते ह्यांनी सर्व प्रकारच्या माणसांना बोलते केले आहे. रघुनाथ माशेलकरांसारखे शास्त्रज्ञ. सोनिया गांधी, सुशीलकुमार शिंदे, आर्. आर्. पाटील, यशवंतराव गडाख, यांच्यासारखे राजनीतिज्ञ. गुलजार, ना. धों. महानोर, मंगेश पाडगावकर, शिरीष पै, इ. सारखे कवी. पंडित जसराज, किशोरी आमोणकर, बेगम परवीन सुलताना इ. सारखे गायक. विठाबाई नारायणगावकर, यमुनाबाई वाईकर आणि सुरेखा पुणेकर यांच्यासारख्या तमाशा-नृत्यांगना. निळू फुले, देवानंद, हेमा मालिनी इ. रजतपटावरील कलाकार. बाबा महाराज सातारकर कीर्तनकार, एफ्.एम्. हुसेन- वसंत सरवटे हे चित्रकार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कुमार केतकर, य. दि. फडके हे विचारवंत; आणि अण्णा हजारेंसारखे समाजसेवक. यांच्याबरोबर कितीतरी साहित्यिक, पत्रकार, वक्ते, वादक इ. सर्वांच्या जीवनानुभवांचे संचित 'ऐवज' मध्ये साकारले आहे.

आत्मनिवेदन करणे, ही मानवाची भूक आहे. आदर्श जीवन पाहणे-ऐकणे आणि शक्यतेनुसार अनुसरणे, ही ह्या भुकेची दुसरी बाजू आहे. अनुभवांचे देणे-घेणे आणि त्याची समीक्षा करून जीवनमूल्यांचा शोध घेणे- हे साहित्याचे प्राणभूत तत्त्व आहे.

'ऐवज' मध्ये त्याच जीवनसंहितेला रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. माणसाची समरसून जगण्याची निष्ठा

प्रत्ययाला येते. आपली निष्ठा दुसऱ्याला सांगितल्याशिवाय तिला पूर्तता येत नाही. संपादक अरुण शेवते कवी असल्याने त्यांनी स्वतः संवेदनाशील राहून भल्याभल्यांची मने संवादशील केली आहेत.

भारताच्या पंतप्रधान इंदिराजी आणि डोरोथी नॉर्मन यांच्यातील पत्रव्यवहारात त्यांचे सहसा न दिसलेले मन व्यक्त होते. स्व. इंदिराजी म्हणतात- 'मी मन मोकळं करीत नाही; त्यामुळे गैरसमज होतात. दिवसेंदिवस जग राहण्याच्या दृष्टीने खूप दुष्ट बनत चालल्यासारखं वाटतं... अफवा पसरविणं हा भारतात उद्योगच बनत चाललाय्- मला एखादं तंतुवाद्य बेसूर झाल्यासारखं वाटतंय्' तसेच फॅनी ('एफ्') आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामधील पत्रव्यवहारही हृद्य आहे. '... don't overwork' म्हणून फॅनी वारंवार प्रेमळ सूचना देतात. बौद्धिक आणि मानसिक सामर्थ्य प्राप्त होण्यासाठी मन संवादशील ठेवावे; असे ते म्हणतात. मा. सोनियाजी आणि राजीवजी गांधी यांच्या भावबंधनात राजकीय जीवनाचे आक्रमण झाले. 'मला माणूस म्हणून- जगायला मिळत नाही.' ही खंत व्यक्त झाली. 'राजीवजींच्या सुरक्षेची काळजी घेतली नाही तर त्यांच्या उत्तरक्रियेसाठीच मला यावे लागेल' म्हणून राहुल गांधींनी व्यक्त केलेली चिंता... एक ना अनेक ... न वाचलेले इतिहासाचे मन प्रकट होते.

शब्दतालांत बांधलेल्या स्वरांच्या पलिकडील निखळ स्वरांचे सुंदर मंगल-पवित्र आणि शुचिर्भूत असे एक विश्व आहे. गानसरस्वती किशोरी आमोणकरांच्या संगीतसाधनेचे ते हार्दही त्यांनी प्रकट केले आहे. स्वरभाव बुद्धीच्या सहायाने ठरविता येत असला तरी स्वर हा बुद्धीप्रधान होऊ शकत नाही; हे स्वर आणि शब्दांचे अशरीरी नाते ठरविणारा कर्ता करविता 'तोच' असून आपण केवळ 'बासरी'! गानसरस्वतींचे हे आत्मप्रकटीकरण, त्यांच्या 'स्वरार्थरमणी'मध्ये प्रकट होण्यापूर्वी, 'ऋतुरंग' मध्ये प्रकट झाले आहे.

तमाशा कलावंत विठाबाई नारायणगावकर यांची कलानिष्ठा थक्क करायला लावणारी आहे. नऊ महिने भरत आलेले असताना, वाढलेल्या पोटाने, मायबाप प्रेक्षकांपुढे नृत्य केले. नृत्य करताना स्टेजवरच कळा येऊ लागल्या. स्टेजमागे जाऊन अपत्याला जन्म दिला. त्याची नाळ तोडून लगेचच स्टेजवर गेल्या. नृत्यांगनेची ही निष्ठा कोणाही महान् व्यक्तिमत्त्वाशी बरोबरी करणारी आहे. 'ऐवज'चे संपादक अरुण शेवते म्हणतात-

'दिवस उजाडतो आणि मावळतो. सगळेच दिवस लक्षात राहत नाहीत. ज्या पावलांचे ठसे आयुष्यात उमटतात तेच दिवस आयुष्य घडवत असतात. अनेक क्षणांशी ऋणानुबंध जोडले जातात. त्या क्षणांमधून, घटनांमधून आपण घडत जातो. त्या दिवसांचा, त्या क्षणांचा, माणसांचा धांडोळा घेणे ह्यात आनंद असतो. तोच 'आपुला आपल्याशी संवाद' असतो. आपल्या हाती 'ऐवज' देताना मनात हीच भावना आहे तुम्ही फक्त वाचायला हवे.'

जीवनानुभवांचा हा 'ऐवज' कर्तृत्ववान माणसांच्या आत्मकथनातून प्रकटला आहे, वेगवेगळ्या विषयांमधून! अरुण शेवतेंनी तो आपल्या हाती दिला आहे. ते म्हणतात त्याप्रमाणे-

'तुम्ही फक्त वाचायला हवं !'

कारण नारायण सुर्वे म्हणतात तेच खरं की,

'माणसांइतका समर्थ सृजनात्मा मला भेटलाच नाही!'

०००

ह्या अंकाविषयी-

हा अंक क्रमांक ३३६ जानेवारी २०११ ते जून २०११ कालावधीचा आहे.

ह्या अंकात समीक्षेच्या काही प्रमुख घटकांवर आधारित लेख एकत्रित केले आहेत. मर्ढेकरांच्या लयतत्त्वाचा आणि त्यांच्या जीवनलयवादाची अनन्यता डॉ. सुरेश भृगुवार यांनी आणि 'डॉ. द. भि.'च्या ग्रंथाचे मौलिक परीक्षण करताना कृष्णा चौधरींनी स्पष्ट केली आहे. समाजभाषा हे साहित्याचे स्वाभाविक अंग आहे. समाजभाषाविज्ञानाच्या अंगाने लिहिलेले डॉ. शैलेश पुंडलिक यांचा 'प्राचीन भारतातील- स्त्री गौरव- एक समाजभाषा विज्ञानपर' लेख तसेच डॉ. किशोर सानप यांच्या 'सृजनाच्या दुःखोत्सवाची देशी कविता' ह्या कृषीकाव्यप्रधान काव्यसंग्रहांचा परीक्षण लेख- हे दोन लेख समाजभाषेवरील आहेत. सौ. अनघा टोंबरे यांचाही लेख ह्याच वळणातील असल्याने त्याचा

समावेश केला आहे. डॉ. द. ना. धनागरे यांनी संज्ञाप्रवाही लेखन म्हणून केलेले ग्रंथपरीक्षण, संज्ञाप्रवाही- लेखनशैलीचे सुबोध विवेचन आहे. काव्यजीवन आणि वास्तवजीवन यांचे संवेदनाशील नाते शोधणे हा वाचकांचा नेहमीचा प्रयत्न असतो. डॉ. सुभाष गढीकर ह्यांनी केशवसुतांच्या कवितेतील 'तारा' चा एक संशोधन-अभ्यास लिहिला आहे.

ह्या अंकाचे नेहमीप्रमाणे सुस्वागत होईल; ही अपेक्षा.

सुनील कुलकर्णी

संपादक

महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे ३०

भ्रमणभाष - ९७६७६९९३१९

संपर्क :
७ गायकवाड वसाहत, सावेडी मार्ग,
अहमदनगर ४१४ ००३. दूरभाष : ०२४१-२४२९७५५

अनुक्रमणिका

मर्ढेकरांचा शैलीचमत्कार

- डॉ. सुरेश भृगुवार

[मर्ढेकरांची कविता 'शैलीगत' आहे. शैली हाच अर्थ आणि शैली हीच लय- हे कवितेचे रहस्य उलगडून दाखविणारा लेख शैलाविज्ञानाच्या अभ्यासकांना उपयुक्त आहे. शब्दांचा क्रम- काव्यानुकूल शब्दक्रमांचे अनेकविध विभ्रम प्रस्तुत लेखात सोदाहरण स्पष्ट करून शैलीच्या अंगाने कवितेचे रसग्रहण केले आहे. वृत्ताचे बंधन कवितेच्या शब्दांवर लादून कवितेची कारागिरी करण्यापेक्षा शब्दांच्या लयगत क्रमांचे विविध आविष्कार कारागिरीच्या पलिकडे जाऊन कवितेचा आत्मा शोधतात. मर्ढेकरांच्या शैलीचमत्काराचे अलंकाररूप दाखविणे हा प्रस्तुत लेखाचा विषय आहे. सुर्वे-ग्रेस यांच्या कवितेची चाहूल यात दिसते का ? कविता हा शब्दांच्या नादलयीचा अर्थपूर्ण असा एकसंध आणि एकसंघ आविष्कार असतो. शब्दांचे अस्तित्व भावलयीत एकरूप होते. त्या भावलयीत शब्दांचे 'असणे' म्हणजे काय असते; ते शैलीविज्ञान अन्वय लावून स्पष्ट करते. शब्दांचे अस्तित्व, कधी लोप पावून, कधी पर्यायाने, कधी विरोधाने तर कधी समभावनेने, कधी अर्थाची अपेक्षा निर्माण करून आणि कधी अर्थ-विस्ताराने.कविता साकार करतात. त्याचे नेमके विश्लेषण ह्या लेखात आले आहे. शैली विज्ञानाच्या अभ्यासकांना आणि सामान्य रसिकांनाही ते भावेल. -संपादक]

मर्ढेकरांच्या ज्या कविता बहुचर्चित आहेत. ज्या कवितांशी आपली दाट ओळख आहे, किंबहुना ज्या कवितांमुळे मर्ढेकरांनी मराठी कवितेत अग्रमूल, अंतर्बाह्य क्रांती केली. पृथगात्म नवकविता निर्माण केली. आधुनिक मराठी काव्योत्तर कवितेवर आपली नाममुद्रा कोरली. पूर्व कवितेचा चेहरा-मोहराच बदलून टाकून ताज्या रक्ताचा पुरवठा करणाऱ्या, मोकळा श्वास घेणाऱ्या, कविता लिहिल्या. त्या कवितांचे अंतर्नाद तारसप्तकात गुंजारव करीत राहिलेत- अजूनही करीत आहेत. दुराग्रही रुढीवाद्यांचा अपवाद वगळता ह्या खास मर्ढेकरी 'परिसस्पर्श' झालेल्या कवितांचे स्वागत झाले. त्यांचे सुवर्णतेज कालपरत्वे अधिकाधिक उजळतेच आहे.

मर्ढेकरी शैलीच्या कवितेतून यंत्र आणि मानव, (हळूहळू मानव यंत्राचा गुलाम होत गेला. यंत्रमुग्ध मानव !), गिरणीमालक व कामगार, पुंजीपती व कष्टकरी गरीव मजूर यांच्यांतील असंतोष व संघर्ष, राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष, जगज्जेतेपदाची महत्त्वाकांक्षा युद्धपिपासा ('विमानाचे हल्ले । बेचिराख जिल्हे') सत्तासंघर्ष, विज्ञानाची प्रगती (?)- सुखी जीवनाची मोहक स्वप्ने की संहारक शस्त्रे ? - या साऱ्याच प्रश्नांनी पोळलेले, होरपळलेले मर्ढेकरांचे मन नाजूक, कुसुमकोमल भावनांच्या सूक्ष्म तरल, मृदुमनोरम भावमधुर कविता कशी लिहू शकेल ? भोवतालच्या परिस्थितीबद्दलची चीड, संताप, आक्रोश व शेवटी प्रक्षोभ मर्ढेकरांच्या कवितेतून व्यक्त होऊ लागला.

मानवाच्या आत्मीय भावनांचा व शाश्वत जीवनमूल्यांचा होत असलेला विध्वंस पाहून पिळवटून गेलेल्या कवीमनाचा प्रक्षोभ कवितातून व्यक्त होत मानवाबद्दलची करुणा शब्दांमधून प्रकट होत गेली. त्या अभिव्यक्तीतून सकृत्दर्शनी जे सार्वत्रिकनैराश्य, जो विद्वेष, जो अंतःक्षोभ, जो तुच्छताभाव (सिनिक् मनोवृत्ती) ज्या कवितांतून सूचित होतात, त्या कवितांची मोहिनी जनमानसावर जबरदस्त होती. अजूनही आहे. आशय व अभिव्यक्ती ह्या दोन्ही अंगांनी ही कविता इतकी अभिनव, इतकी अभूतपूर्व व इतकी अद्भुतरमणीय होती की; ह्या मर्ढेकरी शैलीने रसिकांचे चित्त वेधून घेतले.

प्रक्षोभक कवितांच्या गर्दीत मात्र 'अभ्ररम्य पश्मिनी मोकळ्या तुझिया केसांतून', 'दवांत आलिस भल्या पहाटे', 'शुभ्र तिमिर मोहक वसना', 'आला आषाढ श्रावण','शिशिरागम' मधील काही कविता, 'अजून येतो वास फुलांना' आणि 'अभ्रांच्या ये कुंद अफूने' अशा काही भावमधुर व विशुद्ध, सात्त्विक आनंद देणाऱ्या कविता वाचल्या की वाळवंटात अचानक हिरवे हिरवे हरित तृणाचे गार गालिचे चित्ताला सुखद स्पर्श देत आहेसे वाटते. वैशाखात तप्त वाळवंटात जीवनयात्रा घडावी, हे व्यक्तिशः मर्ढेकरांचेच नव्हे, तर मानवाचे दुर्दैव नसते, तर

अशा चित्ताला प्रसन्न करणाऱ्या अधिक कविता मर्ढेकर लिहू शकले असते का ?

मूलतः मर्ढेकरांचे मृदू-कोमल, हळवे मन मानवातील पाशवी प्रवृत्तींनी दुभंगून गेले. त्यांच्या लेखणीतून वैफल्य, नैराश्य, आक्रोश व शेवटी प्रक्षोभ बाहेर पडून खास मर्ढेकरी शैलीच्या कवितेचा उदय झाला. (तरीही, वर ज्या चार-पाच भावमधुर कवितांचा उल्लेख केला आहे, त्या कवितांतही मर्ढेकरी-शैलीची छाप स्पष्ट दिसून येते. प्रस्तुत लेखात 'अभ्रांच्या ये कुंद अफूने' ह्या कवितेचा ह्याच दृष्टीने विचार करावयाचा आहे.)

वस्तुतः मर्ढेकरांचा स्वाभाविक मनःपिंड हळुवार, नाजूक भावनांना उठाव आणणाऱ्या व रसिकांना रिझविणाऱ्या कविता लिहिणाऱ्या कवीचा असावा, असे वाटते. त्यांचे कवीमन सूक्ष्मतरल, हृदयस्पर्शी भावनांची साक्षेपी जपणूक करणारे आहे, असे जाणवू लागते. 'अभ्ररम्य पश्मिनी मोकळ्या...', 'दवांत आलिस...', 'आला आषाढ श्रावण', 'अभ्रांच्या ये...' इत्यादी कविता वैशाखातील तप्त उन्हात शीतल जलधारांसारख्या आल्हादक आहेत.. यांपैकी 'अभ्रांच्या ये...' ह्या कवितेचे शैलीसौंदर्य उलगडण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करू.

काव्यपाठ : अभ्रांच्या ये कुंद अफूने

अभ्रांच्या ये कुंद अफूनें
पानांना ह्या हिरवी गुंगी;
वैशाखांतिल फांदीवरतीं
आषाढाची गाजर-पुंगी.

मिटून बसलीं पंख पाखरें
पर्युत्सुक नच पीसहि फुलतें;
मूक गरोदर गाईची अन्
गळ्यांतली पण घंटा झुरते.

तिंबुन झाली कणीक काळी
मऊ, मोकळी ह्या रस्त्याची;
उष्ट्या अन्नामध्यें थबकली
चोच कोरडी बघ घारींची.

ब्रेक लागला चाकांवरतीं,
श्वासहि तुटला आगगाडीचा;
ऊन उसासा धरणीचा अन्
उरांत अडला इथें मघांचा.

शिरेल तेव्हां शिरो विचारें
हवेंत असल्या पाडस-पातें;
जगास तोंवर वैशाखाच्या
मृगाविनाही मृगजल चढतें !

मर्ढेकर (आ.का.क.-४)

(कवितेविषयी पुढे चर्चा करण्यापूर्वी पावसाच्या नक्षत्रांसंबंधी थोडी ओळख प्रस्तुत कवितेच्या संदर्भात उपयुक्त ठरेल. म्हणून येथे देत आहे. ती अप्रस्तुत ठरू नये.)

पर्जन्य नक्षत्रे : द. महाराष्ट्रात मृग, आर्द्रा, पनुर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा हीच बारा नक्षत्रे पडतात. मृग नक्षत्र जून महिन्याच्या सातव्या तारखेस लागते. प्रत्येक नक्षत्र १५ दिवस असते. ही सूर्यनक्षत्रे होत. म्हणूनही ही ज्या दिवशी येतात त्या दिवशी पंचांगात मृगार्क, आर्द्रार्क अशा तऱ्हेने अर्क (सूर्य) शब्द लावून लिहिली असतात. त्यात नऊ नक्षत्रे मुख्य असतात.काही नक्षत्रे नपुंसक म्हणून लिहिली असतात. त्यांचे फक्त ढग येतील पण पाऊस पडणार नाही, असे म्हणतात. (स्वयंपुरोहित पृ. २८३)

कवी/लेखक आपले लेखन संस्मरणीय करण्यासाठी सर्वमान्य भाषेचाच वापर करीत असला व शब्दकोशातील शब्दांचाच सामान्यतः प्रयोग करीत असला; तरीही त्यांचे लेखन सामान्यांच्या लेखनाहून वेगळे वाटते. त्याच्या शब्दनिवडीवर, शब्दयोजनेतील विशिष्ट शब्दक्रमावर (यासाठी व्याकरणसंमत रूढ, प्रचलित शब्दक्रमात फेरबदल करण्यावर) त्याचे अनन्यत्व जाणवत असते. तो अनेकदा विचलित (Deviated) शब्दरूपे, भाषिक रूपे आपल्या साहित्यकृतीतून वापरतो, तर कधी परभाषेतील शब्दांचा वापर करतो किंवा तो स्वतः नवशब्दाची निर्मिती करतो. ह्याला नविनीकरण (Neologism) असे म्हणतात. महान कवींनी प्रातिभ कौशल्याने केलेली नवशब्दनिर्मिती भाषेच्या शब्दभांडारात मोलाची भर घालून तिला अधिक वैभवसंपन्न करते.

भाषेला नित्यनूतन करणाऱ्या या कवीच्या सर्व भाषिक विचलनांवर कवीची नाममुद्रा अंकित असते. विचलन हीच शैली होय. (Deviation is style) अशी व्याख्या केली जाते. व Style is a man हे तर सर्वश्रुत आहेच !

कवीच्या/लेखकाच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्वाचा कलात्मक आविष्कार म्हणजे शैली होय.

कवी/लेखक जी विचलित भाषारूपे आपल्या साहित्यकृतीतून वापरतो त्यांवरून त्याची शैली पारखता येते. या भाषारूपांतून शैलीची लक्षणे/निकष पाश्चात्त्य शैलीवैज्ञानिकांनी शोधून काढली आहेत. ह्यांना styleistic Devices (अर्थात् शैली-उपाय असे म्हणतात. विचलित भाषारूपांची विविध प्रकार्ये (Function) लक्षात घेऊन प्रमुख सोळा व पोटभेद सतरा मिळून तेहतीस शैली-उपाय मानले आहेत.[१] (मर्ढेकरांनी 'संदर्भोल्लेख' ह्या उपायांतर्गत 'संदर्भ-विचलन' हा शैली-उपाय (पोटभेद) शोधून काढल्याचे प्रस्तुत लेखकाने दाखवून दिले आहे.[२]

प्रस्तुत कवितेत उपयोजित शैली-उपायांचाच फक्त पर्याप्त परिचय पुढे करून दिला जाईल. तत्पूर्वी उपयोजित शैली-उपायांची कवितेतील उदाहरणे नोंदवू:-

कवितेत उपयोजित शैली-उपाय व त्यांची उदाहरणे

नामे : 'अभ्रांच्या अफूने पानांना गुंगी', 'वैशाखाच्या फांदीवरतीं आषाढाची गाजर-पुंगी', 'पंख-पाखरें पासहि', 'गाईच्या गळ्यांतली घंटा', 'कणीक रस्त्याची', अन्नामध्ये चोच घारीची, ब्रेक चाकांवरती, श्वासहि आगगाडीचा उसासा, धरणीच्या उरांत मघाचा, हवेंत पाउस-पातें, जगास वैशाखाच्या, मृगाविनाही मृगजल.

सर्वनामे : ह्या, ह्या.

विशेषणे : कुंद, हिरवी, पर्युत्सुक, मूक, गरोदर, उष्ट्या, कोरडी, कणिक, मऊ, मोकळी, ऊन, बिचारें, असल्या

क्रियाविशेषणे : इथें, तोवर, तेव्हां.

उ. अव्यय : पण.

क्रियापदे ये, वसली, फुलते, झुरते, झाली, थबकली, लागला, तुटला, अडला, शिरेल, शिरो, चढतें.

क्रमविशेषण : ओळी क्र. १-२, ५-६, ९ ते १२, १३-१४, १६ ते १८. (नामे, सर्वनामे, विशेषणे, क्रियाविशेषणे, शब्दालोप ही 'शब्दविवेक' ह्या मुख्य शैली-उपायाची उपांगे होत.)

वरील उपयोजित शैलीउपायांची ओळख :-

(१) शब्दविवेक : (Choice of words) - शब्दांच्या यथोचित व समर्पक निवडीला शैलीदृष्ट्या अत्यंत महत्त्व आहे. श्रेष्ठ कवी नेमक्या (most just) शब्दांच्या योजनेबाबत चोखंदळ व दक्ष असतात. त्याचप्रमाणे त्या शब्दांना कवितेत यथोचित स्थान देऊन शब्दांचा सन्मान करतात. Best words in the best order हे सूत्र उत्तम कलाकृतीची अनिवार्य गरज आहे. उचित स्थानी उचित शब्दांच्या योजनेमुळे सहचर शब्दांच्या समन्वयाने, संपूर्ण कवितेला सकल शब्दांचा समन्वित, एकसंध, एकात्म अर्थकेंद्र प्राप्त होते. ह्या केंद्राभोवती, त्याच्या कक्षेत सर्व संभाव्य अर्थवलये परिभ्रमण करीत असतात. तात्पर्य, कवितेच्या अर्थकेंद्रापर्यंत पोहचणाऱ्या मार्गावरील प्रवासाचा प्रारंभ शब्दाच्या उचित निवडीपासून म्हणजे शब्दविवेकापासून होत असतो. म्हणून शब्दविवेक हा अत्यंत महत्त्वपूर्ण शैलीउपाय आहे.

"Choice of words is important in poetry, indeed in a sense, it is the whole art of writing poetry." असे बोल्टन म्हणते.[३]

विशेषणे : समर्पक व नेमकी विशेषणे योजता येणे हे योजकाच्या परिपक्वतेचे लक्षण मानले जाते. "विशेषणांचा विपुल वापर हे प्रगल्भ साहित्य, अतिविकसित संस्कृती व विश्लेषणक्षम बुद्धी यांचे वैशिष्ट्य होय." असे रीड म्हणतो.[४] अर्थात, विशेषणांचा वापर सोद्देश, जाणीवपूर्वक व कौशल्याने करावयास हवा. तीच ती विशेषणे वारंवार वापरल्याने त्यांचे अर्थगुरुत्व लोप पावते. "रसिक वाचक जी विशेषणे गृहित धरतात ती टाळावीत व कृती, अभिरूची आणि अर्थ यांना पुढे नेणारी विशेषणे योजावीत."[५] असे रीड म्हणतो.

क्रियाविशेषणे : The words that can most easily be alterned in polishing a poem are

अनुक्रमणिका

adjectives and adverbs." असे एम्. बोल्टन म्हणते.[६] मर्ढेकरांनी विशेषणे, क्रियाविशेषणे (स्थल-कालवाचक क्रि. वि. वगळून) व केवळ अस्तित्वदर्शक विधानात येणारी क्रियापदे वगळून इतर सर्व क्रियापदे, ह्या शब्दांना प्रसरणशील आकाराच्या शब्दगटात स्थान दिले आहे,[७] हे लक्षणीय आहे. क्रियाविशेषणे अन्य सहचर शब्दांशी समन्वय साधून जेव्हा कवितेत अर्थव्याप्ती करतात तेव्हा ती अनेककार्यक्षम होतात.

प्रसरणशील आकार धारण करण्याचे स्वयंभू सामर्थ्य असलेल्या शब्दांना (येथे क्रियाविशेषणांना) अपरिमित अर्थलावण्य प्रकट करण्याचे असीम उपजत बळ (पोटेन्शियल) असते. हे सामर्थ्य शब्दांना कविप्रतिभेने बहाल केलेले असते. म्हणून कवीच्या शैलीचे सौंदर्य जाणून घेण्यास प्रसरणशील आकाराच्या शब्दांचा सूक्ष्म अभ्यास आवश्यक ठरतो. "In many instances adverbs are the key-words." असे यथार्थ उद्‌गार ब्रुक्स आणि वॉरेन ह्यांनी काढले आहेत.

बालकवींच्या कवितांमधून क्रियाविशेषण ह्या शैलीउपायाचे सुंदर, कलात्मक उपयोजन जाणवते. तात्पर्य, कवींच्या सूक्ष्मतरल अनुभूतींच्या तरलतम भावच्छटांचे, समर्पक क्रियाविशेषणांद्वारे, या सौंदर्यानुभूती शब्दाकार घेतात. ह्या शब्दाकाराला प्रसरणशीलता व प्रवाही चैतन्य प्राप्त होते. म्हणून चांगल्या कवीच्या कवितेतील विशेषणे, विशेषतः क्रियाविशेषणे, कवीच्या अंतर्मनाचा व शैलीचाही शोध घेण्यास सहाय्यक ठरतात.

क्रियापदे : A mature great poet gains a fewer effects from adjectives and adverbs and more from verbs." असे सांगून बोल्टनने क्रियापदांचे अनन्यसाधारण महत्त्व विशद केले आहे.[८] एका वाक्यात अनेक क्रियापदे वापरून गती, आवेग व नाट्य निर्माण करण्याचे कौशल्य कवी प्रकट करतात. चॅटबर्न म्हणतो, ''एखाद्या बराच वेळ चालू असलेल्या कृतीचा व/वा कृतीच्या मालिकेचा ओघ, लयीचे आरोहावरोह आणि क्रियापदांच्या काळातील फेरबदल कवी विशेष जाणिवेने करतो.''[९]

क्रमविपर्यय : (Inversion)

प्रचलित, व्याकरणसंमत असा वाक्यातील शब्दक्रम मोडून त्यात फेरबदल करणे म्हणजे शब्दक्रमभंग, व्युत्क्रम किंवा क्रमविपर्यय असे म्हणतात. विशिष्ट शब्दावर वा शब्दसंहतीवर मुद्दाम जोर देऊन, त्याकडे वाचकांचे लक्ष सर्वप्रथम वेधले जाऊन खिळवून ठेवणे हा या योजनेमागे हेतू असतो. आशयाला प्रभावित व प्रकाशित करून, तो अविलंबे वाचकांच्या मनात संक्रमित करणारा, हा प्रभावी शैलीउपाय आहे. क्रमविपर्यस्त रचनेमुळे, कवीला अभिप्रेत असलेले शब्द वाचकांशी लगेच संवाद साधतात. वाचकांना झटितिप्रत्यय आणून देणारा हा शैलीउपाय आहे. कवी व रसिक ह्यांच्यांत सत्वर सुसंवाद घडवून आणणारा हा 'शॉर्ट कट' आहे. कवी व रसिक ह्यांच्या वाङ्मयीन जाणिवांतून सौहार्द निर्माण करणारा हा कलात्मक व प्रतीतिरम्य शैली-उपाय आहे. हा शैली-उपाय भाषेचे विविधांगी शब्दसामर्थ्य व रचनासौंदर्य प्रकट करतो. मात्र हा शैली-उपाय कवीने प्रातिभ कौशल्याने व औचित्यविवेकाने हाताळावयास हवा. त्यामागे सुनिश्चित योजना (Plan) व सुस्पष्ट उद्देश (Motive) हवा.

येथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. छंदोबद्ध/वृत्तबद्ध कवितेत छंद/वृत्तयमकादी बंधनामुळे शब्दक्रमभंग करावा लागतो. असे क्रमविपर्यय, शैली-उपायांची उदाहरणे नव्हेत. शैलीच्या अभ्यासाला अशा उदाहरणांचा विचार, निरर्थक व निरूपयोगी ठरतो. ज्या क्रमविपर्यस्त उदाहरणांतून कवीची शैली दिसून येते, तीच उदाहरणे उपयुक्त मानावीत. अशी उदाहरणे शोधणे हे सूक्ष्म निरीक्षणाचे काम आहे. यासाठी 'शैली-पारखी' नजर हवी.

आता उपयोजित शैलीउपायांच्या उदाहरणांची वर नोंद केलेली आहे, त्यांपैकी वेचक उदाहरणांची शैली-विश्लेषणात्मक चर्चा पुढे केली आहे व कवीच्या शैलीसौंदर्याचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.

दोन

शैलीविश्लेषण व सौंदर्यप्रतीती

उपयोजित शैली-उपायांची सोदाहरण चर्चा :

(१) ''अभ्रांच्या ये कुंद अफूनें'' (ओळ क्र. १)

ढगांना मेघ, अभ्रे, जलद असे पर्यायी शब्द असताना मर्ढेकर, 'अभ्रे' हा पर्याय निवडतात. 'अभ्रांच्या' हा तीन

गुरू अक्षरांनी युक्त सहा मात्रांचा शब्द वदलायचा झाल्यास 'मेघांच्या' हा पर्याय कवीजवळ होता. मग 'अभ्रांच्या' ह्याच शब्दांची निवड का करावी ? अभ्रे ढग हे तर आहेतच; अभ्रे (ढग) आकाशात दाटी करून आले की आकाश झाकोळून जाते. कधी आकाश पूर्ण झाकले जाते. 'उशांची अभ्रे' असा शब्दप्रयोग केला जातो. येथे उशांचे 'कव्हर्स', आवरण. आच्छादन हा अर्थ अभिप्रेत असतो. आकाशातील अभ्रांच्या घनदाट गर्दीने स्वच्छ आकाश दिसेनासे होते. वातावरण कुंद होते. निस्तेज व मलूल होते. आर्द्र झालेसे वाटू लागते. वैशाखाच्या तप्ततापद उन्हात, जिवाची काहिली करणाऱ्या उन्हात या सान्द्र, कुंद वातावरणात पानांनाही हिरवी गुंगी आली आहेसे वाटू लागते.

अभ्रांचा विशाल पडदा, जणू धरणी व आकाश ह्यांच्यामध्ये पसरल्याने, आकाशातील व वातावरणातील सत्यस्थिती पडद्याआड आहे, ती झाकली गेली आहे, दृष्टिआड आहे, म्हणून कुंद वातावरणाच्या तात्कालिक व आंशिक कालापुरत्या दृष्टिभ्रमामुळे, वास्तव अभ्राआड जाऊन, अभ्रांच्या कुंद अफूच्या गुंगीत पानेही हिरवा तजेला लेवून नटली आहेत, हा ऋतुभ्रम ढगांच्या पडद्यामुळे (आच्छादनामुळे) घडला, हे स्पष्ट व्हावे म्हणतात; तो हा होय. ढगांच्या अन्य पर्यायी शब्दांनी हे साध्य झाले नसते.

ह्या ओळीत 'गुंगी' ह्या शब्दाला अन्वर्थक 'अफू' ह्या शब्दाचा प्रयोग करण्यात कवीचा औचित्यविवेक दिसून येतो. शेतात काम करणाऱ्या बायका लहान मुलांना अफूची गोळी देऊन, त्या गुंगीत तास दोन तास त्यांना झोपवून निश्चिंतपणे आपली कामे करतात. येथे अफूची प्रतिमा वापरून, अभ्रांच्या सघन उपस्थितीने जे कुंद, अभ्रधुंद, ढगाळ मुग्ध-मलूल व मानवावर एक अनोखी बेहोषी आणणारे वातावरण उत्पन्न होते. हीच कुंद अफूने येणारी गुंगी होय. कुंद या यथोचित नेमक्या विशेषणाच्या योजनेने वातावरणातील 'बोलके मौन' मर्ढेकरांनी व्यक्त केले. कवितेत पुढे जे पाने, पाखरे, गाय, घार, धरणी ह्यांच्या मनातील आभासात्मक कल्पनाचित्र शब्दांकित केले आहे, त्याचे संसूचन होते. पुढील "वैशाखाच्या... गाजर-पुंगी" (ओळी क्र. ३ व ४) या दोन ओळींमधून या संसूचनाची खात्रीच पटते.

(२) "पानांना ये हिरवी गुंगी" (ओळ क्र. २)

अभ्राच्छादित कुंद (कोंदलेले, कोंदट) वातावरणाने सर्वत्र निस्तेज, कोमेजलेला, झाकोळलेला प्रकाश असतो. या कुंद वातावरणाची गुंगी, एक प्रकारचे आलस्य, स्थिर-चर सृष्टीवर सावट पसरलेले व एक प्रकारे ग्लानीत, वैशाखातच (हा वैशाख नंतर ज्येष्ठ-श्रावण इ. वृक्षपर्णांना, पाखरांना कोठून माहीत असणार? अभ्रांच्या पाठोपाठ मेघवर्षा होणार, हे मात्र त्यांना माहीत असते ! वसंतात वृक्षांना नवी पालवी आल्यावर कोवळ्या पानांना हलका लालसर, पोपटी चमकदार रंग चढतो खरा; पण) वैशाख-वणव्यात ग्रीष्माच्या तप्त-तापद उन्हात वृक्षपर्णे कोरडी, निस्तेज, सुकल्यागत झालेली ! आता ह्या 'अभ्रांच्या कुंद अफूने' पानांची 'वर्षागमाची स्वप्ने' साकार होत आहेत, ह्या कल्पनापूर्तीची आभासमय गुंगी चढली आहे. सुकलेल्या पानांवर जलधारांनी टवटवी येईल, हिरवी कांती चढेल, ही स्वप्ने ती शुष्क पर्णे 'अभ्रधुंदीत' पाहू लागतात. हीच पानांना आलेली हिरवी गुंगी होय. एक प्रकारची उन्मत्त बेहोषी मनाला प्रसन्न, प्रफुल्ल करणारी, रोमांचित करणारी सुखद नशा ही ह्या सर्व अर्थ-छटा अभिसूचित करणारे 'हिरवी' हे विशेषण कवी वापरतात. हिरवेपणा म्हणजे अवखळपणा, ताजेपणा, चंचलता, नशा ! 'गुंगी' या शब्दाला 'हिरवी' हे विशेषण योजण्यात, मर्ढेकरांचे मार्मिकयोजनकौशल्य प्रकट झाले आहे.

अपरिचित विशेषण-विशेष्यांच्या जोड्या तयार करणे हे मर्ढेकरी शैलीचे पृथगात्म वैशिष्ट्य आहे. (उदा. भोळा अश्रू)

(३) "वैशाखाच्या ...गाजर-पुंगी" (ओळी ३-४)

वैशाखानंतर ज्येष्ठ नंतर आषाढ... इत्यादी. पण ज्येष्ठातही ग्रीष्माच्या तप्त झळा अंगाची दाहकता वाढवणारच. तोहि महिना कोरडाच जाणार. पण असे वैशाखातच सुरू होणारे अग्नितांडव साहणे कठीण होत असताना आकाशात अभ्रांची दाटी होऊन कुंद झालेल्या वातावरणामुळे वर्षागमनाची सूचनाच ही अभ्रे देत असल्याचा आभास निर्माण होऊन 'आषाढस्य प्रथम दिवसे...' ह्या शब्दांनी सुरू होणाऱ्या खास

शैलीत वैशाखाच्या फांदीवरतीच आषाढाची गाजर-पुंगी वाजणार ! म्हणजे वैशाखाचा आधार घेणारा, वैशाखाच्या कोरड्या फांदीच्या आधाराने उभा होऊ पाहणारा (ज्येष्ठ तर सोडाच !) आषाढही फुसकाच ठरणार ! कोरडाच राहील. हाच भाव व्यक्त करताना वरील दोन ओळीतील 'वैशाखाची फांदी', 'गाजर-पुंगी' ह्या प्रतिमा-प्रतिकातून मर्ढेकरांनी नेमका आशय सूचित केला आहे.

मर्ढेकरांच्या कवितेतील शब्दांचे अर्थ वाच्यार्थाने घ्यायचे नसतात. 'पानांना ये हिरवी गुंगी' असे कवी लिहितात. फांदीवरील पानांना हिरवी गुंगी वैशाखातच अभ्रांच्या कुंद अफूने आली असली तरी तो भ्रमच ! पण पानांचे हे स्वप्न साकार व्हायचे असेल तर किमान आषाढ तर येऊ द्या ! हा आषाढ तूर्त अभ्राच्छादित कुंद वातावरणामुळे वैशाखातच आल्याचे सांगताना कवी इथे वैशाखाच्या फांदीवर (आधारावर, पायावर) सुखद आषाढ आल्याचे वर्णन करतात. पण हे आषाढाचे आगमन सुद्धा स्वप्न, भास वा गुंगीच आहे, हे गाजर-पुंगी ह्या प्रतिमेतून कवी सुचवितात. गाजराची पुंगी ! वाजली तर वाजली नाहीतर मोडून खाल्ली !' ह्या वाक्प्रचाराचे गाजरपुंगी ह्या शब्दातून अप्रत्यक्ष स्मरण देऊन आषाढही कोरडा जाईल, हे ध्वन्यर्थाने सुचवितात. पहिल्या चार ओळींतून काकुळतीने, चातकप्रतीक्षेने पावसाची वाट पाहणाऱ्या पानांची, पाखरांची, गाईची, घारीची व धरणीची वेदना पुढच्या कडव्यांमधून कवी व्यक्त करतात.

सूक्ष्मपणे पाहिल्यास लक्षात येईल, की पहिले कडवे (ओळी १ ते ४) कवितेच्या प्रास्ताविकासारखे म्हणजे विषय-प्रवेशासारखे आहे. कमीत कमी शब्दांत प्रतिपाद्य विषयाच्या गाभ्यालाच हात घालण्याचे कौशल्य मर्ढेकरी शैलीत आहे.

(४) ''मिटून बसलीं पंख पाखरें'' (ओळ ५)

पर्जन्यानुकूल आभासमय, स्वप्नस्थ वातावरणाच्या गुंगीत पाखरेही एरवी पर्युत्सुक, उत्साही, उंच नभात झेप घेऊ पाहणारी, पंख मिटून बसली आहेत. त्यांचे एकही पीस फुलत नाही.

'पर्युत्सुक' हे पाखरें या नामाचे विशेषण आहे.

वा. शि. आपटे ह्यांच्या संस्कृत-इंग्रजी शब्दकोशात 'पर्युत्सुक' ह्या शब्दाचे असे अर्थ आहेत :-

१. Sorrowful, sorry, regretting, sad, sarrow. त्वम् पर्युत्सुकी भवति यत् सुखितोऽपि जन्तुः।
२. Eagerly, Desirous, Anxious, anxiously longing for. स्मर पर्युत्सुक एष माधव ।
३. Agitated, excited. मुहूर्त पर्युत्सुक मना आसीत्।

प्रस्तुत ओळीत (क्र. ६) पाखरांच्या संदर्भात या विशेषणाचा अर्थ दुःखी, कष्टी, (१) व उत्सुक, एखादी गोष्ट मिळावी याची अनिवार प्रबळ इच्छा असलेली (पाखरे) (२) हे अर्थ लागू पडतात. पाऊस येईल या (स्वप्नस्थ कल्पनेने) प्रथम excited, व पाऊस येत नाही म्हणून दुःखी (sad) - अशा तीनही अर्थच्छटा येथे 'पर्युत्सुक' शब्दाच्या योजनेत कवीने दाखविल्या आहेत.

पाखरांना 'पर्युत्सुक' हे मर्ढेकरांनी योजलेले विशेषण एकाच वेळी कवीच्या बहुप्रसव अर्थक्षम शब्दयोजनेचे सौंदर्य प्रकट करते. वर्षागमाच्या सत्याभासात, गुंगीत रोमांचित व हर्षोन्मादित झालेली मने आभासातून, ग्लानीतून बाहेर येताच मलूल, निस्तेज व दुःखी होतात. ती पाखरे पावसाची आतुरतेने वाट बघत होती. त्यांचे औत्सुक्य, प्रतीक्षा व उत्कंठा शिगेला पोहचली होती. पण अंती निराशाच पदरी पडली. त्यावर पाखरांची प्रतिक्रिया काय तर, 'मिटून बसली... फुलते.' मोजक्या व नेमक्या शब्दांत पाखरांच्याही भावना व्यक्त करणाऱ्या मर्ढेकरांच्या शब्दविवेकाला (Choice of words) दाद द्यावी लागते. पर्युत्सुक या शब्दाने तर शब्दयोजनकौशल्याचा कळस गाठला आहे. पाखरांची मूक भावना कवीला कळली. आता पुढील दोन ओळी बघा.

(५) ''मूक गरोदर...घंटा झुरते'' (ओळी ७-८)

या ओळींमध्ये गायीची मूक व गरोदर ही विशेषणे आणि 'झुरते' हे 'घंटा' ह्या कर्त्याचे क्रियापद शैलीदृष्ट्या अत्यंत प्रभावी व परिणामकारक आहे. गायीच्या स्थितीचे कारुण्यमय वर्णन व प्राण्यांच्या भावना-हर्ष, खेद, आनंद-दुःख इत्यादी-त्यांच्या विशिष्ट नादोच्चारातूनच प्रकट होतात. गायीच्या

हंबरण्यातील विभिन्न नादोच्चारातून विविध भावप्रकटीकरण होते.

प्रस्तुत पहिल्या ओळीत 'मूक' ह्या शब्दातून तिचे हंबरणेही थांबले आहे, ते बळ तिच्यात नाही, हे कवी सुचवितात. तिच्या हंबरण्याचे काम तिची गळ्यातली घंटा करते. वैशाखाच्या अंग भाजून काढणाऱ्या आगीत खायला चारा नाही. असला तरी, अन्नावरची वासनाच उरली नाही. या भुकेच्या व तहानेल्या अवस्थेत त्यातही ती गरोदर असल्यामुळे गर्भभाराने वाकलेली व थकलेली, मूकपणे गलितगात्र होऊन शांत बसलेली ! महत्प्रयासाने कधी अंगावर बसलेल्या गोमाशा उडविण्याच्या प्रयत्नात तिची मान हलकीशी हलली तर तिच्या हालचालीची (जिवंतपणाची) साक्ष देणारा ! वारंवार होणाऱ्या क्षीण, कापऱ्या घंटानादातूनच गायीच्या भावना व्यक्त होत आहेत. हे कवीने ''गळ्यातली पण घंटा झुरते'' ह्या शब्दांत सांगून, 'झुरणे' ह्या नेमक्या (Most just) क्रियापदातून गायीची अगतिकता, अस्वस्थता, दुर्बलता नेमकी टिपली आहे. केवळ 'घंटा झुरते', असे नाही, तर 'गायही झुरते' आहे, हे 'पण' ह्या अव्ययाद्वारे कवी सूचित करतात, ते कसे, हे आपण बघू.

'पण' हे अव्यय येथे 'सुद्धा' (also) या अर्थाने कवीने उपयोजिले आहे. गायीची घंटा पण (सुद्धा) झुरते, असे कवी लिहितात. मग या वाक्यापूर्वीचे शब्द काय असावेत ? ते शब्द कवीने वगळले आहेत. (शब्दलोप (Deletion) हा पण एक शैली-उपाय आहे.) 'गाय तर झुरतेच आहे' हे वगळलेले वाक्य आधी घेऊन पुढे 'गळ्यातली घंटा पण झुरते आहे' हे वाक्य जोडले की 'पण' ह्या अव्ययाने काय चमत्कार केला हे कळते. 'गाय तर झुरतेच आहे' हे व उपवाक्य प्रत्यक्षात नसूनही 'पण' ह्या अव्ययाने कवीचे अलिखित वाक्य उपस्थित केले आहे. व 'शब्दलोप' ह्या शैलीउपायाचा अवलंब करून शब्द तर वगळले व 'पण' ह्या अव्ययाद्वारे ते लुप्त शब्द रसिकांना अंदाजता यावेत, याची सोयही करून ठेवली. मर्ढेकरांचा शैलीचमत्कार स्पृहणीय आहे. गायीच्या गळ्यातील घंटा झुरणे हे सांगून व 'पण' हा शब्द टाकून 'गाय तर झुरतेच आहे' हे सुद्धा आडवळणाने कवी सांगतातच. गायीचे झुरणे घंटेच्या झुरण्यातूनच कळते. येथे मूक गरोदर गायीची भावना निःशब्दतेतून (व शब्दलोपातून) शब्दांकित केली आहे. गरोदर गायीच्या आत्यंतिक वेदनेशी तिच्या गळ्यातील घंटाही समरस झाल्याचे वर्णन केल्याने 'झुरते' या क्रियापदाने घंटेचे मानुषीकरणही अनुषंगाने साधले गेले आहे. (मानुषीकरण हा सुद्धा अर्थप्रधान शैलीउपाय आहे.)

तात्पर्य, नेमकी विशेषणे, अर्थवाही क्रियापद व अल्पाक्षररमणीयत्व प्रदर्शित करणारे अव्यय व काही शब्दांना वगळूनही त्या शब्दांचे अस्तित्व जागते ठेवणाऱ्या अव्ययांची ('पण') योजना यांमुळे या ओळींचे शैलीसौंदर्य दुणावले आहे.

(६) तिंबुन झाली... ह्या रस्त्याची.'' (ओळी ९.१०)

ह्या दोन ओळींत शैलीदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असे काही नाही. अर्थ स्पष्ट आहे. वाच्यार्थच येथे अभिप्रेत आहे. डांबरी रस्त्याचा संदर्भ आहे. वैशाखाच्या उन्हात रस्त्यावरील डांबर वितळून मऊ व गिट्टीपासून सुटून मोकळे होऊन पृष्ठभागावर येते व पादचाऱ्यांच्या पायदळी तुडविले जाऊन मऊ व मोकळे होते. यातून कणिक तिंबुन मऊ झाल्याची कल्पना मर्ढेकरांना सुचली असावी.

(७) ''उष्ट्या अन्नामध्ये...घारीची'' (ओळ ११-१२)

घारीची नजर भक्ष्यावर, उकिरड्यावर फेकून दिलेल्या उष्ट्या व शिळ्या अन्नावर असते. पण वैशाखी तप्त उन्हात या उष्ट्या वा शिळ्या अन्नातील जलांश संपून अन्न कोरडे झालेले ! अशा शुष्क अन्नामध्ये घातलेली घारीची चोच थबकली, यात नवल ते काय ? ते अन्न खाण्याची तिची इच्छा नव्हे; धाडस तिला होईना ! आपण थबकतो, अचानक दचकतो व सावध होतो ते केव्हा ? पुढे धोका आहे, ही शंका येते तेव्हा ! (पहा- ''थबकलाच जागीं सर्प घालुनी वळसा'' - कुसुमाग्रज, 'अहि-नकुल') शिळे, उष्टे अन्न धोकादायक असू शकेल. एकतर विषमय झाले असेल किंवा कोरडे अन्न घशात अडकेल, ते पाण्यावाचून घशाखाली कसे उतरेल ? म्हणून उष्ट्या अन्नामध्ये घारीची चोच कोरडीच राहिली, हे कवी लिहितात. 'थबकली' या

अर्थपूर्ण क्रियापदाने घारीच्या नजरेने व चतुराईने हे सर्व जाणले, असे मर्ढेकरांनी संसूचित करून 'थबकली' ह्या क्रियापदाचे औचित्य व शैलीय सौंदर्य प्रकट केले आहे.

'पाऊस येणार' ह्या गुंगीत किती काळ राहणार ? मृगतंद्रीत कदाचित् मृगतृष्णा भागेलही; पण जलतृष्णा कशी भागणार ? स्वप्नांच्या दुनियेत घारीचीही चोच कोरडीच राहते, पाखरेही पंख मिटून गप्प, शांत पडलेली असतात व गाय तिच्या गळ्यातील घंटेसह झुरत असते. अभ्रांचा पडदा बाजूला केला की वास्तवातील वैशाख-उन्हाचे तांडव पाहून पीडित झालेल्या मूक, असहाय्य जीवांचे कारुण्य प्रखरपणे जाणवू लागते. सत्य आणि सत्याभास ह्यातील भयचकित करणारा भेद वैशाखउन्हापेक्षाही अधिक तप्त-तापद होतो.

ह्या सर्व अर्थ-छटांच्या उद्‌भवाला प्रेरक मर्ढेकरांचा शब्दविवेक व त्यांची विविधरूपधारिणी शैली होय.

(८) "ब्रेक लागला... आगगाडीचा"(ओळ १३-१४)

वैशाख-उन्हाचा प्रभाव सजीव सृष्टीवरच झाला असे नव्हे, तर यंत्रांवरही झाला. (व होतो.) बाहेर प्रचंड गरमी, असह्य तापमान व आगगाडीचे इंजिनही खूप तापलेले ! (बोलून-चालून ती 'आग'गाडी ना?) वारंवार ब्रेक लावताना चाकांवर घर्षण होऊन ('घर्षण-विद्युत' निर्माण होऊन) कधीतरी ब्रेक तुटणारच ! अचानक चाकांवर ब्रेक लागला. आणि आगगाडीचा श्वास तुटला. गाडी एका ठराविक गतीने धावत होती तेव्हा तिचा श्वास लयीत-समकालिक अंतराने वारंवार (हृदयाचे ठोके चालतात तशा विशिष्ट ठेक्यात) चालणारा हा श्वास ब्रेक लागताच तुटला. लय खंडित झाली. तसेच वैशाखातच अभ्रधुंद स्थितीमुळे नियमित चालणारे ऋतुचक्राचे वेळापत्रक-ऋतुचक्राचा श्वास तुटला. वैशाख-ज्येष्ठ यांचे श्वास तर तुटलेच (खंडित झाले) व आषाढाचाही ठेका 'गाजर-पुंगी' ठरणार काय, असा संदेह निर्माण झाला. आगगाडीचा ब्रेक या प्रतिमेतून मर्ढेकरांना हेच जर सुचवायचे असेल तर ह्या प्रतिमेच्या योजनेत त्यांचे शैलीय सौंदर्यच प्रतीत होते. ऋतुचक्राच्या लहरींवर मानवीच नव्हे तर अमानवी व अचेतनांचेही जगणे अवलंबून असते, हेच कवी 'श्वासहि तुटला' ह्या शब्दातून सुचवीत तर नाहीत ना ?

(९) "ऊन उसासा... इथें मघांचा."

उसासा कष्टाने वा दुःखाने टाकला जातो. प्राप्त परिस्थितीवर आपला उपाय नसतो, इलाज नसतो. तेव्हा फक्त उसासा टाकून आपली मनोव्यथा व्यक्त करतो. वैशाखात धरणी अंतर्बाह्य होरपळून, भाजून निघत असल्याने, तिने टाकलेला उसासा 'ऊन'च असेल. नाही का ? म्हणून 'उसासा' ह्या शब्दाला कवीने दिलेले 'ऊन' हे विशेषण औचित्यपूर्ण व अर्थसंपन्न आहे. हा 'मघाचा' उसासा म्हणजे मघा नक्षत्रही पर्जन्यरहित गेल्याने धरणी अंतर्बाह्य कोरडी राहिली; म्हणून तिच्या काळजात मघा नक्षत्राचा ऊन उसासा अडला आहे. मघा हे पावसाचे नक्षत्र कोरडेच गेल्यामुळे धरणीचे दुःख, तिची वेदना ऊन उसास्यातून व्यक्त व्हायला हवी, पण अतिशय दुःखामुळे, नैराश्यामुळे व अपेक्षाभंगामुळे हा उसासा बाहेर न पडता उरातच अडला आहे. धरणीच्याही नाजुक, मृदुतरल भावनांची कुसुमकोमलता 'उरात अडला' ह्या नेमक्या शब्दांनी मर्ढेकरांनी चकोरतलशाच्या नाजुक चोचीने टिपली आहे.

(मघा नक्षत्र हे पावसाचे नक्षत्र असून ते साधारण १७ ऑगस्ट ते २९ ऑगस्टच्या दरम्यान असते. जेव्हा ह्या काळात पाऊस पडतो, तेव्हा तो कोसळून पडतो. अन्यथा मघा नक्षत्र कोरडेच जाते. 'मघा । वर बघा' अशी लोकोक्तीच आहे.)

ऊन उसासा मघाचा आहे, अशी कवी कल्पना करतात. पण मघा नक्षत्र कोरडे गेल्याने वैशाखापासून अंतर्बाह्य उष्ण राहिलेल्या धरणीची धग शांत झालीच नाही. मघा नक्षत्रही कोरडे गेल्याने धरणीच्या काळजात खोलवर दडलेला व उरात अडलेला 'ऊन उसासा' मघाचा नसून, कोरड्या मघा नक्षत्राच्या प्रभावाने धरणीच्या काळजात दडलेला, तिचाच उसासा आहे.

पर्जन्यरहित मघाचा परिणाम धरणीवर झाल्यामुळे हा उसासा मघाचा आहे, असे कवी लिहितात. कवीचे समर्थन करायचे झाल्यास असे करता येईल :-

मघा नक्षत्राचा पाऊस एकदाच येऊन धरणी भिजली व पाणी धरणीच्या उरात शिरले. पुढे मघा नक्षत्र कोरडे

गेले; तरीही भिजल्या जमिनीतून गरम वाफा वाहेर येऊ लागल्या, की हाच जणू धरणीच्या उरात अडलेला मवाचा ऊन उसासा असे मानता येईल. तात्पर्य, मघा नक्षत्र संपूर्ण कोरडे गेले तर धरणी आणखी दुःखी होणार म्हणून 'ऊन उसासा' धरणीचाच राहील, व पावसाची सर येऊन गेली की हा 'ऊन उसासा' मघा नक्षत्राचा हे मान्य करता येईल.

पावसाच्या वेळांचे नक्षत्रांचे वेळापत्रक नेहमीच चुकते. (जसा हवामान खात्याचा अंदाज !) म्हणून शेवटल्या कडव्यात मर्ढेकर लिहितात, "शिरेल तेव्हा शिरो विचारे... चढते."

(१०) "शिरेल तेव्हा... मृगजल चढते." (ओळ १७-२०)

पहिले कडवे हे जसे 'प्रास्ताविक' आहे, तसेच अंतिम कडवे (ओळी १७ ते २०) समारोपासारखे आहे. सर्वच पर्जन्यनक्षत्रे कोरडीच जाऊ लागली आहेत. सृष्टीचे कालचक्र आणि ऋतुक्रम भलत्या वेळी भलते रंग वातावरणात भरू पाहत आहे. म्हणून पावसाची अनिश्चितता पाहून कवी 'शिरेल तेव्हा... पाऊस पातें" असे लिहितात. ह्या अनिश्चित स्थितीसूचक विशेषण आहे. असल्या म्हणजे भलत्या, विपरीत, प्रतिकूल परिस्थितीत हे 'पाऊस-पातें' (तलवारीचे पाते यासारखे पाउस-पातें हा शब्द मर्ढेकरांनी तयार केला आहे. ही नवशब्दनिर्मिती म्हणजे नवीनीकरण/Neologism हा शैलीउपाय होय.) शिरेल तेव्हा शिरो. येथे 'विचारे' हे विशेषण 'पाउस-पाते' ह्या शब्दाचे आहे. बिचारे ह्या विशेषणनि पावसाची अगतिकता, दुर्बलता, परावलंबित्व, असहाय्यता, नेमकी टिपली गेली आहे. असल्या हवेत पाउस-पाते शिरणे पावसाच्या स्वाधीन नाही, हा सर्व ऋतुकालचक्राचा चमत्कारिक लपंडाव आहे. त्यामुळे 'बिचारे' हे पाउस-पात्याचे विशेषण व 'असल्या' हे हवेचे विशेषण. ही दोन्ही विशेषणे कवीने साभिप्राय अर्थपूर्ण वापरली आहेत, हे स्पष्ट दिसते. ह्या विशेषणांनी पाऊस व हवा ह्यांची असहाय्यता व लहरीपणा अधोरेखित झाला आहे.

पुढे कवी लिहितात, वैशाखाच्या जगास तोवर मृगाविनाही मृगजल चढते." येथे 'तोवर' पासून सुरू होणाऱ्या वाक्यापूर्वी एक उपवाक्य (Subordinate clause) आहे. हे उपवाक्य अध्याहृत आहे. लुप्त आहे. ते उपवाक्य असे असेल- 'जो'वर प्रत्यक्ष पाउस-पाते शिरत नाही' तोवर वैशाखाच्या जगास म्हणजे वैशाखाच्या वातावरणात सध्या असलेल्या सकल सृष्टीत, मृग नक्षत्रावाचूनही मृगजल चढते, असे कवी लिहितात. म्हणजे वैशाखातील अभ्राच्छादित आकाशामुळे वातावरणात तयार झालेल्या ऋतुकाळभ्रमामुळे जी पर्जन्यागमाची गुंगी/नशा चढली आहे, त्यामुळे वैशाखातच मृगनक्षत्रावाचून मृगजल (येथे मृगजल म्हणजे मृग नक्षत्राचा पाऊस हा अर्थ उचित वाटतो) चढते. अर्थात मदिरेची नशा चढावी, तशी मृगजलाची (न पडलेल्या मृगवृष्टीची) नशा चढते, हे कवीला अभिप्रेत आहे.

याशिवाय मृग-हरीण व मृगजल म्हणजे हरिणाला होणारा जलभ्रम हा अर्थ कुणी घेतला, तरीही वैशाखात मृग नक्षत्र नसले, तरी हरीण तर असतो. वैशाखाच्या तप्त वाळवंटात हरिणाला मृगजल दिसते. म्हणून मृग नक्षत्रावाचून (मृगाविना) मृगजल (जलभ्रम, पाणी असल्याचा/पाऊस येणार असल्यास भ्रम) चढते, असा अर्थ घेता येईल.

वृक्षपर्णे अजून हिरवी झालेली नसताही हिरवी गुंगी चढते, तसेच वैशाखात मृग नक्षत्र नसतानाही सकल सृष्टीवर मृगजल चढते, यात आश्चर्य ते काय ? सर्व जगालाच ही हिरवी गुंगी-सर्व सृष्टी हिरवीगार होणार ह्या सुखद कल्पनेची नशा चढली आहे; ही आशा व हीच नशा ! ह्या आशेवर जगणे हेच जीवन आहे.

'मृगाविनाही मृगजल चढते' ह्या अंतिम ओळीत जीवनाचे सूत्र आहे. सुखी जीवनाचा मूलमंत्र तर नसेल यात ? आता क्रमविपर्यय ह्या महत्त्वपूर्ण शैली-उपायाच्या दोन उदाहरणांची चर्चा करू.

क्रमविपर्यय : वाक्यातील/काव्यपंक्तीतील शब्दांचे विशिष्ट एकमेव स्थान शैलीसौंदर्यदृष्ट्या निश्चित करण्यासाठी हा शैलीउपाय योजला जातो. (वर या उपायाची शास्त्रीय ओळख झाली आहेच.)

उदा. - "अभ्रांच्या ये कुंद अफूनें" (ओळ क्र. १)

ह्या ओळीत 'अभ्रांच्या' ह्या शब्दाला पहिल्या ओळीत प्रथम स्थान दिले आहे. अर्थात् कवीला हा

शब्द महत्त्वाचा वाटतो, हे स्पष्ट आहे. संपूर्ण कविता वाचल्यानंतर पानांना हिरवी गुंगी असो, वा सर्व जगावरच मृगजलाची नशा असो, ह्या सामुहिक बेहोषीला, सांघिक जलभ्रमाला कारण अभ्रे व त्यांची कुंद अफू होय.

म्हणूनच कवितेतील ऋतुचक्राचे वेळापत्रक चुकल्याचे कारण कवितेतील पुढील सर्व ओळींच्या निर्मितीचे कारणच पहिल्या ओळीत (अभ्रांच्या... अफूने) आहे. हे शब्द पहिल्या ओळीत येणे हा शैलीदृष्ट्या न्याय्य क्रम आहे. ह्या ओळीत 'अभ्रांच्या' हा 'प्राइम वर्ड' आहे. म्हणून हा शब्द सर्वप्रथम आहे. 'ये' क्रियापद मध्येच आल्याने ही क्रमविपर्यस्त रचना आहे. आता ही रचना लयदृष्ट्या व सौंदर्यदृष्ट्याही कशी आकर्षक ठरते ते बघू :-

(कवीची रचना) - ''अभ्रांच्या ये कुंद अफूनें''

(२) पर्यायी रचना : ''ये अभ्राच्या कुंद अफूने''

(३) पर्यायी रचना : ''कुंद अफूने ये अभ्रांच्या''

वर आतापर्यंत जी चर्चा केलेली आहे, त्यावरून कवितेत सर्वच ओळीमधून वातावरणातील बदलांचे, ऋतुकालचक्रामुळे तदनुसार काहीही न घडता वैशाखातच 'अभ्रधुंदी'मुळे आषाढासारखे वातावरण व्हावे व अखिल सृष्टीवर 'हिरवी गुंगी' चढावी, वैशाखात 'मृगजळाची नशा' चढावी, याचे मुख्य कारण मुळी अभ्रांनी आकाश पूर्णपणे झाकून टाकावे व त्या अभ्रांच्या कुंद अफूने सारा आसमंत अनोख्या नशेत गुंग, बेहोष रहावा ही किमया अभ्रांची आहे. म्हणून 'अभ्रांच्या' ह्या शब्दाचे पहिल्या ओळीतील पहिले स्थान- सर्वप्रथम स्थान- कवीकडून दिले जाऊन क्रमविपर्यय या शैलीउपायाद्वारे अर्थसौंदर्याने शब्दाचा गौरव केला आहे.

वरील तीन रचनांमध्ये कवीच्या रचनेतील लयसौंदर्य व नाद ओळीला उठाव आणतो. 'अभ्रां'च्या या शब्दात 'भ्रा' हे जोडाक्षर म्हणून 'अ' नंतर लगेच आघात (त्यामुळे 'अ'च्या दोन मात्रा) व या आघातामुळे 'भ्रा'वर जोर (stress) आल्याने ह्या संपूर्ण शब्दाचा ठसठशीत उच्चार, 'भ्रा'वरील अनुस्वार यामुळे या शब्दाचे महत्त्व नादोच्चारातून स्पष्ट होते. 'भ्रा' वरील अनुस्वार 'कुंद'- मध्ये पुन्हा 'कु'वर येऊन ओळीतील पूर्वार्ध व उत्तरार्ध अनुनादांचे संतुलन राखतो व लयसौंदर्य अबाधित राहते. तात्पर्य, कविकृत क्रमविपर्यस्त रचना लयवती, ओघवती व नादमधुर म्हणूनच स्वीकार्य ठरते.

(२) ''मिटून बसलीं पंख पाखरें'' (ओळ ५)

'मिटून बसली' हे क्रियापद आरंभी व 'पाखरें' हा शब्द-कर्ता शेवटी आल्याने ह्या ओळीतही क्रमविपर्यय आहे. वैशाखातील अभ्रधुंद वातावरणामुळे पानांना हिरवी गुंगी आली, वैशाखात आषाढ सुरू झाल्यासारखे वाटू लागले आणि पाखरांनाही पावसाची स्वप्ने दिवसा दिसू लागली. आधी तप्त उन्हात, उष्ण हवेत बाहेर उडणे शक्य नव्हते. आता तर पावसाची चाहूल लागल्याने पाखरांनी आपले पंख मिटून घेतले. अंग पंखांत लपेटून स्वतःला सुरक्षित करून घेतले. वातावरणात अचानक बदल झाला, थंडीची लाट आली की आपण नाही स्वेटर्स घालतो. हवेतील बदल आपणास कृतिसिद्ध करतो. पाखरांचे पंख मिटून बसणे, घारीची चोच थबकणे इत्यादी क्रियापदे हवा बदलानंतरची प्रतिक्रियाच व्यक्त करतात. पाखरे नाजुक! हवेतील थोड्या बदलानेही ती कावरीबावरी होणार ! म्हणून त्यांची प्रतिक्रिया व्यक्त करणारे 'मिटून बसली' हे शब्द आरंभी आणून भावानुकूल क्रमविपर्यय साधला आहे. मर्ढेकरांचा औचित्यविवेक इथे दिसून येतो.

एक छोटीशी गोष्ट येथे बघा. या ओळीतील सर्व शब्दांचा आरंभ 'प' वर्गातील व्यंजनानी झालेला आहे. (म-ब-प-प) हे सहज घडले असावे. मर्ढेकर मुद्दाम प्रासयुक्त रचना करीत नाहीत. तो त्यांचा स्वभाव नाही.

मर्ढेकरांनी या (व अन्य) कवितेतून नवनवे शैलीय उन्मेष प्रकट करून सुज्ञ रसिकांना आपल्या प्रातिभ कौशल्याने नवनवे भावरंग दाखवूनन दिले आहेत. जितके खोलात जावे तितके नवे आविष्कार हाती लागतात. त्यांच्या अनेक कविता वारंवार वाचताना वाचकांना पुनः प्रत्ययाचा आनंद मिळतो असे नाही; तर प्रत्येकदा नवप्रत्ययाचा आनंद मिळत राहतो.

(संदर्भ टीपा- पान क्र. ५६ वर पहा...

अनुक्रमणिका

'अनन्यता मर्ढेकरांची' – डॉ. द. भि. कुलकर्णी

- कृष्णा चौधरी

[विश्वातील सर्व कलांमध्ये लयतत्त्वाचा सौंदर्यपूर्ण आविष्कार असतो. कविमुख-निर्मितीमुख-रसिकमुख यांची लयबद्ध संघटना (भावानुभवांची संघटना) साहित्यात महात्मता येण्याचे कारण असते. साहित्यकला जीवनलयवादी आहे. हा लयबद्ध अन्वयच मर्ढेकरांची अनन्यता आहे. द्रव्य आणि माध्यम यांच्या कक्षा ओलांडून ती सौंदर्यप्रत्यय देते. संपादक]

'अनन्यता मर्ढेकरांची' हा मर्ढेकरी सौंदर्यविचार व मर्ढेकरी कविता यांचा अन्योन्य संबंध आहे; असे सर्जनशील आस्वादक समीक्षेतून प्रत्ययपूर्ण प्रतिपादन करणारा डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा तिसरा मर्ढेकरविषयक स्वतंत्र चिंतन व्यक्त झालेला लेखसंग्रह. यापूर्वीचे 'दभि'चे मर्ढेकरी चिंतन 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनर्स्थापना या ग्रंथात व्यक्त झाले होते. नंतर ते 'द्विदल' मध्ये व आता 'अनन्यता मर्ढेकरांची'मध्ये. मर्ढेकरी सौंदर्यविचार व त्यांचे ललितसाहित्य यात परस्परसंबंध आहे अशी द. भि.ची दृढ धारणा आहे. हा लेखसंग्रह म्हणजे लेखकाच्या मर्ढेकरी सौंदर्यविचाराचे व मर्ढेकरी कवितेच्या आस्वादाचा आत्मप्रत्यय आहे. मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र कलानिर्मितीच्या प्रक्रियेचे जसे विवेचन करीत होते तसेच ते रसिकवृत्तीतून कलास्वादाच्या आस्वादप्रक्रियेचाही एकाच वेळी विचार करीत होते. कलावंत- कलाकृती व रसिक या तीनही घटकांचा एकात्म विचार मर्ढेकरी सौंदर्यविचारात साकल्याने आढळतो. आत्तापर्यंत मर्ढेकरांच्या सौंदर्यविचारावर व कवितेवर अनेक मान्यवर समीक्षकांनी प्रकाश टाकला. मे. पु. रेगे, प्रभाकर पाध्ये, सुरेंद्र बारलिंगे, धो. वि. देशपांडे, गो. वि. करंदीकर, त्र्यं. वि. सरदेशमुख, विजया राजाध्यक्ष, म. वा. धोंड, सुधीर रसाळ, विनय हर्डीकर व अक्षयकुमार काळे इ. समीक्षकांचे समीक्षाग्रंथ. मर्ढेकरी कवितेचा अन्वयार्थ कधी चरित्रात्मक तर कधी साम्यवादी तर कधी मनोविश्लेषणात्मक समीक्षा विचारप्रवाहातून लावण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. हे सर्व प्रयत्न लेखकाच्या शब्दात सांगायचे झाले तर दुय्यम दर्जाचे मर्ढेकर. "चित्रकार द. ग. गोडसे यांच्या लेखनाचा अपवाद सोडला तर स्वातंत्र्योत्तर काळातील मराठीतील सर्व सौंदर्यशास्त्रीय लेखन मर्ढेकरांच्या "सौंदर्य आणि साहित्य' या ग्रंथाची परिशिष्टे, तळटिपा आणि शुद्धिपत्रे आहेत... मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्रीय लेखन हे मूलतः एका कलावंताचे व रसिकांचे कलाचिंतन आहे." (पृष्ठ क्र. ५२)

मर्ढेकरी सौंदर्यविचार व मर्ढेकरी कविता यात अन्योन्य व अतूट संबंध आहे, हा विचार सुप्रसिद्ध नाट्यविमर्षक के. नारायण काळे यांची मे एकोणसशे छप्पनच्या 'सत्यकथा' मर्ढेकर-विशेषांकात मांडला होता. दभिंच्या या ग्रंथात या बीजांकुराचे विशाल वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. या वटवृक्षाला आस्वादक सर्जनशील समीक्षेच्या अनेक शाखा व पारंब्या फुटलेल्या आहेत. भारतीय साहित्यशास्त्रात साहित्यसमीक्षेचा विचार क्रियाकल्प, काव्यलक्षण, काव्यालंकार व साहित्य अशा पारिभाषिक संज्ञांनी केल्या जात होता. पुढे नाट्यशास्त्रातून आनंदवर्धनाने ध्वनिकाव्याच्या रूपाने साहित्यविचार मांडला. दृश्यकलाकडून सूक्ष्मतेकडे साहित्यकलेचा प्रवास होत गेला. इंद्रियसंवेदन प्रत्ययावर आधारलेल्या ललितकलांचा प्रवास व मानसिक मनोव्यापारावर आधारलेला साहित्यप्रवास यात फरक आहे. साहित्यशास्त्रात काव्यालंकार, पाठ्यालंकार, नेपथ्यालंकार, नाट्यालंकार, वर्णनालंकार व प्रयोगालंकार इ. नाट्यशास्त्रातील संज्ञांतून 'सौंदर्यम् अलंकारम्' अशी साहित्यशास्त्राने वाङ्मयाची कसोटी सांगितली. अलंकार, ध्वनी, रीती व व्यंजनाव्यापारातून साहित्यशास्त्रातील सौंदर्याची लक्षणेच विशद झाली. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी भारतीय साहित्यशास्त्रात अभ्यासाची चतुःसूत्री सांगितली. लक्षणानुसारी लक्षणम, प्राधान्येन व्यपदेशाभवन्ति, यथोत्तरं मुनीना

प्रामाण्यम् व सिद्धपरमतानुवाद. यापैकी 'प्राधान्येय व्यपदेशाभवन्ति', या सूत्राचा अवलंब करून (भारतीय साहित्यशास्त्रात जसे रसासह भावांचेही विवेचन आले.) तसेच मर्ढेकरी सौंदर्यविचाराचा व कवितेचा अभ्यास करताना, अभिजात स्वरूपाच्या मर्ढेकरी काव्यपरंपरेत अभिनवगुप्त, ज्ञानेश्वर, केशवसुत, बालकवी व एलियड यांच्या काव्यविचारांचा व कवितेचा विचार केलेला आहे. प्रधान वस्तु व्यपदेश म्हणजे मर्ढेकरी साहित्यातील लयतत्त्वाचा रचना-व्यूह उलगडून दाखवताना मर्ढेकरी कवितेतील सौंदर्यानुभूतीचा प्रत्यय, अर्थग्रंथीच्या अन्वयात्मक शब्दांतून साधारणीकरणाच्या प्रक्रियेतून प्रतीयमान अर्थापर्यंत कसा उलगडत जातो, याचे विश्लेषण केलेले आहे. भारतीय साहित्यशास्त्रात रसप्रतीती साधारणीकरणाच्या पातळीवर व्यंग्यार्थमय शब्दातून व्यक्त होते; तर मर्ढेकरी सौंदर्यप्रत्ययात लयबंधातून, अन्वयात्मक-प्रसरणशील शब्दातून व्यक्त होते. भारतीय साहित्यशास्त्रात भरत, मम्मट व अभिनवगुप्त रसिकाच्या संविद्प्रतीतीत-चैतन्यप्रतीतीत काव्यानंदाचे स्वरूप सांगतात. मर्ढेकर सौंदर्यप्रत्यय लयबंधातून सौंदर्याकृतीत वस्तुगत मानतात. सौंदर्य हे वस्तुनिष्ठ असल्यामुळे रसिकांच्या अभिरूचीनुसार व कुवतीनुसार सौंदर्यानुभूतीचा आस्वाद रसिक घेत असतो. भारतीय साहित्यात 'अर्थाचा अर्थ' तर मर्ढेकरांच्या सौंदर्यविचारात 'संबंधाच्या संबंधाला' महत्त्व आहे. एकातून रसप्रतीतीविश्रांती तर दुसऱ्यातून लयबंधामुळे सौंदर्यानुभूतीचा आकृतीनिष्ठ प्रत्यय येतो. अभिनवगुप्त कलास्वादासाठी व्यक्तिविशिष्टता सोडायला सांगतात तर मर्ढेकर सौंदर्यभावनेसाठी जीवशास्त्रीय भावनेचा लोप झाला पाहिजे असे म्हणतात. अभिनवगुप्त विश्वाचे मूलद्रव्य चैतन्य मानतो; तर मर्ढेकर विश्वाचे मूलद्रव्य जड अशा इंद्रियसंवेदना मानतात. द. भिं.नी मर्ढेकर आणि अभिनवगुप्त (४थी ओळ) लेखात मूलगामी विवेचन केले आहे. यावरून एखाद्या संशोधकाने अभिनवगुप्त व ज्ञानेश्वर, अभिनवगुप्त व मर्ढेकर असा विषय संशोधनाला घ्यायला हरकत नसावी.

मर्ढेकरी सौंदर्यविचाराचे विश्लेषण करताना दभि म्हणतात. कलाकृती निर्माण होताना व्यूह घटकांचा असेल तर कृती सिद्ध होते. घटकातील संबंधांचा असेल तर आकृती सिद्ध होईल व घटकातील संबंधांच्या संबंधांचा असेल तर सौंदर्यकृती सिद्ध होते. 'लयतत्त्व' हे 'संबंधांच्या संबंधावर' आधारलेले असल्यामुळे ते साधन व माध्यम या भेदापलिकडे जाऊन सर्वगामी होते. विश्वातील सर्व विश्वांगात व कलेमध्ये लयतत्त्वाचाच आविष्कार व्यक्त झालेला दिसतो. लयतत्त्व-सौंदर्यसंबोध हा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा सृष्टांचा मूलाधार आहे तसाच तो सर्व कलांचाही आहे. ललितकला व वाङ्मयकला यात स्वरूप भेद आहे. सौंदर्यशास्त्र सर्व ललितकला व वाङ्मयाच्या मूळाशी इंद्रियसंवेदनांचा लयबद्ध सौंदर्यप्रत्यय असतो. ललितकलांतील सौंदर्यप्रत्यय असा इंद्रियसंवेदनांच्या गुणधर्मांच्या परिपूर्ण आकलनात असतो; तर वाङ्मयकलेचे स्वरूप ती शब्दनिष्ठ कला असल्यामुळे तिच्यातील प्रत्यय मानसगोचर असतो. कवीची अनुभूती ही मूलतः भाषांकित असते. लेखकाचे वर्णविषयांशी झालेले तादात्म्य निरामयसमाधीसारखे नसते. ते सचेतन (Dynamic) असते. ''सचेतनत्त्वाचा भोवरा वाक्स्वरूपाच्या ध्रुवटोकाकडे ओढ घेत असतो.'' शब्दशक्तीने अनुभवाची मान वाकवण्याचे सामर्थ्य लेखकात असल्यामुळेच साहित्यकला इंद्रियसंवेदनांच्या भावगर्भ विचारातून स्फुरलेली असते. विश्वातील विविध भावनान्त घटनांचा सौंदर्यतत्त्वानुरोधाने लयबद्ध अन्वय लावणे हे वाङ्मयकलेचे एकमेव उद्दिष्ट असते. वाङ्मयकलेतील सौंदर्यप्रत्ययात एका संवेदनेतून अनेक विचार व अनेक संवेदनेतून एक विचार व्यक्त होतो. शेवटी लेखकाचे सचेतनत्व वस्तुजाताच्या तादात्म्यातून सूचित होते. मर्ढेकरांनी जीवशास्त्रीय भावना व सौंदर्यशास्त्रीय भावना कोटिशः भिन्न मानल्यामुळे मर्ढेकर स्वायत्तकलावादी, संघटनतत्त्ववादी व आकृतीवादी संबोधले गेले, या गैरसमजाचे लेखकाने साधार निराकरण केलेले आहे. लेखकाच्या मते मर्ढेकर जीवनलयवादी असून नव अलौकिकतावादी समीक्षक आहेत. नव अलौकिकतावादी म्हणजे पौर्वात्य व पाश्चात्य विचारवंतांचा सौंदर्यविचार पुढे नेणारे सौंदर्यसमीक्षक

मराठी समीक्षेत अशी समीक्षा लिहिण्याचा प्रयत्न द. भि. कुलकर्णी यांनी केलेला आहे. उदा.- ज्ञानेश्वर, जी. ए. वरील समीक्षा, दभिंनाही नवअलौकिकतावादी म्हटले पाहिजे. सौंदर्यभावना कोटिशः भिन्न असली तरी भावनाप्रतीती-शक्तितून लयनिष्ठ संघटनानिर्मिती निर्माण होत असते असे लेखकाचे प्रतिपादन आहे.

मर्ढेकरांविषयी असे गैरसमज होण्याचे प्रमुख कारण म्हणजे लेखकाच्या मते अनेक समीक्षकांना मर्ढेकर करीत असलेला कलाकृतीविषयीचा द्रव्य व माध्यम यातील भेदच कळलेला नाही. द्रव्य म्हणजे साधन-ललितकृतीतील द्रव्य म्हणजे शब्द-सामग्री. कलावंताचे माध्यम म्हणजे कलावंताची सौंदर्यानुभूती. चित्रकलेचे द्रव्य म्हणजे रंग व चित्रकाराची सौंदर्यानुभूती म्हणजे रंगधर्म असा माध्यमभेद आकळणे म्हणजे सौंदर्यास्वाद घेणे. उत्कृष्ट कलाकृतीत द्रव्य व माध्यम यातील अद्वैत प्रतीतीमुळे सौंदर्यानुभवाचा प्रत्यय येतो. मर्ढेकरांना चित्र व संगीत या दोन्ही कलात गम्य असले तरी त्यांनी आपली अभिरूची साहित्यकलेवरून केंद्रित केली. अन्यथा त्यांनी सौंदर्य आणि संगीत, किंवा सौंदर्य आणि चित्रकला असा ग्रंथ लिहिला असता. आपल्या ग्रंथाचे स्वरूप सांगताना मर्ढेकरांनी स्वतः जे मनोगत व्यक्त केले ते महत्त्वाचे आहे. ''या निबंधात संपूर्ण साहित्यमीमांसेचा समग्र प्रबंध लिहिण्याचा उद्देश नसून साहित्यमीमांसेच्या मुळाशी असलेल्या आणि जिच्यापासून साहित्यविषयक सांगोपांग चर्चेला जिवंतपणा येतो अशा एका प्रमेयमालिकेचेंच फक्त संक्षिप्त दिग्दर्शन करण्याचा हेतू आहे.'' (वाङ्मयीन महात्मता पृ. १६३)

मर्ढेकरांचे वरील विवेचन लक्षात घेतले म्हणजे मर्ढेकर सौंदर्यशास्त्रावर जाडेजुडे पुस्तक लिहायला प्रेरित झाले नव्हते तर ते एका कलावंताचे कलास्वरूपनिर्मितीचे व कलास्वादाचे कलाविषयक आत्मचिंतन आहे, हे दभिंचे प्रतिपादन पटायला लागते. मर्ढेकरांनी आत्मनिष्ठा, तादात्म्य, कैवल्यपूर्ण मूल्यभाव यातून वाङ्मयात महात्मता येते असे प्रमेय मांडले. यादृष्टीने अनुभवाची आंतरिक लय काही साहित्यकृतीमध्ये कशी टिकून आहे याची उदाहरणेही दिलीत. उदा. बालकवी, लक्ष्मीबाई टिळक, सोपानदेव चौधरी व लुईज़ी पिरांदळे इ. साहित्यिकांच्या साहित्यकृतीत संवेदनाप्रेरित आंतरिक लय व त्या लयीचा निकटच्या दुसऱ्या संवेदनाप्रेरित विचारांशी परस्परसंबंधांची लयंधात्मक गुंफण कशी झाली या मर्ढेकरी सौंदर्य विचारांचे विश्लेषण लेखकाने केलेले आहे. विचारांच्या तर्कशुद्ध संबंधापेक्षा, विचारांचे लयपूर्ण आकलन इथे स्पष्ट झालेले आहे. ''कुठल्याही एका विचाराने लेखकाच्या मनःपृष्ठावर उमटविलेल्या विचारवलयांचा परीघ जितका जास्त विस्तृत तितकी तितकी त्यांच्या लिखाणांत सखोलता अधिक.'' (सौंदर्य आणि साहित्य पृ. क्र. १६०)

मर्ढेकर विशुद्ध संवेदनांना व संवेदनांच्या लयबद्ध गुंफणीला विशेष महत्त्व देतात. सौंदर्यांचे अस्तित्व वस्तुनिष्ठ असले तरी कलाकृतीतील लयबंधाच्या क्षीणपणावरून व जटिलतेवरून, व्यामिश्रतेवरून तसेच रसिकाच्या व्यासंग व कुवतीनुसार रसिकांच्या आस्वादप्रक्रियेत फरक पडत असतो. मर्ढेकर सौंदर्यांचे अस्तित्व स्वयंभू व वस्तुनिष्ठ मानतात. कांट सौंदर्यांचे अस्तित्व मर्ढेकरांप्रमाणे निर्हेतुक न मानता हेतुयुक्त मानतो. ''सौंदर्याचे अस्तित्व हेतूशून्य असून कांट मानतो त्याप्रमाणे ते 'हेतुशून्य, हेतूगर्भ व परिणामशून्य परिणाम नियती स्वरूपाचे नसते. सौंदर्यांची सर्व मजा निर्हेतुक असण्यात असून कोठलाही हेतू नसणे; हाच सौंदर्याचा हेतू असतो. कोठल्याही विशिष्ट परिणामाचे ध्येय न ठेवणे हेच सौंदर्याचे ध्येय असते. सौंदर्यांच्या या उपपत्तीची सर्व मदार मानवी कलाकृतीपेक्षाही निसर्गावर असते. सौंदर्याचे अस्तित्व स्वतंत्र व स्वयंभू असते. ते अनुभवावर संज्ञाशक्तीवर किंवा चैतन्यावर अपरिहार्यतेने अधिष्ठित नसते.'' द.भिं.नी हे स्पष्ट केलेले आहे. 'कवी आणि परंपरा' या लेखात रोमँटिक कवीपेक्षा मर्ढेकरांप्रमाणे एलियटचा काव्यप्रकृतीपिंड अभिजातप्रकृतीचा असल्यामुळे कविता म्हणजे कवीच्या व्यक्तित्वाचा आविष्कार नसून कवीच्या व्यक्तित्वाच्या सुटकेपासूनचा आनंद असतो, असे लेखकाने स्पष्ट केलेले आहे. मर्ढेकरांचा काव्यप्रकृती प्रतिभाधर्मही रोमँटिक नसून अभिजातवादीच आहे. एलियट व मर्ढेकर यांच्या काव्यप्रकृतीधर्मातील अभिजातवादी वस्तुनिष्ठ नातेच दभिंना सुचवायचे

अनुक्रमणिका

असावे. मर्ढेकरांच्या मूळ सौंदर्यविचारातील सूक्ष्मता आपल्या सुलभ विश्लेषण पद्धतीने लेखक सांगतात. कलाकृतीत दोन पदे असतात. एक व्यक्त पद व दुसरे अध्याहृत. मर्ढेकरी कवितेचे आशयकेंद्र विविध घटकातील संबंधाच्या संबंधातून- आंतरिक लयातून उकलत जाते. मर्ढेकरांच्या कवितेत एकाकी प्रतिमा असते. ती उमगली की अर्थग्रंथी उकलून आशयकेंद्र स्पष्ट होत जाते. घटकातील संबंधांचा संबंध म्हणजे कलाकृती. लयतत्त्व केवळ संबंधांचा संबंध नसून द्रव्य व माध्यम यांच्या कक्षा ओलांडून गेल्यामुळे वाङ्मयात महात्मता येते. साहित्याला महात्मता येण्याची कारणे म्हणजे नवीनता व घाटबद्धता. नवीनता व घाटबद्धता कवीच्या प्रतिभाधर्माशी निगडित आहे. कलाकृतीला एक केंद्र व परीघ असतो. या दोन्ही घटकात लयबंध निर्माण झाल्यामुळे सौंदर्याकृतीची निर्मिती होते. विसर्जन आणि सर्जन हा लयाचा धर्म आहे. लयात लौकिक कालतत्त्वाचे विसर्जन होऊन कलाकृतीच्या केंद्र व परिघात अद्वैत निर्माण होते. आशय व अभिव्यक्ती एकरूप होतात. ''साहित्य कृतीच्या घटकांची आणि घटकामधील परस्परसंबंधांची, एकजिनसी संघटना म्हणजे साहित्यकृतीचा रूपबंध होय.'' साहित्यकृतीचा सेंद्रिय रूपबंध हा तिच्या अर्थग्रंथीतील सौंदर्यानुभूतीतून अंगभूत शैलीतून उलगडत जातो. साहित्यकृतीची समीक्षा ही तिच्या सेंद्रिय रूपबंधाशी निगडित हवी;

लेखकांना विनंती

१) लेख पूर्ण ('फुलस्केप') आकाराच्या कागदावर एका बाजूलाच लिहावेत.
२) सुवाच्य अक्षर असावे; किंवा टंकमुद्रित करून पाठवावेत.
३) लिखाणासोबत सदर लेख अन्यत्र प्रसिद्ध झाला नसल्याचे पत्र जोडावे.
४) लेखाबाबत पत्रव्यवहार करू नये. तो परत केला जात नाही. लेखनाची स्थळप्रत आपल्याजवळ असू द्यावी.
५) प्रसिद्धीयोग्य लेखाबाबत संपादक संपर्क साधतील.

कारण कलाकृती ही जशी एक भाषिक कृती आहे तशीच ती भावानुभवांचे सौंदर्यनिष्ठ संघटनाही आहे, हे द.भि.नी विवेचन केलेले आहे. घटकांच्या संबंधाचा संबंध म्हणजे कलाकृती. लयतत्त्व केवळ घटकातील संबंधाचा संबंध नसून द्रव्य व माध्यम यांच्या कक्षा ओलांडून जाते तेव्हा श्रेष्ठ कलाकृतीची निर्मिती होते. हा द्रव्य, माध्यम भेद न समजल्यामुळेच काही समीक्षक मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रास 'मर्ढेकरांचे काव्यशास्त्र' संबोधून मर्ढेकरी सौंदर्यविचाारांचा संकोच करतात. वास्तविक मर्ढेकरांनी काव्य हा शब्द संस्कृत साहित्यशास्त्रात साहित्य या व्यापक अर्थाने उपयोजिलेला आहे. संस्कृत साहित्यशास्त्रात सौंदर्यवस्तूला 'अन्यूनातिरिक्त' असा शब्द आनंदवर्धनाने उपयोजिला असे दभि स्पष्ट सांगतात. प्रभाकर पाध्ये यांनी 'अनूनातिरक्त' यासाठी कलाकृतीला 'मोनॅड' असा शब्द वापरला पण आनंदबधर्नाचा उल्लेख दभिंनी केला तसा स्पष्ट 'सौंदर्यानुभव' या ग्रंथात केलेला नव्हता. सौंदर्यानुभवाची संपन्नता व स्वयंपूर्णतः जिच्यातून बाहेर काही येऊ शकत नाही व जिच्यातून बाहेर काही जाऊ शकत नाही, अशी भावानुभूती कलाकृती ही एक सेंद्रिय संघटना (Organic form) असतो. कुठे कुठे दभिंच्या मर्ढेकरी सौंदर्यविचारांचे चिंतन गो. वि. करंदीकर यांच्याही मर्ढेकरी सौंदर्यविचारांच्या एक पाऊल पुढे जाते. मर्ढेकरांनी विचार बेतून दिले ते शिवण्याची जबाबदारी पुढच्या पिढीची आहे असे करंदीकर 'परंपरा आणि नवता' या ग्रंथात म्हणतात; तर दभिंचे विवेचन पुढील प्रमाणे आहे. मर्ढेकरांचे सौंदर्यदर्शन हे दभिंना संपूर्ण दर्शन वाटते. द.भि. मर्ढेकरी महात्मता, नवीनता व घाटबद्धता ही कलाकृतीत लयतत्त्वामुळे येते असे मानतात. नवीनता, महात्मता व घाटबद्धता यांचा संघात म्हणजे लयबंध हे दभिंचे सौंदर्यसंबोधाचे एकात्म प्रतिपादन मर्ढेकरी सौंदर्य विचाराला सम्यक न्याय देणारे आहे. ललितकलात संवेदनानिष्ठ समतानता असते तर वाङ्मयकलेत भावनानिष्ठ समतानता असते. ललित कला भावानुभूतीनिष्ठ तर वाङ्मयकलेत सौंदर्यभावनानिष्ठ लयबंधाचा आस्वाद रसिक घेत असतो. मर्ढेकरांची कविता कवीच्या व्यक्तित्वाचा

आविष्कार नसून वस्तुनिष्ठ भावानुभवातील घटकांची लयबद्ध संघटना आहे; असे दभिं. आवर्जून सांगतात. केशवसुतांची कविता आडवी तर मर्ढेकरांची कविता उभी कविता आहे. पूर्वी कविता ही कवीरसिक हृदयसंवाद मानली जात होती. पण मर्ढेकरी सौंदर्यविचारानुसार कविता ही कवी-माध्यम-संवाद असते. कलाकृती ही रसिकहृदय-संवाद असते. कवी माध्यमसंवादातून केवळ संप्रेषण होत नसून सृजनशील काव्यनिर्मिती होत असते. मर्ढेकर कधी कवीमुखाने तर निर्मितीमुखाने तर कधी रसिकमुखाने कलानिर्मितीच्या अस्तित्वाचा तर प्रतीतीभेदाचा सौंदर्यविचारात विचार करतात. काव्यनिर्मितीची प्रक्रिया द्विदल स्वरूपाची असते. कवितेच्या केंद्रात व घाटात लयाचा व चैतन्याचा व्यूह प्रकट होत असतो. हा रचनाव्यूह म्हणजे लयबंधता. कलाकृती ही एक लयतत्त्वानुसारी भावानुभवांची सेंद्रिय संघटना असल्यामुळे तिचे स्वरूप लौकिकभिन्न स्वरूपाच्या पातळीवर असते. चरित्रात्मक लौकिक समीक्षेच्या सहाय्याने तिचा रूपबंध संपूर्णपणे उलगडला जाऊ शकत नाही. उदा. विजया राजाध्यक्ष व म. वा. धोंड यांची समीक्षा. कवितेतील शब्दसंहितेच्या अनुषंगाने कवितेकडे जाणे म्हणजे केंद्रानुगामी समीक्षा. अशी केंद्रानुगामी समीक्षा द.भिं.नी लिहिली. शब्दसंहितेतून परिघाकडे जाणारी समीक्षा केंद्रपसारी समीक्षा अशा समीक्षेची उदाहरणे म्हणजे विजया राजाध्यक्षांचे मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ व म. वा. धोंड यांचा तरीही येतो वास फुलांना' विनय हर्डीकरांचे 'कारुण्योपनिषद' हे समीक्षाग्रंथ.

या लेखसंग्रहात काही मान्यवर समीक्षकांच्या ग्रंथांची समीक्षणेही आलेली आहेत. उदा. डॉ. यशवंत मनोहरांचे 'बाळ सीताराम मर्ढेकर' या लेखाला दोन प्रतिभावंत असे शीर्षक देऊन मनोहरांना प्रतिभावंत संबोधले व मर्ढेकरांच्या वाङ्मयीन महात्मतेच्या सिद्धान्तातील सूक्ष्मता त्यांना हेरता आली नाही हे सांगताना द. भि. लिहितात, ''मनोहरांनी अभ्यासकाची अपेक्षापूर्ती केली आहे पण कवी मर्ढेकरांची अपेक्षापूर्ती केलेली नाही. मर्ढेकर मनोहरांना म्हणतात. ''तुम्ही माझे अवमूल्यन केले तरी चालेल. कारण त्यामुळे झालीच तर मराठी समीक्षा आणि मराठी कविता अधिक समृद्धच होईल; निदान कवी आणि समीक्षक म्हणून तुमचा फार मोठा विकास घडून येईल.'' डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या 'अर्वाचीन काव्यदर्शन' व 'मर्ढेकरांची कविता आकलन आस्वाद आणि चिकित्सा' या ग्रंथाविषयी म्हणतात. ''डॉ. काळे मोठे प्रकल्प हाती घेतात ही उत्तम गोष्ट आहे; त्यातून त्यांचा साक्षेप दिसतो. परंतु त्यामुळेच त्यांच्यापाशी असलेली सूक्ष्म रसिकवृत्ती आणि तीक्ष्ण समीक्षादृष्टी यांना ते पुरेसा न्याय देऊ शकत नाहीत. त्यासाठी त्यांना मर्ढेकरी साहित्यावर ठिणगीसारखी उत्स्फूर्त टिपणेच लिहावी लागतील. लेखनाचे मोल काय किलोत करायचे असते?'' मर्ढेकरांच्या कवितेत अपूर्व असे प्रातिभजन्य इंद्रियालंकार व समयालंकार दभिंनो शोधून काढलेत. मर्ढेकरी कवितेची निर्मितीप्रक्रिया व आस्वादप्रक्रिया सर्जनशील अनुभवातील विविध घटकसंबंधातून लयनिष्ठ संघटनप्रक्रिया असून रसिकाला अनुभवसमृद्ध करणारी. प्रतीतीविश्रांती देणारी प्रक्रिया आहे. कलाकृतीची निर्मितीप्रक्रिया द्विदल असते. एक पद अभिव्यक्त व एक अध्याहृत. कलाकृतीला एक केंद्र व परीघ असतो. भावानुभूतीतील विविध परस्परसंवादी व परस्पर विरोधी घटकातून शेवटी एकार्थच प्रतीत होतो. मर्ढेकर गर्भवतीच्या प्रतिमेतून निर्मितीशील सृजनशीलतेकडे जीवनमूल्यांच्या दृष्टिकोनातून पाहतात.

मिटून बसली पंख पाखरे
पर्युत्सुक नच पोसही फुलते;
मूक गरोदर गाईची अन्
गळ्यातील पण घंटा झुरते...

गरोदर गाईला हिरव्या कुरणात चरायचे डोहाळे लागतात. एरवी चरताना रूणझुणणारी गळ्यातील घंटा आता दुःखाने झुरत आहे. इथे दभि ज्ञानात्मक पातळीवरील मर्ढेकरी कवितेचा अर्थ स्पष्ट करताना लिहितात. दुष्प्राप्य सुखासाठी प्रयत्न करता येत नाही- म्हणून मन झुरत असते. मर्ढेकरांची 'तसूतसूतून आसू निथळे' व मुक्तिबोधांची 'कुणाच्या वेदना सोसून सोसून' या कवितातील लयव्यूह उलगडताना लिहितात. ''मुक्तिबोधांची निष्ठा साम्यवादी पण त्यांच्या वरील कवितेत समूहाची जाणीव व्यक्त झाली नाही. व्यक्तिसमूह शक्तिबद्दलची व्यक्तीची जाणीव

अनुक्रमणिका

व्यक्त केली. मर्ढेकरांनी परमेश्वर आणि मानवाचे भवितव्य या दोन संकल्पनावर विराट प्रश्नचिन्ह निर्माण केले. संपूर्ण समाजाची उपरोधाने जाणीव व्यक्त झाली.'' प्रसरणशील शब्दांच्या साहाय्याने सौंदर्यगर्भ व जीवनमूल्यगर्भ आशयाची बंदीश म्हणजे कविता. याच भूमिकेतून दभिंनी 'पिपात मेले ओल्या उंदीर' विषयी आपले चिंतन मांडले. ''उंदीर/सैनिक/मानवजात यांच्या मृत्यूचे चित्रण आले नसून अटळ मृत्यूला विसरून अज्ञानजन्य- कृत्रिम (बेकलाईटी) सुखाचे चित्रण आलेले आहे.'' मर्ढेकरी कवितेतील विरुद्ध भाव संबंधातून भावानुभूतीतील घटकात लयबंधाच्या पातळीवर सौंदर्यप्रत्यय येतो. यादृष्टीने 'ओठावरी आली पूजा', 'या गंगेमध्ये गगन वितळले', 'असे काही तरी व्हावे', 'दणकट दंड स्नायू जैसे, 'दवात आलिस भल्या पहाटी', 'न्हालेल्या जणू गर्भवतीच्या', 'बोंड कपाशीचे फुटे', 'तुझ्याच आलो पायी', व 'भंगू दे काठिण्य माझे' इ. कवितांची रसग्रहणे रसोद्ग्राही सर्जनशील आस्वादक समीक्षेचा वस्तुपाठच आहे. विस्तारभयास्तव इथे देणे शक्य नाही. रसिकांनी ती मुळातूनच वाचावी. अन्वयात्मक शब्दप्रतिमातून व्यंग्यार्थातून आपला आशय इथे इंद्रियगोचर मनोगोचर केलेला आहे. कवितेचे व्यक्त व अध्याहृदत, केंद्र व परीघरूप सृजनशील रूप आस्वादातून विशद केलेले आहे.

मर्ढेकर अभिजनवादी नसून सामान्य माणूसच या कवितेचा नायक आहे. नवीनता म्हणजे दोन घटकांचे लयतत्त्वाच्या आधारे अपूर्व व्यूहात रूपांतर करणे. कलाकृती सापेक्ष काळाची अखंडता आणि घाटबद्धता म्हणजे लयतत्त्व. महात्मता, नवीनता व घाटबद्धता या तीनही सिद्धान्ताचा आधार म्हणजे लयतत्त्व. एलियटपासून बालकवीपर्यंत अनेक कवींच्या कवितांचे मर्ढेकरांनी लयविवेचन केले. त्यामागे लयतत्त्वाचे उपयोजन हा हेतू नसून लयतत्त्वाचा तात्त्विक खुलासा करणे हा आहे. लयसिद्धान्त हा कलाकृतीसापेक्ष तर नवीनता व महात्मतेचा सिद्धान्त कलाकृतीसापेक्ष व निर्मितीसापेक्ष आहे.

एकूण या ग्रंथाचे सार म्हणजे मर्ढेकरी सौंदर्यविचार व मर्ढेकरी कविता यात अन्योन्य संबंध आहे. हेच प्रमेय प्रस्तुत समीक्षालेखकानेही 'मर्ढेकरांची महात्मता' या ग्रंथात मांडलेले आहे. मर्ढेकरी कवितेचा केंद्रस्थानी असणारा लयबंधाचा विचारव्यूह, व्यक्तच अध्याहृत, केंद्र व परीघ यांच्या अद्वैत पातळीवर लेखकाने उलगडून दाखविला आहे. द्रव्य व माध्यम यातील भेद मर्ढेकरांनी प्रथमच स्पष्ट केला तो दभिंनी उलगडून दाखवला. भावानुभूतीतील घटकसंबंधाची लयतत्त्वामुळे झालेली बंदीळ मी मर्ढेकरी सौंदर्यसंकल्पना मराठी समीक्षेत इतक्या सम्यक् विश्लेषणाने, सचेतन तादात्म्याने उलगडून दाखविली नव्हती, ती प्रसरणशील शब्द, व्यंग्यार्थ व लयबंधात्मक सौंदर्यप्रत्यय लेखकाने प्रत्ययपूर्ण उलगडून दाखवला. मर्ढेकरांनी नवीनतेचे मूळ कवीच्या प्रातिभधर्मात असते असे सांगितले; तर आनंदवर्धनाने प्रतिभा म्हणजे 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा' असे म्हटलेलेच आहे. (प्रतिभा अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा । तस्याः विशेषो रसोवेशवैशध सौंदर्यनिर्माण क्षमत्वम) प्रज्ञानैर्मल्यातून प्रतीत होणारे सौंदर्य हा निकष मर्ढेकरांनीही सांगितला. मौलिकता प्रतिभासापेक्ष ठरविली. सत्य आणि सौंदर्य मर्ढेकरांच्या मते अंतिम जीवनमूल्ये आहेत. लय हा प्रतीतीचा विषय नसून लयोद्भव सौंदर्यप्रत्यय हा प्रतीतीचा विषय आहे. कलांची श्रेष्ठता माध्यमस्वरूपावरून तर कलाकृतीची श्रेष्ठता लयबंधावरून ठरत असते. इ. मर्ढेकरी कलास्वरूप विचारांचे या ग्रंथात बिंब-प्रतिबिंब रूपाने दर्शन घडते. आता मर्ढेकरी सौंदर्यविचार व मर्ढेकरी कविता यात विसंवाद आहे, मर्ढेकरी सौंदर्यविचार आकृतीवादी आहे; मर्ढेकरी सौंदर्यविचार स्वायत्ततावादी आहे, अशी अर्थशून्य विधाने करणार नाहीत. 'सौंदर्य आणि साहित्य' व 'पासंग' लेखसंग्रहच आहेत. 'अनन्यता मर्ढेकरांची' हाही लेखसंग्रहच आहे. निर्मल मनाने या ग्रंथाचा आस्वाद घेतला तर हाही एक बीजग्रंथच आहे. विमल प्रज्ञा असणाऱ्या रसिकांसाठी अभिनवगुप्त म्हणतो. ''अधिकारीचात्र विमलप्रतिभानशाली सहृदयाः''

❖❖❖

(अनन्यता मर्ढेकरांची : डॉ. द. भि. कुलकर्णी- पद्मगंधा प्रकाशन, एरंडवन, पुणे. पृष्ठे २२३, मूल्य : १८०/-.)

कृष्णा चौधरी
शिवाजीनगर, वरूड, जि. अमरावती ४४४ ९०६ मोबा. : ९४२१८२५०४५

अनुक्रमणिका

संज्ञाप्रवाही लेखन

डॉ. द. ना. धनागरे

[प्रत्येकाच्या शब्दानुभवामागे त्याच्या व्यक्तिगत जीवनातील सहचारी भाव, प्रभाव आणि अभावाचा इतिहास असतो. शब्दोच्चारामागोमाग एक स्मरणसाखळी जागी होते. एक 'कोलाज' आकार घेऊ लागतो. त्यात सुप्त आणि अबोध मनाचाही सहभाग असतो. संज्ञाप्रवाह आशयाचा शोध घेऊ लागतो– तेच संज्ञाप्रवाही लेखन होय. विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' कादंबरीत ते उत्कट रुपात प्रकटले आहे. प्रस्तुत लेखात संज्ञाप्रवाहाचे हलके–फुलके रूप दिसते संपादक]

जवळपास चार दशके इंग्रजी विषयाच्या अध्यापनाचा अनुभव आणि साहित्यसमीक्षेचा व्यासंग पाठिशी असलेल्या कराडच्या प्रा. गो. वि. कुलकर्णी (जी.व्ही.) यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

दोन्ही पुस्तकातील लेखांचे स्वरूप वेगळे, काहीसे प्रायोगिक आहे. एका विख्यात दैनिकाच्या संपादकाने एक शब्द सुचवायचा आणि त्यावर मोजक्या शब्दात लेखकाने, त्याची स्मरणयात्रा नेईल त्या वाटेने 'त्या शब्दातून ध्वनित होणारे प्रसंग, मनुष्य स्वभाव आणि गतकाळाच्या आठवणी वाचकांच्या ओंजळीत टाकायच्या अशा स्वरूपाचे लेखन ह्या दोन्ही पुस्तकात आहे. त्याला वाचकांनीही भरभरून प्रतिसाद दिलेला आहे.

लेखक गो. वि. कुलकर्णी यांना बाल व तरुणवयात वि. स. (भाऊसाहेब) खांडेकरांसारख्या संवेदनशील लेखकाचा आणि ना. धों. ताम्हणकरांसारख्या 'गोट्या', 'चिंगी' सारखे अजरामर विनोदी साहित्य देणाऱ्या थोर साहित्यिकांचा दीर्घकाळ सहवास लाभला. माणूस आयुष्यात जे काही शिकतो ते सगळेच धडे गिरवून, वर्गात जाऊन शिकत नाही; उलट अनुभवातून, निरीक्षणातून, सहवासातून, चर्चेतून नकळत अशी मूल्य-विचारांची शिदोरी गोळा करीत असतो. ती आयुष्यभर पुरून उरणारी असते. ती शिदोरी किती समृद्ध व परिपूर्ण आहे हे 'जी व्हीं'च्या 'स्वगत' मधील लेखांमधून शब्दबद्ध झाले आहे.

अनुभव, रंजक किस्से आणि आठवणी यांची चटक दार खिचडी, सांडगी मिरची आणि फोडणीच्या तेलासह- आपल्याला चाखायला मिळते- असे लेखन अधिक तर माणसाच्या उतारवयात अधिक होते. जेव्हा एकांताशीच मैत्री करावी लागते; अशावेळी माणूस स्वतःच्या अनुभव-विश्वाचा पुनःप्रत्यय घेण्यात, इतिहासाला, गतकाळातील प्रसंगाच्या आठवणींना उजाळा देण्यात दंग होऊन जातो. जीव्हींचे तसेच काहीसे झाले आहे. कुठल्यातरी शब्दावरून, प्रसंगांवरून, किंवा कुणाशी बोलण्यामधून लेखकाच्या मनाची नौका स्मृतीसागरात मुक्तपणे विहार करू लागते.

'संज्ञाप्रवाही' असे या लेखनाचे स्वरूप आहे. मग हा शब्द 'खिडकी' असेल, 'पाऊलवाट' असेल किंवा 'फुगा' असेल, त्या एका शब्दातून लेखकाच्या आठवणी विशेषतः बालपणाच्या आठवणी जाग्या होतात; आणि 'स्वगता'च्या रुपाने साकार होत जातात, वाचकाला अंतर्मुख करतात; असे हे लेखन आहे. जरा वेगळ्या वाटेने जाणारा हा साहित्य प्रकार आहे.

लेखक जे सांगतात, ते प्रांजळपणे, प्रामाणिकपणे; त्याचा पुरावा अथवा दाखला देण्याची गरज नसते. असे त्यांना वाटते. 'हातावरच्या रेषा' (पृ. १५-१६) तून त्यांना आर्किमिडीज सारखे चित्र साकारल्याचे जाणवते, त्याच्याशी त्यांचा संवाद होतो. आणि त्यातून आचार्य अत्रे निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर रस्त्यावरच्या एका ज्योतिषाला स्वतःच्या हातावरच्या रेषा वाचायला सांगतात, तो प्रसंग जीव्हींना आठवतो. 'तुमची भाग्यरेषा तुम्हाला उत्कर्षाकडे नेणारी आहे' असे ज्योतिषी सांगतो, प्रत्यक्षात मात्र हार त्यांच्या अत्र्यांच्या पदरात पडलेली असते; तरीही त्याला आचार्य अत्रे १० रु. ची नोट देतात. त्यामागे 'मी हरलो पण ज्योतिषी जिंकला, कारण त्यांना १० रु. देताना पाहून त्याच्याकडे हस्तरेषा दाखवणारांची रांग लागते.' हा प्रसंग वाचकांना भावतो. एकातून दुसरा प्रसंग/व्यक्ती आठवणे- अशी स्मरणसाखळी म्हणजे 'स्वगत' !

साध्या साध्या आठवणींमधून आपली वस्तूंशी कशी बांधिलकी तयार होते हे 'ओगराळे' (पृ. २१-२२) या लेखातून गो. वि. मांडतात. मग ते ओगराळे साध्या पितळाचे वा स्टेनलेस स्टीलचे असो, ते मोडीत काढून टाकणे आपल्याला रुचत नाही. हा सर्वांच्या जीवनात कधी ना कधी येणारा अनुभव, लेखक हृद्यपणे सांगून जातात. त्यामुळे ते वाचताना वाचक जेव्हा स्वतःच्या जाणिवेच्या प्रवासात जाऊ लागतो तेव्हा 'स्वगत' सारखे लेखन परिणामकारक झालेय हे जाणवते.

मी ज्याला जाणिवांचा प्रवाह म्हटलेय त्याचे एक अतिशय चांगले स्वगत 'भरपाई' (पृ. १५-१६) या शब्दावर लिहिलेय. शेजाराच्या घराला लेखकाच्या वाहनाचा धक्का लागल्याने शेजाऱ्याने नुकसान भरपाई, मागण्या त्यावरून अटातटीचे भांडण होते. मग कोर्टाच्या चकरा, शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये कारण कोर्टातून निकाल हाती लागतो, न्याय नाही. त्यातून 'जे गेले ते गेले, त्याची खरे तर कधीच भरपाई होत नसते.' हे जीवनविषयक साध्यासरळसोप्या डोळस शहाणपणावर आधारलेले तत्त्वज्ञान लेखक सहज सांगतात; त्यातून लेखकाला त्यांचे वडील अत्यवस्थ होते ती काळरात्र आठवते, तुफान वारा, धों-धों पाऊस, कडाडणाऱ्या विजा चमकत असताना आई शेजारीच राहणाऱ्या डॉक्टरांना बोलावायला जाते, तेवढ्यात समोरच्या झाडावर वीज कोसळते. आणि त्याचवेळी इकडे वडिलांचे प्राणोत्क्रमण होते. आता याची 'भरपाई' कोणाला मागायची ? 'काही कमावले तर काही गमवावे लागते, भरपाई कधी होते पण पूर्ण कधीच होत नसते.' (पृ. २५-२६) ही जीवनधारणासुद्धा लेखक व्यक्त करतात. एकातून दुसरे आठवत जाणे आणि ते उत्स्फूर्तपणे शब्दबद्ध होण्याला 'Stream of consciousness' असे म्हटले आहे.

'स्वगत' हे लेखन 'शब्दांच्या' अर्थछटा उलगडून दाखविणारेही आहे. उदाहरणार्थ 'नाद' (पृ. ४५-४६) म्हणजे छंद, हव्यास, आवड, तसेच संगीत आणि सौंदर्यशास्त्रात 'नाद' शब्दाच्या वेगळ्याच अर्थछटा आहेत. हे अर्थवैविध्य परमेश्वराने- सृष्टीनिर्माण करतानाच निर्माण केलेय हे सुद्धा लेखक अधोरेखित करतात. या अर्थच्छटांमध्ये 'तमाशाचा-लावणीसम्राज्ञीच्या 'नादा'ला लोक लागतात किंवा व्यसनाधीनता हा नादाचाच प्रकार आहे या अर्थछटा सुटल्या आहेत. याचे कारण लेखकाच्या अनुभवविश्वात त्या नसाव्यात असे समजायला हरकत नाही ! निदान असेल तर त्याची जाहीर कबुली पत्नी (सौ. अनुराधा बाई)च्या धाकामुळे देण्याचे त्याना धाडस झाले नसावे..

लेखकाचा नर्म विनोद 'मुलाखत' (पृ. ७७-७९) सारख्या स्वगत मधून आपल्या अनुभवास येतो. त्यात एका राजाच्या एका राजपुत्राला तीन राजकन्यांपैकी एक निवडायची होती तेव्हा दोन अधिक दोन किती ? या प्रश्नाने स्वगत सुरू होते. मुलाखतीत बंड्याला येणारे अनुभव अलिकडे सर्वच नोकऱ्यांसाठी होणाऱ्या मुलाखतीबाबत अनेकांना येतात. त्यावर लेखकाने केलेले भाष्य मोठे मार्मिक आहे. 'जे खत शेतात उपयोगी पडत नाही ते खत म्हणजे मुलाखत, व दुसरे चिलखत. मुलाखत यशस्वी होण्यासाठी बुद्धिचातुर्याचे चिलखतच घालावे लागते तेच खत मुलाखतीस उपयोगी पडते.' (पृ. ७७-७९) अशी उपरोधगर्भ टीका गो. वि. सहजपणे करून जातात.

'माणसं दोन टोकांची' या पुस्तकातील लेखांचे स्वरूप मला काहीसे वेगळे वाटले. आयुष्यात भेटलेल्या, अनुभवलेल्या किंवा माहिती असलेल्या व्यक्तींचा वेध जी. व्ही. रुपकात्मक पद्धतीने, म्हणजे तशीच, पण काल्पनिक व्यक्तिचित्रे उभी करून घेतात. या लेख-संग्रहाला जगदीश खेबुडकरांनी लिहिलेल्या छोटेखानी प्रस्तावनेत ते म्हणतात : ''लेखकाला प्रचंड निरीक्षणशक्ती असावी लागते, त्याचे परीक्षण करावे लागते आणि सर्वांगीण समीक्षण करणे क्रमप्राप्त ! ही गुणत्रयी जी. व्ही.च्या ठायी असल्यामुळे वेगवेगळ्या स्वभाववैशिष्ट्यांची वर्णने साध्या सरळ, अकृत्रिम मांडणीतून साकार झालीत.'' ते लेख वाचताना अशा व्यक्ती आपल्यालाही भेटल्या होत्या, किंवा होत्या का? याचा शोध चोखंदळ वाचक स्वतःच्या स्मृती-पटलावर वर घेऊ लागतो. अशी परकायाप्रवेश करण्याची क्षमता असलेली जी.व्ही.ची लेखनशैली आहे.

त्या पुस्तकात 'अबोल' पंडितराव यांचे एक वाक्याचे

भाषण असो, किंवा त्यांना अबोलपणे आलेले मरण असो ते हृदयाचा ठाव घेतात. कृतघ्न श्रीपादकाका, शिवरामपंतांकडून धंद्याचे सर्व शिक्षण घेऊन त्याचाच धंदा बसविणारे, पण अखेर मुलगाच व्यसनाधीन होऊन स्वतःच्या घरी भीक मागायला येतो, या कृतघ्न माणसाच्या आयुष्यातला शेवटचा अनुभव हा सॉमरसेट मॉमच्या कथेत येणाऱ्या anti-climax सारखा वाटतो. आपल्या कर्माची फळं याच जन्मी, 'याचि देही', भोगावी लागतात हे तत्त्वज्ञान जी.व्ही. न सांगताही सांगून जातात. आत्मकेन्द्रित जीवन जगणाऱ्या स्वार्थी लोकांवर जळजळीत भाष्य करतात.

कृतघ्न श्रीपादकाकांच्या विरूद्ध कृतज्ञतेने सदा भारावलेले अरुणराव, सेवानिवृत्तीच्या दिवशी आई-वडिलांच्या माघारी त्यांना लहानाचे मोठे केलेल्या ९० वर्षाच्या यशोदाबाई या आजीना विसरले नाही. त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिले. हीच कृतज्ञता वार लावून शिकलेल्या त्यांच्या सासऱ्याबद्दलही दिसते. आणि आपल्या गरीबांच्या देशाबद्दलही 'मुलं प्रॉपर्टी विकून अमेरिकेला चला म्हणतात.' पण तेव्हा मला अरुणरावांच्या स्वभावातल्या कृतज्ञतेपेक्षा स्वाभिमानी स्वावलंबीवृत्ती भावली. (पृ. ११०-१५), हे लेखकाचे वाक्य पटते.

या सर्व लेखांची शीर्षके एका शब्दात दिलेली आहेत. थोड्या शब्दात अशा गुंतागुंतीच्या स्वभावधर्म असलेल्या व्यक्तींचा गाभा लेखकाने अचूकपणे हेरलेला आहे. शंकेखोर सदाशिवराव, 'धार्मिक' वृत्तीचे घर्मांजी व त्यांना साजेशी वृत्ती असलेल्या सावित्रीबाई (पृ. ६५-६९), खादाड श्रीपतराव, किंवा समाधानी असलेला शांतिनाथ ड्रायव्हर आहे, आणि समंजस पिलूनाना ही टोकाची व्यक्तिमत्त्वे जी.व्ही.च्या शैलीतून जिवंत होतात. ती वाचकांना निश्चित आवडतील.

'आटोपशीर, मोजकेपणा, चटकदार आणि भावणारे' अशा चार शब्दात या दोन्ही पुस्तकातील लेखांचे वर्णन करता येईल. चोखंदळ वाचकांच्या पसंतीला ही पुस्तके उतरतीलच !

❖❖❖

गो. वि. कुलकर्णी, स्वगत, कोल्हापूर : अभिनंदन प्रकाशन, ऑक्टोबर २०१०, पृष्ठे ११६, मूल्य रु. ११५/-
गो. वि. कुलकर्णी, माणसे : दोन टोकांची, कोल्हापूर. अभिनंदन प्रकाशन, ऑक्टोबर २०१०, पृष्ठे १८०, मूल्य रु. १८०.

डॉ. दत्तात्रेय नारायण धनागरे
बी/७, दिव्यकुंज अपार्टमेंटस्, १०७६, गोखले रोड,
मॉडेल कॉलनी पो. ऑ., पुणे ४११ ०१६.
दूरभाष : ०२०-२५६५४७३६

प्राचीन भारतातील स्त्रीगौरव : एक समाजभाषाविज्ञान– अभ्यास

- शैलेश सदाशिव पुंडलीक

समाजभाषाविज्ञानाचे दोन प्रमुख भाग पडतात. एक म्हणजे समाजामध्ये जे वैविध्य आणि वैचित्र्य सापडते त्याप्रमाणे भाषेतही अनेकविध फरक पडतात. या प्रकारामध्ये भाषेचे अनेक उपभाषांमध्ये (dialects) रूपांतर होते. उदा. त्यामध्ये प्रादेशिक उपभाषा, सामाजिक उपभाषा, प्रसंगानुरूप भाषा, तसेच व्यवसायानुरूप उपभाषा, लिंगानुसारी भाषा, भाषाद्वित्त, द्विभाषिकत्व किंवा बहुभाषिकत्व अशा अनेक विषयांचा अंतर्भाव होतो. या अभ्यासाची दिशा समाजरचनेकडून भाषारचनेच्या अभ्यासाकडे असते. या अभ्यासाला समाजभाषाविज्ञान (sociolinguistics) असे म्हणतात.

याच विषयाचा वेगळ्या दृष्टिकोणातून विचार करता येतो. त्या विभागात जेव्हा भाषा एखाद्या गोष्टीच्या संबंधात वापरली जाते; तेव्हा तिच्या प्रत्यक्ष स्वरूपावरून म्हणजे तिच्यातील शब्द, वाक्प्रयोग यांच्यावरून ती भाषा वापरणाऱ्या समाज घटकांच्या त्या गोष्टीसंबंधीच्या भावना, प्रवृत्ती, विचारसरणी या गोष्टी कशा आहेत यांचा अभ्यास करता येतो. या विभागात विविध भाषिकातील संबंधांमध्ये किती दूरत्व अथवा जवळीक आहे याचा अभ्यास होतो. याला आपुलकी, आपलेपणा/जवळीक = (इंग्लिशमध्ये) solidarity, तसेच परकेपणा, बोलणाऱ्यांचे तौलनिक सामर्थ्य, दूरत्व/जवळीक = power असे म्हणतात (याला सामर्थ्यनिदर्शक किंवा 'पॉवर' असे म्हणण्याचे कारण असे की बहुतेक वेळा समाजातील सबल घटक अथवा सबल व्यक्ती असबल घटक किंवा असबल व्यक्तींबरोबर फारश्या जवळिकीने किंवा आपुलकीने बोलताना दिसत नाहीत.) या प्रकारच्या अभ्यासाला इंग्रजीत study of solidarity and power semantics असे म्हणतात.

समाजातील उच्च आणि निम्नस्तरीय व्यक्ती एकमेकांशी बोलताना जे वाक्प्रयोग करतात - विशेषतः ते एकमेकांना संबोधन करण्यासाठी जे संबोधन प्रयोग (address terms) करतात; त्यावरून त्यांच्या एकमेकांसंबंधी असणाऱ्या विचारप्रवृत्तींचा अभ्यास करता येतो. संभाषणासाठी मराठी वापरणाऱ्या उच्चस्तरीय व्यक्ती निम्नस्तरीय व्यक्तींशी बोलताना 'तू' किंवा तत्सदृश्य असे एखादे आदरदर्शक नसणारे सर्वनाम वापरतात, मात्र निम्नस्तरीयांनी त्यांच्याशी बोलताना 'तुम्ही', 'आपण' यांसारखी आदरनिदर्शक सर्वनामे वापरावी अशी अपेक्षा ठेवतात. या मराठी सर्वनामांप्रमाणेच लॅटिनमध्ये vos हे आदरनिदर्शक तर tu हे निम्नतानिदर्शक सर्वनामे दिसतात. त्यांवरून या स्वरूपाच्या अभ्यासाला इंग्लिशमध्ये study of t = 'tu' and v = vos' असे म्हणतात. त्या परिभाषेत उच्चस्तरीय व्यक्ती बोलताना t चा वापर करतात; पण स्वतःसाठी v ची अपेक्षा ठेवतात. हा महत्त्वाचा फरक आहे. उदा. *सर्वसाधारणपणे स्त्रियांनी पुरूषांशी बोलताना v चा वापर करावा पण स्वतः t स्वीकारावे अशी भावना पुरूषप्रधान समाजरचनेत आढळून येते.*

रॉजर ब्राऊन आणि आल्बर्ट गिलमन (१९६०) या दोन भाषाशास्त्रज्ञांनी या संबोधनांचा अभ्यास केला. तो समाजभाषाविज्ञानाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

तसेच भाषेमध्ये आढळणाऱ्या इतरही वेगवेगळ्याभाषाप्रयोगांवरून ती वापरणाऱ्या समाजाचा स्त्रीकडे किंवा पुरूषाकडे पाहाण्याचा दृष्टिकोणही काय आहे हे लक्षात येते. याचे मराठीतील पुढील उदाहरण लक्ष देण्यासारखे आहे; साधारणपणे एखादा पुरूष वेड्यासारखा वागला तर पुरुष 'तो पुरूष किती वेडा आहे' असे म्हणतात. पण एखादी स्त्री वेड्यासारखी वागली तर हेच पुरूष *'स्त्रिया किती वेड्या असतात' असे म्हणतात. जणू काही स्त्रियांकडे वेडेपणाचाच मक्ता दिलेला आहे; तर त्याउलट पुरूषांच्या सर्व क्रिया पूर्णपणे तर्कशुद्ध असतात.*

याप्रमाणेच समाजातील उच्च आणि निम्नस्तरीय वर्गांच्या एकमेकांसंबंधी काय भावभावना आहेत

अनुक्रमणिका

यांचाही अभ्यास करता येतो. याप्रमाणे भाषेच्या प्रत्यक्ष स्वरूपावरून एखाद्या विषयासंबंधी त्या समाजाच्या काय भावना आहेत; हे लक्षात येते. भाषेच्या या अभ्यासाला भाषेचे समाजशास्त्र (sociology of language) असे म्हणायची पद्धत आहे. भाषेचे समाजशास्त्र आणि समाजभाषाविज्ञान यांना एकत्रितपणे समाजभाषाविज्ञान असे म्हणतात.

असा, शास्त्राच्या या दोन पैलूंच्या अभ्यासातील फरक, दाखवता येईल. समाजभाषाविज्ञान आणि भाषेचे समाज - विज्ञान यांच्या अभ्यासामध्ये फार कटाक्षाने फरक दाखविता येतो, असे होत नाही. बऱ्याच वेळा दोन्हींची अभ्याससामग्री आणि अभ्यासपद्धती याही एकच असतात. त्यामध्ये फक्त अभ्यासकाच्या दृष्टिकोणामुळे फरक पडत असतो एवढेच. उदा. लिंगानुसारी भाषा हा विषय या दोन्ही शाखांमध्ये अभ्यासता येतो. स्त्रियांच्या स्वभावानुसार त्यांच्या भाषाप्रयोगात पडणारे फरक आणि पुरूषांच्या भाषाप्रयोगातील फरक यांचा अभ्यास ध्वनिव्यवस्था, रूपिमव्यवस्था, वाक्यरचना आणि अर्थव्यवस्था या सर्वच स्तरांवर करता येतो. या नेहमीच्या अर्थाने समाजभाषाविज्ञानाचा पैलू आहे. याप्रमाणे स्त्री आणि पुरूष यांच्या भाषाप्रयोगांमध्ये प्रत्यक्ष आढळणाऱ्या फरकांवरून स्त्रियांच्या स्त्रीसंबंधी आणि पुरूषांसंबंधी ज्या भावभावना आणि प्रवृत्ती आहेत त्यांचा आढावा घेता येतो. दुसऱ्या दिशेने पाहाता पुरूषांच्या भाषेवरून त्यांच्या पुरूष आणि स्त्री यांच्यासंबंधी असणाऱ्या वेगवेगळ्या प्रवृत्तींचा अभ्यास करता येतो.

या प्रमाणे भाषेच्या समाजविज्ञानाच्या दृष्टिकोणातून प्राचीन भारतीय समाजामध्ये स्त्रीचे काय स्थान होते आणि तत्कालीन स्त्रीपुरूषांच्या स्त्रीसंबंधी काय प्रवृत्ती होत्या हे पडताळून पाहाता येईल. या विषयासंबंधी मला असे म्हणायचे आहे की पितृसत्ताक असणाऱ्या आणि परंपरेने पुरूषप्रधान मानल्या जाणाऱ्या या देशात स्त्रीगौरवाची एक फार मोठी परंपरा अस्तित्वात होती. मुख्य म्हणजे समाजभाषा विज्ञानाचा अगदी वरवर अभ्यास केला तरी या परंपरेचे पुरावे जागोजागी दिसून येतात. त्यासाठी तत्कालीन संस्कृतीचा, परंपरांचा आणि भाषाप्रयोगांचा थोडासा अभ्यास करणे आवश्यक आहे एवढेच.

मी स्वतः त्यासाठी फक्त संस्कृत या भाषेचा आणि पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथाचा विचार करीन, पण इतर भाषांमध्येही हीच प्रवृत्ती थोड्याफार फरकाने आढळून येईल असे मला वाटते. या सामाजिक, ऐतिहासिक-भाषाशास्त्राच्या बरोबर मी समाजभाषाविज्ञानातील सपीर-व्हॉर्फ अभ्युपगमाचाही वापर करीन; कारण भाषा आणि मानुष-भावना/विचार यांची त्यात सहजपणे सांगड घालता येते.

सपीर-व्हॉर्फ अभ्युपगम - भाषिक सापेक्षतावाद :

सर्वसामान्य माणसांची अशी समजूत असते की, द्रव्य आणि आकार हे द्वंद्व, भाषेमध्ये विचार आणि शब्द या स्वरूपात दिसते. त्यांच्या दृष्टीने भाषा हे विचार संप्रेषणाचे निव्वळ माध्यम आहे म्हणून विचार प्रमुख असून शब्द दुय्यम स्वरूपाचे असतात. इ.स. १९४० च्या दशकात बेंजमिन ली व्हॉर्फ या प्रा. सपीर या प्रख्यात भाषावैज्ञानिकाच्या एका विद्यार्थ्याने एक नवाच अभ्युपगम मांडला. त्याच्या विचारानुसार विचार प्राथमिक महत्त्वाचे नसून भाषेमध्ये जे शब्द आणि ज्या रचना उपलब्ध असतात; त्यांच्यामुळे माणसाच्या विचारांची दिशा आणि स्वरूप ठरते. मनुष्य प्रथम विचार करतो आणि नंतर त्याला भाषेचा वेष देतो; असे नसून वस्तुस्थिती अशी आहे की, मनुष्याच्या भाषेमुळे त्याच्या विचारांची सामग्री, रूप आणि दिशा या सर्व गोष्टी ठरतात. व्हॉर्फच्या या अभ्युपगमाला सपीर-व्हॉर्फ अभ्युपगम किंवा भाषिक सापेक्षतावाद असे म्हटले जाते. त्याच्यावर बरीच चर्चा झालेली आहे तरीही तो निर्विवादपणे मान्य झालेला नाही (पुंडलीक, २०००). पण काही विशिष्ट मर्यादांपर्यंत तो अतिशय उपयुक्त आहे, यात शंका नाही. एखाद्या समाजाच्या भाषेत असणारे शब्द आणि वाक्प्रयोग यांच्या सहाय्याने

समाज रचना → भाषेत पडणारे फरक = समाजभाषाविज्ञान भाषेतील फरक → सामाजिक भावनांचे निदर्शन = भाषेचे समाजविज्ञान

त्या समाजातील स्त्री सारख्या एखाद्या विषयासंबंधी काय विचार आणि प्रवृत्ती आहेत हे सहज समजून येते. सामाजिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासात त्याचा पुष्कळ उपयोग होतो.

भाग २ : मातृसत्ताक/पितृसत्ताक समाज आणि स्त्रीचे हक्क

मानवी समाज हे बहुतांशी पुरूषप्रधान/पितृसत्ताक (patriarchal) असल्याचे दिसून येते. जगात काही देश मातृसत्ताकही होते. पण ही पद्धत जगाच्या इतिहासात फार काळ कुठेही चालली नाही. भारतामध्येसुद्धा स्त्रीप्रधान किंवा मातृसत्ताक (matriarchal) पद्धती केरळ आणि कामरूप या देशात होत्या. (विशेषतः केरळमध्ये तर ती एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत अस्तित्त्वात होती.) पण असे असले तरी मातृसत्ताक समाजातही सर्व सत्ता खऱ्या अर्थाने स्त्रीच्या हातात पूर्णपणे होती असे कधी नव्हते. कारण अशा समाजातही स्त्रीच्या संपत्तीचे आणि घरादाराची रक्षण करण्याची जबाबदारी तिच्या भावावर असे. याचाच अर्थ असा की मातृसत्ताक समाजातही अनेक अधिकारांचा उपयोग प्रत्यक्षात पुरूषच करत असे. मग पितृसत्ताक पद्धतीत सर्वच अधिकार पुरूषांच्या हातात असतील यात फारसे आश्चर्य नाही.

पुरूषप्रधानतेमुळे पितृसत्ताक पद्धतीत पुरूष स्वतःच्या अधिकारांचा अतिरेकी-गैर-वापर करण्याची शक्यता कधीच नाकारता येत नाही. आपल्यामध्ये एक अशी दृढ समजूत आहे की भारत हा पूर्वापार काळापासून अशा अन्याय्य परंपरेने पितृसत्ताक देश आहे. त्यामध्ये स्त्रियांना नेहमीच गौण स्थान दिले जात असे. उदा. त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार नसे. दुसरे म्हणजे मनने 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे म्हटले आहे आणि तिसरे म्हणजे अशाच मनोवृत्तीच्या इतर काही पुरूषांनी स्त्री ही ताडनाची (म्हणजे मार खाण्याची) अधिकारी आहे असे म्हटले. त्यामुळे वेद, वेदाश्रित धर्म, मनु आणि यांच्याबरोबर कदाचित सर्वच भारतीय समाज पूर्वग्रदूषित झाला असे चित्र निर्माण होते.

स्त्री-गौरवासंबंधी (chivalry) संकल्पना प्रथम इंग्लंडचा राजा आर्थर आणि त्याचे शूर सरदार यांच्या काळात निर्माण झाल्या आणि नंतर त्या तिथून इतर जगामध्ये तसेच भारतातही आल्या अशीही एक समजूत आपल्याकडे आढळते. प्रत्यक्षामध्ये गेल्या सहा-सातशे वर्षांच्या काळामध्ये इंग्लंडमध्ये स्त्रीला फारशी प्रतिष्ठा नव्हती. तत्कालीन इंग्लिश समाज पूर्णपणे पुरूषप्रधान होता. त्यामुळे स्त्रीच्या चांगल्या नशीबाचे द्योतक म्हणजे तिला एखादा सधन आणि सुस्वभावी नवरा मिळणे हे होते. जेन ऑस्टेन या प्रख्यात इंग्रजी लेखिकेच्या 'प्राईड ॲन्ड प्रेज्युडिस' या प्रसिद्ध कादंबरीतील पहिलेच वाक्य या कठोर सत्याचे निदर्शन करते (It is a truth acknowledged universally that a single man in possession of a large fortune must be in want of a wife) किंबहुना या कादंबरीचा विषयच तरुण मुलींच्या आईबापांनी त्यांची लग्ने जमविण्यासाठी केलेली धडपड हा आहे. (The business of her life was to get her daughters married.) या प्रमाणे इंग्लंडमधील पुरूषी वर्चस्वाचे अनेक नमुने इंग्रजी वाङ्मयातच पाहायला मिळतात.

भरीस भर म्हणून विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापर्यंत स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी त्यांना स्त्रीहक्कांची मोठी चळवळ सुरू करावी लागली. इतकेच नव्हे तर काही काही जागांमध्ये उदा. विद्यापीठांच्या ग्रंथालयामध्ये स्त्रियांना प्रवेश नव्हता. त्यामुळे संतापलेल्या व्हर्जिनिया वुल्फ या प्रख्यात लेखिकेने असे मत व्यक्त केले होते की अशा ग्रंथालयांमधये (आत जाऊन) बंदिस्त होण्यापेक्षा ती बंद असलेलीच बरी (तिचे वाक्य प्रत्यक्षात असे आहे (It is better to be locked outside than inside)

स्त्रियांच्या या दुर्दैवी अवस्थांवर तसेच त्यांच्या भाषेत आढळणाऱ्या पुरूषी वळणाबद्दल इंग्लंडमध्येही कुणी म्हणजे अगदी स्त्रियांनीसुद्धा फारसे लिहिले नाही. मात्र इ.स. १९७३ च्या सुमारास रॉबिन लेकॉफने भाषेमध्ये आढळणाऱ्या पुरूषी वर्चस्वाची चर्चा केली; त्यानंतर इतरही अनेक लेखिकांनीसुद्धा या विषयात पुरूषी अहंभावावर बरेच लिखाण केलेले आहे. तेव्हापासून इंग्रजी भाषेमध्ये खूप बदल घडवून तिच्यात

लिंगनिरपेक्षता आणण्याचा बराच प्रयत्न झाला.

या उलट दुसऱ्या बाजूने पाहिले तर भारतीय संस्कृती आणि भारतीय समाजात स्त्रीगौरव अनेकविध मार्गांनी प्रकट होत असे. अगदी वैदिक काळातील स्त्रियांसंबंधी बोलायचं झाले तर वेदांमध्ये अनेक ठिकाणी त्यांची प्रशंसा केल्याचे दिसून येते. विशेषतः हे ऋषी पुरूष असल्यामुळे त्यांची स्त्री संबंधीची मते लक्षणीय आहेत.

तत्कालीन स्त्रियांना घरामध्ये आणि घराबाहेरही उत्कृष्ट शिक्षणाची संधी आणि उत्कृष्ट आदर्श उपलब्ध होते. वैदिक ऋषींच्या दृष्टीने स्त्री ही मुळातच जास्त भावनाशील आणि उदार अंतःकरणाची असल्याने तिला दुःखी आणि थकलेल्या लोकांच्या गरजा स्वाभाविकपणे समजतात. दुसऱ्या बाजूला तिला देव आणि कर्तव्य यांचे जास्त चांगले ज्ञान होऊ शकते. 'विया जानाति जसुरिं वितृषंतं विकामिनं । देवत्रा कृणुते मनः' (ऋग्वेद ५.६१.७). तसेच अशी सुशिक्षित स्त्री ही एखाद्या अधार्मिक आणि कृपण माणसापेक्षा नेहमीच चांगली आहे,' उतत्वा स्त्री शशीयसी पुंसो भवति । वस्यसि अदेववादराधसः' (ऋग्वेद ५.६१.६)

या समाजातील स्त्रीगौरवासंबंधी अनेक पाश्चात्य लेखकांनीही लिहिलेले आहे. उदा. वैदिक काळातील स्त्रियांसंबंधी लिहिताना प्रा. वेबर यांनी असे म्हटलेले आहे, "The free position held by women at this time is remarkable. We find songs of the most exquisite kind attributed to poetesses and queens, among whom the daughter of Atri appears in the foremost rank." त्या काळी ज्या दर्जाच्या तत्त्वज्ञानिक चर्चा होत असत आणि त्यात स्त्रिया ज्या पद्धतीने भाग घेत असत त्यासंबंधी वेबरने पुढे दिल्याप्रमाणे लिहिलेले आहे, "We must, at any rate, assume among the Brahmans of this period a very stirring intellectual life in which even the women took an active part... women who with enthusiastic ardour plunge into the mysteries of speculation impressing and astonishing men by the depth and loftiness of thier opinions, and who solve the questions proposed to them on sacred subjects." (History of Indian literature, page 21, 22, 38).

आता प्रा. वेबर प्राचीन भारतातील परिस्थिती, वैदिक काळातील स्त्रिया आणि तत्कालीन ब्राह्मणांसंबंधीच लिहीत होते असे म्हणता येईल हे खरे; पण भारतात अशा अनेक गोष्टी नंतरच्या युगांमध्येही आणि ब्राह्मणेतर समाजातही पाहायला मिळतात. अगदी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकातही- म्हणजे ज्या काळात भारतीय स्त्रियांना जास्तीत जास्त वाईट वागणूक मिळाली असण्याची शक्यता आहे- त्यांच्या बुद्धिमत्तेची तारीफ करण्यासारख्या अनेक गोष्टी दिसून येतात. उदा. सर जॉन माल्कन यांनी देवी- अहिल्याबाईसंबंधी म्हटले आहे, "She has become,l by general suffrage, the model of good government in Malwa... In the most sober view that can be taken of her character, she certainly appears... to have been one of the purest and most exemplary rulers that ever existed; and she affords a striking example of the practical benefit a mind may receive from performing wordly duties under a deep sense of responsibility to its creator." (मेम्वार ऑफ सेंट्रल इंडिया इन्क्लुडिंग माळवा १८३२, भाग १, पृ. १८५, १९५)

या काळासंबंधी लिहिणारे दुसरे लेखक कर्नल टॉड हे जेव्हा अठरा/एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्रियांसंबंधी लिहीत होते; तेव्हा त्यांनाही भारतामध्ये स्त्रियांना मिळणाऱ्या सन्मानाचे चित्र पहायला मिळाले होतेच. त्यांनी भारतीय स्त्रियांसंबंधी जे अनेकविध गैरसमज पसरविले जातात त्या विरूद्ध असणारी सत्यस्थिती पुढील शब्दात नोंदविलेली आहे, "Most erroneous ideas have been formed of the Hindu female, from the pictures drawn by those who never left the bank of the Gangese. They are represented as degraded beings, and that not one in

अनुक्रमणिका

many thousands can even read." टॉड यांच्या विधानांना बरेच महत्त्व आहे; कारण त्यांनी ही विधाने स्वतःच्या अनुभवावरून केलेली आहेत, "From the knowledge I do possess of the freedom, the respect, the happiness which the Rajput women enjoy, I am by no means inclined to deplore their state as one of captivity." अगदी अठराव्या/एकोणिसाव्या शतकातही भारतीय समाजजीवनात स्त्रियांचा फार मोठा प्रभाव दिसून येत असे. त्यासंबंधी टॉड यांनी पुढील निरीक्षणे नोंदविलेली आहेत, "Though immured and invisible, their influence on society is not less certain than if they moved in the glare of open day." (Annals of Rajasthan, vol. 1, p.p. 523-24, 531 1880). याप्रमाणे भारतामध्ये नेहमीच स्त्रियांचा गौरव केला जात असे हे त्याच्या परंपरा, संस्कृती आणि विशेषतः भाषा यांच्या आधारे दाखविता येते. या चर्चेच्या पुढील विभागात प्राचीन भारतातील भाषा आणि समाज यासंबंधी ज्या गोष्टी आढळून येतात त्यांची चर्चा केलेली आहे.

भाग ३ : विविध समाजघटकांच्या स्त्रीसंबंधीच्या प्रवृत्ती

समाज, संस्कृती आणि भाषा यामध्ये स्त्रीविषयी आढळणाऱ्या भावना आणि प्रवृत्ती यांचे वर्गीकरण तीन प्रमुख गटांमध्ये करता येईल.

१. समाजाच्या, संस्कृतीच्या स्त्रीसंबंधी असणाऱ्या भावना आणि प्रवृत्ती.
२. स्त्रीच्या स्त्री संबंधी असणाऱ्या भावना आणि प्रवृत्ती.
३. पुरूषांच्या स्त्रीसंबंधीच्या भावना आणि प्रवृत्ती (या पुरूषात प्रामुख्याने पिता, पति आणि मुलगा या तीन नात्यांचा विचार करावा लागतो.)

समाजाच्या स्त्रीसंबंधी असणाऱ्या वृत्ती आणि भावना :

१) धर्म आणि शिक्षण :

प्राचीन भारतामध्ये गोत्र, जनपद/देश, आणि पिता यांच्या नावावरून स्त्रीचे नामकरण करण्याची एक प्रथा अस्तित्वात होती. त्यातून त्यांची सामाजिक प्रतिष्ठा आणि गौरवात्मक स्थिती यांचा निर्देश होत असे. अशा स्त्रिया सुना म्हणून दुसऱ्यांच्या घरात गेल्या तरी त्यांना त्यांच्या मूळ नावानेच हाक मारण्याची प्रथा असे. मुख्य म्हणजे *कोणत्याही स्त्रीचे नाव तिच्या पतीच्या नावावरून ठरविले जात नसे.* या उलट काही अपवादात्मक परिस्थितीत पत्नीच्या नावाचा उल्लेख हा तिच्या पतीच्या नावाचा भाग होत असे आणि त्यात त्या घरातील सर्व पुरूषांना अभिमानही वाटत असे या गोष्टींचे निर्देश पाणिनीने आणि भाष्यकारांनी ठिकठिकाणी केले आहेत. खाली त्यांचा आढावा घेतलेला आहे. देश आणि पिता यांच्या नावावरून स्त्रीचे नाव ठेवले जाणे हे प्राचीन भारतात सर्वमान्य होते : महाभारतातील अनेक स्त्रियांची नावे या पद्धतीने तयार झालेली आहेत. उदा. गांधार → गांधीर, केकय → कैकेयी, कोशल → कौसल्या, मद्र → माद्री, कुंती/कोंतवार → कुंती, कुरू → कुरू, भर्ग → भार्गी. याप्रमाणेच पांचाली, वैदेही, आंगी, वांगी, मागधी अशीही अनेक नावे दिसून येतात. आज सुद्धा राजस्थानमध्येही राण्यांचे उल्लेख हाडौती रानी, ढूंढारी रानी असे त्यांच्या जनपदांच्या, कुटुंबांच्या नावावरून करण्याची प्रथा आहे.

देशानुसार नाव ठेवल्या जाणाऱ्या या स्त्रिया नेहमीच राजकुमारी असत असाही नियम नव्हता. उदा. त्या काळात यौधेय, लिच्छवी अशी लोकशाहीवादी गणराज्येही अस्तित्वात होतीच त्यात राजा, राजकुमारी वगैरे शब्द उत्पन्नच होत नाहीत. पण त्या गणांच्या नावांवरून यौधेय → यौधेयी, लिच्छवी → लिच्छवी अशी नावे तयार होत असत. एकूणच या स्त्रिया त्यांच्या देशांच्या, गावांच्या, परंपरांच्या, संस्कृतीच्या, अभिमानाच्या प्रतीक होत्या. त्यांना त्याप्रमाणे सन्मानाने वागवले जात असे. (४/१/१७६/७८, ४/१/१७८). गोत्र आणि पित्याच्या नावावरून प्रचारात आलेली नावे पुढीलप्रमाणे आहेत. गर्ग → गार्गी/गार्ग्यायणी, भृगु → भार्गवी, जनक - जानकी, पर्वत → पार्वती, कुंतीभोज → कुंती इ. इ. ही नावे पित्याच्या सन्मानाची द्योतक असत. त्यामुळे त्या स्त्रियांनाही त्यांच्या गौरवाचा अधिकार प्राप्त होत असे. वर म्हटल्याप्रमाणे पतीच्या नावावरून स्त्रीचे नाव ठरत नसे पण पतीच्या गौरवात मात्र तिला हिस्सा प्राप्त होत

असे, उदा. पतीच्या हुद्यावरून तिला काही विशेषणे प्राप्त होत असत उदा. महामात्र → महामात्री, गणक → गणकी, आचार्य → आचार्यानी. अशा वेळी पतीच्या गौरवानुसार तिलाही गौरव/प्रतिष्ठा प्राप्त होत असे.

प्राचीन भारतीय समाजाने स्त्रीला पुरूषाचे *अर्धांग* मानलेले आहे. ती त्याची *सहधर्मचारिणी* असे. पतीबरोबर यज्ञकर्म करण्याचा अधिकार तिला प्राप्त होतो म्हणून तिला पत्नी असे म्हटले जाते. (पत्युर्नो यज्ञसंयोग ४/१/३३). पत्नी या शब्दाचा अर्थ 'स्वामिनी' असा होतो. पण अर्थातच यथायोग्य विवाह समारंभ झालेला नसेल तर ती स्त्री स्वामिनी होऊ शकत नाही. देवपूजा, स्वयंपाकघर, राज्यकारभार, गृहकारभार, व्यवसायातील लाभ यात स्वामिनीला अधिकार असत.

शिक्षणाचा अधिकार : त्या काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता असे म्हणणाऱ्यांसाठी हे नमूद केले पाहिजे की त्यांना शिक्षणाचा अधिकार तर होताच पण शिकवण्याचाही अधिकार होता. (४/१/६३) कृष्ण यर्जुर्वेदाच्या कठ शाखेत शिकणारीला कठी असे म्हणत. तसेच ऋग्वेदाच्या बह्वृच शाखेत शिकणारीला बह्वृची असे म्हणत. विद्येच्या इतर शाखांमध्येही उदा. मीमांसा आणि व्याकरण यासारख्या अवघड विषयांचाही त्या अभ्यास करू शकत. पाणिनीचा अभ्यास करणारी ती पाणिनीया, आपिशलीच्या व्याकरणाचा अभ्यास करणारी ती आपिशला (४/१/१४), काशकृत्स्नाच्या मीमांसेचा अभ्यास करणारी ती काशकृत्स्ना (४/१/१४, ४/१/८३, ४/३/१५५) अशी त्यांची वर्णने केली जात. या स्त्रिया त्यांची इच्छा असेल तर पूर्ण आयुष्यभर सुद्धा ब्रह्मचारिणी म्हणून राहू शकत. विवाह आणि वैवाहिक आयुष्य किंवा चूल आणि मूल हेच स्त्रीच्या आयुष्यातील अंतिम ध्येय नाही; हे त्यांच्या उदाहरणावरून सिद्ध होते.

याहीपेक्षा जास्त लक्षणीय गोष्ट अशी की अशा सुविद्य स्त्रीबरोबर विवाह करणारा पुरूष स्वतःला भाग्यवान समजत असे आणि *तिच्या नावावरून स्वतःचे नामकरण करून त्यात अभिमान मानीत असे.* उदा. औपगवी माणविका भार्या अस्य औपगवी भार्यः, ग्लुचुकायनी माणविका भार्या अस्य, ग्लुचुकायनी भार्यः (४/१/९३, वा ९) पतींच्या नावावरून स्त्रीचे नाव कधीच ठेवले जात नसे. या उलट पत्नीच्या नावावरून पतीची ओळख देण्याचा हा प्रकार सर्व जगात अभिनव असा आहे. विद्यार्जनाच्या क्षेत्रातही स्त्रीला कोणत्याही भेदभावाचा अनुभव येत नसे. विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना समान अशीच वागणूक दिली जात असे. त्यात लिंगभेदानुसार श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव केला जात नसे.

पाठशाळेमध्ये अभ्यास करायला येणाऱ्या यथायोग्य व्यवस्था करण्याचीही प्रथा तत्कालीन समाजामध्ये अस्तित्वात होती. शिक्षणासाठी आलेल्या माणविका म्हणजे विद्यार्थिनींना रहाण्यासाठी स्वतंत्र वेगळी व्यवस्था केलेली असे. या प्रकारच्या लेडीज होस्टेलला छात्रीशाला असे म्हणण्याची पद्धत होती. (छात्र्यादयः शालायां ६/२/८६) विद्यार्थ्यांप्रमाणेच अशा माणविकांचेही उपनयन केले जात असे. ज्ञानोपासना हे एक व्रत आहे : व्यसन आहे. काही स्त्रिया आयुष्यभर अविवाहित राहूनही हा अभ्यास पुढे चालवत. त्या शाळांमध्ये येणाऱ्या नवीन पिढीच्या विद्यार्थिनींना शिकवण्याचे काम त्या करत असत. वेदांचे अध्यापन करणाऱ्यास माणविकांचे उपनयन करण्याचा अधिकार असणाऱ्या अशा थोर शिक्षिकांना आचार्या असे म्हणत. आचार्यांची पत्नी ती आचार्यानी (म्हणजे केवळ पतीच्या अधिकारामुळे अधिकार प्राप्त झालेली) या शब्दाच्या विरूद्ध स्वतः अध्यापन करणारी ती आचार्या असा त्यांच्यामध्ये स्पष्ट भेद केला जात असे.

ज्ञानोपासनेप्रमाणे धर्माचा अभ्यास आणि धर्माचरण याही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. स्त्रीची इच्छा असल्यास आयुष्यभर अविवाहित राहून भिक्षुणीसारखे रहाणे, हा पर्याय तिला उपलब्ध होता. अशा स्त्रीला कुमारश्रमणा असा शब्द आहे. (कुमार श्रमणादिभिः, २/१/७०). पुरूष संन्याशांसाठी परिव्राजक असा शब्द असतो तसा ब्रह्मचारिणी स्त्रीसाठी परिव्रजिता असा शब्द वापरलेला आहे. बौद्ध धार्ममध्येही भिक्षुर्णीची योग्यता ओळखून त्यांच्यासाठी भिक्षुणी संघाची व्यवस्था केलेली

होती.

२) स्त्रियांचे सामाजिक जीवन :

वर नमूद केल्याप्रमाणे स्त्रीला अविवाहित राहाण्याचा अधिकार होता हे जसे खरे होते तसेच तिला सांसारिक आयुष्यातही अनेक अधिकार प्राप्त व्हायचे. त्यातील एक विशिष्ट प्रकार म्हणजे स्त्रीक्रीडा करण्यासाठी म्हणजे आपल्या मैत्रिणींबरोबर खेळण्यासाठी तिला स्वतंत्र उद्याने उपलब्ध होती. *या उद्यानांमध्ये पुरूषांना प्रवेश नसे.* स्त्रियांच्या खेळांपैकी काहींची नावे शालभंजिका क्रीडा, उद्दालकपुष्प क्रीडा अशी होती. बागेमध्ये खेळल्या जाणाऱ्या या खेळांना उद्यानक्रीडा असे नाव होते. फक्त स्त्रियांपुरते असणारे असे खेळ आणि फक्त स्त्रियांपुरती उपलब्ध असणारी उद्याने ही बहुधा भारतातच सापडत असावीत. (६/२/७४).

आभूषणांच्या बाबतीतही एक गोष्ट स्पष्ट आहे की पुरूषांच्या दागिन्यांपेक्षा स्त्रियांच्या दागिन्यांची संख्या जास्त असणे स्वाभाविक आहे. या दागिन्यांचा उल्लेख ४/२/९६ या सूत्रात केलेला आहे.

विवाह करणाऱ्या स्त्रीला तिच्या पतीच्या घराप्रमाणे संपत्तीतही अधिकार असे. उदा. राजाबरोबर जिचा राज्याभिषेक केला जात असे तिला पट्टमहादेवी किंवा महिषी असे म्हणत. (४/४/४८). त्याच्याबरोबर राज्यकारभार करण्यासाठी तिला वेतनाप्रमाणे ठराविक रक्कम मिळत असे. त्याला माहिष असे म्हणत (अण महिष्यीदभ्यः ४/४/१६), महिष्याधर्म्य माहिषं) त्या राजाला इतर राण्या असल्या तर त्यांना प्रजावती असेही म्हणत. त्यांना मिळणाऱ्या धनाला प्राजावत असे म्हणत. कौटिल्याने कुणाला किती धन मिळावे याचे आकडे सुद्धा नमूद केलेले आहेत. त्याचप्रमाणे महिषीला दर वर्साला ४८,००० पण तर इतर राण्यांना दर वर्षाला १२,००० पण मिळत असत. (टीप : पण हे एक चांदीचे नाणे आहे.)

३) संपत्तीवरील हक्क :

तत्कालीन स्त्रियांचा पतीच्या संपत्तीवर हक्क असे आणि त्याचा हवा तसा विनियोग कराला त्यांना मोकळीक असे. भारतातील अनेक देवळांमध्ये दान देणाऱ्यांच्या याद्यांमध्ये अनेक स्त्रियांची नावे आढळून येतात. अहिल्याबाईचे नाव तर यात अग्रगण्यच आहे.

४) मतदानाचा अधिकार आणि क्षात्रतेज :

इंग्रज समाजात विसाव्या शतकापर्यंत स्त्रियांना मतदानाचा हक्क नव्हता. पण भारतात दोन हजार वर्षांपूर्वी लिच्छवी किंवा यौधेयांसारखी अनेक लोकशाहीवादी/गणराज्ये होती असे वर म्हटलेले आहे. त्या गणराज्यात स्त्रियांच्या मतांचा आदर केला जात असे. तसेच युद्धाच्या वेळीसुद्धा त्या हातात शस्त्र घेऊन शत्रूबरोबर लढत असत. या विषयाच्या जास्त माहितीसाठी जिज्ञासूंनी राहुल सांकृत्यायन या महापंडितांनी लिहिलेली जय यौधेय ही कादंबरी वाचण्यासारखी आहे.

५) स्त्री आणि विवाह :

वास्तविक वैवाहिक जीवन हे स्त्रीचे सारसर्वस्व नव्हे हे आधीच दाखवून झालेले आहे. तरीही स्त्रीच्या संदर्भात विवाह या संस्थेमुळे कांही अनर्थकारी परंपरा रूढ झालेल्या आहेत. त्यामध्ये विधवा हा शब्द दुर्दैवाचे आणि अमंगलाचे प्रतीक मानला जातो. वास्तविक त्याचा मूळ अर्थ चांगला असून त्याला वाईट अर्थ प्राप्त होणे अशक्यच होतेया वस्तुस्थितीकडे आपण लक्ष देत नाही. त्याचा योग्य तो अर्थ समजण्यासाठी भारोपीय समाजाचा इतिहास आणि त्याची भाषा यांचे काही धागेदारे लक्षात घ्यावे लागतील.

विधवा हा शब्द जवळजवळ सर्वच भारोपीय भाषांमध्ये दिसून येतो. उदा. म. इं. → विद्वे, विदेवे (widwe, widewe); ग्रीक → वित्वे (wittwe); सॅक्सन → विद्वे; अॅ. सॅ. विद्वे (widwe), गोथिक → विदोवो (widowo) लॅटिन → उइदुआ (uidua) इ. इ. याचा अर्थ असा होतो की भारोपीय समाजाचे विभाजन होण्यापूर्वी हा शब्द अस्तित्वात होता. तत्कालीन समाजात विवाह ही संस्था आणि संस्कार अस्तित्वातच नव्हते. उदा. महाभारतात उत्तर कुरू या देशाचा उल्लेख आहे. हा बहुधा सध्याचा बॅक्ट्रिया नावाचा देश असावा. भारोपीय आर्य त्या लगतच्या प्रदेशातून पूर्व आणि पश्चिम दिशांना युरोप आणि भारतात आलेले असावेत असा एक अंदाज करता येतो. त्यातील स्त्रिया विवस्त्र वावरत आणि त्यांना हव्या त्या पुरूषाबरोबर समागम करीत- *ते धर्म्य मानले गेले*

होते. याचा अर्थ एवढाच की त्या काळात कोणत्याही स्त्रीने कोणत्याही पुरूषावरोवर समागम करणे निषिद्ध मानले गेले नव्हते.

त्यानंतर पाणिनीच्या आधी सुमारे ५०० ते ७०० वर्ष या काळात श्वेतकेतू नावाच्या महर्षीने विवाह संस्थेचे नियम सूत्रबद्ध केलेले असावेत. पण विधवा हा शब्द श्वेतकेतूच्याही आधीच्या काळापासून वापरला जात असली पाहिजे हे स्पष्ट आहे. आता ज्या काळात विवाह ही संस्थाच नव्हती त्या काळात विवाह होणे हे स्त्रीचे अंतिम भाग्य होऊ शकत नाही. पण तर मग अशा समाजात सौभाग्य, चि.सौ.कां., सौभाग्यवती असे शब्दही उपपन्न होत नाहीत. मग अशा काळातही विधवा हा शब्द वापरला जात असेल तर त्या शब्दाला अशुभ आणि अमंगल असा अर्थ प्राप्त होऊच शकत नाही हेही मान्य करायला हवे.

अर्थात् एका दृष्टीने विधवा हा शब्द दुर्दैवाचे निदर्शक होता यात शंका नाही, पण तो सध्याच्या रूढ अर्थाने नव्हे. तत्कालीन स्त्रील जसे तिच्या इच्छेनुसार कोणत्याही पुरूषाबरोबर जाण्याचे स्वातंत्र्य होते तसे तिच्या पसंतीच्या एखाद्या पुरूषाबरोबर सर्व आयुष्यभर रहाण्याचे स्वातंत्र्यही तिला होतेच. त्यातील दुर्दैवाचा भाग ही की हा तिचा जोडीदार काही कारणामुळे मरण पावला तर ती दुःखाची गोष्ट आहे; आणि तिला त्याबद्दल स्वाभाविकपणे दुःख होणारच. मग तरीही तिला दोन पर्याय उपलब्ध होतेच. एक तर ती नंतर तिच्या पसंतीच्या दुसऱ्या एखाद्या पुरूषाबरोबर राहू शकते; किंवा दुसरे म्हणजे ती उरलेला सर्व जन्म आपल्या जोडीदाराच्या आठवणीत घालवू शकते. एखादी दुर्दैवी विधवा तरुण आणि सुंदर असेल तर तिला दुसऱ्या पुरूषाकडे जाण्याचा सल्ला मिळणे स्वाभाविक आहे. तो अमान्य करून ती तशीच राहिली तर *तिच्या त्या भावनांचा आदर करून* इतर पुरूषांनी तिचा विचार करू नये याचे प्रतीक म्हणून विधवा हा शब्द वापरला जात असला पाहिजे. तेव्हा हा शब्द खऱ्या अर्थाने स्त्रीच्या भावनांचा आदर करणारा, तिच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणारा, तिच्या मूलभूत इच्छांना गंभीरपणे मान्यता देणारा असा शब्द आहे.

एखाद्या चांगल्या अर्थाच्या शब्दाला वाईट अर्थ लगेच प्राप्त होऊ शकतो. भारतात पितृसत्ताक पद्धत रूढ झाली तेव्हा विशेषतः विधवा या शब्दाला इतका वाईट अर्थ प्राप्त झाला की 'सौभाग्यवती भव' याचा खरा अर्थ *नवऱ्याआधी तुझा मृत्यू होवो* असा होतो याकडे कोणाचे लक्ष जात नाही. सौभाग्य आणि सुवास या अतिशय सुंदर शब्दांचे मृत्यूवरोवर अतूट नाते जोडले गेले आणि सर्वांत जास्त चांगला आर्शीवाद देण्याच्या बहाण्याने मृत्यूसारखा अभद्र आशीर्वाद देण्याची प्रथा सुरू झाली.

(एक लहानशी टीप : उत्तरकुरू या देशातील स्त्रियांचा उल्लेख वरती केला गेलेला आहे आणि त्यांच्या अमर्याद स्वातंत्र्यामुळे त्या स्वैराचारी असाव्या ही एक समजूत होण्याची शक्यता आहे. प्रत्यक्षात ती पूर्ण चुकीची असली पाहिजे. स्वातंत्र्य असणे आणि ते अनिर्बंधपणे वापरणे यात फरक आहे ही एक गोष्ट. दुसरे म्हणजे या परिस्थितीचा वासनांध पुरूषांनी गैरफायदा घेणे ही दुसरी गोष्ट. या दोन्ही गोष्टी त्या काळात घडल्याच्या नोंदी आढळत नाहीत. या उलट पुरूष किंवा स्त्री स्वैराचाराने वागत नसत अशी नोंद मात्र आवर्जून पहायला मिळते.

छांदोग्य उपनिषदाच्या पाचव्या अध्यायात उद्दालक आणि त्याचे इतर काही मित्र अश्वपती या नावाच्या केकय देशाच्या राजाकडे गेले. हा राजा मोठा धर्मवेत्ता आणि द्रष्टा ऋषी होता. तेव्हा त्याने आपल्या राज्यातील समाज व्यवस्थेचे वर्णन करताना माझ्या राज्यात दारू पिणारे, अविद्वान, अग्निपूजा न करणारे असे लोक रहात नाहीत असे म्हटले. याच यादीत त्याने त्याच्या राज्यात स्वैराचारी पुरूष नसल्याचाही उल्लेख केलेला आहे. आणि *स्वैराचारी पुरूषच नसतील तर स्वैरिणी स्त्रिया कुठून येणार* असा प्रश्न त्याने पुढे विचारलेला आहे. अश्वपती स्वतः आत्मज्ञानी आणि सत्यव्रती आहेच; तेव्हा तो आपल्या समाजाची/ प्रजाजनांची खोटी स्तुती करणार नाही हे स्पष्ट आहे. दुसरे म्हणजे तसे करणे त्याला शक्यही झाले नसते, करण ते उद्दलक आणि त्याच्यासारख्या इतर प्रज्ञासंपन्न ऋषींच्या लगेच लक्षात आले असते. तिसरे म्हणजे राजा स्वतः धर्माचरण करणारा असेल तर त्याच्या चारित्र्याचा प्रजाजनांवर लगेच परिणाम होतो, या

अनुक्रमणिका

नियमाने तत्कालीन राजा तथा प्रजा चारित्र्यसंपन्न असणे फारसे आश्चर्यकारक नाही.

चौथे म्हणजे एखाद्या देशात चांगल्या घटना घडत असताना त्यांचाही परिणाम शेजारच्या देशांमध्ये दिसून येतो. केकय देश तसेच त्याच्या आजूबाजूचे प्रदेश यांच्यातील सद्‌गुणी प्रजाजनांचा एकमेकांवर परिणाम होणे स्वाभाविक होते. त्यानुसार केवळ केकयच नव्हे तर तत्कालीन इतरही अनेक प्रदेश असे चारित्र्यसंपन्न असावे असा सहज तर्क करता येतो. तेव्हा उत्तरकुरूतील स्त्रिया स्वैरिणी नसण्याची शक्यता जास्त आहे. त्यांच्या स्वातंत्र्य-धर्माचा अर्थ एवढाच घ्यायचा की समाजाने स्त्रियांना व्यक्तिगत स्वातंत्र्य दिलेले असले तरीही त्यामध्ये स्वैराचार न करणे अशी वैयक्तिक वृत्तीसुद्धा तत्कालीन स्त्री पुरूषांमध्ये होती. अन्यथा त्यांच्या स्वैराचाराच्याही नोंदी उपलब्ध होऊ शकल्या असत्या. कारण ज्या समाजात स्त्रियांना इतके स्वातंत्र्य मिळते त्या समाजात त्यांच्या स्वैराचाराच्या गोष्टींचीही नोंद व्हायला हरकत नाही. पण तशा नोंदी कुठेच आढळत नाहीत. किंबहुना इतर कुणीही पाहू शकले नाही; तरी देव सर्व काही पाहू शकतात म्हणून पाप करू नये असाच सद्‌सद्‌विवेक सांगणारा उपदेश यमाने यमीला केलेला होता.

अश्वपतीच्या विधानांचा अर्थ दुसऱ्याही एका दृष्टिकोणातून लावणे आवश्यक आहे. पुरूष स्वैराचारी नसतील तर स्त्रिया स्वैराचारी होऊ शकत नाहीत असे म्हणताना त्याने स्वैराचाराची सर्वच जबाबदारी पुरूषांवर टाकलेली आहे. अश्वपती हा त्याच्या देशासाठी कर्तुम अकर्तुम अन्यथा कर्तुम म्हणजे एखादी गोष्ट करणे किंवा न करणे किंवा आपल्याला हव्या त्या पद्धतीने करण्याचे सामर्थ्य असणारा राजा होता. तो स्वतः पुरूष होता आणि स्त्री मुक्तीवादी नव्हती. तरीही त्याने असा निर्बंध घालून द्यावा ही गोष्ट लक्षात घेतली तर तत्कालीन समाजामध्ये स्त्री किती सुरक्षित होती आणि तिला किती स्वातंत्र्य होते या दोन्ही गोष्टी अधोरेखित होतात.)

स्त्रीच्या आणि पुरूषांच्या स्त्री संबंधीच्या भावना :

तसे पाहिले तर या दोन्ही विषयांचा अभ्यास एकत्र करणे जास्त योग्य आहे कारण स्त्रीच्या स्त्रीसंबंधींच्या भावनांची उदाहरणे फारशी सापडत नाहीत. शिवाय पुरूषांच्या स्त्री संबंधी असणाऱ्या भावना या पिता, पती आणि पुत्र या तीन स्तरांवर व्यक्त होतात - त्यात स्त्रीच्याही भावना काही वेळा व्यक्त होतातच.

पित्याच्या मुलीबद्दलच्या भावनांचे उत्कृष्ट उदाहरण कण्व आणि शकुंतला यांच्या कथेत दिसते. अर्थात हे एकच उदाहरण आहे असे नाही. जनकाला सीता जमीन नांगरताना मिळाली, तसेच आदिशक्ती महालक्ष्मी लहान मुलीच्या रूपाने महर्षि कात्यायनांच्या आश्रमात आली; तेव्हा त्यांनीही तिला मुलगी मानले होते. त्यांच्या नावावरूनच देवीचे नाव कात्यायनी असे पडले अशी एक कथा आहे. असेही इतर अनेक पुरूष असू शकतात की ज्यांना स्वतःची मुलगी नाही म्हणून त्यांनी शकुंतलेसारख्या मुलीला आपल्या मुलीसारखे वाढविले होते.

शकुंतला सासरी जाताना कण्वांनी जे उद्‌गार काढले आहेत ते अतिशय लक्षणीय आहेत. प्रत्यक्षात कण्व हे सुखदुःखाच्या पलीकडे गेलेली, स्थितप्रज्ञ वृत्तीचे संन्यस्त मनोवृत्तीचे होते या उलट सर्वसामान्य माणसं अगदी सहज भावनाविवश होऊ शकतात. म्हणून नेहमीच अतिशय अचूक शब्द वापरणाऱ्या कालिदासाने कण्वांसाठी अरण्यौकस = अरण्यात रहाणारा = संन्यस्त वृत्तीचा/स्थितप्रज्ञ असा शब्द वापरलेला आहे तर सर्वसामान्य माणसांसाठी गृहिणः म्हणजे ज्यांना आधीच दुःखे, संकटे त्रास देतात असा शब्द घेतलेला आहे. मुलगी या अर्थाने तो तनया = तनुपासून जन्माला आलेली आणि तिच्या वियोगासाठी तो विश्लेष = विभाजन असे शब्द वापरतो. सरतेशेवटी कण्वांच्या भावनेसाठी तो प्रेम, वात्सल्य हे शब्द वापरत नाही तर केवळ स्नेह = आपुलकी असा शब्द घेतो. पण कण्वांमध्ये आणि सामान्य माणसांमध्ये एवढा मोठा फरक असूनही शकुंतला सासरी जाणार म्हणून कण्वांना एवढे दुःख होत असेल तर सर्वसामान्य माणसांना अशा प्रसंगी किती दुःख होईल याचा अंदाज करणे हे कलिदासाने वाचकांच्या कल्पनाशक्तीवरच सोपविलेलले आहे.

मूळ भारोपीय भाषेमध्ये मुलीसाठी दुहिता हा शब्द होता. भारतात आल्यावर आर्यांनी कन्या हा शब्द वापरायला सुरूवात केली. मुळामध्ये कन्या हा शब्द

अनुक्रमणिका

√कम = कामना करणे, इच्छा करणे या क्रियापदापासून तयार होतो तेव्हा कन्या या शब्दाचा अर्थ जिची इच्छा करावी असा होतो. (टीप : कं या शब्दापासून comedy = सुखान्तिका; ग्रीक komodos = comic actor; kmo/komos = मेजवानी, नाचगाणे; comfort = आनंद देणारी, सुख देणारी शक्ती असे आणि इतर अनेक शब्द तयार होतात) कन्येला आत्मजा म्हणजे स्वतःपासून जन्माला येणारी असाही शब्द आहे. तनया, तनुजा म्हणजे (स्वतःच्या) शरीरापासून विस्तार पावणारी किंवा जन्म घेणारी असे तिचे वर्णन केलेले आहे. ज्या भाषेत मुलीसाठी इतके विविध, सुंदर आणि अर्थवाही शब्द वापरले जातात ती भाषा वापरणाऱ्या समाजात गर्भजल चाचणी करणाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला गेला असता यात शंका नाही.

प्राचीन भारतीय समाजात कन्या ही भार/गळ्यातील धोंड आहे असे कोणी मानत नसावे, किंबहुना कुमारी अवस्था संपवून तारूण्यात येणाऱ्या मुलीला वर्या (शतेन वर्या, सहस्रेण वर्या) असे म्हटले जाई. त्यांचा अर्थ असा की तिच्या पित्याला शंभर किंवा एक हजार चांदीचे कार्षापण//चांदीची नाणी कन्याशुल्क देऊन तिच्याशी लग्न करण्याचीही प्रथा होती.

काही वेळा स्त्री स्वतःचा पति स्वतःच शोधत असे. अशा स्त्रीला पतिंवरा असे म्हणत (३/२/४६). स्वयंवर हा शब्द आणि प्रथा सर्वत्रच प्रसिद्ध आहे. वधूसाठी जनी (जानी ? याचे थोडे विवेचन पुढे येईल) असा शब्द होता. नवविवाहितेसाठी सुमंगली असे विशेषं होते. मग, मेंग (meng) = भाग्य, कल्याण हे शब्द फार पुरातन काळापासून भारोपीय समाजात वापरले जात होते. त्यापासून तयार झालेले मंगला = सर्वपवित्र, सर्वभद्र, सर्व सौभाग्य देणारी अशा अर्थाचे आदिशक्ती देवीचे एक नाव आहे. यावरून सुमंगली या शब्दात व्यक्त होणाऱ्या भावना किती सखोल असाव्या हे लक्षात येते. ज्या समाजात वधूसाठी अशी अनेकविध सुंदर विशेषणे आहेत त्या समाजात मुलगी ही एक भार आहे; तिचे लग्न होईपर्यंत तिला कसेबसे सांभाळले पाहिजे ही भावना निर्माण होणे अशक्य आहे.

पुरूषांच्या स्त्रीसंबंधीच्या कल्पना :

विवाहिता स्त्रीसाठी संस्कृतमध्ये जाया (३/२/५२), पत्नी (४/१/३३) आणि जानि असे शब्द प्रचलित होते. यापैकी पत्नी या शब्दाने स्त्रीचे जे हक्क निर्देशिले जातात त्यांचा उल्लेख यापूर्वी झालेला आहे. जाया आणि जानि हे शब्दही विशेष लक्षणीय आहेत. पुत्ररूपाने पती जिच्या पोटी जन्म घेतो तिला जाया असे म्हणतात. यामुळे पुरूषाने हर प्रयत्नाने स्त्रीचे रक्षण करावे, विशेषतः ती गरोदर असताना तिच्या सर्व इच्छा पूर्ण कराव्या असा भारतीय परंपरेचा दंडक आहे.

जानि हा भारोपीय काळापासून आलेला एक विलक्षण असा शब्द आहे. तो √ग्ने = जाणणे या क्रियापदापासून निर्माण झालेला आहे. जी स्त्री सर्वत्र प्रसिद्ध आहे, सर्वांना ज्ञात आहे ती जानि असा त्याचा अर्थ होतो. या शब्दापासून मध्य इंग्रजीत क्वीन (queen, queene) = राणी; अँग्लोसॅक्सनमध्ये क्वेन (cwen) = राणी; आईसलँडमध्ये क्वान (kvan) = पत्नी; गोथिक क्वेन, क्वेन्स (kwens, kweins) = स्त्री; जेन, जेनी (स्त्रियांची नावे) असे शब्द तयार झाले. संस्कृतमध्ये हा शब्द ग्ना = दिव्य/दैवी) स्त्री, देवी या अर्थाने वापरला जातो. त्यापासून नारी = अलौकिक किंवा दैवी स्त्री असा शब्द तयार झाला (पुंडलीक, २००३). जानि म्हणजे पत्नी या शब्दामध्ये या सर्व अर्थांच्या छटा उतरलेल्या आहेत..

संस्कृतमध्ये स्त्रीसाठी अनेक शब्द आहेत. उदा. वनिता हा शब्द पाहा. तो √वन = इच्छा करणे या शब्दापासून तयार झाला आहे. वांच्छा = इच्छा, वानणे = स्तुती करणे, वामदेव 'एका ऋषीचे नाव' वन किंवा उपवन = सुखद वृक्षराई, वाग इ. इ. हा शब्द पाश्चात्य भाषातही vantage (व्हॅंटेज) = इच्छा करण्यासारखी जागा, अॅडव्हांटेज = इच्छा करण्यासारख्या जागेकडे, इं. John = इच्छा करण्यासारखा, देखणा तरुण, फ्रें. Jean - (ज्यॉं) देखणा तरुण इ. इ. स्पॅनिशमध्ये Juan (टीप : याचा उच्चार वॉन असा होतो) = देखणा तरुण, Juanita (याच्या वॉनिता या उच्चाराशी वनिता या शब्दाच्या उच्चाराशी तुलना करा) = सुंदर स्त्री या शब्दांमध्ये दिसून येतो.

कांता आणि वल्लभा हे शब्द प्रिया या अर्थाने वापरले

अनुक्रमणिका

जातात. त्यातील कांता हा शब्द √कम, √काम म्हणजे सुख देणारे, इच्छा करणे या क्रियापदांशी संबंधित आहे. म्हणून काव्याचे एक प्रयोजन कांतासंमित तयोपदेशयुजे (पत्नीने केलेल्या उपदेशाप्रमाणे मधुर आणि हितकारी असे केलेले आहे.) पत्नीने दिलेला सल्ला किती मूल्यवान आहे हे त्यावरून दिसून येते. त्या शब्दाचे कन्या = कामना करण्याजोगी या शब्दाशी नाते आहेच.

ज्या भाषेत स्त्रीसाठी रमणी/रामा = रम्य, सुंदर स्त्री; वामा = इच्छा करण्यासारखी सुंदर स्त्री; भामा = सुंदर तापट स्त्री; सती = साध्वी, सुभगा = भाग्यवती; शिवा = पवित्रा असे शब्द वापरले जातात.ते शब्द वापरणाऱ्यांची सौंदर्य, साधुता, शुचिता शोधणारी सौंदर्यदृष्टीही वाखाणण्यासारखी असली पाहिजे. (टीप : संस्कृतमध्ये पुरूषासाठी इतक्या मोठ्या प्रमाणावर, इतके शब्द वापरले जात नाहीत.)

स्त्री ही पुरूषाची सहधर्मचारिणी आहे, ती पुरूषाचे अर्धांग आहे, तिच्यावाचून पुरूष अपूर्ण आहे असे भारतीय परंपरा मानते. म्हणून शिव आणि शक्ती यांच्या मिलाफाने नारीश्वराचा अवतार होतो. शंकराचार्यांचे अर्धनारीश्वर स्तोत्र प्रसिद्ध असून त्यात या देवतेची स्तुती करताना नमः शिवायै च नमः शिवाय असे म्हणत पहिले वंदन स्त्रीला आणि दुसरे वंदन पुरूषाला केलेले आहे. किंबहुना शिव या शब्दातच इ या स्वराच्या रूपाने शक्तीचे वास्तव्य आहे. *त्यामुळे शक्तीवाचून/इ वाचून शिव म्हणजे केवळ शव = प्रेत आहे असे म्हटले जाते.*

पुरूषांनी स्त्रीच्या गौरवासाठी केलेले अनेक प्रयत्न इतिहासात नमूद केलेले आहेत. मैत्रेयीने याज्ञवल्क्याजवळ त्याच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली; तेव्हा त्याने तिला त्याची आधीची पत्नी कात्यायनी हिची परवानगी घ्यायला सांगितली. मैत्रेयीनेही मोठ्या सुसंस्कृत वृत्तीने कात्यायनीच्या नैसर्गिक हक्कांचे रक्षण केले. याप्रमाणे या ठिकाणी *स्त्री आणि पुरूष या दोघांनीही स्त्रीच्या हक्कांचा सन्मान करण्याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण पहायला मिळते.*

मुख्य म्हणजे मैत्रेयीने याज्ञवल्क्याला विवाह करण्यासंबंधी विचारले आणि त्याने कात्यायनीचा विचार प्रथम केला या दोन्ही गोष्टींबद्दल- पितृसत्ताक पद्धतीत अपेक्षा असल्याप्रमाणे - समाजाने त्या दोघांनाही वेड्यात काढले नाही. समाजाने मैत्रेयी आणि कात्यायनी या दोघींचेही नैसर्गिक हक्क मान्य केले आणि ते मानणाऱ्या याज्ञवल्क्याचीही थोरवी इतिहासात नोंदवून ठेवली. किंबहुना भारताच्या इतिहासात त्या तिघांचीही नावे अजरामर झाली.

भारतात कोणत्याही स्त्रीचा अपमान हा नेहमीच अक्षम्य अपराध मानलेला आहे. श्रीकृष्णाने राजसूय यज्ञाच्या वेळी पत्नीची निंदा करणाऱ्या शिशुपालाला सांगितले की पत्नीची निंदा करण्याचा अपराध हा शंभर अपराधांच्या बरोबरीचा असतो. म्हणून श्रीकृष्णाने त्यावेळी शिशुपालाचा वध केला. द्यूत प्रसंगाच्या वेळी द्रौपदीला अपमान सहन करावा लागला. त्याची भरपाई करण्यासाठी याच श्रीकृष्णाने सर्वसंहारक युद्ध घडवून आणले. रावणाकडून सीतेचा जो अपमान झाला त्याच्या भरपाईसाठी राम रावण युद्ध घडून आले.

सीतेचा त्याग केला म्हणून रामाला दोष देण्याची प्रथा बऱ्याच माणसांमध्ये दिसते. परंतु सहधर्मचारिणी या शब्दाचा अर्थ रामाने स्वतःच्या वर्तनाने सिद्ध केलेला आहे. प्रजानुरंजनासाठी त्याने सीतेचा त्याग केला असे म्हणणे तर अशक्यच आहे कारण नंतर अश्वमेध यज्ञाच्या वेळी जेव्हा सहधर्मचारिणी पत्नीची आवश्यकता होती तेव्हा रामाने प्रजानुरंजनाला केराच्या टोपलीत टाकले आणि दुसऱ्या कोणा स्त्रीचा पत्नी म्हणून स्वीकार करण्यास नकार दिला. त्यावेळी त्याने सीतेची सोन्याची मूर्ती सहधर्मचारिणी म्हणून वागवली. यावरून त्याच्या सीतेसंबंधीच्या भावना किती उच्च कोटीच्या होत्या हे दिसून येते. रामाचाच एक पूर्वज अज याने पत्नीचे वर्णन करताना गृहिणी, सखी = प्रिय मित्र, सचिव, प्रिय शिष्या असे केलेले आहे. ज्या समाजामध्ये अशी भाषा आणि अशा परंपरा अस्तित्वात होत्या त्या समाजात स्त्रीचा गौरव नेहमीच होत असावा यात आश्चर्य नाही.

माता म्हणून स्त्रीचा गौरव :

माता ही स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात जास्त महत्त्वाची भूमिका आहे. स्त्रीच्या गुणधर्मांवरून मुलाचे वर्णन करता येते; तसे त्याच्या पित्याच्या गुणधर्मांवरून

करता येत नाही. उद. सुंदर स्त्रीच्या मुलाचा उल्लेख कल्याणिनेय असा केला जातो तर सुशील, साध्वी आणि विशेष सद्गुणसंपन्न अशा स्त्रीच्या मुलाला भद्रमातुर असे म्हटलेले आहे. (४/१/११५ आणि ४/१/१४७).

माता या रूपाने तर स्त्रीचा सर्वात जास्त गौरव केला जातो, 'कुपुत्रो जायेत, क्वचिदपि कुमाता न भवति' असे शंकराचार्यांनी म्हटले आहे. दैवतांची यादी करताना 'मातृदेवो भव' असे म्हणून पहिला निर्देश मातेचा केला जातो. ही परंपरा इतकी दृढमूल आहे की संन्यासी आपल्या पित्याला नमस्कार करू शकत नाही कारण तो पित्यालाही वंदनीय आहे. याउलट माता ही संन्याशालाही नित्य वंदनीय आहे. ती जेव्हा जेव्हा भेटेल तेव्हा त्याने तिला नमस्कार केलाच पाहिजे. मातृत्वाचे सामर्थ्य एवढे मोठे आहे की विधवा स्त्री इतरांना अपशकुनी मानली जात असली तरी तिच्या मुलासाठी मात्र ती नेहमीच शुभशकुनी असते. आईच्या भावनांचे आणि इच्छेचे महत्त्व एवढे आहे, की शंकराचार्यांनी सर्व समाजाचा विरोध पत्करूनही आईच्या प्रेताला स्वतःच्या हाताने अग्नि दिला. आईच्या सामर्थ्याचे वर्णन करताना एक अशी कथा सांगतात की रणांगणातून पळून आलेल्या मुलाला विदुला रागावली; त्या तिच्या रागावण्यामुळे तिच्या मुलातील क्षात्र धर्म इतका जागवला गेला की तो युद्धासाठी परत गेला आणि विजयी वीर म्हणूनच आईकडे परत आला.

वंशाची परंपरा :

आपल्या वंशाचे नाव पुढे चालावे म्हणून मुलाची इच्छा करणारे पुरूष आणि स्त्रिया अनेक आहेत. पण प्राचीन भारतामध्ये पितृवंशाप्रमाणे *मातृवंश सांगण्याची सुद्धा परंपरा* होती. कारण मातेचे महत्त्व सांगणारे प्रसंगही जीवनात अनेक येतात. बृहदारण्यकाच्या सहाव्या भागाच्या पाचव्या अध्यायाच्या शेवटी तर मातृवंशाने आलेल्या अनेक आचार्यांची एक लांबलचक अशी यादीच दिलेली आहे. त्यात कात्यायनी, गौतमी, भारद्वाजी, पाराशरी, कौशिकी, काण्वी, कापी, आत्रेयी, मंडूकी, शांडिली, क्रौंचिकी, प्राश्नी, आसुरी अशा अनेक मातांचा उल्लेख केलेला आहे (मी इथे सर्वच मातांचा उल्लेख केलेला नाही; ते शक्यही होणार नाही).

मुलाने पित्याचे, कुळाचं नाव उज्वल करावे, किंबहुना त्यासाठीच आपल्याला मुलगा व्हावा अशी मातापित्यांची अपेक्षा असते. प्रत्यक्षात मुलगीसुद्धा आपल्या कुळाचे नाव उज्वल करू शकते हे या आधी केलेल्या चर्चेत स्पष्ट झालेले आहे. भारतीय परंपरेचे वैशिष्ट्य म्हणजे मुलाने आपल्या नावाबरोबर आईचे नाव प्रसिद्ध करण्याचेही अनेक प्रसंग इतिहासात घडून आल्याचे दिसतात. वर वर्णन केलेल्या यादीतील या सर्व मातांची मुले पुढे या समाजात थोर ऋषी आणि आचार्य म्हणून शिक्षण, तत्त्वज्ञान आणि संस्कृती या क्षेत्रात प्रसिद्ध झाली. त्यातील कात्यायनीचा जो मुलगा तो कात्यायन असे म्हणून त्याचे नाव त्याच्या आईच्या नावावरून पडले अशी एक कथा आहे. कदाचित हाच कात्यायन पुढे फार मोठा व्याकरणतज्ज्ञ होऊन त्याने पाणिनीच्या अष्टाध्यायीवर भाष्य लिहिले आणि आपल्या आईचे नाव जगात अमर केले असावे. याच परंपरेतील उद्दालकाने आपल्या मुलगा श्वेतकेतू याला *'तत्वमसि' या महावाक्याचा उपदेश केला* आणि वेदांती तत्त्वज्ञानाचे शिखर गाठले. स्वतः श्वेतकेतूही मोठा तत्त्वज्ञानी होता. त्याने पुढच्या काळात विवाह संस्था आणि संस्कार यांचे नियम सूत्रबद्ध केले आणि सामाजिक स्थैर्याचा पाया घातला. घोर आंगिरस या नावाच्या ऋषीने *देवकीपुत्र कृष्ण* याला परम ज्ञानाचा उपदेश केला. याच कृष्णाच्या नावाशी भारतीय तत्त्वज्ञानाचे सार सांगणारी गीता जोडली जाते.

कधीकधी असे होऊ शकते की काही कारणामुळे मुलाला पित्याचे नाव किंवा गोत्र माहीत नसते- केवळ आईचे नाव माहीत असते. पण मातेचे नाव सांगताना क्वचित पित्याचे नाव/गोत्र माहीत नसणे हा सुद्धा त्या काळात दोष मानला गेला नव्हता. उदा. जबालेचा मुलगा म्हणून सत्यकामाने आपले नाव फक्त सत्यकाम जाबाली असे सांगितले. त्याच्या गुरूंनी (म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून वर नमूद केलेल्या परंपरेतील गौतम उद्दालकानेच ?) ते मान्य केले, कारण सत्यकामाच्या तथाकथित गोत्रापेक्षा त्याच्या मातेची आणि त्याची स्वतःची सत्यप्रियता जास्त मौल्यवान आहे. तोच

अनुक्रमणिका

श्री. राजा फडणीस यांचे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त अभीष्टचिंतन !



महाराष्ट्र साहित्य परिषदेचे जुने-जाणते, निष्ठावान कार्यकर्ते श्री. राजा फडणीस ह्यांनी आपल्या वयाच्या पंच्याहत्तरीत २६ एप्रिल २०११ रोजी पदार्पण केले आहे. श्री. राजा फडणीस यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाहपदावरून आणि कोषाध्यक्ष पदावरून सुमारे २५-३० वर्षे कार्य केले आहे. सन २००६ ते २०११ ह्या काळात त्यांनी साहित्य परिषदेचे कार्यकारी विश्वस्त म्हणून कार्य केले आहे. परिषदेतर्फे त्यांचे अभीष्टचिंतन !

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

सत्यकाम पुढे भारतीय परंपरेतील एक महान आचार्य म्हणून प्रसिद्ध झाला.

अर्थात् पाणिनीच्या काळापर्यंत विवाहसंस्था दृढमूल झालेली होती (मात्र पितृसत्ताक पद्धती आजच्याइतकी दृढ झालेली नव्हती). तेव्हा त्या काळात पित्याचे गोत्र माहीत नसता निव्वळ मातेचे नाव माहीत असणे या गोष्टीला कुत्सित अर्थ प्राप्त झालेला होता (कुत्सने ण च ४-१-१४७). त्यामुळे कदाचित सुशील मातेच्या मुलाचा उल्लेख भद्रमातुर असा केला जात असावा. (खरे म्हणजे हे बरोबर नसावे.)

पण मुलाने केलेल्या आईच्या सन्मानाचा परमोच्च बिंदू खरे म्हणजे याच महाराष्ट्राच्या भूमीमध्ये पहायला मिळतो. महाराष्ट्राच्या एका अतिशय प्रसिद्ध राजाने शिलालेखात आपले नाव कोरताना स्वतःचा उल्लेख *गौतमीपुत्र* सातकर्णी असा केलेला आहे. जगाच्या इतिहासात दुसऱ्या कोणत्याही राजाने आपल्या नावाबरोबर आईचे नाव जोडून ते अमर केल्याचे उदाहरण दिसून येत नाही. हा पुरूषाने केलेला स्त्रीचा सर्वोच्च गौरव मानायला हवा.

संदर्भसूची :

ब्राऊन, आर. आणि गिल्मन (१९६०) स्टाईल इन लॅग्वेज (सं.) टी.ई. सिबिऑक

फसोल्ड, आर. डब्ल्यू. (१९९०) दि सोश्योलिंग्विस्टिक्स अव लँग्विज, ऑक्सफर्ड, बॅजल ब्लॅकवेल.

हाइम्स, डी. एच. (सं.) १९६४) लँग्विज इन कल्चर अँड सोसायटी : अ रीडर इन लिंग्विस्टिक्स अँड अँथ्रॉपॉलॉजी, न्यू यॉर्क, हार्पर.

प्राइड, जे. बी. आणि जे. होम्स (१९७२) सोश्योलिंग्विस्टिक्स : सिलेक्टेड रीडिंग्ज, हॅमंड्जवर्थ, पेंग्विन बुक्स.

पुंडलीक, शै.स. (१९९७) पाणिनीची मातृभाषा : काही उत्तरांचा शोध, भाषा आणि जीवन (सं) कल्याण काळे : वर्ष १५, अंक ३, पावसाळा, १९९७ पृ. ४७-५७. (मराठी अभ्यास परिषद, पुणे).

पुंडलीक, शै. स. (२०००) स्टडी ऑफ अ‍ॅन्थ्रॉपॉलॉजी अँड इटस् यूज इन लँग्वेज टीचिंग, न्यू क्वेस्ट (एप्रिल-जून २०००) मुंबई ४०००५१ पृ. १७४-१८७).

पुंडलीक, शै. स. (२००३) इंग्रजीतील क्न ने सुरू होणाऱ्या शब्दांविषयी, भाषा आणि जीवन वर्ष २१, अंक ३, पावसाळा २००३ पृ. १६-२५. (मराठी अभ्यास परिषद, पुणे).

सपीर (१९२२) लँग्वेज, शिकागो.

व्हॉर्फ, बी. एल. (१९४४) अ लिंग्विस्टिक कन्सिडरेशन ऑफ थिंकिंग इन प्रिमिटिव्ह सोसायटीज, शिकागो.

❖❖❖

शैलेश सदाशिव पुंडलीक
माजी विभागप्रमुख, उपयोजित भाषाविज्ञानविभाग
श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई.

सृजनाच्या दुःखोत्सवाची देशी कविता

डॉ. किशोर सानप

['जो साऱ्या जगाचा पोशिंदा– तोच उपाशी !' हा महात्मा फुलेंचा इशारा– शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे आज वारंवार आठवतो आहे. त्रिं. ना. अत्रे यांच्या गावगाड्यातही याचे विश्लेषण आहे. तो कवितेचा विषय व्हावा, हे स्वाभाविक आहे. समाजधुरिणींनी तो परिवर्तनाचा विषय म्हणून ऐरणीवर घ्यावा; हीच यातून अपेक्षा. – संपादक]

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात ज्या काही मोजक्या कवींनी शेतकऱ्यांच्या कुटुंबात जन्म घेतल्यावर शेतीत कुणवाऊ कष्ट करून हाडाचं पाणी करणाऱ्या मायबापांच्या हालअपेष्टांचं उजाड दरिद्री जीवन अनुभवलं; आणि अस्सल देशी भाषेतून उलंगवाडी झालेल्या शेतीचं दुःख शब्दबद्ध केलं; त्या कवींमध्ये जगदीश कदम या नांदेडच्या कवीची दखल घेतली आहे. शेतीनिष्ठ जाणिवांची अभिव्यक्ती करताना ह्या कवीने आपली नाळ केवळ शेतीच्याच जीवनाशी जोडली असे नव्हे, तर शेतीतल्या काळ्या मातीतून जे 'वारकरी कल्चर' किंवा 'सावळा विठ्ठल उगवला', त्याच्याशीही ह्या कवीने आपले अस्सल वारकरी नाते सांगितले आहे. सावळे परब्रह्म असलेला विठ्ठल किंवा विठू हा शेतकऱ्यांच्या आध्यात्मिक जीवनाचे आणि दुःख-मुक्तीचे साध्य बनला. ज्ञानेश्वर ते तुकाराम अशी ही विठोबाच्या संतांची वारकरी-परंपरा, महाराष्ट्राच्या मातीचे वैभव मानली जाते. दुःखमुक्तीचे हे वैभव देशीय कवींनाही कधी टाळता आलेले नाही. जो कवी काळ्या मातीच्या अंगाशी लगडतो, त्याला विठूच्या भक्तीतूनच दुःखमुक्तीचा मार्ग शोधावा लागतो. श्रीकांत देशमुख ते जगदीश कदम अशी ही शेतीनिष्ठ वारकरी काव्याची देशीय परंपरा ह्याच समकालीन कालखंडात मुखरित झाल्याचे दिसून येईल.

रास आणि गोंडर (१९९८), झाड आणि माती (२००३), नामदव शेतकरी (२००६) असे जगदीश कदम यांचे तीन कवितासंग्रह नांदेडच्या निर्मलकुमार सूर्यवंशी यांनी निर्मल प्रकाशनाच्या वतीने प्रकाशित केले आहेत. रास आणि गोंडर, झाड आणि माती ते नामदेव शेतकरी अशी विठूच्या नामदेव शेतकऱ्याच्या जीवनाची ही शोकात्म कविता आहे. विसाव्या शतकातले शेवटचे दशक आणि एकविसाव्या शतकातले पहिले दशक म्हणजे सबंध महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा कालखंड होय. गेल्या दोन शतकात सावळ्या परब्रह्माशी एकरूप होणाऱ्या शेतकऱ्यांना, विठूही दुःखमुक्त करू शकला नाही. जणू ह्या काळात विठूच्या भक्तीचा बहर ओसरला असावा; आणि वारकरी भक्तांच्या जीवाला शेवटची घरघर लागली असावी. सृष्टीचा निर्माता खुद्द झाडाच्या फांदीला गळफास लावू लागला. जगण्याचा त्याला कंटाळा आला नाही, परंतु मृत्युपंथाचा वारकरी होणे त्याला आवडू लागले.

शेतीचे उजाडलेपण आणि करंट्या व्यवस्थेच्या भोवऱ्यात गुदमरून जगण्यापेक्षा काळ्या मातीच्या साक्षीने विषप्रयोग, त्याला मुक्तीचा मार्ग वाटू लागला. शेतकऱ्यांच्या ह्या भयावह जीवघेण्या अवस्थेचे 'पॅकेज' सरकारच्याही हाताबाहेर गेले; आणि सावळ्या विठ्ठलाने तर कधीचीच त्याची साथ सोडली. जगण्यापेक्षा मृत्यू प्रिय वाटण्याची ही वारकरी शेतकऱ्यांची अवस्था भूमीपुत्रांना कशी सहन होईल ? असह्य दुःखसंवेदनांतून मग त्यांचे शब्दच समाजाशी बोलू लागले. जगदीश कदमच्या कवितेची जातकुळी शेतकऱ्याचे जीवघेणे दुःख समाजासमोर मांडून समाजाच्या मनात, काळ्या मातीत जीवनाचं बियाणं-दान टाकणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीनिष्ठ जाणिवांचा उत्कट आविष्कार करणारी आहे. काळ्या मातीत जीवनाचं बियाणं पेरून, घामाचा पाऊस पाडून, सृजनाचा दुःखोत्सव साजरा करणाऱ्या शेतकऱ्याची मानसिकता, त्याच्याच भाषेत आणि शैलीत मांडणारी ही अस्सल देशीय कविता आहे.

शेतीचे आधुनिकीकरण झाले. गिरणीचं चाक चालू लागलं. ट्रॅक्टरचं धूड शेतीच्या मातीत लोळू लागलं.

शेतीत राबणारे मजूर ह्या यंत्रांची शक्ती पाहून आणि पोटातली भूक त्यानं हिसकून घेतल्याचं दुःख सहन करीत, आभाळाकडं पाहात पावसाची प्रतिक्षा करीत, होईल त्यामार्गानं कसंबसं जगू लागले. शेतीचा तुकडा पोटाची भूक भागवत नाही; आणि मजुरीचं पितळ वाजलं; अशा कात्रीत शेतकरी आणि शेतमजूर सापडला. जुनं गाव नवं झालं. लक्तरलं घरदार धूळ खात पडलं. मह्या गावचं आखर नावालाच उरलेलं. लेक सासरी चालली आखराचे डोळे ओले, माऊलीच्या मनातले त्याने हुंदके गिळले. हे कवीच्या प्रतिभेतून साकारलेलं वास्तव असलं तरी, तिरडीचं मडकंही आखराला जागविते, कोण्या जिवाचं सरण डोळ्यापुढे चेतविते... हेच कवीच्या डोळ्यांनी पाहिलेलं सत्य असतं. राख आणि मातीचं वास्तव जाणणारी कविता रास आणि गोंडर ह्या अर्थपूर्ण कवितांच्या मालिकेपासून सुरू होते.

बाभळीचे काटे उभे अंगावर
बोचतो कसा हा नवा पितांबर !

शेवटी लेकराचा बाप गेला उभा धारण मोडला, माऊलीच्या आकांतानं धीर बैलांचा खचला. तिकांडा बापू मव्हा जातो जुपण जुताय तेव्हा चिंध्या अंगावर किती मोजदाद हाय कोठं, रडे शिवताना दोरा माय लुगड्याचा गोठं, माय बापूच्या संगं कष्टत धान उफनतांना पायाशी रास असूनही तिच्या हाती मात्र गोंडरच लागतो.

हाडं राबतेत किती बापू चिपाड झालेला
घामातून जगण्याला त्यानं इसार देलेला
नांगरल्या रानामंदी टाचा उललेल्या खोल
बापूलाच कळलेली काळ्या ढेकलाची वल...

एवढं खपूनही जेव्हा, 'फोडनीला नाही तेल, सांगे भगोन्याला भात' आणि 'घरी दुभती म्हईस, पोर दुधासाठी रडे,' असा शेतकऱ्यांच्या पिकाच्या राशी नेणारे दलाल आणि त्याच्या वाट्याला आलेलं गोंडर-तणकट-पालापाचोळा आणि तसंच त्याचं शुष्क जीवनही. मातीचं सपन उशाला घेऊन कुटुंबासाठी झोपी जाणाऱ्या शेतकऱ्याच्या आशा मृगात फळल्या नाही की त्याला ताटातला घासही कडू लागतो. काळजाचा ठोका चुकतो. चिंतांची ओझी वाढतात. त्याखाली दबून जातो. पोराचं शिक्शण, लेकीचा हळद लावून कर्जाचा डोंगर उचलणारा बाप, गाडीखाली लावतो. हिशोब, फळेल नशिब औंदातरी. परंतु हत्तीच्या पायानं पाऊस येतो आणि कापसाचा भोत चिखल होऊन, बैलाचीच धूर जड होते आणि मायबाप तर गाडीचे आक मोडलेले होतात, धाय मोकलून रडतात. त्यातच, बव्हल्याची गाठ कशी भर दिवसा सुटली, साता जल्माची फेरी सालातच उसववी. संसार मोडका तरी गोड केला, मुंगीच्या पायाला शीण कैसा ? असे जेव्हा कवी म्हणतो, तेव्हा वाचकाचं हृदय पिळवटून निघतं. म्हणूनच घरधनी रानामंदी गेल्यावर धनीनीच्या पायाला चिरे पडतात. बाबुश्याच्या बापाच्या आंगात ताप असतो. तरी कष्ट चुकत नाहीत. 'दारिद्र्य पाचवीला आले त्याचे फळ झाले कडूझर... दुःखं अनावर झालं आणि काळजाचा चेंदामेंदा झाला' की बापुशा गुत्त्यावर जाणार आणि झिंगत झिंगत घरी येणार.

कुरूपल्या तळव्याला खडा टोचलेला जसा
पंढरीचा वारकरी असा पिसाळला कसा ?

'नाही कपाळाला कुखू नाही सडा सारवण, गाव सुतक पाळते जळे कोणाचं सरण ?' कुरूपाच्या तळपायाचे मुके घर कष्टावले. ज्ञानेश्वर-तुकोबांच्या शब्दांतून ते कवितेत मांडायचे, या वारकरी जाणिवेतून जगदीश कदम यांची कविता शेतकऱ्यांच्या दुःखजाणिवांची अभिव्यक्ती करताना, लोकगीते-लोकछंद-ओवी-अभंग-अष्टाक्षरीतून वाचकांच्या हृदयाशी थेट संवाद साधताना दिसते. हीच शोकात्मता आणि सलणारी जाणीव घेऊन कवी आपल्या झाड-मातीशी एकरूप होत, पुन्हा नव्या धीराने वाचकांशी संवाद साधताना दिसतो. रास आणि गोंडरचं दर्शन घडवताना शेवटच्या कवितेतून-ढेल्यावर त्याचा जीव 'इठू पांढरीचा राजा', लटकला फांदीलाच कोण्या जल्माची सजा ? हाच जीवघेणा प्रश्न कवीच्या मनात उपस्थित होतो. त्याच्या दुःखशोधाची यात्रा पुन्हा 'झाड-माती' ते 'नामदेव शेतकरी'पर्यंत सुरू असते.

आधुनिकीकरणामुळे गावाचं आणि शेतीचंही वास्तव बदललं. लळा लावून जगणाऱ्या गावात जगण्याची रीतच बदलली. 'नसे काळजात माया साऱ्या ओठांवर बाता'... अशी अवस्था गावाची झाली.

अनुक्रमणिका

दुःखाच्या कढईत पोळणाऱ्या बापाबद्दल झाडमातीच्या मनात काय दडून बसलंय ? या प्रश्नाचा शोध कवी घेतो. काटे तुडवून-मोडून पाय अधू झाला; तरी घामाचं अत्तर बाप रानात उधळतो. जागोजागी फाटलेले पायतानं घेऊन बाप काकरात राबतो. ढेकळात सोललेले आणि तापल्या मातीत भेगाळलेले तळपाय कितीही काळ्या मातीत राबले तरी देवळात देव दिसत नाही. असतो तो काळाकुट्ट अंधार, अंगातलं बळ तरी किती पुरणार ?

कुणब्याच्या पायाखाली सदा काळीभोर माती
कुठे चुकते गणित येई गोंडरच हाती...

शेवटी उभ्या घस्कटाचं जिणं नशिबी आलेलं. जीवनाच्या शेतालाच मग हराळी व्यापून उरते. लेक शिकलेला परंतु घरी बसलेला. सुगी साथ देत नाही. दारिद्र्य ललाटी. वाचा वसे मुलखाची. करमाचा व्हतो गाळ. पीक चिभडलं सारं. तुकारामाचा जागल्या झोपी गेलेला. जिभेवर तुकोबाचे अभंग आणि पिकांत डोलणारा विठ्ठलही कीर्तन ऐकताना मनातली सल घालवू शकत नाही. ऐशी कुणब्याची जात. 'घस्कटाचे धनी आज झाले मोताद कंगाल । उभा देह खुडताना त्याचे बांधलेले हात ॥ माती पिकवून त्याच्या होते जीवाची आबाळ, हरसाल वाढतोय त्याच्या विहिरीचा गाळ ॥ नाही कवडीची पत बापू मव्हा बळीराजा. जागोजागी मोडताना लोक बघतात बजा ॥ हाय खावून का कुठं गुत्ता सुटणार हाय, गाय हंबरली तरी त्याचं गेचुडाला काय ? ॥ शेवटी, 'कोणी काय, कोणी काय, व्हते बोलत दबून, कुणब्याची आत्महत्त्या जाते मढ्यात झाकून...' हेच सत्य आणि वास्तव कवी आपल्या दुःखकाव्यांतून मांडतो. शेवटी व्यवस्थेला कवी प्रश्न विचारतो...

बाप्पा,
आमच्या मुळ्या उखडून टाकायला
सरसावणारे तुझे हात त्यांच्या मुळ्यांना
कधी भिडणार आहेत ?

हाच एक साधा सवाल शेतकऱ्यांचं अस्तित्व मिटविणाऱ्यांच्या अस्तित्वाबाबत कवी विचारतो. झाडमातीत सुद्धा मुक्तछंदापेक्षा अष्टाक्षरी आणि लोकछंदातूनच कवीची कविता आपल्या अस्सल शेतकरी जाणिवा व्यक्त करते. 'तूच खोदला पाया रोप लावले रे दारी, तुका-चोखा गेल्यावर गवसेना धुरकरी।' असे कवीला वाटते. तुका-चोख्याची मराठी भाषा भूमीपुत्रांच्या काव्यातून हरवल्याची खंत मांडताना कवी, पाणी वाहून नेताना जशी फुटावी पालखी ! असा मराठी भाषेचा वापर करणाऱ्या कवींबाबत चिंता व्यक्त करतो. कवी वारकरी-शेती परंपरेत राहूनच आपल्या अभिव्यक्तीची तंत्रे आणि भूमिनिष्ठ-आशयनिष्ठ प्रतिमांचा वापर करीत वाचकांच्या हृदयाशी संवाद साधतो. देशीय शैलीची निर्मिती करतो. आशयाभिव्यक्तीत आणि छंदाच्या मांडणीत आणि शैलीत अनेक दोष जाणवतातही. परंतु आशयाची वीण अनुभवाधिष्ठित असल्यामुळे जगदीश कदम यांच्या कवितेतल्या कळवळ्याबद्दल मात्र मुळीच संशय राहातनाही. नामदेव शेतकरी ह्या कवितासंग्रहातून हेच शेतकऱ्याचे जीवघेणे दुःख कवी उत्कट आणि तीव्रतेच्या उंचीवर नेऊन मांडू पाहातो.

'नामदेव शेतकरी गाव कोणतेही घ्याना, हर वस्तीत दिसतो सारखाच बारदाना...' हे या संग्रहाचे आशयसूत्र आहे. जवळपास कविता अष्टाक्षरी छंदात आहेत. शेवटी एक दीर्घ कविता मुक्तछंदात आहे. अष्टाक्षरी हाताळताना कवीला कवितेची लय आणि काव्यमूल्याचे पुरेसे भान दिसत असले तरी कवितेतला पसरटपणा छंदाच्या वापरात टाळता आला असता. छंदातली कविता ही लयकळा असलेली शब्दसृष्टी घेऊन येत असते. त्यात गद्यात्मतेला वाव नसतो. खरे तर नामदेव शेतकरी हे मराठी कवितेतील खंडकाव्य असून एका वारकरी शेतकऱ्यांच्या शोकात्म जीवन चित्रणाची ती वास्तव नांदी आहे. आजच शेतकऱ्यांचं जीवन वास्तव आहे. दशदिशांनी नागवलेल्या आणि कर्जाच्या डोंगराखाली दबत लती होऊन, शेवटी संसाराचा गाडा खिळखिळा करून, पुढे केवळ अंधार वाट्याला आल्याचे सत्य जाणवताच आपला नामदेव शेतकरी गळफास लावून जगाचा निरोप घेतो.

जगदीश कदम यांनी नामदेव शेतकरी या खंडकाव्यात पूर्ण शक्तीनिशी महाराष्ट्रातल्या वारकरी शेतकऱ्यांची वर्तमान भीषण अशी चित्तथरारक जीवन कहाणी मांडली आहे. आजही आमचा नामदेव शेतकरी

आपल्या म्हाताऱ्या मायबापांचा सांभाळ करतो. 'माय थकली तरीही घर घेते सारवून, वारकरी बाप त्याचा लावी अभंगाची धून' हे त्यांचं अखेरचं जीवन वास्तव आहे. बापूच्या तोंडचा शब्द भजनाचा साज होतो आणि बापूचं भजन ऐकून विठ्ठला रे पांडुरंगा, अंगातला शीण गेला... असे त्याला वाटते. 'बाप्पा नामदेवा दुःख तुझे कधीचे साचले, नवा अध्याय मानून पिढ्यापिढ्यांनी वाचले...' या वारकरी परंपरेतून नामदेवाची चडणघडण झालेली आहे. शेतकऱ्याचे दुखणे हे पिढीजात घरंदाज आहे. खांदा फुटला तरी दुःखाचं ओझं तो पेलतो. कवी, नामदेवच्या नागवलेल्या आणि मृत्यूपंथाला लागलेल्या जीवनाची गाथा गातो. त्याचे कुणीही नच सांगितलेले पुराण आळवतो. वेदनेच्या गाथेतून उगवलेली नामदेवाची कथा सांगतो.

नामदेव शेतकरी देह झालेला कोळसा
मरणाच्या दारालाच येई घालून वळसा
नामदेव शेतकरी आला कुणब्याच्या पोटी
चालताना मातीवर जागोजागी आडकाठी...

नामदेव हे शेतकऱ्यांच्या जातकुळीचं प्रतीक असून सबंध संग्रहातून शेतकऱ्यांच्या दुःखद जीवनाचे चित्रण कवीने केलेले आहे. नामदेव हा भारतीय शेतकऱ्यांचं स्मारक आहे. त्याला वारकरी संस्कृतीचा स्पर्श आहे. जगण्याची दुःखद लय आहे. दुःख आणि संकटांच्या ओझ्याखाली दबूनही ग्यानबा-तुकोबांच्या ओवी-अभंगातून त्याला मुक्तीचा आनंद-मार्ग शोधता येतो. त्याच्या काळजाचा काला झाला तरी आतमध्ये गलबला सुरू असतो. बिनबुडाचे त्याचे नशिब असते आणि शेतातला दाणादुणा त्याचा सोईरा असतो. शिकलेला भाऊ शहरात नोकरी करतो आणि शेतकऱ्यांच्याच शोषणात सहभागी होतो. महाराष्ट्रातलं सरकार कुणब्याचं असूनही कुणबी नागवला जातो. शिकलेले शेतकऱ्यांचे पोरंच शेतकऱ्यांचं शोषण करतील, हा इशारा महात्मा फुल्यांनी शंभर वर्षांपूर्वीच दिला होता, तो आता खरा ठरला आहे.

नामदेवा तुव्हा भाऊ झेडपीत बसलेला
शेतकऱ्यांच्या घामानं म्हणे टोलेजंग झाला ।

'नामदेव शेतकरी त्याचा बाप रडे कुढे, किती वाढवावी गती काळ धावतोच पुढे.' सदैव काळाच्या मागेच असणारा आणि भोळाभाबडा नामदेव शेतकरी काबाडकष्ट करूनही शेवटी गळफास लावतो.

नामदेव शेतकरी उभा दारात दुष्काळ
पाखरांची चिवचिव असे हुडकित माळ
माय होते सनकाडी आणि बापूचा ढेपसा
ढासळल्या विहिरीचा होतो रंडका उपसा...

दुबार पेरणीचे संकट आणि दुष्काळ तर शेतकऱ्यांच्या जगण्याचे अंतिम वास्तव. वाटेवर टपलेल्या टोळधाडी त्याच्या मोडक्यातोडक्या संसाराला पोखरून टाकतात. 'नामदेव शेतकरी नाही सुचतच काही, मस्तकात किडे मुंग्या आणि देहाचीही लाही॥ बायकोच्या आंगावर नाही कणभर मास, लेकीसाठी नरड्यात नाही उतरत घास । दागदागिने कुठले कुणब्याच्या संदकांत । गुढीसाठी ठेवलेला पितांबर असे आता ॥ लेकराचे वाळे तोडे कथलाचे बाजुबंद । हीच जन्माची कमाई, असे कुलपात बंद ॥' असा हा नामदेव शेतकरी आपल्या गावातला राजा असूनही रंक असतो. सोन्यासारखा माणूस एक कुणबीच हाय आणि त्याला वजा केल्यावर बाकी राहतेच काय ? हा कवीचा प्रश्न आहे.

'नाही मिळणार कर्ज म्हणे नामदेवा तुला, आजा-पणजाही तुझा दंडव्याजातच मेला...' हेच खरेतर नामदेवच्या जीवनाचे आदिम सत्य आहे. मुकाखट नामदेव वाटे लाचार भिकारी. घरादाराला हुरोडी. वाटणीचे रामायण घराघरात. आंधळेच सरकार-आंधळाच कारभार. जप्ती दारावर येता होई गावात कालवा. नामदेव शेतकरी त्याची झोप मोडलेली, कुणब्याच्या गोधडीला नवी कथा जोडलेली. इथे घामाला ना भाव नसे चाड राबण्याची, नावालाच म्हणायची धरती कुणब्याची. शेतकरी बळिवंत त्याला लावलं बिरूद, अशाा बाजिंद्या जगाचं नाटकही सुदमूद... असा उपहासाने मग कवी बोलू लागतो. व्याजाखाली दबलेला शेतकरी शेवटी गळफास लावूनच मुक्त होतो.

शेवटी, नामदेव शेतकरी त्याच्या देहाचा कोळसा होतो आणि त्याची जगण्याची उमेदच मावळते. तो काळानिळा पडतो आणि वेदनेच्या आत्मसंवादात बुडून जातो. नामदेवचा होरपळलेला देह पाहून हुडहुडी भरलेला बाप

(पान क्र. ६७ वर पहा...

केशवसुतांच्या प्रेमकवितेतील 'तारा'

- डॉ. सुभाष ज. गर्दीकर

[केशवसुतांची बंडखोर कविता सुपरिचित आहे. त्यांच्या प्रेमकवितेचे प्रेरणास्थान त्यांच्या वास्तवजीवनात होते काय ? काव्यजीवन आणि वास्तवजीवन यांचे नाते काय असते, याच्या चर्चेतून केशवसुतांची की केशवसुतांचा 'तारा' शोधण्याची गरज आहे. - संपादक]

केशवसुतांचे आपल्या पत्नीवर निःसीम प्रेम होते. पुण्याला शिकत असताना या तरुण जीवाला पत्नीबद्दल वाटणारी ओढ त्यांच्या प्रेम काव्यातून व्यक्त झाली आहे. केशवसुतांचे बंधू सीतारामपंतांनी केशवसुतांच्या पत्नीच्या रुपाबद्दल केलेला उल्लेख व त्यानुसार समीक्षकांनी काढलेले निष्कर्ष काहीही असले तरी केशवसुतांनी मात्र 'नाडि माझी तुज करी वाहताहे' अशी एकरुपत्वाची भावना व्यक्त केली आहे. केशवसुतांची प्रेमकविता त्यांच्या आयुष्याबरोबर विकसित होत गेली आहे.

केशवसुतांचे पुतणे दत्तोपंत दामले यांनी केशवसुत जन्मशताब्दी-वर्षात 'सरस्वतीचे लाडके पुत्र'[१] हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथामध्ये केशवसुतांच्या चरित्राचा आलेख रेखाटला. त्यात कवितांच्या संदर्भात विवेचन करताना केशवसुतांच्या काही प्रेमकवितांतून येणारा 'तारा' हा उल्लेख प्रत्यक्षातल्या स्त्रीच्या संदर्भातला असल्याचे मत मांडले आहे.

केशवसुतांच्या प्रेम-कवितातून व्यक्त होणारे उत्कट प्रेम 'अमूर्त निराकार' व्यक्तीवरील नसावे तर 'कोण्या तरी रुपसंपन्न पण दुष्प्राप्य स्त्रीवरचे प्रेम त्यातून सूचित' होत असल्याचा तर्क द. मो. दामले यांनी व्यक्त केला आहे.

केशवसुतांना मुंबई सोडून भडगावला जावे लागले; याचे वाईट वाटले. त्याची तीन कारणे द. मो. दामले यांनी नमूद केली आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे- ''कोणी तरी एखादी स्त्री व्यक्ती त्यांच्या मनात भरलेली; पण त्याचप्रमाणे त्यांस ती सदैव दुष्प्राप्यच वाटणारी, मुंबईस अधून मधून नजरेस पडणारी असावी, आणि आता मुंबई कायमची सुटल्याने ती स्त्री नजरेसही पडण्याची शक्यता नाहीशी झाली. ही व्यथा त्यास बोचत असावी''[२] असे द. मो. दामले नमूद करतात. व त्या स्त्री बद्दलची ओढ केशवसुतांच्या कवितेतून व्यक्त झाली असल्याचे मत ते मांडतात.

हा मुद्दा अगदी स्वतंत्र व नवा विचार असल्याचे नमूद करताना द. मो. दामले म्हणतात की, केशवसुतांची प्रेमकाव्ये कोणाही स्त्रीला उद्देशून नसून 'कविता-देवी' वा 'देवी सरस्वती' यांच्यावरील असल्याचे सांगितले जात असले; तरी ते तर्कसंगत वाटत नाही. कारण प्राचीन काळापासून पुरुषाला स्त्रीचे आकर्षण वाटत आले असून त्यात अपवित्र, वाईट असे मानण्याचे कारण नाही... केशवसुतांच्या कीर्तीमध्ये किंवा काव्यसंपदेमध्ये या नव्या तर्कामुळे न्यूनत्व येण्याची भीती आपल्याला वाटत नसल्याचे द. मो. दामले नमूद करतात.

आपल्या या मताच्या पुष्ट्यर्थ 'माझा अंत', 'सुंदरी दर्शन' 'कविच्या हृदयी जसे गुंतती', 'प्रणय कथन', 'वियोगामुळे', 'कोणीकडून ? कोणीकडे ?' या कवितांचा उल्लेख ते करतात. 'त्वत्प्रीतीस अपात्र हा जन' व 'प्रीतीची भाषा' या काव्यातील उल्लेखावरून ''ही स्त्री महाराष्ट्रीय ब्राह्मण नसावी; त्यास ती दुष्प्राप्य असावी'' असा तर्क द. मो. दामले व्यक्त करतात... यास कारण 'त्वत्प्रीतीस' मधील 'मेरी जान ! गुल्नार' हे शब्द चिंत्य वाटतात'' असेही द. मो. दामले नमूद करतात व आपला तर्क खराच असल्याचे ठामपणे सांगतात.

केशवसुतांच्या कवितेत 'तारा' हे नाव तीन चार वेळा आल्याकडे लक्ष वेधून ते नाव केशवसुतांच्या पत्नीचे नसल्याचे ते स्पष्ट करतात. ''एखादी खरोखरीच कोणी तरी अज्ञात व्यक्ती 'तारा' या काल्पनिक नावाची होती असे धिटाईने मानण्यास हरकत कोणती ?'' असा सवालही द. मो. दामले विचारतात.

भ. श्री. पंडितांचा तर्क

केशवसुतांच्या कवितेतील 'तारा' नावाविषयी भ. श्री. पंडित म्हणतात

अनुक्रमणिका

"- नाही ज्या परि डोंगळा कधिही तो गेला झणी साखरे' (१८८७) आणि 'प्रणय कथन' (१८९८) या दोन कवितात 'तारा' हे स्त्री संबोधनात्मक नाव आले आहे. 'प्रणयकथन' या कवितेत पालुपदात आलेले 'तारा' हे नाव बहुधा केशवसुतांच्या पत्नीचे माहेरचे नाव असावे'३ भ. श्री. पंडित यांचा हा तर्क द. मो. दामले खोडून काढतात. व केशवसुतांच्या पत्नीचे माहेरचे नाव 'बयो' असल्याचे तर सासरचे नाव 'रखुमा किंवा रुक्मिणी' असल्याचे नमूद करतात.[४]

रा. श्री. जोग यांचा संभ्रम

केशवसुतांच्या प्रेमविषयक काव्यात चमत्कृती असल्याचे मत माधवराव पटवर्धन यांनी व्यक्त केले, त्या अनुषंगाने मत मांडताना रा. श्री. जोग म्हणतात- "याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे प्रेमविषयक तसे जिव्हाळ्याचे अनुभव फारच अल्प होते, हे आहे. त्यांचा विवाह लहानपणीच झाला होता, तेव्हा विवाहपूर्व विरहाची जाणीव त्यांना स्वानुभवाने असणे शक्य नव्हते. विवाहोत्तरही पत्नीखेरीज इतर स्त्री-प्रेमाचा अनुभव त्यांना असल्याचे त्यांचे चरित्र किंवा किंवदन्ती सांगत नाही. तेव्हा त्यांची स्वतःच्या कवितांमधील प्रेमविषयक आत्मव्यक्तीही बहुतांशी कल्पना विलासात्मक होती. ती तशी असल्यानेच तीमध्ये बरीच चमत्कृती आली आहे."[५] असे नमूद करणारे रा. श्री. जोग 'प्रणय कथन' या कवितेच्या विवेचनात मात्र वरील तर्काला छेद जाईल असे मत व्यक्त करतात. ते म्हणतात- "यातील 'तारे' हे आरंभीच्या आणि शेवटच्या ओळीतील संबोधन कोणा खरोखरच्या व्यक्तीचे अस्तित्व सूचित करते काय ? दुसरीकडेही एका ठिकाणी तिचा उल्लेख आला आहे. बहुधा ती काल्पनिक असून येथे तरी यमकाच्या सोयीसाठी आली असावी"[६] असे मत रा. श्री. जोग व्यक्त करतात तेव्हा त्यांच्याही मनातील संभ्रम आपल्याला जाणवतो.

शाश्वत प्रेमाची तारका

'तारा'बाबत कृ. बा. मराठे 'शाश्वत प्रीतीची तारका' या अर्थाने विवेचन करतात. ते म्हणतात "कवीला शाश्वत प्रेमाची वाटणारी योषा (Star of constant love) त्यांच्या कल्पनेने रंगविलेली दिव्य देवी आहे. एरवी असली अक्षय्य प्रीतीची 'तारा' मर्त्य पृथ्वीवर सापडणे शक्य नाही, असे नमूद करून कृ. बा. मराठे पुढे म्हणतात, केशवसुतकाळी प्रियेच्या नावाने उघड उघड बोलणे अगर लिहिणे परंपराभूत नव्हते. म्हणूनच त्यांनी हे 'कल्पना फलित' हा 'बुद्धिविलास' यांचा मार्ग पत्करून ती होईल तितकी मानवी आणि जिवंत वाटेल असे प्रकार कवीने योजले आहेत. तिला ते 'सखी' 'कांते' म्हणतात; तर घटकेत ती त्यांची भगिनी होते. (दूर कोठे एकला जाऊनिया) ती निजधामात राहते आणि तिथूनच ती कवीशी बोलाचाली करते. या दृष्टीने या 'तारे'चा विचार करता केशवसुतांच्या कवितेतील हे कोडे सुटू शकते"[७] याचा अर्थ 'तारा' या नावाची कोणी ही वास्तवातली स्त्री नव्हती; हेच मराठे नमूद करतात.

केशवसुतांच्या कवितांची पडताळणी करता 'तारा' हे नाव 'नाही ज्या परि डोंगळा...' (१८८७) या कवितेतील दुसऱ्या कडव्यात एकदा आले आहे; तर प्रणयकथन' (१८९८) या कवितेच्या धृ-पदात सुरुवातीला आले आहे. कवितेच्या शेवटी पुन्हा तेच धृ-पद आले आहे. या संपूर्ण कवितेत फक्त धृ पदातच

ते नाव आहे. 'नाही ज्या परि...' ही कविता १८८७ साली केशवसुतांनी लिहिली आहे. १८८४ ते १८८९ पर्यंत केशवसुत पुण्यात शिकत होते. केशवसुत मुंबईला पहिल्यांदा गेले तेच मुळी १८९० साली. म्हणजे मुंबईला जाण्यापूर्वीच लिहिलेल्या या कवितेत 'तारा' हे संबोधन आले आहे. याचा अर्थ द. मो. दामले म्हणतात तसे मुंबईच्या वास्तव्यात केशवसुतांच्या मनात ठसलेल्या त्या व्यक्तीवरून 'तारा' हे संबोधन वापरले असण्याची शक्यता नाही; हे स्पष्ट होते. केशवसुतांच्या मनात अशी कोणती व्यक्ती ठसली असेल असे वाटत नाही. म्हणजे मुंबईच्या वास्तव्यात ती स्त्री त्यांना दिसली असण्याचा व तिच्यावरून कविता लिहिल्याचा द. मो. दामले व्यक्त करतात तो तर्क फोल ठरतो. केशवसुतांच्या इंग्रजी कवितांतही 'तारा' आलेली आहे. या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करताना द. मो. दामले मांडतात तो नवा विचार, तर्कसंगत व संयुक्तिक ठरत नाही, आणि केशवसुतांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाशी तो जुळतही नाही.

संदर्भ :

१. दामले द. मो. 'सरस्वतीचे लाडके पुत्र', प्रकाशक - द. मो. दामले, सोलापूर. प. आ. २८ सप्टेंबर १९६६.
२. दामले द. मो. तत्रैव - पृ. ७७
३. पंडित. भ. श्री. समग्र केशवसुत पृ. ३५०
४. दामले द. मो. तत्रैव पृ. ८०
५. जोग रा. श्री. - केशवसुत काव्यदर्शन - पृ. १२३
६. जोग रा. श्री. - तत्रैव पृ. १३१
७. मराठे कृ. बा. 'केशवसुतांनी पाहिलेली स्त्री' 'मांडवी' - कवि केशवसुत विशेषांक - ऑक्टोबर १९६६, पृ. ३७-३८)

❖❖❖

डॉ. सुभाष ज. गढीकर
'पसायदान' ९६, यशवंत कॉलनी,
कारंजा-लाड : ४४४१०५ जि. वाशीम.
दूरध्वनी : ०७२५६-२२२३८७
भ्रमणभाष : ९८५०८२४५९०
ई-मेल : subhashgadhikar@rediffmail.com
subhashgadhikar@gmail.com

अनुक्रमणिका

पुस्तक परिचय

'उत्कट संवेदनाशील ललित लेखन'

- डॉ. ज्योत्स्ना आफळे

'सोनफुलं' हा डॉ. मंदा खांडगे यांचा नुकताच प्रकाशित झालेला ललितलेख संग्रह आहे. एकूण सोळा लेख या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेत. या लेखांमध्ये विविधता आहे. काही प्रवासानुभव आहेत. काही बालपणातील समृद्ध अनुभव आहेत.. काही निसर्गविषयक तर काही सामाजिक जाणिवेतून लिहिलेले आहेत.

या ललितलेखना मागची प्रेरणा व्यक्त करताना डॉ. मंदा खांडगे लिहितात, 'मनात उमटणारे भावनांचे तरंग शब्दरूप होतात; आणि ते कागदावर उतरून त्याचा लेख प्रत्यक्षात उतरला की, मन हलकं होतं. एखादा उत्कट अथवा मनाला चटका लावणारा अनुभव, एखादे निसर्गातील घटित, एखादा प्रसंग हेही शब्दरूपाने कागदावर अवतरतात त्यावेळी 'मी' तटस्थपणाने त्यांच्याकडे पाहत राहते. आपल्याला जे भावतं ते दुसऱ्यापर्यंत शब्दरूपाने पोहोचवावं आणि त्यांना आपल्या अनुभवविश्वात सहभागी करून घ्यावं अशी त्यामागची माझी भूमिका असते.'' (पृष्ठ क्र. ५)

या संग्रहातील 'सोनफुलं' या लेखात लेखिकेने झेंडूच्या फुलांना सोनफुलं असे म्हटलेले आहे. नवरात्र, दसरा दिवाळीच्या सुमारास बाजारात दिसणाऱ्या पिवळसर अशा झेंडूच्या फुलांच्या राशी म्हणजे सोनफुलांच्या राशी असे लेखिकेने त्या फुलांचे वर्णन केलेले आहे. या सोनफुलांवरून पुस्तकालाही 'सोनफुलं' असं नाव दिले आहे. परंतु मुखपृष्ठावरचे फुलांचे चित्र विसंगत आहे. भलत्याच फुलांचे चित्र तेथे काढलेले आहे. चित्रकाराने सोनफुलांचा लेखिकेला अभिप्रेत असलेला अर्थ लक्षात घ्यायला हवा होता. मुखपृष्ठावरची फुले विलोभनीय आहेत परंतु तो लेख वाचताना ही विसंगती लक्षात येते.

बालपणातले समृद्ध अनुभव लेखिकेने 'प्रतिक्षा', 'प्राजक्त', 'सोनफुलं', 'मी एक थांबलेली, ... या लेखातून व्यक्त केलेले आहेत.. आपल्या स्मृतीकोषात जपून ठेवलेल्या अनेक रम्य आठवणींचा पट पुन्हा उलगडलेला आहे. यामध्ये भोंडला, भातुकली, बाहुलाबाहुलींची लग्ने, मंगळागौरीचे खेळ आहेत. त्यानिमित्ताने म्हटलेली गाणी आहेत. मैत्रिणींशी केलेले हितगुज, रूसवेफुगवे आहेत. लहानपणी ज्या घरात राहिलो; त्या घरांची वर्णने, त्याच्या आजूबाजूचा परिसर, शाळा कॉलेजचे दिवस, येण्याजाण्याचे रस्ते, गर्दी, दुकाने, सणासुदीच्या दिवसातील फुलून आलेली बाजारपेठ या सगळ्यांची अत्यंत सूक्ष्म वर्णने लेखिकेने केलेली आहेत. बालपणी काही गोष्टी भुरळ घालणाऱ्या असतात. प्रौढावस्थेत त्या नगण्य वाटतात. पण अशा लहान लहान गोष्टीतच बाल्य दडलेलं असतं. लेखिका लिहिते; की तांबट आळीच्या रस्त्याने पुढे गेले की पावाच्या भट्ट्या होत्या. रस्ताभर भाजलेल्या पावाचा खरपूस वास दरवळत असायचा आणि तो मला आवडायचा, कासार वस्तीतल्या बांगड्या मारूतीपुढे परीक्षेच्या दिवसात हात जोडले जायचे, वज्रदेही चौकात मेळेकरी घुंगराची काठी वाजवत येत,सोन्यामारूती चौकातून घुंगरांचे पैंजण घालून चालताना त्याचा छन् छन् होणारा आवाज, दिवाळीत घराच्या तिन्ही मजल्यांवर शंभराहून जास्त पणत्या लावलेल्या असायच्या आणि तिन्हीसांजेला त्या मंद पणत्यांचे तेज रस्त्यावर उभे राहून पाहण्यात आनंद वाटे. डोळ्यासमोर पुलवाला गुंफत असलेली वेणी आणि झराझरा गुंफत जाणारी शेवंतीची फुलं हे विलोभनीय दृश्य बघायला आवडत असे.

अनुक्रमणिका

लेखिकेला निसर्गाचे आकर्षण आहे. निसर्गातील अनेक गोष्टींनी तिचे भावजीवन समृद्ध केलेले आहे. कोकणातल्या निसर्गसौंदर्याची वर्णने अप्रतिम आहेत. बोर्डीचा, दाभोळचा, गोव्याचा, मुंबईचा समुद्रकिनारा रात्रीच्या नीरव शांततेत येणारी त्याची गाज, संध्याकाळचा सूर्यास्त, चांदण्या रात्री अनुभवलेला माडातून वाहणारा वारा, वरचे निळे आकाश आणि त्याखालचे फेनधवल पाणी, आसमंतातील शांतता, किनाऱ्यावरची मऊशार पांढरी रेती, यांच्या वर्णनातून निसर्गाचे अभिजात दर्शन लेखिकेने घडवले आहे. अनेक प्रकारच्या पानाफुलांचे वास, समुद्राची गाज, वाऱ्याचा कानात घुमणारा आवाज, पावलांना होणारे गवताचे स्पर्श यांच्या वर्णनातून दिसून येते की लेखिकेच्या इंद्रियसंवेदना अतिशय तीव्र आहेत.

"मिंक कोटाच्या निमित्ताने", 'सूर्यास्त' या लेखातून प्रवासानुभव आलेले आहेत. अमेरिकेतील कॅनडा, मॉंट्रिअल येथील प्रेक्षणीय स्थळांची वर्णने यात आहेत. 'मिंक कोटाच्या निमित्ताने' या लेखतील परदेशात 'एकला चलो रे' म्हणत एकटीने पण आनंदात जीवन जगणाऱ्या जयाताईंची कहाणी मनाला स्पर्शून जाते. तसेच आपल्या गाडीसकट जलसमाधी मिळालेल्या एका कोरियन युवतीच्या अपघाताचे वर्णनही अत्यंत हृदयद्रावक आहे.

या संग्रहातील 'ऋणानुबंध' हा लेख वाचनीय आहे. घरातील पाळीव कुत्रा 'मॉंडो' हा कुटुंबाचाच एक भाग कसा होतो, घरातल्या प्रत्येकाला त्याचा लळा कसा लागतो, सगळे घरच त्याच्याभोवती कसं फिरतं, त्याचं लोभस रूप, त्यांचे हावभाव, त्याच्या बारीक सारीक खोड्या याचे विलोभनीय वर्णन लेखिकेने केले आहे. त्यामुळेच मॉंटोचा आजार आणि त्यातच झालेला त्याचा अंत वाचकाला अस्वस्थ करतो. लेखिकेचे आणि मॉंटोचे ऋणानुबंध किती घट्ट होते; हे दिसून येते.

अनेक लेखक-लेखिकांशी असलेला अनुबंध लेखिकेने 'माझी पत्रे' या लेखातून व्यक्त केलेला आहे. कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज, अनुताई वाघ, संजीवनी मराठे, पद्मा गोळे, शांता हेळके, इंदिरा संत, यांच्या जिव्हाळ्याने ओथंबलेल्या पत्रांचे उल्लेख केलेले आहेत, डॉ. हे. वि. इनामदार, डॉ. आनंद पाटील, प्रा. वैजनाथ महाजन, रविंद्र पिंगे, द्वा. भ. कर्णिक, डॉ. प्र. न. जोशी, शंकर वैद्य, डॉ. वि. म. कुलकर्णी यांनी लेखिकेच्या लेखनाबद्दलचे अभिप्राय पत्राद्वारे कळवले आहे. लेखिका लिहिते की ही पत्रमैत्री आनंदाचा ठेवा आहे, ही कौतुकाची थाप आयुष्यभर जपून ठेवावी अशी आहे. लेखनबळ वाढविणारी, लेखनाला हुरूप देणारी आहेत. या पत्रांचे मोल करता येणार नाही. ही श्रीमंतीची ऊब देणारी आहेत. या पत्रातून मिळणाऱ्या आशीर्वादामुळे आपल्या लेखनाची वाटचाल झाली अशी कृतज्ञता लेखिकेने व्यक्त केलेली आहे.

एकूणच या संग्रहातले सगळेच लेख ललितगद्य या वाङ्मयप्रकारात चपखलपणे बसणारे आहेत. प्रत्येक लेखात लेखिकेमधला 'मी' पूर्णांशाने व्यक्त झालेला आहे. जीवनातला प्रत्येक अनुभव अतिशय उत्कटतेने घेण्याची लेखिकेची वृत्ती दिसून येते. तरल, काव्यात्मता, उत्कट संवेदनशीलता, निखळ सौंदर्यदृष्टी, समतोल जीवनदृष्टी इत्यादी कौशल्यांनी युक्त असे हे ललितलेखन आहे.

❖❖❖

सोनफुलं - डॉ. मंदा खांडगे,
प्रकाशक - संस्कृती प्रकाशन, नारायण पेठ, पुणे ३०.
मूल्य रु. १२५. (२० जानेवारी २०१०)

डॉ. ज्योत्स्ना आफळे
७६/१० 'सुयोग', शांतीशिल सोसायटी,
लॉ कॉलेज रोड, पुणे ४.

एक भीषण जीवनानुभव 'मुन्नी' – अरुणा सबाने

- प्रा. डॉ. भगवान ठाकूर

[कल्पनेलाही लाजवील अशा भीषण वास्तवाकडे धीटपणे पाहणे; आणि त्याला कलात्मक आकार देणे– ह्याला अतिवास्तववादी म्हणून बाजूला टाकणे समीक्षेला परवडणारे नाही. जीवनाचा विद्रूप चेहराही सहृदयतेने कलेच्या दर्पणात पाहणे म्हणजेही जीवनाला समजून घेणे होय. संपादक]

समाजानं एखाद्या महारोग्याला झिडकारावं अशा अव्हेरलेल्या वेश्या वस्तीतील, रक्तामांसाच्याच माणसांनी फशी पाडलेल्या 'मुन्नी'ची ही एक विलक्षण कहाणी. खरं तर वेश्या, देवदासी, मुरळी या स्त्रियांच्या जगण्या-भोगण्यावर यापूर्वी अनेकांनी कथा, कादंबरी, कविता, नाटकातून लिहिलंय. नामदेव ढसाळच्या गोलपीठापासून तर नारायण सुर्व्यांच्या 'मास्तर तुमचंच नाव लिवा' पर्यंत आणि बळवंत कांबळेपासून तर राजन गवस ते उत्तम कांबळेंच्या 'देवदासी आणि नग्नपूजा' पर्यंत आणि अगदी बाबा भांडच्या 'जुगार'पर्यंत ज्या संवेदनाक्षम, सजग, समाजभान असलेल्या लेखक-कवींनी समाजाच्या या उपेक्षित घटकावर लिहिलं त्यात एक आगळी वेगळी भर अरुणा सबाने यांच्या 'मुन्नीने' घातली आहे. विशेषतः एका स्त्रीनं, स्त्रीमधल्या मायमाखल्या मायेने केलेले हे चित्रण ज्या धाडसानं, निर्भय मोकळेपणाने केले आहे; ते मराठी कादंबरी विश्वात अनोखेच म्हटले पाहिजे.

आकांक्षा प्रकाशन, नागपूरने प्रकाशित केलेली एकूण २०८ पृष्ठांची अरुणा सबाने यांची त्यांच्या 'विमुक्ता'नंतरची ही दुसरी कादंबरी आहे. ही कादंबरी सर्वार्थाने नायिकाप्रधान आहे. ही कादंवरी वैदेही वडस्कर या उद्योजक, सामाजिक कार्यकर्त्या स्त्रीची आहे. तशीच सायना आणि त्याहून 'मुन्नी'ची अधिक आहे. मुन्नी आणि सायना या वैदेहीच्या जीवनातील स्वप्न आणि वास्तवाच्या एका नाण्याच्या दोन बाजू असाव्यात तशा आहेत. नागपूरातल्या 'गंगा-जमुना' या वेश्या वस्तीतून, रेडलाईट एरियाच्या खातेऱ्यातून मुन्नीची सुटका वैदेही करू शकली, सायनाची सुटका तिला करता आली नाही.

प्रत्यक्ष जन्मदात्या बापानं, सख्ख्या मामानं अजाण, अल्लड, कोवळ्या मुन्नीचं लैंगिक शोषण करून पुन्हा कहर म्हणजे कसाबाच्या काळजाने तिला 'गंगा-जमुनात' आणून अवघ्या २ हजाराला जित्रापासारखी विकली. वैदेहीने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, आपल्या मुलामुलींचा जीव पणाला लावून, सर्व धोके पत्करून मोठ्या हिमतीने, मुन्नीची त्या नरकातून सुटका केली. मुन्नीला कुटुंब नावाचं हक्काचं घर दिलं, मायमाऊलीची माया दिली. भावंडांचं प्रेम दिलं, सुसंस्कृतपणाचे सर्व संस्कार दिले. थेट यू.पी.एस.सी. होईपर्यंतचे संपूर्ण शिक्षण दिलं. मुन्नीला तिचं अवघं माणूसपण देणारी वैदेही हीच खरी या कादंबरीची नायिका म्हणायला हवी. पण कादंबरीच्या आशयकेंद्री मुन्नीच असल्यामुळे नायकत्वाच्या निकषाप्रमाणे तीच या कादंबरीची नायिका आहे. मुन्नीची करुण कहाणी कळलेली; आणि त्यामुळे आंतरबाह्य अस्वस्थ वैदेहीच्या, मुन्नीची सुटका 'गंगाजमुना'च्या नरकातून कशी करता येईल, याच्या नियोजनापासून सुरू झालेली ही कादंबरी मुन्नीची निवड यु.पी.एस.सी.च्या ट्रेनिंगसाठी होते, ती ट्रेनिंगला निघते, इथपर्यंतचा कथ्यावकाश या कादंबरीचा आहे.

कादंबरीच्या प्रारंभीच दिलेली दोन कोटेशन्स- एक इंग्रजी आणि दुसरे हिंदी-उर्दूतील अतिशय सूचक, मार्मिक आणि कादंबरीच्या आशय फलकाचे संसूचन करणारी आहेत. 'Nothing is good or bad in this world. It all depends on how you look at it; and react to it.' ह्या अवतरणाची संदर्भछाया कादंबरीभर जाणवत राहते. तर "चारा न कोई जलते रहने के सिवा । साचे में फनाहके ढलते रहने के सिवा । ए शमा तेरी हयाते फानी क्या है ? झोके खाने संभलते रहनेके सिवा ।" हीच जणू या कादंबरीतील स्त्रियांची

अपरिहार्य नियती आहे. याच नियतीविरूद्ध वैदेहीचा संघर्ष सुरू आहे. ह्या भीषण संघर्षाचे फलित जणू यू.पी.एस.सी.चे 'स्वपान' साकारलेली मुत्री आहे. कादंबरीची वैचारिक उंची वाढविणारी ही दोन्ही अवतरणे लेखिकेने खूप औचित्यपूर्ण पद्धतीने वापरली आहेत.

या कादंबरीची अर्पणपत्रिका देखिल लेखिकेचा कादंबरीलेखनामागील मानसहेतू स्पष्ट करणारी आहे. ''इथल्या शोषणव्यवस्थेला बळी पडावं लागून मनाच्या इच्छेविरूद्ध नको त्या व्यवसायात पडणाऱ्या माझ्या समस्त मैत्रिणींना'' अशी ही अर्पण पत्रिका कादंबरीच्या आशयसौंदर्याला पूरक आहे.

तृतीयपुरुषीनिवेदनपद्धतीचा वापर कादंबरीभर केला आहे. कादंबरीतील लहान-मोठी, गौण-मुख्य पात्रे पाहता लक्षात येते की वैदेही, मुत्री (मैत्रेयी), सायना, सुहास ही मुख्य पात्रे आहेत; तर गौण पात्रांमध्ये वैदेहीची मुलं इशान, रेवा, देवयानी (सून), भैया, ऑन्टी, पहिलवान, गजामामा, गौरी (वैदेहीची मैत्रिण) चावला, प्रा. सोहम् महाजन, पी.एस.आय. देवतळे, मोलकरीण वत्सला आणि गंगाजमुनातील सायना, राधा, नकोशी, खुशबू, किरण इ. पात्रे आहेत.

सायना आणि मुत्री या एका नाण्याच्या दोन बाजू वाटतात. मुत्रीला जगण्याचा उन्नत मार्ग योग्य वयात योग्य वेळी गवसला. सायना मात्र एकदा मार्ग चुकली मग बुडत्याचा पाय खोलात या न्यायाने दीर्घकाळ ती फरफटत, भरकटत आणि फाटतच राहिली. प्रस्थापित पुरुषसत्ताक व्यवस्थेविरूद्ध, प्रवाहाविरूद्ध पोहणे मुळीच सोपे नाही. पण व्यवस्थेला नकार, अन्याय-शोषणाचा धिक्कार करण्याचा प्रकृतीधर्म असलेली एखादीच वैदेही, मुत्री सारख्या निष्पाप, अश्राप, कोवळ्या जीवाला 'गंगाजमुना'तल्या अंधार यातनांमधून मुक्त करून सुख, यशरुपी, प्रकाशोन्मुख गुलबकावलीचं फूल प्राप्त करून देते.

जवळपास १३ वर्षांपूर्वी मुत्रीला ती १० वर्षाची असताना लेखिका भैय्या आणि सुहासच्या मदतीने मोठी जोखिम पत्करून 'गंगाजमुना'तून अक्षरशः पळवून घेऊन येते. मुत्रीला असं घरी आणणं एखाद्या अनाथाश्रमातून मूल घरी आणण्याइतकं सोपं नव्हतं. स्वतःसकट स्वतःच्या मुलामुलींचा जीव धोक्यात घालण्याचा हा प्रकार होता. तसं पाहिलं तर अशा मुत्री किंवा सायना सारख्या शेकडो मुली फसवून, नासवून, हतबल, असहाय्य करून गंगाजमुनासारख्या, फोरासरोड, कामाठीपुरा, बुधवार पेठेतल्या लुतभरल्या भुलभुलैया दुनियेत प्रकाशाच्या, स्वातंत्र्याच्या एखाद्या किरणाच्या प्रतिक्षेत मरेपर्यंत तशाच घुसमटत, पिचत, खचत जगतात. जगताना रोज रात्री मरतात आणि मरता मरता जगतात. या कादंबरीतल्या सारखी एखादीच मायमाऊली ममत्वाची बेडर झुंज देऊन एखाद्याच मुत्रीची अशी सुटका करू शकली. मुत्री काय, सायना काय या इथल्या फक्त पुरुषसत्ताक, वासनांध व्यवस्थेच्याच शिकार नसतात; तर त्याला इथली भांडवलशाही शोषक व्यवस्था आणि जातीव्यवस्था देखिल कारणीभूत असते. पैशांसाठी शूद्रातिशूद्र समाजातील पुरुष, मग ते बाहेरचे दलालच नसतात तर सख्खे काका, मामा, भाऊ अगदी बापसुद्धा असू शकतात. नव्हे; असतातच ! हे नराधम कोवळ्या अजाण लेकीबाळींना सुद्धा कसावकाळजाचे बनून दहा-पाच हजारांसाठी विकतात.

स्त्री-पुरुष संबंधातील अनेक अलक्षित पैलूंवर लेखिकेने निर्भयपणे प्रकाश टाकला आहे. 'लिव्ह-इन् पार्टनर' सारख्या नव्या विचारांनाही निर्भिडपणे मांडले आहे. खरं तर 'मुत्री' हा लेखिकेचा एक धाडसी सामाजिक प्रयोग आहे. व्यवस्थेविरुद्धचे एक 'वनवुमन वॉर'-बंड आहे. लेखिकेचे स्त्री-पुरुष संबंधातील नाजूक, सूक्ष्म, पुष्कळदा समाज अमान्य संबंधांवरील स्वचिंतन, कथानकातील घटना-घटितांवरील वैचारिक, भावात्मक भाष्य विलक्षण आहे. त्यामुळे कादंबरीच्या गुणवत्तेचा पोत चिंतनीय आहे.

कादंबरीतील अनेक प्रसंग वाचून वाचक प्रचंड अस्वस्थ होतो. संवेदनशील, स्त्री-पुरुष समताग्रही वाचक तर आतून पार उद्ध्वस्त होतो. काय आणि कसले भयानक जग तो 'गंगाजमुना'त पाहतो. खरेच असे आणि इतके आहे का ते जग ? असा प्रश्न सुद्धा एखाद्या अभिजन वाचकास पडू शकतो. इतके ते जग लेखिकेने प्रत्ययकारी पद्धतीने साक्षात् केले आहे.

ही कादंबरी बऱ्याच प्रसंगात वाचकाच्या काळजात

सुरूंगस्फोट घडविते. उदा. सायनाला चावला लॉजवर एकटंच सोडून गेला. आता काय ? गजामामा, लंगड्या, बाप वैदेहीच्या फ्लॅटपर्यंत पोहोचले आता काय ? ऑन्टीने, सायनाने वैदेहीला त्यांच्या अंधार जगातील वास्त सत्य सांगून आतून उद्ध्वस्त केले. वैदेही बेशुद्ध झाली. आता कसे होणार ? सायनाला प्राध्यापकाने बाहेर काढले. पुढं काय ? इ. प्रसंग उत्सुकता वाढवतात. कादंबरीतल्या पात्रांच्या भावविश्वात वाचक गुंतत जातो.

लेखिकेची वर्णनशैली अर्थसुंदर आहे. 'मुत्री' सारखा नाजूक विषय तितक्याच हळुवार हाताने, मायमाखल्या वृत्तीने त्यांनी हाताळला आहे. उदा. वैदेहीनं मुत्रीला जेव्हा पहिल्यांदा पाहिलं त्यावेळचं तिच्या निष्पाप, निर्व्याज व्यक्तित्वाचं वर्णन ज्या आप्तभावाने, हळुवार शब्दकलेने केले आहे, ते विलक्षण आहे. आशय सौंदर्यासोबतच अभिव्यक्तीचं सौंदर्यही या कादंबरीचं बलस्थान आहे. अर्थ सुंदर शब्दकला कादंबरीभर आहे. उदा. १. ''ज्वारीच्या कणसातून साराच्या सारा जोंधळा तीनतीनदा झाडून-झटकून घ्यावा तसा...'' (पृ. २२)२. ''छोटंसं डबकं जरी दिसलं तरी कोरड्या ठणठणीत मातीच्या ढिगाऱ्यावरून पोटतिडकीनं बेडूक त्या लहानशा डबक्याकडं धाव घेईल तसं.'' (पृ. ७७) ३. ''दाट धुक्यातून माणूस पहावा तशी ती आपल्या पूर्वायुष्याकडे पहात होती.'' (पृ. १२२) ४. ''एखाद्या झाडानं वाढण्यासाठी किती कुंड्या बदलाव्यात ?'' (पृ. १२३) ५. ''आपलं शरीर ही एक सुंदर फुलांची बाग आहे, त्यात डोळे, कान, नाक, हृदय अशी विविध सुंदर फुले आहेत. आपली बाग, आपल्या हक्काची बाग आपण आपल्या मनाविरूद्ध कुणाला तरी ओरबाडू द्यावी काय ?'' (पृ. १३४) ६. ''मृगाच्या पहिल्या पावसाने वसुंधरा जशी वर्षभराच्या घाणीने डबडबलेली असली तरी स्वच्छ होते ना, तसेच स्त्रीचं आहे.'' (पृ. १३६) ७. ''मी तर बोलून चालून धंदेवालीच... पण हा धंदा ना माझ्या अम्मानं पाहिला होता ना मला यातलं काही समजत होतं... तुमच्या चांगल्या समाजातल्या माणसांनीच मला या धंद्यापाण्याला लावलं.'' (पृ. १६५) ८. ''सगळं आयुष्य जुगारात हरल्यासारखी हतबल.'' (पृ. १६६) ९. ''एका तासापूर्वी स्वच्छ दिसणाऱ्या आकाशात पावसाचे एवढे ढग अदृशावस्थेत कुठे लपून बसले होते... मागमूस नसलेला पाऊस असा कसा वेड्यासारखा कोसळतोय!'' (पृ. १७२) १०. ''श्रावणातील आभाळाप्रमाणे क्षणाक्षणाला रंग बदलणारा चेहरा.'' (पृ. १७५) इ. कितीतरी वाक्ये आहेत जी कादंबरीच्या अभिव्यक्तीसौंदर्यात आणि आशय सौंदर्यातही भर घालतात.

अधूनमधून वऱ्हाडी शब्दकळा संवादांचे सौंदर्य खुलवतात. उदा. मायमाखल्या, दबूनशान, मिचमिच्या पिवळा लाईट, मेणचटलेली चादर, अजबगजब, बह्याड, लटक, करवादली, धापोडा, बफरला, बुहारा, रायते, मसन्याउद, फत्रू, खुटीउपाट, मनकवडा इ.

सारांश, 'मुत्री' ही मराठी कादंबरीच्या वाटचालीत समकालीन कादंबऱ्यात एक ठसठशीत, अनोखी आणि चाकोरीबाहेरील एक नाविन्यपूर्ण कादंबरी आहे. देशीय स्त्रीवादाचं एक विलक्षण रसायन या कादंबरीच्या नसांमधून वाहताना जाणवते. एखाद्याला एका स्त्रीनं लिहिलेली ही धीट कादंबरी किंचित् जादाच 'बोल्ड' वाटू शकते. पण 'गंगाजमुना'च्या गटार जीवनाची कल्पना येण्यासाठी इतके यथातथ्य वर्णन करणे आवश्यकच होते. वाचकही या वेगळ्या जगातील जगावेगळी पात्रे पाहून थक्क होतात, अंतर्मुख होतात मग अस्वस्थ होतात. एक भीषण जीवनानुभवाचा शोध आणि वेध घेणारी 'मुत्री' मराठी वाचकांना निश्चितच आवडली असेल याची खात्री आहे.

❖❖❖

मुत्री (कादंवरी) - अरुणा सबाने आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प. आ. २०१०, पृष्ठ - २०८, मूल्य - २१० रुपये

प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर
नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे - १.
भ्रमणध्वनी : ९४२२२८९५८०

अनुक्रमणिका

बहिणाबाईंच्या लेकी – एक मुक्त चिंतन !

- सौ.अनघा ठोंबरे

[कथा-कादंबरी आणि काव्याचे वास्तव विषय प्रतिभावंतांची वाट पहात आहेत. सौ. ठोंबरे यांनी त्यांच्या अनुभवविश्वातून ते अधोरेखित केले आहे. जीवनाची ही चालती-बोलती विरूपिका ! संपादक]

सावित्रीबाईंच्या लेकींनी नेत्रदीपक प्रगती केली आहे. त्यांचं क्षितिज विस्तारलं आहे. बुद्धिमत्ता, कर्तृत्व, चिकाटी, एकाग्रता साहस, जिद्द, महत्त्वाकांक्षा अनेक गुणांनी युक्त सुशिक्षित सावित्रीबाईंच्या लेकी संगणकापासून अंतरिक्षापर्यंत प्रत्येक क्षेत्रात झेप घेत आहेत. परिवर्तनाच्या लाटांवर स्वार होऊन अडचणींचा समुद्र पार करून साहित्य, संगीत, कला, क्रीडा सर्व क्षेत्रात अग्रेसर आहेत. समाजकार्य, सेवा, स्वयंपाक आणि शिक्षण या परंपरागत क्षेत्रातही नवी दालनं त्यांनी शोधली आहेत. संशोधन, प्रशिक्षण समुपदेशन, वैद्यकीय क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. सृजनशीलता, भावनिकता, संवेदनशीलता, संयम, सहनशीलता, सहृदयतेचं वरदान असलेल्या भारतीय स्त्रिया, त्यांच्यामुळेच होणार आहे देश महासत्ता ! स्त्रीविश्वातली जागृती, क्रांती, शक्ती पाहून विश्व आश्चर्यचकित होत आहे. राजकारण, समाजकारण, वकिली, रेल्वे, विमान चालवणे, पोलीस सैन्यदलात अधिकारी मोठ्या उद्योजिका, व्यवस्थापनतज्ज्ञ, प्रशासकीय सेवा करणाऱ्या सावित्रीबाईंच्या लेकींच्या प्रगतीचा चढता आलेख पाहून सावित्रीबाईंना कृतार्थ वाटत असेल, त्या इथे अवतरल्या तर भारावून जातील त्यांना अश्रू आवरणार नाही. इवलेसे रोप गगनावरच काय अंतरिक्षात गेले आहे. पण निरक्षर बहिणाबाईंच्या लेकीही आहेतच.

या सावित्रीबाईंच्या लेकी आहेत तशा समाजात बहिणाबाईंच्या साहित्यिक लेकीही आहेत. कष्टकरी, मोलमजुरी करणाऱ्या, शेतात राबणाऱ्या, किरकोळ भाजी विकणाऱ्या, पडेल ते काम करणाऱ्या स्वयंपाक, वृद्धसेवा, रुग्णसेवा, बालसेवा, साफसफाई, वरकाम, बागकाम, फॉल-पिको करणाऱ्या आहेत. गोधड्या शिवणाऱ्या, नर्सिंग काम करणाऱ्या, बोहारणी आहेत, डबे पोचवणाऱ्या, चहाची टपरी चालवणाऱ्या आहेत. शाळेचं तोंडही न पाहिलेल्या या एकलव्य विद्यापीठाच्या पदवीधर आहेत, जीवनाच्या शाळेत शिकतात. त्यांचे जीवन साधं, सरळ, सुरक्षित नसतं. अनेक उलथापालथी, घडामोडी असतात, प्रत्येक दिवस वेगळा असते. विधवा, परित्यक्ता, फसवल्या गेलेल्या, व्यसनासक्त पुरुषांचा संसार सांभाळणाऱ्या आहेत, चूल आणि मूल, गर्भारपण आणि बाळंतपण यांच्या चक्रात आहेत. अजूनही बालवयात लग्न होतात, भरपूर मुलं होतात. घरात बाळंत होतात, सासुरवास असतो, तो तरी परवडला पण नवरावास भयानक ! दारूडे, निष्क्रिय, संशयी नवरे मारहाण करतात. शोषण असते. उपासमार तर असतेच ! सरपण गोळा करायचं, शेतात खुरपायचं, गाठी मारलेल्या साड्या नेसायच्या, उरलंसुरलं खायचं, आरोग्याचा भयानक प्रश्न ! स्वच्छतागृह, आडोसा नाही, हवा, उजेड नाही, योग्य आहार नाही, दूधसाखर घातलेला चहा नाही, केसांना तेल नाही, दुःखाचे अश्रू पुसायलाही वेळ नसतो. सगळीकडून अभाव नकार.नवरे त्यांना एड्स, गुप्तरोग देतात, शंभर टक्के ॲनिमिया आहे, अनेकींना कमी दिसतं, क्षयाची बाधा असते, साथीचे रोग असतात, दुखणी अंगावर काढली जातात. कष्टांना अंत नाही, बारा किलोमीटरवरून पाणी आणायचं, सत्तर किलोच्या टोपल्या घेऊन दहा किलोमीटर विकत फिरायचं, चारपाचशे पोळ्या लाटायच्या, वीस रुपये शेकडा मजुरी. रात्रपाळी, दिवसपाळी, बरा पैसा मिळतो म्हणून शय्यास्थित रुग्णांची सेवा करायची. तेल, तूप, दूधदुभते, सुकामेवा घातलेला स्वयंपाक करायचा लोकाच्या घरी ! स्वतःला कधी पेज, कधी शिळी भाकरी. शरीराचे हाल असे तर असतातच. असुरक्षिततेमुळे आणखीही कशाकशाला सामोरं जावं लागतं. ऐकलं तर काळजाचा ठोकाच चुकतो. 'त्यांचे बाप, भाऊ, नवरेच त्यांना वेश्या बनायला भाग

पाडतात, पैसा मिळवायला लावतात. त्यातून दारू पितात, त्यातून उलट हीच वाईट निघाली म्हणून दुसरी लग्ने करतात, तिच्याच पैशावर, तिच्याच जीवावर जगून तिच्याच जीवावर उठतात. खून, बलात्कार असतात, रोज आत्महत्त्या करण्यासारखी परिस्थिती असते. मारहाणीचे बळ शरीरमनावर उठतात. कशा जगतात ? शिक्षण नाही, पैसा नाही, कौशल्य नाही. चाळिशीतच थकतात, वृद्ध होतात. त्यात अज्ञानाबरोबर अंधश्रद्धा आहेत.. नवरे फक्त दारू पिण्यापुरते पैसे कधीमधी मिळवतात. बेकार, उपद्व्यापी, गुन्हेगार वृत्तीचे, अनेक आरोपांखाली तुरूंगात असलेले आहेत. घरातल्या तीनही पिढ्या दारू पितात- सासरा, नवरा, मुलगा. जे सासरी तेच माहेरी, इकडे एकादशी तर तिकडे शिवरात्र. माहेरची वाट बंद असते. भांडणतंटे, मारामाऱ्या, शिवीगाळ चालू असते. अपघात रोज होत असतात. दवाखान्याच्या फेऱ्या असतात, मिळवलेले सर्व दवाखान्यात जाते. दारूमुळे पुरुष तर सतत आजारीच असतात. अनेकदा नवरे विकृत मनोरूग्ण असतात, ढोंगी असतात, अनेकदा परागंदा होतात. गायब होतात. त्याहीपेक्षा कळस अनेकजण चक्क दुसरीतिसरी लग्नं करतात. अनेकदा सांगत येतात- 'बाई काल माझ्या नवऱ्यानं दुसरं लग्न केलं.' क्माझी सून दुसऱ्या कुणाचा हात धरून पळून गेली.' 'मुलाला एडस् आहे.' 'घरात अंधत्व अपंगत्व, असाध्य आजार आहेत.' नवरे दारूसाठी, जुगारासाठी चमचे, डबे, कपबशा, घरातलं धान्यही, अंगावरचे कपडेही विकतात, परत असते तीन दगडांची चूल, एका बाईचा संसार असा चार वेळा विकला, तिने चार वेळा नवा डाव मांडला, घरात सुतळीचा तोडाही नाही. झोपायला गादी, अंगाला स्वेटर ही चैन आहे. वाऱ्यावर संसार सोडून नवरे निघून जातात. दारिद्र्य, कष्ट, उपेक्षा, अनिश्चितता असते. वर्तमान, भूत, भविष्य कुठेही आशेचा किरण नसतो. त्या कुठून सावित्रीच्या लेकी होणार ? पण त्या आहेत अष्टभुजा, त्या आहेत सती सावित्री आणि त्या आहेत बहिणाबाई ! सतत जीवनसंघर्षाला गरिबीला तोंड देत असतानाही जीवनाला स्वीकारतात, आनंदानं सामोरं जातात, आला दिवस साजरा करतात. सणासुदीला नटतात. टी.व्ही. बघतात. हसून खेळून राहतात, उद्याची चिंता करत नाहीत, मनाच्या बँकेत अनेक कटू अनुभव असतात. ते उगाळत नाही. आला क्षण जगून, सार्थ करतात. एक दार बंद झाले की दुसरे ठोठावतात. एक रस्त्यावर भाजी विकायची, कॉर्पोरेशननं माल जप्त करायला सुरवात केली मग रिक्षा, टेम्पो चालवायला शिकली, लिहितावाचता येत नाही. लायसन्स कसा मिळणार ? कामावरून कधी काढून टाकलं जाईल हे माहिती नसतं, पगारात काही ना काही कारणानं कपात, रजा, सुट्ट्या नाहीत, जॉब सॅटिस्फॅक्शन, चांगले शब्दही नाही. प्रेम नाही, व्यथा वेदना ऐकायला श्रोता नाही, रडण्यासाठी कुणाचा खांदा नाही, विवाहांमध्ये तर प्रेम नसतेच, मेल्या तरी कुणाचे डोळे ओलावत नाहीत. नवरे बाशिंग बांधून उभे असतात.

साहित्य, संस्कृती, कल्पनांच्या विषयात त्या समृद्ध आहेत, त्यांचा प्रत्येक अनुभव खरा, जिवंत आहेत. त्या कष्टांनी सेवा करतात, पण समाजाचा एक घटक म्हणून त्यांचं स्थान काय आहे, त्यांची किंमत काय आहे ? तरीही त्यामानानं त्या खूप सहन करूनही आनंदी असतात. स्वीकार, सहकार्य असतं. प्रत्येकीची अश्रू भरलेली कहाणी, कथांमधली पात्र वेगळी, नाव वेगळी व्यथा त्याच. पण नुसतेच अश्रू नाहीत. अनेक भावभावनांच्या छटा आहेत. आनंद, उत्साह, जीवनेच्छा श्रद्धा, भक्ती आहे, मैत्रीची ओढ आहे, आशेचे किरण आहेत. प्रत्येकीला अग्निदिव्य करावं लागतं, प्रत्येकजण पणाला लावली जाते, इथे रामायण, महाभारत आहे, छोटे, छोटे आनंद आहेत, मोठी दुःख पार केल्यानंतरही फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून उडण्याची भरारी आहे, सर्वस्व गेलं तरी अपराजित मनानं जगण्याची उभारी आहे, कल्पनेच्या पलिकडची सहनशक्ती आहे, लवचिकतेला तर अंतच नाही, स्वतःला बदलतात, हा रस्ता बंद झाला दुसरा शोधतात, तोही चुकला तर तिसऱ्याकडे वाटचाल करतात. प्रत्येकीच जीवन एक दीर्घकथा, एक कादंवरी, एक साहसकथा, गूढकथा कधी चमत्कारकथाही ! वाट चुकलेल्या आहेत, गणित जमवणाऱ्या आहेत, झालं गेलं विसरून नवा अध्याय सुरू करणाऱ्या आहेत. त्यांचं स्वतःचं असं जीवनाचं तत्त्वज्ञान आहे. त्या गटानं आयुष्य जगतात, झाडांवरल्या पक्षांप्रमाणे रहातात, निसर्गाच्या अधिक जवळ असतात. जीवनाचं पुस्तक वाचतात,

अनुक्रमणिका

त्याचं अनुभवांचं क्षेत्र अधिक विशाल असतं, त्यांचं कौतुक करणार कोणी नाही. प्रसिद्धी, प्रतिसादाचं भाग्य नाही. कुठली संमेलनं नाहीत, पद नाहीत, गौरव, सत्कार नाही. इतिहासाच्या पानांवर कुठे नाव नाही. पण कर्तृत्व आणि बुद्धिमत्तेत त्या उण्या नाहीत, ज्या जीवापाड प्रेमानं त्या मुलांना वाढवतात, ज्या खस्ता खातात, काळजावर दगड ठेवतात त्याला अंत नाही, तोड नाही. एक प्रकारचा अलिप्त विरक्तपणाही त्यांच्यात असतो आणि अफाट प्रेम करण्याचीही क्षमता असते. इतक्या रूक्ष, काटेरी जीवनातही काव्य बहरलेलं दिसतं, लिहिता वाचता येत नसेल पण शब्दातून ते पाझरत असतं, भुकेचं गाणं खऱ्या भुकेतून येतं, एकेक प्रसंग ऐकताना डोळ्यात अश्रू, अंगावर काटा येतो. थोडे थोडे पैसे साठवून आनंदानं दिवाळी करतात, क्षणात होत्याचं नव्हतं झालं तरी खचून जात नाहीत, त्यांना पर्यायच नसतो, आत्महत्याही क्वचित करतात, कुठले तरी पाश त्यांना बांधून ठेवतात. अनेक कल्पना त्यांना सुचतात. साहित्य, संस्कृतीची ही अलिबाबाची गुहा अजून अज्ञातच आहे, अनुवादित पुस्तक, धार्मिक पुस्तक, पाकक्रिया, आरोग्यविषयक साहित्य, दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारी पुस्तकं, प्रवासवर्णन सगळ्यांपेक्षा वेगळे, अधिक खरं आपलं, खरं भारतीय काही तिथं आहे त्याचा शोध, वेध घ्यायला हवं. त्यांच्या मनाच्या तळाशी साठलेलं जेव्हा त्या सांगतात तेव्हा मन सुन्न होतात. त्यांचा श्रोता झाल्याबद्दलची कृतज्ञता त्यांच्या शब्दाशब्दात असते, क्षणात आपल्या होऊन जातात. त्या स्त्रिया, तरी या शहरातल्या स्त्रिया, खेड्यापाड्यात आदिवासी पाड्यात, दूर समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्यांच्या कथा किती वेगळ्या असतील, जीवनाचे रंग किती विविध असतील. त्यांना खूप भेटावंसं वाटतं, जाणावंसं वाटतं.

कथा कादंबऱ्यांच्या, सिनेमांच्या आणि नेहमीच मालिकांच्या सुरवातीला एक वाक्य दाखवलेलं असतं. 'या मालिकेतील सर्व पात्रे, कथा, प्रसंग काल्पनिक आहेत, कुणाच्या जीवनाशी साम्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा' त्या उलट इथे आढळेल 'सर्व पात्रे, कथा, प्रसंग वास्तव सत्य आहेत, इथे काही काल्पनिक आढळल्यास तो योगायोग समजावा. त्या दुःखातही त्यांना काव्य कसं स्फुरत असेल ? अंधश्रद्धांच्या जाळ्यात अडकलेल्या त्यांना कुठेतरी सत्य जाणवत असतं. त्यांना बालपण, तारूण्य, वार्धक्य नसतं, असतं ते एक कष्टमय जीवन, कळाहीन काळात जगण्याचं ओझं घेऊन त्या चालत असतात. त्यांना व्यासपीठ नाही. मुक्तपीठ नाही. त्यांना ओव्या येतात, त्या चारोळ्या रचतात, अभंग पाठ म्हणतात. आयुष्यात देवाकडून काही मिळत नाही तरी श्रद्धा भक्ती कणभरही कमी होत नाही. अनाथांना सांभाळतात, वृद्धांची सेवा करतात, दारूड्या नवऱ्यांच्या पतिव्रता असतात, सवतीलाही आपलं मानतात, कितीदा तरी मन मोठं करतात, आयुष्यात किती सहन करतात, किती ऐकून घेतात, किती स्वीकारतात. ह्या स्वप्नही रंगवतात, आशेनं फुलून येतात, धाडसही करतात, घाबरत नाहीत कशालाच, कुणालाच, कर्ज काढतात. भिश्या लावतात, गाव सोडून जातात, नैसर्गिक संकटांना तोंड द्यावे लागते, तलवारीच्या पात्यांवरून चालण्याचे व्रत असते. ऐकताना आपल्या काळजात धस्स होते. शिक्षण नाही, पैसा नाही, आधार नाही, प्रेम नाही त्या सगळ्यांना जगण्यासाठी होकार यांना मिळतो कुठून ? नवरे लवकर मरतात, दारू पिऊन, दुसरा संसार मांडतात, तोही नवरा तसाच असतो, जीव पोळलेला असतो तरी परत तेच करतात. काही लग्नच न करायचं ठरवून आईवडिलांचा संसार करतात. कुणी कराटेत पदक मिळवतात, पण शिक्षण नाही. आजारपणात स्वतःच ॲडमिट होतात, ऑपरेशनला स्वतःचा अंगठा उठवतात, कुणी सोबत नसते, कुठून डबा येणार नसतो, आसपासचे लोकच घासातला घास देतात, घरी कुणी वाट पहाणारे नसते, कुणी फिरकत नाही. ही मेली तर दुसरी असते; पण तिची बारकी पिलं तिला सांभाळतात, जपतात. सासुरवास करणारी सासू तिच्या मांडीवर प्राण सोडते, इथे वृद्धाश्रम, पाळणाघर नसतात, वस्तीतली अनाथ मुलं ती संभाळते, एवढं करून आंधळ्या अपंगासाठी तिचा जीव तुटतो. गळ्यात गळा घालून रडताना म्हणतात, 'बाई माझ्या हातची पुरणपोळी तुम्ही खायची आहे.' 'कागद गोळा करून जाळून त्याच्यावर आपल्यासाठी 'च्या' करतात, दोन कष्ट जादा करून पोहे बशीभरून देतात, आजारी पडलो तर बघायला येतात. बिस्किटाचा पुडा आणतात. त्यांच्या अनुभवांना शब्दात आणायला हवं, खाणीतून सोनं बाहेर

काढायला हवं, पण कोण हे करणार, कोण वाचणार? कोण ऐकणार? त्यात कुठे आहे 'थ्रिल', 'रोमान्स', 'सस्पेंस आणि इतर मालमसाला !' इथे आहे प्रतिबिंब, आपल्याच समाजातल्या एका भागाचं. हिशेब शिकतात, हिंदी शिकतात, इंग्रजीही शिकतात, जगण्यासाठी जे शिकायला हवं ते शिकतात. त्यांना साहित्य, संस्कृती, वाङ्मय शब्दही माहिती नाहीत पण या शब्दांचे अर्थ मात्र त्या जाणतत. त्यातल्या एकीनं रचलेल्या या चारोळ्या, ती थोडी शिकलेली आहे पण शाळा सोडून कितीतरी वर्षे झाली. धुणीभांडी, केरफरशी करत होती मग चहाची टपरी चालवली, आता ब्यूटीपार्लर चालवतेय. अधूनमधून रांगोळ्या, मेंदी काढते, भाजीही विकते, जीवनाचे हे अनंत रंग, माणसांचे विविध नमुने तिने अनुभवलेले आहेत. दारिद्र्याविषयी म्हणते-

एखाद्या गोचिडीप्रमाणे
गरिबी आमच्या जीवनाला चिकटली
सावरायला तेव्हा कुणीच नव्हतं.
आम्हीच आमची आसवं पुसली.

एक वेगळीच 'प्रतिभा' जाणवते. तिनं काही इतर साहित्य वाचलेलं नाही, पण स्वतःला वाचतात.

मरणं खूप सोपं असतं
पण जगणं अवघड आहे
क्षणोक्षणी मरण याला
जीवन असे नाव आहे.
आणखी एक चारोळी-
आयुष्यभर रडत राहिले की
मला मरण का येत नाही
पण मरण जेव्हा समोर आलं
तेव्हा म्हणाले थांब आत्ताच नाही.

त्यांना खुलवायला हवं, बोलतं करायला हवं, समजावून घ्यायला हवं ! आपल्याला सृजनशीलतेच्या प्रत्यय येतो, आदिमानवाकडे असलेली सृजनशीलता, गुहेत स्फुरलेली, जन्ममृत्यूच्या सीमेवर रचलेली ज्वलंत अनुभव व्यक्त करणारी, जीवनाची दाहकता जाणवून देणारी खरीखुरी अभिव्यक्ती. या बहिणाबाईंच्या लेकी आहेत, गरीब, कष्ट करणाऱ्या, दुःखांनी भरलेल्या मनाने वावरून त्यांच्याप्रमाणेच आपलं दुख हंड्याझुंबरांप्रमाणे टांगणाऱ्या आणि आपलं दुःख मनाच्या तळघरात कोंडणाऱ्या ! त्यांना ऐकणं, जाणून घेणं हा एक साक्षात्कारी अनुभव आहे, ते एक वेगळंच अध्यात्म आहे, मुर्दाड मनाला संवेदनशील करणारं आहे! फक्त त्यातला आनंद अंतरात्म्याला समजायला हवा ! तो समजला की आपण त्यांचे होऊन जातो सगळेच्या सगळे.

अशीच एक चारोळी एका ब्रेन ट्यूमरने ग्रस्त गरीब मुलीची.

देव देण्यासाठी
दैव घेण्यासाठी
मग हा देण्याघेण्याचा खेळ कोणासाठी ?

आयुष्याच्या धकाधकीत शापित मध्ययुगीन आयुष्य जगताना अनुभवांचे लेख, प्रसंगांच्या कथा होतात, भावनांच्या कविता आणि जीवनाच्या कादंबऱ्या होतात. या कादंबरीच्या नायिका शोधत आहेत. लेखकांना आणि त्याहीपेक्षा सहृदय श्रोते आणि वाचकांना, तुम्ही त्यातलेच एक असू शकता !

❖❖❖

सौ. अनघा ठोंबरे
१/१३, सहजानंद सोसायटी, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
दूरध्वनी : २५३८२६३३

(पान क्र. १८ वरून पुढे चालू...)

संदर्भ-टीपा :

१. भृगुवार, सुरेश : 'गोविंदाग्रजशैली : स्वरूप व समीक्षा' पृ. २०८-९.
२. भृगुवार, सुरेश : 'मर्ढेकरांची काव्यशैली', नवभारत, नोव्हेंबर-डिसेंबर २००९ (मर्ढेकर विशेषांक)
३. बोल्टन, एम्. 'ॲनॉटॉमी ऑफ प्रोज', पृ. ५
४. रीड, हर्बर्ट : 'द इंग्लिश प्रोज स्टाइल', पृ. २०-२१
५. रीड, हर्बर्ट : तत्रैव, पृ. १७.
६. बोल्टन एम्. (उनि. क्र. ३) पृ. १५४.
७. मर्ढेकर, बा. सी. : 'सौंदर्य आणि साहित्य' पृ. १०५
८. बोल्टन एम्. : (उनि. क्र. ३) पृ. १५५
९.चॅटवर्न, पहा- भृगुसार, सुरेश : गोविंदाग्रज शैली : स्वरूप व समीक्षा, पृ. १८२-८३.

❖❖❖

डॉ. सुरेश भृगुवार
५०४, पेरीग्रीन, रहेजा वुड्स, कल्याणीनगर, पुणे - ४११ ००६.
दूरभाष : (०२०).३२५२८६५२ भ्रमणभाष : ९९२३०८०७५८

एका सत्यवादी डॉक्टरचं आत्मकथन– 'मना सर्जना' – डॉ. अनिल गांधी

- नंदा सुर्वे

मान्यवरांची- समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींची आत्मचरित्रं वाचकांसमोर येत असतात. तसंच उपेक्षिताचं जीणं जगणारांची- पारंपारिक जाच सहन करत स्वतःला उभं करणारांची आत्मचरित्रंही येतात. त्याचबरोबर विशिष्ट व्यावसायिकांची, उद्योजकांचीही आत्मचरित्रं येत असतात. सर्व प्रकारची आत्मचरित्रं कुतुहलानं वाचली जातात. कारण प्रत्येकाची जगण्याची समीकरणं खूप भिन्न भिन्न असतात. समोर येणारी आव्हानं वेगवेगळी असतात. कुणाला तापलेल्या, उकळत्या प्रश्नांना सामोरं जावं लागतं. जगणं नाकारण्याची भेदकताही काहींच्या मनःपटलावर उमटत असते. व्यावसायिकांची, उद्योजकांची आत्मचरित्रं समाजाला दिशा देण्याचं काम करत असतात. नैतिक मूल्यांची शिकवणही त्यातून अनेकदा मिळत असते.



अनेकदा वाकड्या वाटेवर जाण्याचं आव्हान समोर असतानाही आपली वैद्यकीय शिक्षणातली, वैद्यकीय व्यवसायाची नीतीमत्ता जागी ठेवून एक यशस्वी डॉक्टर, एक यशस्वी सर्जन म्हणून जनमानसावर आपली नाममुद्रा उमटवणाऱ्या डॉ. अनिल गांधी यांचे 'मना सर्जना' हे आत्मकथनात्मक पुस्तक खूपच प्रेरणादायी आहे. 'मना सर्जना' या शीर्षकाबरोबरच 'मना सज्जना' हे जोड शीर्षक घेतलं असतं तर डॉ. अनिल गांधींमधला सत्त्वशील धागा शीर्षकापासूनच ठळकपणे समोर आला असता. त्या धाग्याची वीण अधिक घट्ट झाली असती. असो. असो.

'मना सर्जना' हे वस्तुतः व्यावसायिक आत्मकथन आहे. यापूर्वी डॉ. अरूण लिमये यांचं 'क्लोरोफॉर्म' नावाचं वैद्यकीय व्यवसायावरचं आत्मकथन खूप चर्चेत आलं होतं. त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातली अनिष्टता खूप भेदकतेनं, परखडपणे मांडली होती. दोन्ही पुस्तकांमध्ये हेतूसाधर्म्य असलं तरी डॉ. अनिल गांधी यांच्या लिखाणात संमतपणाचं दर्शन घडतं. वैद्यकीय व्यवसायातली नीतीमूल्यं काही प्रमाणात हरवत जात असल्याचं दिसतं. पण ती ओलांडून नैतिक मार्गावरून जाण्याचं आपलं ब्रीद कधी सैल पडू देऊ नये असं 'मना सर्जना' हे पुस्तक सांगतं. व्यवसाय माणसाला सघन करतो. पण त्यात शुद्धता, सचोटी यांचा अंतर्भाव असेल तर तो त्या माणसाच्या अंतर्मूल्यांना सुखावतो.

डॉ. अनिल गांधी यांनी आपले सुरूवातीचे हलाखीचे दिवस, खडतर प्रवासातले चटके याविषयी खूप मोकळेपणानं लिहिलं आहे. 'हरपलेलं बालपण... करपलेलं मन' हे एका प्रकरणातलं उपशीर्षक भेदकतेची साक्ष देतं. वैद्यकीय शिक्षणासाठी माढ्याहून पुण्यात आल्यावरही अनेक दुर्धर प्रसंगांना त्यांना सामोरं जावं लागलं. बोर्डिंगमध्ये रहात असताना अंघोळीसाठी गरम पाणी घेणं परवडत नसे. पण तिथल्या पाणी देणाऱ्या मावशी अधून मधून गरम पाणी दयेपोटी द्यायच्या. पुढे वैद्यकीय क्षेत्रात स्थिरावल्यावर त्या मावशींना जेवायला बोलवून त्यांना साडी-चोळी नेसवल्यावर थोडंतरी उतराई झाल्याचं समाधान डॉक्टरांना मिळालं. उपकृततेची भावना त्यांच्या मनात खोलवर रूजत असे. एके ठिकाणी ते लिहितात, 'माझी फी भरणारे घारपुरे सर, बसायला पाट देणारा कमल राठी, समोरचं ताट देणारे रानडे सर. या सगळ्यांनी मला निःशब्द केलं होतं.' अशी काही माणसं, असे काही माणुसकी संपन्न प्रसंग त्यांच्या

तळकप्प्यात घर करून राहिले आहेत.

या पुस्तकातील अनेक प्रसंगांमधून डॉ. गांधी यांच्यातल्या संवेदनशीलतेचा प्रत्यय येतो. एकदा एका सहा वर्षाचा पन्नास टक्के भाजलेला मुलगा त्यांच्याकडे पेशन्ट म्हणून आला. डॉक्टरांनी त्याला वाचवण्यासाठी अक्षरशः शर्थीचे प्रयत्न केले. पण त्यात अपयश आलं. डॉक्टर खूप खचून गेले त्या मुलाच्या पालकांइतकेच ते हळहळले. तेव्हा त्या मुलाचे वडीलच डॉक्टरांच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, "डॉक्टर, तुम्ही केलेले प्रयत्न आम्ही पाहिले आहेत. पण ईश्वरी इच्छेपुढे आपण पामर काय करणार ?" डॉक्टर यावर खूप सुन्न झाले.

त्यांच्याकडे येणाऱ्या पेशन्टच्या कथा-व्यथा सांगणारे अनेक दाखले या पुस्तकात दिले आहेत. त्या प्रत्येक प्रसंगांमध्ये त्यांच्यातला डॉक्टर आणि माणूस संलग्नपणे काम करताना दिसतात. कारण ते जितके व्यवसायतज्ज्ञ आहेत, व्यवसायनिष्ठ आहेत, तितकेच ते माणुसकीसंपन्न आहेत, माणुसकीनिष्ठ आहेत. व्यवसाय आणि माणुसकी या दोन्हीला धर्म मानणारे आहेत.

मूल्याधिष्ठित जीवन जगत असतानाही काही वेळा मन दुभंगून टाकणारे प्रसंग डॉक्टरांच्या समोर आले. एका टॅक्स कन्सल्टंट मित्रानं यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वापर आपल्या स्वार्थासाठी करून घेतल्याचं लक्षात आल्यावर त्यांचं मन विदीर्ण झालं होतं. खोटेपणा, फसवेपणा, दांभिकपणा हे प्रकार त्यांना अधर्म वाटत आले.

डॉ. अनिल गांधींनी सामाजिक बांधिलकीचं भानही खूप सढळपणे जपलं. त्यांनी स्थापन केलेल्या 'आदिशक्ती ट्रस्ट' या संस्थेचं काम जबाबदारीनं पार पाडलं जात आहे. या ट्रस्टच्या माध्यमातून आदिवासी भागात काही आश्रमशाळा काढण्यात आल्या. जेणेकरून मुलांना शिक्षणाचं महत्त्व कळावं, त्यांनी शिक्षणाकडे प्रवृत्त व्हावं हा हेतू त्यामागे होता.

डॉ. गांधी यानी मूल्यवादी, तत्त्ववादी भूमिकेतून आपलं जीवन व्यवसायाला, समाजाला समर्पित केलं आहे, याचं साक्षात्कारी चित्र 'मना सर्जना' मध्ये उमटलं आहे. म्हणूनच या पुस्तकाला असामान्य उंची प्राप्त होते. प्रकाशनानंतर केवळ एका महिन्यातच दुसरी आवृत्ती काढण्याचं भाग्य याला लाभतं. शिवाय हे पुस्तक हिंदी, गुजराती आणि इंग्रजीमध्ये भाषांतरित होण्याच्या वळणावर जातं, हे उल्लेखनीय.

अतिशय शुद्ध, निर्मळ भावनेतून उतरलेलं, मनाच्या नितळपणाची साक्ष देणारं, सुसंस्कृततेचा पदर न सुटलेलं हे पुस्तक वाचनीय झालं आहे. वेधक झालं आहे.

❖❖❖

नंदा सुर्वे

एफ/१, अशोका पार्क, २७/३ हिंगणे खुर्द,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०५१. फोन : २४३४९०८८

पुस्तक : 'मना सर्जना', लेखक : डॉ. अनिल गांधी,
प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस

श्रद्धांजली !

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुभाष भेंडे
ज्येष्ठ नाट्यसमीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी
ज्येष्ठ साहित्यसमीक्षक प्रल्हाद वडेर
भारतरत्न-स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी
मराठी चित्रपट-गीतकार आणि कवी जगदीश खेबुडकर
ज्येष्ठ साहित्यिक म. गो. पाठक
ज्येष्ठ विनोदी लेखक वि. आ. बुवा
आणि जगप्रसिद्ध चित्रकार एम्. एफ्. हुसेन


अनुक्रमणिका

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा चिंतनगर्भ वेध–
एणें वरें ज्ञानदेवों– वसु भारद्वाज

- शीला निपुणगे

[ज्ञान–ज्ञाता आणि ज्ञेय ह्यासंबंधी वेगवेगळ्या दृष्टीने चर्चा होत आली आहे. ज्ञानदेवांच्या समग्र वाङ्मयाचे हे चिंतन !
– संपादक]

संत एकनाथांनी 'ज्ञानेश्वरी'ची शुद्ध प्रत तयार केल्यानंतर ज्ञानदेवांच्या समग्र तत्त्वज्ञानाचा ऊहापोह करणारे अनेक ग्रंथ लिहिले गेले. याच परंपरेतील आजच्या काळातील एक वैशिष्ट्यपूर्ण लेखन म्हणजे वसु भारद्वाज लिखित 'ऐणें वरें ज्ञानदेवो...' हे पुस्तक.



'ज्ञानदेव' हा अभ्यासविषय असलेल्या लेखकाने ज्ञानदेवांचे चरित्र, नाथपरंपरा, ज्ञानेशांचे मूळ तत्त्वज्ञान यांसह ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि हरिपाठ या ग्रंथांमधील ज्ञानदेवांच्या तात्त्विक विचारप्रणालीचा वेगळ्या, स्वतंत्र दृष्टिकोनातून आढावा घेतला आहे. संतांच्या तत्त्वविचारांचा कित्येकदा चुकीचा अर्थ लावला जातो असे सांगून लेखक म्हणतात की, संतांच्या तत्त्वज्ञानाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्या त्या संतांचे समग्र तत्त्वज्ञान अभ्यासले पाहिजे. याच दृष्टीने ज्ञानदेवांच्या प्रमुख ग्रंथांमधील तत्त्वविवेचनासह लेखकाने त्या त्या ग्रंथातील सारभूत भाग समोर आणला आहे.

आदिनाथ शंकरापासून सुरू झालेली नाथपरंपरा ज्ञाननाथांपर्यंत येऊन पोहोचली. ज्ञानदेव हे मराठवाड्यातील होते हे भारद्वाज शिलालेखांच्या आधारे सिद्ध करतात. 'ज्ञानेश्वर' हे नाव पातंजल योगसूत्राशी निगडित असल्याचे द. रा. बेंद्रे यांचे मत, ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानावर वसुगुप्ताचार्यांच्या 'शिवसूत्रां'चा असलेला प्रभाव, वीरशैव संप्रदायाशी त्यांचा असलेला परिचय तसेच ज्ञानदेवांचा 'अमृतानुभव' आणि मायिदेव यांचे 'अनुभवसूत्र' यांतील तात्त्विक विचारांमधील साधर्म्य अशा अनेक बाबी लेखकाने संशोधनातून येथे मांडल्या आहेत.

'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या दोन मूल ग्रंथांमधील तत्त्वज्ञानाची मीमांसा लेखकाने विस्तृतपणे आणि सूक्ष्मतेने केली आहे.

'भाष्यकारांतें वाट पुसतु' अशा विनम्र भूमिकेतून ज्ञानदेवांनी भगवद्गीतेचे 'देशीकार लेणें' करून 'इथे मऱ्हाटिचिये नगरीं ब्रह्मविद्येचा सुकाळु' केला. हिंदुस्थानातून वैदिक धर्म 'समूळं च विनश्यति ।' अशी स्थिती निर्माण झाली, त्या काळातील ज्ञानदेवांच्या या असामान्य कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना लेखक लो. टिळकांच्या मताचाही संदर्भ देतात.

ज्ञानेश्वरीतील कर्म, उपासना, ज्ञान अशा वेदसंमत विषयांचा ऊहापोह करताना लेखक वेद-उपनिषदांचा आधार घेत यज्ञसंस्था, संन्यास, चातुर्वर्ण्यव्यवस्था, कर्मसिद्धान्त उपासना, ज्ञान यासंबंधी नेटके विवेचन करीत जातात.

'ज्ञानेश्वरीत, गीतेच्या अठरा अध्यायांपैकी पहिल्या चोहोंत 'कर्म', दुसऱ्या सातात 'उपासना' आणि पुढील अध्यायातून 'ज्ञान' प्रतिपाद्य आहे' या लोकमान्यांच्या विधानाचा परामर्श घेताना- वेदांमधील कर्म, उपासना, ज्ञान हे विषय सर्वसामान्यांना हितावह होतील अशाच दृष्टिकोनातून ज्ञानेश्वरांनी मांडल्याचे लेखक सांगतात.

पहिल्या चार अध्यायात ज्ञानेशांनी केलेली 'कर्ममीमांसा' गीतार्थाला अनुसरूनच आहे. कर्म, अकर्म, कर्माची आवश्यकता का व कशी अशा सर्व प्रश्नांचा ऊहापोह ज्ञानदेव ज्ञानेश्वरीत करतात. या

संदर्भात- 'स्वधर्म हाच नित्ययज्ञ' असे ते म्हणतात-

'स्वधर्मु जो बापा । तो नित्ययज्ञ जाण पां ।
म्हणौनि वर्तता तेथ पापा । संचारू नाहीं ॥'

प्राप्त कर्तव्ये उत्तमरीत्या पार पाडणे म्हणजेच स्वधर्मचरण. हाच अखंड यज्ञ आणि हीच खरी देवपूजा. यापुढील पायरी म्हणजे 'निष्काम कर्मयोग'. ज्ञानदेव म्हणतात-

'कर्माधारें तरि राहाटिजे । परि कर्मफल न भोगिजे ।
जैसा मांत्रसु न बाधिजे । भूतबाधा ॥'

ईश्वरार्पण बुद्धीने कर्म केल्यास कैवल्यप्राप्ती दूर नाही,' असेही ते म्हणतात-

'एर योगिये कर्माधारे । विहितें चि निजाचारें ।
पूर्णता अवसरे । पावते होति ॥'

ज्ञानदेवांचा कर्मयोग हा अशा तऱ्हेने कर्मत्यागाचा नव्हे तर स्वधर्माचरणाचा संदेश देणारा आहे.

ज्ञानेश्वरीतील उपासनामार्गाचे विश्लेषणही लेखक वेदांचा दाखला देऊनच करतात. ज्ञानदेवांची उपासनाविषयक मीमांसा वेदसंमत आहे आणि मुख्य म्हणजे ती आकलनसुलभ आहे. वारकरी संप्रदाय ज्ञानदेवोत्तर कालात वेगाने वाढला याचे कारण सगुण-निर्गुणाचा ज्ञानदेवांनी घातलेला मेळ. 'शांभवाद्वय' तत्त्वज्ञान आणि नामदेवांच्या सहवासातील श्रेष्ठ भक्तिभावना यांच्या योगे ज्ञानदेवांनी अद्वैत भावनेचा प्रसार जनसामान्यांपर्यंत केला. ज्ञानदेव स्वतः श्रेष्ठ भक्तही होते आणि महान योगीही ! कीर्तनभक्ती आणि योगसाधना या दोहोंच्या मिलाफातून त्यांनी 'एकरसें आनंदाचें आवारू' जगासाठी मांडले. कर्माप्रमाणे भक्तीसुद्धा ईश्वरार्पण बुद्धीनेच करावी. कर्मकाण्डात रमणारी भक्ती जे करतात; ते भगवंतापर्यंत पोहोचू शकत नाहीत-

'परि ते भक्त मातें नेणति । जे कल्पनेबाहिरे न निगति ।'

अशा भक्तांना मिळणारे फळ हे नाशिवंत असते.

उपासनामार्गासंबंधी दीर्घ विवेचन करून लेखकाने बाराव्या अध्यायातील भक्तियोगाने त्याचा समारोप केला आहे-

'हें विश्वचि माझें घर' ही प्रतीती अनुभवणारा भक्तच श्रेष्ठ पदी पोहोचतो, हेच उपासना मार्गाचे साररूप आहे.

वेद-उपनिषदे, भगवद्गीता आणि ज्ञानेश्वरी या सर्वांचा सखोल अभ्यास, प्रगाढ व्यासंग यातून लेखक ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचे विविध पदर साक्षेपाने उलगडत नेताना दिसतात. भक्तिमार्गाबरोबरच निर्गुणाचे अधिष्ठान असणारी ज्ञानदेवांची 'ज्ञानमीमांसा' लेखकाने समरसून मांडली आहे. वेदांमध्येही 'ज्ञानविज्ञान काण्ड' आहेच असे सांगताना-

'चराचरसृष्टीचे साधकबाधक ज्ञान प्राप्त करून आत्मज्ञान मिळविणे हाच ज्ञानविज्ञानकाण्डाचा मूळ हेतू' असल्याचे लेखक प्रतिपादन करतात.

गीतेतील ज्ञानयोग हा सांख्यनिष्ठ आहे. असे सांगून गीतेतील सांख्यदर्शन आणि कपिलोक्त सांख्यदर्शन यांच्या विषयीचे विस्तृत विवेचन लेखक सुरुवातीस करतात. 'सर्वांभूतीं परमेश्वर' पाहणे हेच श्रेष्ठ ज्ञान असे

अनुक्रमणिका

गीता सांगते. हेच तत्त्व अनेक दृष्टान्तांमधून ज्ञानदेव स्पष्ट करकतात.

सर्व जग हे ब्रह्मस्वरूप आहे. 'परब्रह्मतत्त्व' हीच काय ती 'ज्ञेय वस्तू' आहेत. ते जाणण्यासाठी गुरुकृपा हवी. एकदा ते जाणले की, ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय असा कुठलाच भेद शिल्लक राहत नाही. आणि भेदरहिततेतून अलौकिक आनंदाची प्राप्ती होते. तेरा ते अठरा या अध्यायांमधील प्रकृती, पुरुष, क्षेत्र, क्षेत्रज्ञ, त्रिगुण, अष्टधा प्रकृती, शब्दस्पर्शादी विषय या सर्वांबाबतचे विवेचन-विश्लेषण लेखक बारकाव्याने आणि साक्षित्वाने करताना दिसतात.

ज्ञानदेवांचा दुसरा मूलग्रंथ म्हणजे 'अमृतानुभव', या ग्रंथातील दहा प्रकरणांमधील ८०७ ओव्यांमधून ज्ञानदेवांनी अवघे अनुभवविश्वच उभे केले आहे. याचा मागोवा घेणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे आहे असे लेखक वसु भारद्वाज मानतात, ते खरेच आहे. याच मनोभूमिकेतून अनुभवामृतातील ज्ञानअज्ञान भेदकथन, शब्दखण्डन, अज्ञानखण्डन, ज्ञानखण्डन, जीवन्मुक्तदशाकथन आदी दहा विभागांमधून शेवटी ज्ञानदेवांचे साररूप तत्त्वज्ञान ते वाचकांपर्यंत पोहोचवितात.

ज्ञानेश्वरांचे मूल तत्त्वज्ञान म्हणजे 'शैवमत'. या शैवागमाचा उगम भारतातच काश्मिरात झाला असून ते आगभोक्त वेदसंमत दर्शन आहे. याच्या एकंदर ७७ शिवसूत्रांपैकी पाच सूत्रे ज्ञानेशांनी प्रमाण मानली, असे सांगून लेखक 'शिवशक्ति समावेशन' या प्रकरणापासून सुरुवात करतात.

'शिव-शक्ति' म्हणजेच 'पुरुष' आणि 'प्रकृति' अर्थात ब्रह्म आणि माया. शिवशक्तीच्या ऐक्यातून जग निर्माण झाले याचे निरूपण ज्ञानदेव अनेकविध समर्पक दृष्टान्तांमधून करीत जातात.

'हा ठाववरी वियोग भेडें । जें बाळ जगायेव्हटें ।
वियालीं परी न मोडे । दोघुलेंपण ॥'

हे दोघेही वियोगाला इतके भितात, की जगाएवढे बाळ निर्माण केले तरी आपसातील प्रेम आटू देत नाहीत

इतकेच नव्हे तर- एकमेकांव्यतिरिक्त इतर जगाची ते दखलही घेत नाहीत. ही शिवशक्ति एकरूपता कशी आहे ?

'दो दांडी एक श्रुति । दोहों फुलीं एकी हति ।
दोहों दिवीं दीपिक्त । येकीचि जेवीं ॥
दो ओठीं येकी गोठी । दो डोळां येकी दिठी ।
तेवी दोघीं जिहीं सृष्टी । येकीचि जेवी ॥'

याशिवायही- गोडी आणि गूळ, कापूर आणि सुगंध, सूर्य आणि प्रकाश, बिंब आणि प्रतिबिंब अशी अनेक उचित उदाहरणे देत ज्ञानदेव प्रकृति-पुरुषामधील अभिन्नता ठळकपणे अधोरेखित करतात.

सांख्य तत्त्वज्ञानाच्या मते पुरुष हा प्रकृतीपासून भिन्न आहे. याची त्याला जाण असणे म्हणजे 'कैवल्य;' पण ज्ञानदेवांच्या मते हा केवळ 'द्वैतविलास' आहे. ईश्वराच्या ठिकाणी प्रकृति-पुरुष हा भेद जाणवत असला तरी तो नाममात्रच आहे. मूलतः फक्त परमात्मा (शिवच) असून तो सर्वव्यापी आहे.

अमृतानुभवात 'गुरूस्तवन' करताना गुरुशिष्याचे यथार्थ नाते कसे असते याचा ठाव ज्ञानदेव घेतात-

'राति नुरेचि सूर्या । नातरी लवण पाणिया ।
नुरेचि जेवीं चेइलिया । नीद जैसी ॥
कापुराचे थळीव । नुरेचि आगीची बरवं ।
नुरेंचि रूप नांव । तैसें यया ॥'

सूर्यापुढे रात्र उरत नाही. पाण्यात मीठ वेगळे राहू शकत नाही. जागे झाल्यावर झोप उरत नाही. कापराचे अलंकार अग्नीमध्ये वेगळे उरत नाहीत, त्याप्रमाणे सतशिष्य सद्गुरूजवळ गेला की शिष्याचेही नामरूप राहत नाही. 'सद्गुरू त्याला 'आपणासारिखे करिती तात्काळ' असा गुरुमहिमाा ज्ञानदेव वर्णन करतात- यासाठी- सुपर्ण-लेणें, चंद्र-चांदणें, असे इतरही दाखले ते देतात.

यानंतर वाचाऋणपरिहार, ज्ञानअज्ञानभेदकथन, श्रुतिप्रतिपादित परमतत्त्वाचे विश्लेषण या सर्वांचा परामर्श घेत लेखक शब्दखण्डनाकडे वळतात.

प्रथमतः शब्दांचे सामर्थ्य वर्णन करून ज्ञानदेवांनी म्हटले आहे की- अमूर्त अशा 'ब्रह्मवस्तू'चे वणंन करण्यास मात्र हे शब्द असमर्थ आहेत.-

'किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु ।
परी ययाही संबंधु । नाहीं येथें ॥'

अनुक्रमणिका

स्वयंप्रकाशी, स्वसंवेद्य असे आत्मरूप व्यक्त करण्यासाठी शब्दांची गरजच नाही- हे 'शब्दखण्डन.'

अज्ञानाला सिद्ध करणारे ज्ञान नसेल, तर अज्ञान उभेच राहू शकत नाही- हे 'अज्ञानखण्डन' आणि शुद्ध ज्ञानाला शब्दात प्रकट करताच येत नाही हे 'ज्ञानखण्डन' होय. आत्मत्व, कैवल्य, स्वसंवेद्यता ही स्थिती भाषेच्या, शब्दांच्या, दृष्टीच्या पलीकडची. त्या स्थितीचे वर्णन-

'किंबहुना श्रीनिवृत्ति । ठेविलों असों जिया स्थिति ।
ते काय देऊं हातीं । वाचेचिया ॥'

अशा हृद्यतेने ज्ञानेश्वर करतात.

अमृतानुभवाच्या उपसंहारात- सांख्यदर्शन, पातंजल योगदर्शन तसेच शिवसूत्रांचा आधार घेत लेखकाने या गहन विषयाचे सम्यक् विवेचन केले आहे. शेवटी जीवनमुक्त पुरुष हा सुखदुःखातीत होऊन शिवस्वरूप बनलेला असतो. 'जीव-शिवाचे हे ऐक्य हाच अमृतानुभवाचा हेतू' असा सारांश ते देतात.

याच पुस्तकात 'चांगदेव पासष्टी' आणि 'हरिपाठ' या ज्ञानदेवांच्या प्रासंगिक ग्रंथांचा नेमका आढावा लेखकाने घेतला आहे. आत्मा-परमात्मा ऐक्य हाच ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा. तोच बोध ज्ञानदेवांनी वटेश्वर चांगदेवांना केला. 'तत्त्वमसि' अर्थात 'ते' (ब्रह्म) म्हणजे 'तू'च आहेस याचे ज्ञान झाले की भेद सरतो. उरते ते 'अद्वैत'. जगताचे कारण असूनही परमात्मा 'निर्लिप्त' आहे. ज्ञानस्वरूप परमात्मतत्त्वच 'द्रष्टा' आणि 'दृश्य' या रूपांनी प्रतीतीला येते. सोन्यात काहीच बदल न होता अलंकार बनतात. पाण्यात तरंग उठले तरी भेद निर्माण होत नाही. ढेप केल्याने गुळाची गोडी बदलत नाही. घडी घातल्याने वस्त्राचे रूप बदलत नाही. तसे स्वरूप वेगळे असले तरी जगातील 'परमात्मतत्त्व' तेच असते. सुताच्या गुंडीवर जसे आत-बाहेर सर्वत्र सूतच असते, तशी परमात्मरूपावर दृश्य, द्रष्टा, दर्शन ही त्रिपुटी असते- जी मिथ्या ठरते. वाद्यापूर्वी ध्वनी आणि अग्नीपूर्वीही लाकूड हे सामान्यरूपाने असतेच. अशा कितीएक अर्थपूर्ण दृष्टान्तांमधून ज्ञानदेवांनी वटेश्वर चांगदेवांना 'परमतत्त्व' उलगडून सांगितले. 'आपला दोघांचाही आत्मा एकच आहे' तो ज्ञानस्वरूप कसा- तर-

'अंधाराचें ठायीं । सूर्यप्रकाश तंव नाहीं ।
परी मी आहे हें कांहीं । नवचेनि जेवीं ॥'

सूर्यप्रकाशच नाही अशा अंधारात बसलो, तरीही 'मी आहे' हे भान असतेच. ते आत्मप्रकाशामुळे । त्याचप्रमाणे तुझ्यातील 'तू' पण व माझ्यातील 'मी'पण यांचा लोप होतो तेव्हा उरते ते 'आत्मतत्त्व' असते. हे 'आत्मतत्त्व' म्हणजे 'दोघांमधील एकत्मभाव'. डाव्या हाताने उजव्या हाताला मिठी द्यावी तशी ही भेट ! येथेही ज्ञानदेव स्वतःकडे गुरूपद घेत नाहीत. जीवब्रह्मात्मैक्याचे हे निरूपण निवृत्तिनाथांनीच माझ्याकडून करविले.

'चांगदेवा तुझेनि त्याजें । माउलिया निवृत्तिराजे ।
स्वानुभव रसाळ खाजें । दिधलें लोभें ॥'

असाच त्यांचा लीन भाव आहे. 'विश्वात्मक चैतन्य म्हणजे मीच' ही अनुभूती ज्ञानदेवांकडून चांगदेवांना मिळाली आाणि ते खऱ्या अर्थाने 'ज्ञानी' झाले.

ज्ञानदेवांचा चौथा ग्रंथ म्हणजे वारकरी मंडळींचा नित्यनैमित्तिक असा 'हरिपाठ'. याचा उल्लेख भारद्वाज 'एक दैनंदिन नामोपासना' असा करतात. हरिपाठास 'सर्वेश्वरवाद' आहे. नामयज्ञ आहे. नामाचे, मानसपूजेचे, ध्यानाचे महत्त्व आहे. 'एकतत्त्व नाम दृढ धरी मना' हा ज्ञानदेवांनी दिलेला मंत्र उद्धारक आहे, या सर्वांचा थोडक्यात वेध लेखक घेतात.

पुस्तकात शेवटी 'श्रीज्ञानदेव पंचीकरण : एक दुर्लक्षित प्रकरण' यामध्ये पंचीकरणाबाबतचा संभ्रम तसेच पंचीकरणाचा हेतू आणि त्यातील सारभूत भाग लेखक सांगून जातात.

ज्ञानदेवांविषयीच्या अपार श्रद्धेतून लिहिलेल्या या ग्रंथातील लेखकांचा व्यासंग, मुद्देसूद मांडणी, निःसंदिग्ध विवेचनशैली आणि ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाच्या मुळाशी पोहोचण्याची आस व ध्यास यांमुळे जिज्ञासू तसेच अभ्यासक यांच्यासाठी उत्तम संदर्भमूल्य असलेले असे हे लेखन आहे यात शंका नाही.

❖❖❖

शीला निपुणगे
२ कस्तुरी सोसायटी, ३७१ ब शनिवार पेठ,
पुणे ४११०३०. भ्रमणभाष : ९८९०३५४३६२

'एणें वरें ज्ञानदेवो...' लेखक- वसु भारद्वाज,
प्रतिमा प्रकाशन, पुणे. २०१०,
किंमत रु. २००/-

आस्तिक्यभावनेची करुणाशील कविता : 'अनासक्त' – मुकुंदराव कुलकर्णी

- डॉ. सुहास पुजारी

'अक्षरस्वप्ने' (१९९३) यानंतर जवळपास दीड तपाचा कालावधी मागे पडल्यानंतर 'अनासक्त' हा काव्यगुच्छ घेऊन मुकुंदराज कुलकर्णी रसिकांच्या समोर येत आहेत.



मुकुंदराज हे सत्त्वशील वृत्तीचे कवी आहेत. जीवनातील चांगुलपणावर, शुभंकरतेवर त्यांची श्रद्धा आहे. मनुष्यप्रेम उत्तरोत्तर उन्नत व्हावे, सर्वसामान्यांच्या डोळ्यांत आनंदाचे मोर नाचावेत, अवघे जग आनंदमय व्हावे. ही त्यांची कांक्षा आहे. संस्कारक्षम वयात ते देवळांच्या प्रदेशात व देवमाणसांच्या सहवासात वाढले आहेत. पारिजातक, मोगऱ्याचे सान्निध्य त्यांच्या मनाला कोवळीक देणारे ठरले आहे. त्यामुळे मुकुंदराज यांची कविता सत्त्वशीलतेचा आग्रह धरणारी आहे. सत्त्वाचा 'उदयोस्तु' करू पाहणारी आहे. 'अनासक्त' या शीर्षकातूनही हीच जाणीव प्रतिबिंबित झाली आहे.

कधी रागावून, करिसी ताडन
परी तुझे मन, माउलीचे ।
ताडनही तुझे, आशीर्वाद होय
बहकले पाय, सावरती ।

अशी ही कवीची श्रद्धा आहे. ईश्वरीशक्तीची आणि त्यांच्या सर्वव्यापकतेची प्रतीती या श्रद्धेतून व्यक्त होते.

तूच जोजवतोस श्रांत जीवांना शयनाच्या विश्रामगृहात.

तूच जागवतोस आपुलकीच्या आणि सौहार्दाच्या ज्योती मनामनात.

तुझ्या कृपाछत्राखाली अवघं जग सुखरूप,
चराचरात, अणूरेणूत फक्त तुझंच शुभंकर रूप.
तुझ्या इच्छेशिवाय झाडाचं पानही हलत नाही,
असा संतांचा डंका आहे.

असे त्या सर्वात्मकाचे गुणगान कवी करतो ते या आस्तिक्यभावनेतूनच.

'अशा तुझ्या संपूर्ण नियंत्रण असलेल्या कॉम्प्युटराईज्ड जगात दुष्टांचं आणि दुःखांचं व्हायरल इन्फेक्शन झालंच कसं?' एकढीच एक शंका आहे.

अर्थात् ही शंका भक्तहृदयातून व्यक्त झाली नसून ती एका सत्त्वशील, करुणाशील कवीच्या व्यथेतून व्यक्त झाली आहे. ईशचिंतन आणि अज्ञेयचिंतनातही मुकुंदराजांची कविता रमते. चराचरांवर ईश्वरी सत्ता चालते; पण त्या ईश्वरी सत्तेचे गूढ काही उकलत नाही. हे गूढ समजून घ्यायचे असेल तर संतांचा आधार घ्यावा लागतो. संतकृपेच्या दीपकामुळे मनातला अंधार हटतो आणि ईश्वरी प्रकाशतत्त्वाची जाणीव होते, अशी ग्वाही कवीने दिली आहे.

तार्किकांचे थवे थकले, शास्त्रज्ञांनी हात टेकले
अज्ञाताचे गूढ कोडे कोणीच नाही स्पर्शू शकले ।
फक्त संतांशींच थोडे, कोडे काही बोलत असते
बोलता बोलता महात्म्यांची, ब्रह्मानंदी टाळी लागते ।
अज्ञाताच्या प्रवासाला संत हातात देतात दिवा
त्यानेच थोडा उजेड होतो, अज्ञाताची हलते हवा ।

ईश्वरविषयक ओढ, श्रद्धा आणि अज्ञाताचा शोध ही 'अनासक्त' मधील कवितांची एक मूळ प्रेरणा आहे. सत्त्वशीलतेकडे कवीचा जात्याच ओढा असल्याने ईशतत्त्वाचे व संतत्त्वाचे त्याला अनिवार आकर्षण आहे.

मुकुंदराज यांच्या कवितेत 'देव' आहे आणि 'देवमाणूस' ही आहे. ही कविता केवळ देवचिंतनात रमणारी नाही तर ती मानवतेचे गाणे गाणारी आहे.

अनुक्रमणिका

आपण करतो घासाघीस
राबणाऱ्या हातांबरोबर
लाचार श्वासांबरोबर
विस्कटलेल्या घरट्यातील
अनाथ पाखरांबरोबर
पांढऱ्या कपाळाच्या
जगण्याच्या धडपडीबरोबर
एखादा रुपया जास्त दिला तर
ज्यांच्या चेहऱ्यावर उतरते कृतज्ञ पौर्णिमा,
आणि डोळ्यात नाचतात आनंदाचे मोर.
त्यांच्याशीच होतो आपण नको तितके कठोर
मात्र महागड्या वस्तूंच्या मग्रूर ए.सी. जगात
पंचतारांकित दडपण बसते आपल्या छाताडावर.

ही 'स्टेटस् सिंबॉल' या शीर्षकाची कविता याच माणूसपणाला अधोरेखित करते. आपल्यातील हरवलेल्या माणसाला खोलवर हाक देते. 'प्रार्थना' या कवितेतील अंध जोडप्याच्या कुटुंबाला पाहून वाटणारी करुणाही अशीच अंतर्मुख करणारी आहे. देवळांच्या प्रदेशात वाढलेल्या या कविमनाला देवळाभवतालचे भीषण वास्तव अस्वस्थ करते. दुःख, दैन्य, विकलांगता त्याला घायाळ करते. हातात ॲल्युमिनियमचा फुटका तांब्या घेऊन खुरडणाऱ्या जख्ख म्हातारीला पाहून तो असाच विद्ध होतो.

तिला पाहून आजूबाजूच्या गर्दीच्या सुखी चेहऱ्यावर
उठत नाही सहानुभूतीचा एखादाही तरंग
हे पाहून मी आणखी विषण्ण.
आता म्हातारी माझ्या खांद्यावर, माझ्या
संवेदनांवर स्वार-सिंदबादच्या कथेसारखी.
थोड्याच वेळात एखादं नाणं तिच्या तांब्यात टाकून
मीही अदृश्य होतो त्या गर्दीत
आणि यथावकाश कवितेच्या माध्यमातून
भिरकावून देतो म्हातारीला तिच्या वेदनांसह
वांझोट्या श्रोत्यांवर
...तेव्हा ईश्वर विषण्ण.

ईश्वर कशाने विषण्ण होतो, हे ज्याला समजते त्याची कविता करुणाघन आणि अनासक्त होते. मुकुंदराज कुलकर्णी यांची कविता ही त्याचे उदाहरण होय.

मुकुंदराज यांची कविता ही आस्तिक्यभावनेने गंधित झालेली असली तरी सामाजिक जाणिवेचे तिला वावडे नाही. सामाजिक, आर्थिक विषमतेवर ती नेमकेपणाने बोट ठेवते. समाजातील दांभिकतेचे कुरूप आणि तितकेच वास्तव चित्र ती रेखाटते. असे चित्र रेखाटताना त्यांची कविता सहानुभुतीच्या शब्दांत भिजते. दांभिकतेवर उपहासगर्भ शैलीत प्रहार करते. दाहक वास्तव ती मांडते.

आकाश रंगवूनी, वाटून घेतलेले
आपुलाच रंग मोठा, गर्दी भांडते आहे ।
निवडुंग आज बसले, जाऊनिया महाली
जपती फुले तयांना, गर्दी नाडते आहे ।

भ्रष्टाचार, अत्याचार, उजळ माथ्याने मिरवणारे गुन्हेगार हे सर्व भयाण वास्तव पाहून कवी व्यथित होतो. आणि जगत्नियंत्याच्या व्यवस्थेपासून ते विद्यमान न्यायव्यवस्थेला तो दोषी धरतो.

न्यायालयावर विश्वासणारे आपणच वेडे
आस्तिक भावनेवर उमटतात रक्तलांच्छित ओरखडे
कर्मसिद्धान्तावर आधारलेली तुझी न्यायव्यवस्था,
राहिली अशीच दिरंगाईची, भारतीय न्यायव्यवस्थेसारखी

अलीकडे समाजातील प्रत्येक जीव स्वकेंद्री बनत चालला आहे. सुखी, सुरक्षित जीवनाचे कवच आपणाला लाभले की जगाच्या कोणत्याही चिंतेची त्याला गरज राहिली नाही. त्यामुळे कळवळ्याच्या जाती आता दिसत नाहीत. संवादोत्सुकता आढळत नाही. अंतरीचे निर्मळ झरे आटले जाताहेत, हे भावनिक ओसाडपण सर्वत्र माजताना दिसत आहे. ही सल मुकुंदराज कुलकर्णी यांच्या कवितेतून पुनःपुन्हा व्यक्त झाली आहे. 'अलीकडे' ही या संग्रहातील आरंभीची कविता किंवा 'कुंपणे', 'पाया हलतो घराचा', 'कर्तव्यपूर्ती', 'तीर्थयात्रा...?', 'संपले संवाद', 'एकाकी', 'समुद्र' या कविता हा हरवलेला संवादाचा चिरका स्वर शब्दांत पकडतात. घराचे सामूहिक गाणे होण्याऐवजी सप्तरंगी तुरूंग होत आहे. हे दुखरे वास्तव कवीने अतिशय प्रभावी शैलीत नोंदवले आहे.

'ओळख' कवितेतील प्रतीकात्मकता, 'मूल्यवान' मधील कृषिवलांच्या जगण्याचे- त्यांच्याच व्यवसायातील प्रतिमांच्या साहाय्याने केलेले चित्रण, 'पोथी', मधील भवदुःखाने गांजलेल्यांची व्यथा, 'भव्य

अनुक्रमणिका

राऊळी दाटतो', 'वणवा', 'मौन' मधील निसर्गावस्थांचे मनाला व्यापून राहणारे कलात्म चित्रण, 'कर्तव्यपूर्ती'मधील बापलेकांच्या नात्यातले ताण-उघाण, 'पाया हलतो घराचा' मधून सप्तरंगी संस्कृतीतून काळोखात पोचत चाललेली पिढी, 'ढग' मधील दोन दृश्यातून उभे राहणारे जीवनाचे विदारक चित्र 'अशा वेळी' मधून मृत्युभयाची मन हेलावणारी चरचरीत जाणीव या सर्वस्पर्शी अनुभवदर्शनाने मुकुंदराज कुलकर्णी यांची कविता मनात गोंदली जाते.

मुकुंदराज कुलकर्णी हे म. रा. विद्युत पारेषण कंपनीत अभियंता आहेत. आपल्या रोजच्या अनुभवाचा-व्यवसायाचा धागाही 'भारनियमन' सारख्या कवितेतून त्यांनी कलात्म पातळीवर जपला आहे.

प्रतिभा ही ईश्वरदत्त असते; ही मुकुंदराज यांची श्रद्धा आहे. नवनिर्मितीमागे ईश्वरीशक्ती उभी असते. त्यामुळे प्रतिभेचे पावित्र्य जपले पाहिजे असे कवीला वाटते. पण प्रतिभा लाभाकरिता लाचार होते, असे ओंगळवाणे चित्र पाहायला मिळते तेव्हा कवीच्या अंतःकरणास वेदना होते. ही वेदनाही 'प्रवास', 'जाणीव', 'कोडे' यासारख्या कवितांमधून ठिबकताना दिसते. कवी, विचारवंत, कलावंत यांच्या दांभिक, केविलवाण्या वृत्तीवर अशी कविता भाष्य करते.

तो विहंग ठेवून जातो
सत्कार हार अन् टाळ्या
तो ठेव मानुनी आपुली
हा मिजास मारी वाळ्या

जिथे अहंकार नाही, लीनता आहे पण दीनता नाही, विकार, विखार नाही, जिथे आहे केवळ स्निग्ध चांदणे, पावसाळी ढगांप्रमाणे बरसणे, मुक्तपणे आपले वहर वाटणे, अनासक्त होऊन जगणे, अशा जीवनापुढे, अशा चरणांपुढे या कवीचा माथा अवनत होतो, विनम्र होतो.

असा कृतज्ञ सोहळा, होती सजल लोचन
आणि तिथेच घडते, सार्थ जन्माचे दर्शन

अशी या कवीची जीवनजाणीव आहे, श्रद्धा आहे. त्यामुळेच मुकुंदराज यांची कविता ऋषीचा स्वभाव घेऊन प्रकटते. आणि आपल्या पाठीवरून फिरत राहतो आकाशातून उतरलेला एक प्रकाशाचा हात... लख्ख !

❖❖❖

डॉ. सुहास पुजारी
संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

'अक्षरपान', ७/८, मंत्री-चंडक इस्टेट,
होटगी रस्ता परिसर, सोलापूर ४१३ ३२२५
भ्रमणध्वनी : ९९६०२७२०३१,
E-mail : suhaspujari18@gmail.com

देणगीदार

क्र.	दिनांक	नाव	रक्कम	
१)	१९-१२-२०१०	श्री. राजन मुठाणे	१,०००/-	योगक्षेमार्थ देणगी
२)	३-१-२०११	विकास सालकोडे	२,०००/-	ग्रंथपाल पुरस्कार
३)	३-१-२०११	महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ	५,००,०००/-	शासकीय अनुदान
४)	४-१-२०११	डी. व्ही. जोशी	५००/-	योगक्षेमार्थ देणगी
५)	६-१-२०११	श्री. चंद्रकांत शेवाळे	२०,०००/-	दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कारासाठी देणगी
६)	७-१-२०११	श्री. चंद्रकांत शेवाळे	२०,०००/-	दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कारासाठी देणगी
७)	१९-१-२०११	श्री. चंद्रकांत शेवाळे	१०,०००/-	दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कारासाठी देणगी
८)	२१-१-२०११	श्री. चंद्रकांत शेवाळे	१०,०००/-	दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कारासाठी देणगी
९)	२१-१-२०११	मीनाक्षी केळकर (कै. जानकीबाई केळकर यांच्या स्मरणार्थ)	५००/-	दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कारासाठी देणगी
१०)	२-२-२०११	श्री. चंद्रकांत शेवाळे	१०,०००/-	दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कारासाठी देणगी
११)	८-२-२०११	महेंद्र मुंजाळ	१,२००/-	योगक्षेमार्थ देणगी
१२)	२७-३-२०११	डॉ. सु. प्र. कुलकर्णी	३००/-	योगक्षेमार्थ देणगी
१३)	३१-३-२०११	संचालक, सहायक ग्रंथालय संचालन	१५,०००/-	ग्रंथालय अनुदान
१४)	६-४-२०११	डॉ. मधुसूदन घाणेकर	१,००१/-	योगक्षेमार्थ देणगी
१५)	११-५-२०११	सुनीता (नंदा) पैठणकर	१०,०००/-	जी. ए. कुलकर्णी स्मृतिदिनासाठी देणगी
१६)	१८-५-२०११	वि. ग. कानिटकर	१०,०००/-	वाङ्मय इतिहास खंड ७ भाग ३ व ४च्या छपाईसाठी

❖❖❖

लोकवाङ्मयदृष्टीने संत वाङ्मयाचा अभ्यास : 'अभंगपौर्णिमा' प्रकल्प

- अंजली पटवर्धन

'अभंगपौर्णिमा' हा डॉ. मच्छिंद्र मालुंजकर यांनी संपादित केलेला आणि पुणे येथील दास्ताने आणि रामचंद्र कंपनी यांनी प्रसिद्ध केलेला संत वाङ्मयावरील ग्रंथ होय. लोकवाङ्मयाच्या दृष्टीने प्रयोगनिष्ठ अभ्यास आणि संहितानिष्ठ अभ्यास एकत्रित मांडणारा हा पहिला ग्रंथ होय. असे ग्रंथाच्या मलपृष्ठावर नमूद केले आहे. ग्रंथप्रकाशन समारंभप्रसंगी संत वाङ्मयाचे अभ्यासक पद्मश्री डॉ. यू. म. पठाण, प्रा. डॉ. सदानंद मोरे आणि पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. महंत महामंडलेश्वर ह.भ.प. लहवितकर महाराज या तिघांनीही मराठीतील प्रयोगनिष्ठ चिकित्सा आणि संहितानिष्ठ चिकित्सा, लोकवाङ्मयाच्या दृष्टिकोनातून एकत्रितपणे मांडणारा, सिद्ध झालेला हा पहिलाच अभिनव ग्रंथ होय, अशी स्पष्ट व जाहीर प्रतिक्रिया व्यक्त केली.



'अभंगपौर्णिमा' हा प्रकल्प राबविण्यात आला. त्या प्रकल्पावरील हा प्रयोगनिष्ठ व संहितानिष्ठ चिकीत्सेचा संपादित ग्रंथ होय. लोकवाङ्मयाचा अभ्यास प्रयोगनिष्ठ वाङ्मयकला या दृष्टीने करणे श्रेयस्कर असते. ही लोकबंधात्मक चिकित्सादृष्टी स्वीकारून संतवाङ्मय हे लोकवाङ्मय स्वरूपात अनुभवास येते हे लक्षात घेऊन प्रयोगनिष्ठ अभ्यासाचे स्वरूप ठरविण्यात आले. संतवाङ्मय हे प्रवचन, कीर्तन, दिंडी, वारी सोहळा, भजन, भारूड या स्वरूपात संगीत साथीसह प्रयोगसिद्धतेने प्रकटते हे लक्षात घेऊन, संत ज्ञानेश्वर ते संत तुकडोजी येथवरच्या संतांच्या रचनांचे प्रवचन/निरूपण या स्वरूपात 'अभंगपौर्णिमा' या प्रकल्पांतर्गत गुरूकुल भागवत आश्रमाचे संस्थापक ह.भ.प. अशोकानंद महाराज कर्डिले यांनी विविध ठिकाणी सादर केले. प्रत्येकवेळी भिन्न श्रोतृवृंदाच्या समोर हा प्रयोग झाल्याने प्रवक्ता आणि श्रोतृवृंत यांच्या एकत्रित समूहमनाच्या आविष्काररूपात निरूपण घडले. या निरूपणप्रसंगी स्वतः संपादक आणि दोन निरीक्षक सहकारीही उपस्थित होते. हे प्रयोग करताना संहितानिष्ठ समीक्षा करण्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे. प्रवचन/निरूपणाचे ध्वनीमुद्रण केले, निरीक्षक आणि समीक्षक यांच्या निरीक्षणाआधारे चर्चा होई. या प्रत्येक चर्चेच्यावेळी लोकवाङ्मयदृष्ट्या कसा अभ्यास करता येईल ? याची चर्चा होत असे. प्रयोगापाठोपाठ संहितानिष्ठ समीक्षा डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिहीत आणि प्रसिद्ध करीत. त्यावरील वाचकांच्या प्रतिक्रियाही नोंदून घेत असत. या प्रकल्पामध्ये संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत जनाबाई, संत एकनाथ, संत संतामाई, संत निळोबा, संत समर्थ रामदास, संत तुकडोजी, संत गुलाबराव महाराज आणि संत तुकाराम असे बारा भाग; प्रत्येक संताचा स्वतंत्र विचार करणारे आहेत. तर संत चोखोबा, चोखोबांची पत्नी संत सोयरा, संत निर्मळा, संत कर्ममेळा, संत बंका, संत कान्होपात्रा असा संतमेळा तसेच संत गोरा कुंभार, संत सेना, संत नरहरी, संत सावता हा संतमेळा आणि संत कबीर व शेख महंमद या संतद्वयांचा एक भाग असे मिळून प्रवचनासाठी पंधरा भाग करण्यात आले होते. या पंधरा भागावरील निरूपणाच्या ध्वनीमुद्रणाचे शक्यतो जसेच्या तसे लिखित रूप (ट्रान्सक्रिप्शन) करण्यात आले.

हा प्रकल्प करण्यामागचे आणखी एक उद्दिष्ट म्हणजे संतवाङ्मय हे लोकवाङ्मय अर्थात् अक्षरवाङ्मय आहे आणि मराठी भाषेची संपूर्ण जडणघडण, समृद्धी व

अनुक्रमणिका

विकास करण्याचे श्रेय संतवाङ्मयाकडे जाते. या दृष्टीने वाङ्मयाच्या अभ्यासाला अधिक महत्त्व देऊन शिक्षण प्रक्रियेतील मराठीच्या अभ्यासक्रमात सर्व स्तरांवर क्रमवद्धतेने अधिक अवकाश देऊन समावेश व्हावा. यासाठी अभ्यासक्रमाची अशी विभागणी कोणत्या स्वरूपात असावी याचे सूचन संपादकमहोदयांनी संपादकीयात केले आहे. मात्र या ग्रंथात लोकवाङ्मय दृष्टीने पुन्हा प्रयोगाची व संहितेची चर्चा करण्याचे लोकसाहित्य दृष्टीने साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांवर जबाबदारी टाकली आहे. या तऱ्हेने अभ्यास घडल्यास संतवाङ्मयाचा यथार्थ अभ्यास घडेल, असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. या ग्रंथात पंधरा भागात मिळून एकशेपंचवीस रचनांचा विचार केला आहे.

'अभंगपौर्णिमा', संपादक : डॉ. मच्छिंद्र मालुंजकर,
प्रकाशक : दास्ताने आणि रामचंद्र कंपनी पुणे,
पृष्ठे ४२४, किंमत ४००/-

संतवाङ्मय आणि लोकसाहित्य यांच्या अनुवंधाविषयी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी वारंवार चर्चा केली आहे.

संतवाङ्मयाच्या अभ्यासाला लोकवाङ्मयाचे आयाम देणाऱ्या या ग्रंथात प्रवचन/निरूपणाच्या स्वरूपात संतांच्या रचना श्रोतृसंवादात कशा प्रकट होतात, याचे रंजक रूप अनुभवता येते. तसेच संहितानिष्ठ रूपही आकलित होते. याद्दष्टीने एकत्रित चर्चा करणारा हा मराठीतील वेगळ्या प्रकारचा ग्रंथ आहे, हे म्हणणे संयुक्तिक वाटते. अपेक्षित संतवाङ्मयाच्या अभ्यासक्रमासाठीच्या चळवळीने या प्रयोगाने अभ्यासास चालना मिळेल, हे निश्चित.

❖❖❖

अंजली पटवर्धन
४५, पद्मदर्श सोसायटी, सातारा रोड, पुणे ४३.
दूरभाष : ९७६७८३९१५४

(पान क्र. ४४ वरून पुढे चालू...)

लोळागोळा होतो. त्याच्या मायचा हुंदका पदरातच पिसाळतो. लेकरांचा धावा गावात मावत नही आणि बायकोचा टाहो ऊर बडवीत येतो. बहिणीच्या गावातला आकांतही दारी येतो. वेडीपिशी माय विठोबाला म्हणतसे, कोण्या वैऱ्याला पावशी ? मायमाऊलीच्या मनातल्या प्रश्नाचं उत्तर मात्र काळ्या विठ्ठलाजवळ नसतं. नामदेव शेतकऱ्याचे जीवन म्हणजे लाख मुंग्यांचे पाय खुडून टाकलेल्यावाणी असते. वेदनेचा महापूर त्याच्या जीवनाला व्यापून असतो. तरी नामदेव शेतकरी जीवनाला हरत नाही. जीवनातल्या दुःखांवर धावा बोलून तो जगण्याची उमेद बाळगणारा अस्सल वारकरी-शेतकरी असल्याची ग्वाही कवीने दिली आहे. कवीनं आशेचं रोपटं शेतकऱ्यांच्या जीवनमातीत लावलं आहे. निदान ते तरी उगवलं पाहिजे, असं वाटतं.

आत्महत्येवर उपाय शोधताना कवी म्हणतो, जीव दिल्याने प्रश्न सुटत नसतात. हा लाल बावटी संदेशही संतांनी दळून ठेवलाय आमच्यासाठी. संतांच्या अभंगाइतकीच आमची समर्पणशीलताही अभंग... नामदेव शेतकऱ्याची लढाई एकतर्फीच आहे. त्याचा कुणी वाली नाही. तो वेदनांचाच वंशज आहे. त्याला मुक्तीचा मार्ग मात्र केवळ वारकरी संतांच्या ओवी-अभंग आणि विठोबा-रखुमाईच्या गजरातच मिळतो. नामदेव हा सावळा विठ्ठल बनून चंद्रभागेच्या कोरड्या पात्रात वारकरी होऊन उतरतो आणि निळ्या आकाशाखाली पिंपळपानाशी नातं सांगत, कबीराच्या कुशीत शिरतो. थेट गाथेतल्या गणगोतासारखा आपला नामदेव शेतकरी, दुःख आणि वेदनांशी झुंजत, जगण्याचे वारकरी पर्याय शोधत, जगाच्या पालनपोषणाची खांद्यावर आलेली जबाबदारी पार पाडत, काळ्या मातीशी एकरूप होतो... शेतकरी आणि त्याचं जगण्याचं वारकरी पाणी जोखून, शेतकऱ्यांच्या जीवन चित्रणाचे शोकात्म परंतु वारकरी आशादायी चित्रण जगदीश कदम यांनी आपल्या तिन्ही कवितासंग्रहातून केल्यामुळे; त्यांच्या कवितांनी महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे जगणे देशीय शैलीने कवितेच्या पातळीवर नेले आहे...

१. रास आणि गोंडर, निर्मल प्रकाशन, नांदेड, १९९८.
२. झाड आणि माती, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००३.
३. नामदेव शेतकरी, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००६.

❖❖❖

डॉ. किशोर सानप
कमला नेहरू शाळेजवळ, रामनगर, वर्धा - ४४२ ००१
दूरध्वनी : ०७१५२-२४१७५९ मो. : ९३२६८८०५२३

नवे आजीव सभासद

१) म्हातारमारे सुकृत संजय, पुणे
२) जोगळेकर मंदार मोरेश्वर, पुणे
३) बिदरकोटे विश्वनाथ परस्पा, सोलापूर
४) अधोरे वैशाली अनिल, सोलापूर
५) शिंदे प्रणिती सुशीलकुमार, सोलापूर
६) चौधरी शैलेंद्र विश्वासराव, सोलापूर
७) काळे अरुंधती माधव, घोडेगाव
८) काळे माधव नारायण, घोडेगाव
९) नितनवरे अनिल सेवकराम, भंडारा
१०) मुनघाटे प्रमोद गोविंदराव, नागपूर
११) अम्बाडे वसंत बाळकृष्ण, पुणे
१२) हिंगोणकर शशिकांत भाऊराव, जळगाव
१३) साळुंखे हेमंतकुमार अमृतराव, जळगाव
१४) गुंजाळ अनिल दशरथ, पुणे
१५) बोरकर श्रीराम कृष्णाजी, ठाणे
१६) बापट गिरीश हरि, ठाणे
१७) नाईक अमरनाथ रघुनाथ, पट्टण
१८) पुरंदरे चंद्रकांत शिवराम, इचलकरंजी
१९) यादव वसंतराव आकाराम, पुणे
२०) तुपे केशव परवतरा, औरंगाबाद
२१) दांडेकर वि. ज., वारजे माळवाडी
२२) पाठक प्र. ल., वारजे माळवाडी
२३) कर्दळे वसुधा, वारजे माळवाडी
२४) झांबरे गिरीश निळकंठ, वारजे माळवाडी
२५) ताम्हणकर मंजिरी, वारजे माळवाडी
२६) करंदीकर गिरीश जी., वारजे माळवाडी
२७) नेने जयंत, वारजे माळवाडी
२८) परब प्रदीप भास्कर, वारजे माळवाडी
२९) गायधनी वैभव मुकुंद, वारजे माळवाडी
३०) पंडीत व्ही. व्ही., वारजे माळवाडी
३१) निळेकर मनिषा अनिल, वारजे माळवाडी
३२) पाठक प्रतिभा प्रकाश, वारजे माळवाडी
३३) भिडे विजय, वारजे माळवाडी
३४) कुलकर्णी श्रीकर जनार्दन, वारजे माळवाडी
३५) आचार्य नारायण रघुनाथ, वारजे माळवाडी
३६) राव मीना, वारजे माळवाडी
३७) कुलकर्णी वैशाली, वारजे माळवाडी
३८) जुनेजा वर्षा, वारजे माळवाडी
३९) गरगेट संजय, वारजे माळवाडी
४०) पंडीत अविनाश, वारजे माळवाडी
४१) पाटणकर देवदत्त, वारजे माळवाडी
४२) पाटणकर जया, वारजे माळवाडी
४३) आठवले रोहिणी, वारजे माळवाडी
४४) सावरगावकर किरण, वारजे माळवाडी
४५) नारळकर विवेक, वारजे माळवाडी
४६) घारपुरे ज्योती, वारजे माळवाडी
४७) मुळे प्रविण दत्तात्रय, वारजे माळवाडी
४८) धर्मशा शशिकांत माधव, वारजे माळवाडी
४९) बनसोड माधुरी, वारजे माळवाडी
५०) देशमुख अनुरेखा, वारजे माळवाडी
५१) सातारकर नंदिनी मधुकर, वारजे माळवाडी
५२) फणसळकर श्रीराम विनायक, -"-
५३) सोनवणे सावळेराम पांडुरंग, वारजे माळवाडी
५४) पुरोहित नंदकुमार आर., वारजे माळवाडी
५५) तवळे मधुकर नरहर, वारजे माळवाडी
५६) धुमाळ प्रदिप रामचंद्र, वारजे माळवाडी
५७) खोले शामराव दत्तात्रय, वारजे माळवाडी
५८) गोखले अरुण प्रकाश, वारजे माळवाडी
५९) अराणके गजानन गोपाळ, वारजे माळवाडी
६०) पांडकर भालचंद्र विष्णू, वारजे माळवाडी
६१) कुलकर्णी गोपाळ माधव, वारजे माळवाडी
६२) मर्ढेकर वसंत पुरुषोत्तम, वारजे माळवाडी
६३) काणेगावकर धनश्री सुधीर, वारजे माळवाडी
६४) जोशी दिगंबर कालिदास, वारजे माळवाडी
६५) धर्माधिकारी चंद्रशेखर दत्तात्रय, -"-
६६) अद्वैत वृंदा दिवाण, वारजे माळवाडी
६७) शहा अशोक राजाराम, वारजे माळवाडी
६८) वैद्य माधवी दिलीप, वारजे माळवाडी
६९) वैद्य दिलीप, वारजे माळवाडी
७०) पाटील रजनी विश्राम, जळगांव
७१) मैराळे ललित अभिमान, जळगाव
७२) शिंदे दिलीप अधिकराव, सांगली
७३) पत्की हेमकिरण दत्तात्रय, सोलापूर
७४) लोणी धारेप्पा यमनप्पा, सोलापूर
७५) माझरे प्रसन्न महेश, सोलापूर
७६) कुलकर्णी गोविंद गोपाळ, सोलापूर
७७) निरगुडे सुरेंद्र ए., पुणे
७८) गोखले भाऊ, वारजे माळवाडी
७९) फडणीस रंजना उदय, वारजे माळवाडी
८०) देसाई विद्या, वारजे माळवाडी
८१) कर्वे अनुराधा, वारजे माळवाडी
८२) निर्मळे सुभाषचंद्र, वारजे माळवाडी
८३) पेंडसे सुभाष, वारजे माळवाडी
८४) बोरकर विद्याधर, वारजे माळवाडी
८५) व्यास अलका, वारजे माळवाडी
८६) पानगव्हाणे हर्षल वसंतराव, लासलगांव
८७) पानगव्हाणे सविता हर्षल, लासलगांव
८८) आहेर यशवंत भाऊसाहेब, विंचुरा
८९) टंकसाळे महेश रामचंद्र, श्रीरामपूर
९०) बिग्ली प्रसन्ना अनंतराव, श्रीरामपूर
९१) कोकाटे रमेश दत्तात्रय, डोंबिवली
९२) बेलसरे चंद्रशेखर प्रमोदकुमार, पुणे
९३) डॉ.प्रा. शिवाजीराव श्रीपतराव कदम, पुणे
९४) देशमुख उद्धव मधुकर, जामखेड
९५) देशमुख जयश्री उद्धव, जामखेड
९६) देशमुख निखिल उद्धव, जामखेड
९७) चिंतामणी अरुण मुरलीधर, जामखेड
९८) ॲड. सानप प्रवीण विठ्ठल, जामखेड
९९) देशमुख गजानन लक्ष्मण, जामखेड
१००) देशमुख माधुरी गजानन, जामखेड
१०१) देशमुख प्रसाद गजानन, जामखेड
१०२) देशमुख शुभांगी प्रसाद, जामखेड
१०३) देशमुख मोरेश्वर प्रभाकर, जामखेड
१०४) कुलकर्णी दिनकर भालचंद्र, जामखेड
१०५) मोरे राजेश सुरेश, जामखेड
१०६) गुगळे रमेश हरकचंद, जामखेड
१०७) गुगळे दिलीप हरकचंद, जामखेड
१०८) गुगळे संजय हरकचंद, जामखेड
१०९) गुगळे पुष्पा रमेश, जामखेड
११०) डॉ. गायकवाड प्रताप बलभीम, जामखेड
१११) डॉ. गायकवाड प्रतिक प्रताप, जामखेड
११२) कोठारी राजेंद्र सुभाष, जामखेड
११३) पितळे अशोक शांतीलाल, जामखेड
११४) जांभळे गुलाबराव वैजिनाथ, जामखेड
११५) कुलकर्णी यशवंत बाळासाहेब, जामखेड
११६) प्राचार्य देशमुख आर. बी., जामखेड
११७) राळेभात मधुकर शाहुराव, जामखेड
११८) डॉ. खैरनार प्रकाश दशरथ, जामखेड
११९) खैरनार सौ. प्रज्ञा प्रकाश, जामखेड, जामखेड
१२०) ठाकरे दादाहारी अण्णा, जामखेड
१२१) कोळी ईश्वर रघुनाथ, जामखेड
१२२) घुले सुभाष यादवराव, जामखेड
१२३) प्रा. कदम शत्रुघ्न, जामखेड
१२४) चांदेकर रमेश एकनाथ, जामखेड
१२५) डॉ. आरोळे रजनीकांत, जामखेड
१२६) कांबळे रत्ना, जामखेड

संस्कृतीच्या पाऊलखुणा शोधणारा साहित्यिक – डॉ. द. ता. भोसले

- प्रा. मिलिंद जोशी

[ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द. ता. भोसले यांनी नुकतीच वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. त्यांच्या साहित्यिक वाटचालीवर टाकलेला हा दृष्टिक्षेप. – संपादक]

ग्रामीण साहित्याचे लेखक आणि समीक्षक, ग्रामीण साहित्य चळवळीतले विनीचे कार्यकर्ते, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचे अभ्यासक म्हणून डॉ. द. ता. भोसले यांचे नाव सर्वांना परिचित आहे. गेल्या चाळीस वर्षांत भोसलेसरांनी कथा, कादंबरी, ललितलेखन, चरित्र, समीक्षा आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या ग्रंथांची निर्मिती केलेली आहे. भीमा आणि माण नदीच्या संगमावर असलेल्या पंढरपूर तालुक्यातील सरकोली या छोट्याशा गावात एका शेतमजुराच्या घरात भोसले सरांचा जन्म झाला. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हे तीन काळ शालेय अभ्यासक्रमात शिकविले जातात. पण दुष्काळ नावाचा चौथा काळ त्यांच्या गावाची सदैव पाठराखण करीत होता. सरांचे बालपण मोठ्या कष्टात गेले. वयाच्या अकराव्या वर्षी आई-वडिलांचे छत्र हरविल्यानंतर त्यांना शिक्षणासाठी मोठ्या दिव्यातून जावे लागले. मॅट्रीक पास झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी सोलापूरच्या संगमेश्वर महाविद्यालयात प्रवेश घेतला. या काळात डॉ. निर्मलकुमार फडकुलेंचा त्यांना जवळून सहवास लाभला आणि भोसले सरांमधला लेखक जागा झाला. प्राचार्य डॉ. के. भोगिशियन अडचणीच्या काळात सदैव त्यांच्या पाठीशी राहिले. वि. स. खांडेकरांचं साहित्य, व्यंकटेश माडगूळकरांचं साहित्य, साने गुरूजींचं साहित्य, श्री. म. माट्यांचं साहित्य या सगळ्या लेखकांच्या साहित्याचा भोसले सरांच्या जीवनावर, लेखनावर, दृष्टिकोनावर आणि व्यक्तिमत्त्वावर परिणाम झाला. १९६२ मध्ये एम. ए. पूर्ण केल्यानंतर रयत शिक्षणसंस्थेच्या श्रीरामपूर महाविद्यालयात त्यांनी मराठी विषयाच्या अध्यापनाला प्रारंभ केला.



भोसले सरांची प्रकाशित झालेली पहिली कादंबरी 'मी आणि माझा बाप' ही.पण लेखन झालेली पहिली कादंबरी 'इथे फुलांना मरण जन्मता' ही आहे. या दोन्ही कादंबऱ्या पूर्णतः वेगळ्या प्रकृतीच्या आहेत. 'मी आणि माझा बाप' ही मराठीतील पहिली ग्रामीण विनोदी कादंबरी मानली जाते. विलंदर बाप आणि त्याच्या सहवासात तयार झालेला इरसाल मुलगा ग्रामीण माणसाच्या स्वभावातला साधेपणा, भाबडेपणा, कमकुवतपणा हेरून कसं मजेत जगतात; याचं चित्रण या कादंबरीत आहे. ही कादंबरी मेनका दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. कुलकर्णी ग्रंथालयाचे पंडितराव कुलकर्णी यांनी ती वाचली आणि प्रकाशित केली. डॉ. द. ता. भोसले मराठी वाचकांना प्रथम परिचित झाले ते ग्रामीण विनोदी कादंबरीकार म्हणून. धर्म, रूढी आणि परंपरा यांच्या चक्रात अडकलेल्या समाजात कोवळ्या विवाहित मुलींची कशी ससेहोलपट होते याचे विदारक चित्रण त्यांच्या 'इथे फुलांना मरण जन्मता' या कादंबरीत आहे. विनोदी लेखन सहजपणे करताना गंभीर विषय तेवढ्याच ताकदीने हाताळणारे लेखक म्हणून ते वाचकांच्या आणि समीक्षकांच्या पसंतीस उतरले. भूक, दारिद्र्य, अज्ञान, शोषण आणि संकटे या पाच गोष्टींनी ग्रामीण भागातील माणसांचे जीवन व्यापलेले आहे. त्याचे प्रभावी चित्रण अन्न, पाऊस, मनस्विनी, जन्म या आपल्या कथासंग्रहातून भोसलेसरांनी केले. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कोरडवाहू जमीनधारक, अल्पभूधारक या साऱ्यांचे अंतःकरण पिळवटून टाकणारे संघर्षमय जीवन भोसले सरांच्या ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. जीवनाच्या पसाऱ्यातील अनुभवांचे कोंदण घेऊन जन्माला येणाऱ्या लेखात एक प्रकारचा अकृत्रिम जिवंतपणा आढळतो. तोच अनुभव भोसले सरांचे ललित गद्य वाचताना येतो. पार आणि शिवार, आठवणीतला दिवस, बालमुठीतील दिवस या त्यांच्या पुस्तकातून समृद्ध संपन्न आणि चिंतनशील अशा ललितगद्यलेखनाचा प्रत्यय वाचकांना येतो.

अनुक्रमणिका

संस्कृती म्हणजे समाजजीवनाला प्राप्त झालेले अत्यंत उबदार आणि किमती असे महावस्त्र. काठ, पदर, रंग, नक्षीकाम, पोत या सर्वांच्या नजाकतीने त्या महावस्त्राला भव्यत्व, मोहकत्व आणि सुबकत्व प्राप्त झालेले असते. त्यातूनच हे संस्कृतीरूपी महावस्त्र व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांचे संरक्षण करते. मानवी जीवनयात्रेची पद्धती ज्या सामाजिक आचार, विचार, श्रद्धा, वाङ्मय नि कला यामधून अभिव्यक्त होते तिलाच संस्कृती असं मानणाऱ्या भोसलेसरांनी सर्व थोर पूर्वसूरींच्या आणि प्रामाणिक समकालीनांच्या तपाचे भान राखून आपल्या निरभ्र दृष्टीने जे जे अनुभवले ते ते आपल्या लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीविषयक ग्रंथात मांडले. संस्कृतीच्या पाऊलखुणा, चावडीवरचा दिवा. लोकसंस्कृती स्वरूप आणि विशेष, लोकजीवन आणि लोक संस्कृती, ओळख लोकसंस्कृतीची या त्यांच्या ग्रंथांनी साहित्याचे दालन समृद्ध केले. ''मराठी संस्कृती सातासमुद्रापार नेण्यासाठी संस्कृतीच्या पाऊलखुणा हे पुस्तक महत्त्वाचे आहे.'' असा अभिप्राय व्यक्त करणाऱ्या शरद पवारांनी हे पुस्तक इंग्रजीत अनुवादित व्हावे यासाठी पुढाकार घेतला आणि मॅकमिलन प्रकाशनाने ते पुस्तक प्रकाशित केले. परंपरा, तत्त्व आणि समाजशास्त्रीय भूमिका या त्रयीतून लोकसंस्कृतीचे भोसलेसरांनी केलेले चिंतन पुढच्या अनेक पिढ्यांना उपयुक्त ठरणारे आहे. कर्मवीर भाऊराव पाटील आणि संत गाडगेबाबा ही त्यांनी लिहिलेली चरित्रेही खूप गाजली.

अनेकदा सर्जनशील लेखक कार्यकर्ता म्हणून साहित्यिक चळवळीत काम करण्यासाठी फारसे उत्सुक नसतात. साहित्यिक चळवळीतला धडाडीचा कार्यकर्ता म्हणूनही भोसले सरांची वेगळी ओळख आहे. ग्रामीण साहित्य चळवळीच्या प्रारंभापासून सक्रिय असणारी जी मोजकी मंडळी होती. त्यात भोसलेसर अग्रस्थानी होते. आता काही मंडळी मीच त्याचा निर्माता आहे, अशा आविर्भावात वावरत आहेत. ग्रामीण साहित्याच्या चळवळीला तात्त्विक स्वरूपाचं अधिष्ठान देण्यासाठी व्याख्यानांच्या माध्यमातून लोकमानस तयार करण्यासाठी भोसले सरांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. ग्रामीण साहित्याची चळवळ ही दलित साहित्य निर्मितीतून किंवा चळवळीतून निर्माण झालेलं अनुकरण आहे अशी टीका ज्यावेळी होत होती, त्याचा प्रतिवाद करण्याच्या निमित्ताने काही लेख आणि बरीचशी व्याख्याने सरांनी दिली. अनेक ग्रामीण साहित्यिकांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून आणि त्यांच्या साहित्याची समीक्षा करून भोसले सरांनी त्यांची पाठराखण केली. ग्रामीण भागातील अनेक लेखकांना नावारूपाला आणण्यासाठी त्यांनी कष्ट घेतले. महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास आणि ग्रामीण बोलींचा शब्दकोश तयार व्हावा यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखा पंढरपूरला स्थापन करण्यापासून ती शाखा नावारूपाला आणण्यासाठीचे सर्व प्रयत्न भोसले सरांनी केले. कार्यक्रमासाठी वक्ता ठरविण्यापासून त्यांच्या निवास-भोजनाची व्यवस्था आपल्या घरी करण्यापर्यंत सगळी कामे ते बिनबोभाट पार पाडत असतात. 'साहित्यिक कार्यकर्ता' म्हणून त्यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुक करण्यासाठी मसाप पुणे ने २००६ साली त्यांना भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार प्राचार्य शिवाजीराव भोसलेंच्या हस्ते प्रदान केला. वयाच्या ७५व्या वर्षीही त्यांचा व्याख्यानांच्या निमित्ताने महाराष्ट्रात आणि बृहन्महाराष्ट्रात संचार सुरू असतो. नव्या लेखकांना शोधणे, त्यांना संधी आणि प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे, मित्रत्वाच्या नात्याने त्यांच्याशी स्नेह जोडणे हा त्यांचा आवडता कार्यक्रम. पंढरपुरात वास्तव्याला असलेला हा लेखक वारकऱ्यांइतकाच महाराष्ट्राच्या लोकजीवनाशी एकरूप झालेला आहे. कोवळ्या वयात परिस्थितीचे चटके अनुभवलेला हा लेखक नेहमी प्रसन्न आणि हसरा असतो. ज्या परिसरात लेखकाचे कष्टप्रद बालपण गेले त्या गावाविषयी, तिथल्या माणसांविषयी एकही तुच्छतेचा उद्गार त्यांच्या बोलण्यात आणि लेखनात आढळत नाही. उलट इथल्या अनुभवांनी मला जीवनाचे सर्वांगसुंदर दर्शन घडवून उपकृत केले. खडकावरती बीजारोपण करण्याचे नैतिक बळ दिले; अशीच कृतज्ञतेची भावना त्यांच्या मनात आहे. सरांच्या या वाटचालीत त्यांच्या पत्नी स्वाती भोसले यांची त्यांना मोलाची साथ लाभली आहे. इथली माती, माणसे आणि संस्कृती यांच्यावर भरभरून प्रेम करणाऱ्या भोसले सरांना पांडुरंगाने दीर्घायुरारोग्य द्यावे, हीच प्रार्थना !

❖❖❖

प्रा. मिलिंद जोशी, पुणे
joshi.milind23@gmail.com

अनुक्रमणिका

निवडक नवे...

परिषदेकडे आलेल्या ग्रंथांपैकी
विशेष उल्लेखनीय ग्रंथांचा
परिचय करून देणारे सदर




भूमीचे मार्दव : कवी इंद्रजित भालेराव

कवि इंद्रजित भालेराव यांचा हा १० वा काव्यसंग्रह. कृषिजीवनाचे अनेक विभ्रम दर्शविणारी ही कविता कवीच्या कृषीजीवनाशी एकरूप झालेल्या मनाचेही नकळत दर्शन घडविते. पहिल्या १४ कविता केळीच्या बागेचे अंतरंग उघडून दाखवितात. लोणीतल्या सुंदर शिल्पाला केळीचा गाभा दाखविता येत नाही. केळीवाईचा गरतीचा थाट, ऊनवाऱ्यातही फुलून येणारे केळीचे बन आणि त्यातील शृंगार मनोज्ञ आहे. त्यानंतरच्या कवितांमध्ये गवतच्या कवितांनी मन वेधून घेते. गवताचे अनेक आविष्कार आणि त्यानुसार त्यांची नावे- रानलहू, पानलहू, ल्व्हाळी, कुसळी, तृण-तण (धान्यातलं तण-बांध्यावरचं गवत), अनपेक्षित ठिकाणी उगवणारे तणकट, नजर निरोगी करणारे हिरवेगार समुद्रलाटांसारखे क्षितिजपार लहरणारे गवत, तुर्रेदार गवत, पृथ्वीचे वस्त्र-गवत, अख्ख्या सृष्टीचक्राला गजबजविणारे गवत, दंवबिंदूंची तृणपाती, टाळकरी गवत- बेचीतून बेची निघत राहून एक 'बद' तयार करणारे 'बेची' गवत, धान्यात उगवणारं आवधान गवत, उसातलं काऊस, ज्वारीत कानी, साळीत भरड, विषारी काँग्रेस गवत ते गाजर गवत. स्मशानातलं हराळी-गवत त्याची बहीण शिपू, ओढ्याकाठचं लोणा गवत, पाणथळीच्या अस्ताव्यस्त गवताला 'पंधाड' म्हणतात. नदीकाठी त्याचे पूर्वज-वंशज दिसतात. सर्वांना पुरून उरणारे 'देवेगौड' गवत. गवताविना पायवाट, काठावरील गवताविना नदी, गवताविना पृथ्वी ही कल्पनासुद्धा भयानक आहे. सृजनाचे प्रतीक गवत- मानवी भावभावनांशीही एकरूप झाले आहे. म्हणूनच म्हाइंभटासारखा पंडित गवताचे तोडे हातात-पायात घालीत असे. वसंत आबाजी डहाकेंची बोलकी प्रस्तावना या संग्रहास लाभली आहे.


(भूमीचे मार्दव (कवितासंग्रह) इंद्रजित भालेराव, मनोविकास प्रकाशन, पुणे. जानेवारी २०११, किंमत रु. १२०/-)

काव्यमुद्रा : संपादक-आशुतोष पाटील



१९८५ ते २०१० ह्या पंचवीस वर्षांच्या कालखंडात 'कविता-रति'च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या १११ निवडक कवितांचे परिशीलन ह्या संग्रहात केले आहे. कुसुमाग्रज, इंदिरा, ना. घ. देशपांडे, संजीवनी, वा. रा. कान्त, शांता शेळके, शिरीष पै, शंकर वैद्य, फ. मु. शिंदे, यशवंत मनोहर, ना. धों. महानोर, अरूणा ढेरे इ. प्रतिथयश कवींबरोबर प्रियदर्शन पोतदार, इंद्रजित भालेराव, प्रकाश होळकर, प्रतिभा महाजन, संतोष शेणई, सिसियि कार्व्हालो, निरंजन उजगरे, रेखा ठाकूर, अंगली कुलकर्णी, मल्लिका अमर शेख, रमण रणदिवे, उर्मिला चाकूरकर, इ. नव्या दमाच्या कवींचाही समावेश आहे. काव्याशय आणि काव्याभिव्यक्तीच्या संवादी-विसंवादी प्रवाहाचे दर्शन अभ्यासकांसाठी उपयुक्त आहे. आशुतोष पाटील यांची ५४ पृष्ठांची सविस्तर प्रस्तावना या दृष्टीने वाचनीय आहे.

(काव्यमुद्रा-संपादक-आशुतोष पाटील, प्रकाशक-संपादक 'कविता-रती' रु. १६०/- वितरक - सुजय प्रकाशन, धुळे, डिसेंबर २०१०)



संसार आणि सेन्सॉर : श्रीमती अपर्णा मोहिले

अपर्णा मोहिले यांचे आपल्या जीवनातील प्रदीर्घ व्यासंग आणि बहुविध अनुभवांच्या बळावर लिहिलेले 'संसार आणि सेन्सॉर' हे पुस्तक वाचनीय व मननीय आहे. आयएएस्, फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या सदस्य आणि अध्यक्ष (१९७८ ते १९८३), इंग्रजीच्या प्राध्यापिका, मेंबर ऑफ पोस्टल सर्व्हिसेस आणि महाराष्ट्र-गोवा राज्याच्या चीफ पोस्ट-मास्तर, इ. जबाबदार पदावरून त्यांनी काम केले. 'सेन्सॉर' ही मनोवृत्तीही आहे. श्रेय आणि प्रेयाच्या द्वंद्वात प्रेयाला 'सेन्सॉर' लावून श्रेयस्कर मार्गावर राहणे, मनाचे अनुशासन करणे असा व्यापक अर्थ घेऊन त्यांनी आपले लेखन केले आहे. त्यांच्या ह्या ललितलेखांना आत्मचिंतनाची हृद्य किनार आहे. शालेय जीवनात स्नेहसंमेलन वा अन्य प्रसंगी सादर करण्यासाठी त्यांनी लिहिलेला एकांकिका संग्रह 'त्रिदल' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. ही दोन्हीही पुस्तके पुष्पक प्रकाशन, पुणे ने प्रसिद्ध केली आहेत. (संसार आणि सेन्सॉर- अपर्णा मोहिले, पुष्पक प्रकाशन, पुणे ३०, मूल्य रु. १००/-)

इरावती कर्वे आणि विंदा करंदीकर :



संपादक डॉ. पुष्पा राजापुरे-तापस यांनी डॉ. इरावती कर्वे यांच्या मानवशास्त्र आणि समाजशास्त्रविषयक संशोधन-निबंध तर विंदा करंदीकरांच्या काव्यमय सामाजिक-वैचारिक दृष्टीतून निर्माण झालेली कविता यांच्यावरील अभ्यासकांच्या लेखांचे संपादन करून हा ग्रंथ सिद्ध केला आहे. श्री. मिलिंद बोकील, डॉ. निशिकांत मिरजकर, प्रा. वसंत आबाजी डहाळे, प्रा. विजय तापस, डॉ. उमा वैद्य इत्यादी विचारवंतांचे लेख ग्रंथित केले आहेत. इरावती कर्वे यांच्या जन्मशताब्दी आणि 'विंदा' ना मिळालेला ज्ञानपीठ पुरस्कार; या निमित्ताने मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाने आणि पुण्याच्या स्नेहवर्धन प्रकाशनाने केलेल्या उपक्रमाचे हे ग्रंथरूप अभ्यासकांसाठी उपयुक्त आहे.

(इरावती कर्वे आणि विंदा करंदीकर, संपादक : पुष्पलता राजापुरे-तापस, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २०१०, किंमत रु. २००/-)

❖❖❖

संपादक, म. सा. पत्रिका

नवे आजीव सभासद

१२७) कल्याणकर यादवराव विश्वनाथ, जामखेड
१२८) ब्रह्मे उमाकांत रामचंद्र, जामखेड
१२९) ब्रह्मे मंदार उमाकांत, जामखेड
१३०) ब्रह्मे श्रीपाद अरविंद, जामखेड
१३१) देशमुख शशिकांत अंबादास, जामखेड
१३२) प्रा. कुंभार ज्ञानदेव तुकाराम, जामखेड
१३३) प्रा. गाडेकर संजय नरहरी, जामखेड
१३४) प्रा. देशमुख विजयकुमार दामोदर, जामखेड
१३५) हळपावत पोपटलाल बन्सीलाल, जामखेड
१३६) हळपावत संजय पोपटलाल, जामखेड
१३७) कुलकर्णी रविंद्र दत्तात्रय, जामखेड
१३८) नजन बाबुलाल शंकरराव, जामखेड
१३९) वराट सुदाम कानिफनाथ, जामखेड
१४०) कुलकर्णी उमेश दत्तात्रय, जामखेड
१४१) खेत्रे अनंता विष्णू, जामखेड
१४२) पारखे शांताराम नारायण, जामखेड
१४३) पुजारी विजयकुमार चंद्रकांत, जामखेड
१४४) शेख सादिक अमीर, जामखेड
१४५) होशिंग श्रीकांत बाळकृष्ण, जामखेड
१४६) होशिंग साधना श्रीकांत, जामखेड
१४७) देशमुख उमेश व्यंकटेश, जामखेड
१४८) देशमुख उन्नती उमेश, जामखेड
१४९) आडसूळ रमेश मारूती, जामखेड
१५०) पारखे बाळासाहेब आप्पा, जामखेड
१५१) गायकवाड प्रवीण तात्याबा, जामखेड
१५२) वायकर शहाजी नारायण, जामखेड
१५३) देडे अनिल कुंडलिक, जामखेड
१५४) पोले विशाल लक्ष्मणराव, जामखेड
१५५) ढाळे नरेंद्र सुधाकर, जामखेड
१५६) सुपेकर भागवत नारायण, जामखेड
१५७) कुलकर्णी सुभाष पुरषोत्तम, जामखेड
१५८) चिंतामणी अमित अरुण, जामखेड
१५९) होशिंग सदानंद बाळकृष्ण, जामखेड

❖ ❖ ❖

अनुक्रमणिका

कार्यवृत्त (१ डिसेंबर २०१० ते ३१ मे २०११)

प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह
(शब्दांकन - दीपक करंदीकर, कार्यवाह, म.सा.प., पुणे.)

४ डिसेंबर २०१० : प्रकाशक/प्रसारक दयार्णव कोपर्डेकर जन्मशताब्दीनिमित्ताने म. सा. परिषद आणि कोपर्डेकर कुटुंबियांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी ग्रंथ प्रकाशन व विक्री व्यवसाय : काल, आज आणि उद्या' या विषयावर चर्चासत्र आयोजिले होते. रामदास भटकळ अध्यक्षस्थानी होते. पां.ना. कुमठा, विद्याधर गोखले, अनिल मेहता, शरद गोगटे, बाबा भांड, सु. वा. जोशी, मनोहर जोशी, प्रभाकर साठे यांनी वक्ते म्हणून चर्चासत्रात भाग घेतला.

८ डिसेंबर २०१० : कॉफी क्लब : कवी योगेश जोशी यांच्याशी संवादाचा कार्यक्रम झाला. अनंत भावे, योगेश जोशी, धनश्री जोशी हे व्यासपीठावर होते. कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक केले. 'दूरस्थ दीप' या जोशी यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन दूरदर्शनवृत्त निवेदक अनंत भावे यांच्या हस्ते झाले.

१५ डिसेंबर २०१० : योगिनी जोगळेकर स्मृतिदिनानिमित्त कविसंमेलन : प्रदीप निफाडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनचे सूत्रसंचालन अमृता खाकुर्डीकर यांनी केले. व्यासपीठावर प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य व परीक्षाविभाग प्रमुख डॉ. सौ. स्नेहसुधा कुलकर्णी व सुनेत्रा ओक हे उपस्थित होते. या संमेलनात शरद उमराणी, मंजिरी जोग, वृंदा दिवाण, ज्योत्स्ना चांदगुडे, मीनल बाठे, संदीप काळे, अंजली महागावकर, आश्लेषा महाजन, शीलवती निपुणगे, मन्मथ बेलूरे, दीपक करंदीकर, प्राजक्ता जोगळेकर, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी या कवींनी आपापल्या दोन काव्यरचना सादर केल्या. डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. माधवी वैद्य यांनी आपले विचार प्रकट केले. काव्यरसिकांची भरघोस उपस्थिती लाभली. सुधन्वा जोगळेकर यांचेही स्वागत करण्यात आले.

२२ डिसेंबर २०१० : प. पू. परमहंस स्वामी स्वरूपानंद (पावस) स्मृतिव्याख्यान : रामकृष्ण मठ पुणे, चे स्वामी सुविज्ञेयानंद यांचे 'वर्तमान युग आणि अध्यात्माचे महत्त्व'' या विषयावर आनंद मंगल कार्यालयातील व्यासपीठावर व्याख्यान झाले. परिषदेच्या वतीने शाल, श्रीफळ, हार व ज्ञानेश्वरीची प्रत देऊन प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य व कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे यांच्या हस्ते हार घालून सत्कार करण्यात आला. प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले. ह. ल. निपुणगे यांनी आभार मानले. व्याख्यानाच्या प्रारंभी सुनंदा शाळीग्राम यांनी स्वामीस्वरूपानंद यांचे पद सादर केले. त्याचबरोबर मधुभाऊ पटवर्धन यांनी स्वामी सुविज्ञेयानंद यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. शेवटी उपस्थितांसाठी चहापानाची व्यवस्था करण्यात आली होती.

८ जानेवारी २०११ : श्रद्धांजली सभा : सुभाष भेंडे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, चित्रा नाईक, नलिनी जयवंत, देवदत्त दाभोळकर, डॉ. के. बी. ग्रँट, वामन निंबाळकर, विठ्ठल उमप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपाडे यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली होती. कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, अरविंद जोशी या वक्त्यांनी आपले विचार प्रकट केले. तसेच साहित्यिक डॉ. न. म. जोशी यांनी पाठविलेली लिखित श्रद्धांजली दीपक करंदीकर यांनी वाचून दाखविली. सभेचे संचालन व शोक प्रस्तावाचे वाचन दीपक करंदीकर यांनी केले.

१७ जानेवारी २०११ : वि. स. खांडेकर स्मृतिदिनः 'वि. स. खांडेकरांचे साहित्य' या विषयावर प्रसिद्ध साहित्यिक ह. मो. मराठे यांचे भाषण झाले. प्रारंभी प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी खांडेकरांच्या दोन रुपक कथांचे वाचन व प्रास्ताविक व स्वागत केले. कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी सूत्रसंचालन केले. दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

१८ जानेवारी २०११ : न्या. म. गो. रानडे स्मृतिदिनः 'न्या. रानडे व्यक्तिमत्त्व आकलन' या विषयावर प्रा. गणेश राऊत यांचे व्याख्यान झाले. वक्त्यांचा परिचय प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी करून दिला. आभार व प्रास्ताविक श्रीधर सहस्रबुद्धे यांनी केले.

अनुक्रमणिका

३१ मार्च २०११ : दिवाळी अंक स्पर्धा २०१०- पारितोषिक वितरण समारंभ : ज्येष्ठ साहित्यिक डॉ. न. म. जोशी यांच्या अध्यक्षीय उपस्थितीत 'दिवाळी अंक स्पर्धा २०१०' चा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. प्रास्ताविक ह. ल. निपुणगे यांनी केले. स्वागत डॉ. माधवी वैद्य यांनी केले. डॉ. न. म. जोशी सरांच्या ७५व्या वर्षानिमित्ताने परिषदेने सरांचा हृद्य सत्कार यानिमित्ताने केला. आशा साठे व विनया खडपेकर यांनी स्पर्धा-परिक्षकांची मनोगते व्यक्त केली. चंद्रकांत शेवाळे, जयंत गोखले व मीनाक्षी केळकर या देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. यानंतर डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते पारितोषिके वितरीत करण्यात आली व त्यांनी अध्यक्षीय समारोप केला. तसेच पारितोषिक विजेत्यांपैकी काहींनी मनोगत व्यक्त केले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

१) अ. स. गोखले स्मृत्यर्थ 'रत्नाकर' पारितोषिक :
   अंक : अनुभव

२) श्री. चंद्रकांत शेवाळे (संपादक-ग्रहांकित) पुरस्कृत तीन पारितोषिके
   अ) विविध ज्ञान विस्तार कर्ते 'रावसाहेब मोरमकर' पारितोषिक : अंक '**मैत्र**'
   ब) मासिक मनोरंजनकार 'का. र. मित्र' पारितोषिकः अंक 'अक्षरप्रतिष्ठा'
   क) शं. वा. किर्लोस्कर यांच्या स्मरणार्थ पारितोषिक : अंक 'ऋतुरंग'

३) उत्कृष्ट कथेचे 'दि. अ. सोनटक्के' पारितोषिक
   कथा : 'ॲम्बुलन्स राइड' लेखक डॉ. समीर कुलकर्णी : अंक 'अनुभव'

४) उत्कृष्ट ललितलेखासाठी 'अनंत काणेकर' पारितोषिक
   लेख : 'सुगरिणीची पिल्ले' लेखक : शिरीष कुमार पाटील : अंक 'गस्त'

५) बालविभागासाठी विशेष पारितोषिक (कै. जानकीबाई केळकर यांच्या स्मरणार्थ)
   अंक : आम्ही हुश्शार मुले

६) विशेष उल्लेखनीय पारितोषिके
   अंक : कोकण दिनांक आणि अंक इत्यादी.

सूत्र संचालन नंदा सुर्वे यांनी केले व आभार प्रदर्शन दीपक करंदीकर यांनी केले.

२४ मार्च २०११ : पुष्पा पुसाळकर (प्रथम वर्ष) पुरस्कार : सुविचार प्रकाशन मंडळ, पुणेच्या व्यवस्थापिका पुष्पा पुसाळकर यांच्या स्मरणार्थ मंडळाने या वर्षी एक लाख रुपयांची देणगी परिषदेला दिली. या देणगीच्या व्याजातून म. सा. प. तर्फे उत्कृष्ट पुस्तकनिर्मितीबद्दल २०१० सालच्या प्रथम पुरस्कारासाठी उद्धव ठाकरे यांच्या 'महाराष्ट्र देशा' या पुस्तकाची निवड करण्यात आली. सदर पुस्तकाचे प्रकाशक 'प्रबोधन प्रकाशन, मुंबई' यांना रु. ५०००/- व मानचिन्ह अशा स्वरुपात हा पुरस्कार पुसाळकर यांच्या स्मृतीदिनी म्हणजे २४ मार्च २०११ रोजी प्रदान करण्यात आला.

८ एप्रिल २०११ : कै. कमोडर मधुकर केशव लेले स्मृतिदिन : 'प्रश्न आजचे आणि उत्तर संत साहित्याचे' या विषयावर प्रा. मिलिंद जोशी यांचे व्याख्यान झाले. प्रास्ताविक डॉ. वि. वि. घाणेकर यांनी केले. डॉ. माधवी वैद्य यांनी मिलिंद जोशी यांचा परिचय करून दिला. श्रीफल व गुलाब देऊन डॉ. घाणेकर यंच्या हस्ते प्रा. जोशी यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दीपक करंदीकर यांनी केले.

या निमित्ताने थोर समाजसेवक यांनी दिल्लीत भ्रष्टाचाराबद्दल केलेल्या 'आमरण उपोषणाला' पाठिंबा दर्शविण्यासाठी उपस्थितांच्या सह्या एका नोंदवहीत जमा करण्यात आल्या.

९ एप्रिल २०११ : ज्ञानकोशकार केतकर स्मृतिदिनः १ ज्ञानकोशकार केतकर ते कृषिज्ञानकोश या विषयावर मा. श्री. अशोक महादेव जोशी यांचे भाषण झाले. यानिमित्ताने डॉ. द. ना. धनागरे यांनी आपले विचार प्रकट केले. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांनी श्रीफल व गुलाब देऊन वक्त्यांचा सत्कार केला व समारोप म्हणून आपले विचार प्रकट केले. प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक केले. कार्यवाह नंदा सुर्वे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. कार्यवाह दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. पटवर्धन सभागृहात एका स्टँडवर कृषिज्ञानकोशाचे खंड १ ते ६ प्रदर्शित केले होते.

अनुक्रमणिका

१० एप्रिल २०११ : ज्ञानकोशकार केतकर स्मृतिदिन : पुण्यातील कमला नेहरू उद्यानातील केतकरांच्या समाधीस्थळाला दरवर्षीप्रमाणे सकाळी ठीक ८.१५ वाजता मा. श्री. अशोक महादेव जोशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम झाला. परिषदेतर्फे उपस्थितांना पेढेवाटप करण्यात आले. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी, स्थानिक कार्यवाह अनंत जोशी, नंदा सुर्वे, दीपक करंदीकर, सर्वसाधारण प्रतिनिधी डॉ. कल्याणी दिवेकर, परिषदेचे कार्यालयीन कर्मचारी व नागरीक याप्रसंगी उपस्थित होते.

४ मे २०११ : कवी कुसुमाग्रज व शं. ना. जोशी पुरस्कार वितरण सोहळा : प्रारंभी दिवंगत कवी व गीतकार जगदीश खेबुडकर यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कवी कुसुमाग्रज पुरस्कार कल्पना दुधाळ व शं. ना. जोशी पुरस्कार न्या. नरेंद्र चपळगांवकर यांना देण्यात आला. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षस्थानी डॉ. द. भि. कुलकर्णी होते. पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत डॉ. माधवी वैद्य यांनी केले. परीक्षक म्हणून सदाशिव शिवदे व मनोहर सोनवणे तसेच परीक्षक रमण रणदिवे यांचा सत्कार करण्यात आला. कुसुमाग्रज पुरस्कार नवसिद्धान्त प्रकाशनच्या डॉ. मनीषा जगताप यांना प्रकाशिका म्हणून देण्यात आला. न्या. चपळगांवकर यांच्या हस्ते शं. ना. जोशी पुरस्कार यांनी स्वीकारला. श्री. मु. शं. जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. परीक्षकांपैकी रमण रणदिवे, डॉ. सदाशिव शिवदे यांनी मनोगते व्यक्त केली. पुरस्कारप्राप्त कवयित्री कल्पना दुधाळ यांनी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी केला. स्थानिक कार्यवाह प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी आभार मानले.

१० मे २०११ : कै. कवीवर्य जगदीश खेबुडकर यांना श्रद्धांजली सभा : महाराष्ट्र साहित्य परिषद व संस्कृती प्रकाशन, पुणे यांचया संयुक्त विद्यमाने माननीय उल्हासदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली श्रद्धांजली सभा आयोजित केली होती. कोषाध्यक्ष सुनील महाजन, जयराम देसाई, श्रीधर माडगूळकर, श्याम भुर्के, उद्धव कानडे, दीपक करंदीकर, अरुण म्हात्रे, प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी, व मा. उल्हासदादा पवार या वक्त्यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. या सभेचे सूत्रसंचालन व श्रद्धांजली ठरावाचे वाचन कार्यवाह व संस्कृती प्रकाशनाच्या सौ. सुनीताराजे पवार यांनी केले. शेवटी उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून के. जगदीश खेबुडकर यांना श्रद्धांजली वाहिली.

२६ मे २०११ : वर्धापनदिन समारंभ : वार्षिक ग्रंथ आणि ग्रंथकार पारितोषिके वितरण :
शारदा स्तवनाच्या गायनाने मृणाल धोंगडे यांनी कार्यक्रमाचा प्रारंभ केला. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी व कोषाध्यक्ष सुनील महाजन यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. कल्याणी दिवेकर यांनी उत्तम कांबळे यांचा व कार्यवाह प्रकाश पायगुडे यांनी डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते ग्रंथकार पारितोषिके वितरित करण्यात आली. त्यानंतर त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नंतर डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते ग्रंथलेखकांची पारितोषिके वितरित करण्यात आली. पुरस्कार विजेत्यांपैकी भानू काळे व अचला जोशी (मुंबई) यांनी मनोगते व्यक्त केली. नंतर डॉ. अनिल अवचट यांचे समारोपाचे अध्यक्षीय भाषण झाले. कार्यवाह ॲड. प्रमोद आडकर यांनी आभार मानले. साहित्यिक, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर समारंभाला आवर्जून उपस्थित होते.

२७ मे २०११ : वर्धापन दिन समारंभ : परिषदेचा १०५ वा वर्धापन दिन समारंभ माजी न्यायमूर्ती, मा. नरेंद्र चपळगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कार्यक्रमाची सुरवात 'बहु असोत सुंदर' या महाराष्ट्र गीताच्या गायनाने झाली. राहुल घोरपडे आणि त्यांचे सहकारी यांनी हे गीत सादर केले. प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक केले. व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य व कोषाध्यक्ष सुनील महाजन यांनी केले. न्या. नरेंद्र चपळगांवकर यांच्या हस्ते यंदाचा 'मसाप सन्मान' प्रा. रा. ग. जाधव यांना व डॉ. भीमराव कुलकर्णी 'कार्यकर्ता' पुरस्कार मा. किरण ठाकूर (बेळगाव) यांना प्रदान करण्यात आला. याचवेळी 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७वा भाग ३ व ४' चे प्रकाशन न्या.

चपळगांवकर यांच्या हस्ते झाले. त्यानंतर मराठी वाङ्मयेतिहास खंडाच्या लेखकांचे सत्कार करण्यात आले. सत्कारमूर्ती किरण ठाकूर व प्रा. रा. ग. जाधव यांनी मनोगते व्यक्त केली. प्रमुख पाहुणे न्या. नरेंद्र चपळगांवकर यांचे भाषण झाले. अध्यक्षीय समारोप परिषदेचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उद्धव कानडे व दीपक करंदीकर यांनी केले. या प्रमुख समारंभानंतर ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने. 'राहुल घोरपडे, स्वाती दैठणकर आणि सहकारी यांनी, त्यांच्या कवितांवर आधारित 'काव्यांजली' हा कार्यक्रम सादर केला. याही समारंभास मान्यवर साहित्यिक व रसिक श्रोते यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे १०५व्या वर्धापन दिन समारंभ- प्रसंगी वितरित करण्यात आलेली विविध पारितोषिके-

विशेष सन्मान

म.सा.प. गौरव पुरस्कार- ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव, डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार- मा. किरण ठाकूर (संपादक दै. तरुण भारत, बेळगाव)

विशेष ग्रंथकार पुरस्कार

डॉ. शं. दा. पेंडसे स्मृती-पुरस्कार (संत साहित्यविषयक)- डॉ. रामचंद्र देखणे

मा. कृष्णराव फुलंब्रीकर पुरस्कार (संगीत समीक्षा) - मुकुंद संगोराम

डॉ. वि. कृ. गोकाक पुरस्कार - अशोक याळगी

कविवर्य भा. रा. तांबे पुरस्कार (गेय कविता) - प्रकाश होळकर

प्रा. गो. रा. परांजपे पुरस्कार (विज्ञान विषयक) - डॉ. दीपक शिकारपूर

श्रीपाद जोशी पुरस्कार (संदर्भग्रंथ अनुवाद-आंतरभारती कार्य) - डॉ. मृणालिनी गडकरी

कमलाकर सारंग पुरस्कार (नाट्यविषयक) - डॉ. चंद्रशेखर फणसळकर

ग. ह. पाटील पुरस्कार (बालसाहित्य, शिक्षणविषयक) - अनंत भावे

ज्योत्स्ना देवधर पुरस्कृत लेखिका - शांता गोखले

वार्षिक ग्रंथ पारितोषिके -

पुरस्काराचे नाव	पुरस्कार विजेते	ग्रंथाचे नाव
वा. म. जोशी पारितोषिक (कादंबरी)	भालचंद्र नेमाडे	हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ
ह. श्री. शेणोलीकर पारितोषिक (समीक्षा)	डॉ. आनंद पाटील	समीक्षा अपहरण
वासुदेव धोंडो व भागिरथीबाई दीक्षित पारितोषिक (धार्मिक)	डॉ. कृ. ज्ञा. भिंगारकर	संत तुकाराम आणि संत कबीर
लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख पारितोषिक (ललितेतर वैचारिक)	कन्हैयालाल जळगावकर	जात-वर्ण व्यवस्था विचार : एक कृतिबद्ध भूमिका
ज. रा. कदम पारितोषिक (कृषिविषयक)	प्रा. डॉ. अशोकराव ढगे	पीक वाढीसाठी चौफेर तंत्र
स. ह. मोडक पारितोषिक (अनुवाद)	भारती पांडे	द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स
ग. ल. ठोकळ पारितोषिक (ग्रामीण साहित्य)	जयवंत अवघडे	सरपंच
प्रा. उमाकांत कीर पुरस्कृत कृष्णाजी वामन कीर पारितोषिक (ललित)	भानू काळे	अंतरीचे धावे
नी. स. गोखले पारितोषिक (उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती)	नंदिनी पब्लिशिंग हाऊस, पुणे	अँड द ऑस्कर गोज् टू...
पुष्पलता रानडे पुरस्कृत लक्ष्मीबाई टिळक पारितोषिक (आत्मचरित्र)	ज्योत्स्ना कदम	सर आणि मी
मृत्युंजय पारितोषिक	रवींद्र शोभणे	महाभारताचा मूल्यवेध

पुरस्काराचे नाव	पुरस्कार विजेते	ग्रंथाचे नाव
कमल भागवत व के. पी. भागवत पारितोषिक (मानसशास्त्र, समाजशास्त्र, स्त्रीजीवनविषयक)	मीनल जगताप	मराठा स्त्रियांचे स्थान
स. रा. गाडगीळ पुरस्कृत विजया गाडगीळ स्मृती पारितोषिक (उत्कृष्ट वाङ्मयमूल्य असलेल्या ग्रंथास)	चंद्रकांत वानखडे आपुला चि वाद आपणांसी	एका कार्यकर्त्याचे आत्मकथन :
अरविंद वामन कुलकर्णी स्मृती पारितोषिक (उत्कृष्ट समीक्षाग्रंथ)	डॉ. हरिश्चंद्र थोरात	कादंबरी : एक साहित्य प्रकार
वि. वि. बोकील स्मृती पारितोषिक (उत्कृष्ट बालवाङ्मय)	गद्य-मंगला गोडबोले पद्य- एकनाथ आव्हाड	सही रे सही हसरे घर
अंबादास माडगूळकर स्मृती पारितोषिक (सामाजिक आशयाच्या ग्रंथास)	डॉ. कैलास सोनावणे	महाराष्ट्रातील चर्मकार समाजाचे राजकारण
शरद्चंद्र मनोहर भालेराव स्मृती पारितोषिक (लक्षवेधी साहित्य ग्रंथ)	अचला जोशी	आश्रम नावाचं घर (कहाणी श्रद्धानंद महिलाश्रमाची)
शरद्चंद्र मनोहर भालेराव स्मृती पारितोषिक (प्रबंधलेखनासाठी)	प्रा. महेबूब बन्सीभाई सय्यद	नारायण सुर्वे आणि दुष्यंतकुमार यांच्या कवितांचा तौलनिक अभ्यास
माधव मदाने पुरस्कृत शरच्चंद्र चिरमुले पारितोषिक (कथासंग्रह)	अभिराम भडकमकर	चुडैल
सागर/वसुंधरा शिरोळे पुरस्कृत डॉ. पुष्पा दिनकरराव शिरोळे पारितोषिक	डॉ. के. आर. महाडिक	औषधांविषयी बोलू काही
सागर/वसुंधरा शिरोळे पुरस्कृत मालिनी दिनकरराव शिरोळे पारितोषिक	अरुण जाखडे	'इर्जिक' स्तंभलेखन
सागर/वसुंधरा शिरोळे पुरस्कृत ॲड. त्रिंबकराव शिरोळे पारितोषिक (ललितगद्य)	प्रा. रमेश कोटस्थाने	तरंग

दि. १५ मे ते २३ मे व २८ मे ते ३१ मे २०११ : ३री ते ६ वी पर्यंतच्या मुलामुलींसाठी कवितेचे शिबीर परिषदेतर्फे रोज सकाळी १० ते १२ या वेळात आयोजित करण्यात आले होते. रेणू गावस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराला प्रारंभ झाला. या शिबिरात सुमारे १५ मुलामुलींनी सहभाग घेतला. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, मीरा शिंदे, हिमानी लिमये, राहुल घोरपडे, कविता मेहेंदळे व इरा जोशी या लहान मुलीने नृत्यासाठी मार्गदर्शन केले.

या निमित्ताने परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात प्रथमच वंचित मुलांनी कविता शिकण्याचा अनुभव अत्यंत आनंदाने घेतला. त्यांनी शिबिरात शिकलेल्या कवितांचा २ जून रोजी परिषदेत जाहीर कार्यक्रम झाला.

३० मे २०११ : म. गो. उर्फ बाबा पाठक श्रद्धांजली सभा : महाराष्ट्र साहित्य परिषद व अनुबंध प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ही श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्ष श्रीधर माडगूळकर व योगेश्वर गंधे, अनिल कुलकर्णी, सुनील महाजन, प्रा. मिलिंद जोशी, दीपा क्षीरसागर, डॉ. न. म. जोशी, रवींद्र जोशी, इत्यादि वक्त्यांनी आपली श्रद्धांजलीपर भाषणे केली. कार्यवाह प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य व्यासपीठावर होत्या.

वारजे कोथरूड शाखा

१२ जानेवारी २०११ : स्वामी विवेकानंद जयंतीच्या शुभमुहुर्तावर परिषदेच्या वारजे-कोथरूड शाखेचे उद्घाटन समारंभपूर्वक सकाळ वृत्तपत्र समुहाचे प्रमुख संपादक व ८४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले. म.सा.प.च्या प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य या प्रमुख पाहुण्या होत्या. शाखेच्या अध्यक्षा- डॉ. अश्विनी धोंगडे, कार्याध्यक्ष- विजय दांडेकर, उपाध्यक्ष- मधुकर तवले व शाखेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. सुनील महाजन यांनी शाखेला या निमित्ताने रु. ५०००/- ची देणगी दिली.

२४ एप्रिल २०११ : वारजे कोथरूड शाखा कार्यकारिणी सदस्य यांच्या वतीने नुकत्याच झालेल्या परिषदेच्या निवडणुकीत यशस्वी झालेल्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची एकत्रित बैठक व सत्कार करण्यात आला. तेव्हा डॉ. माधवी वैद्य, प्रा. मिलिंद जोशी, ॲड. प्रमोद आडकर, दीपक करंदीकर, प्रकाश पायगुडे, महेंद्र गुंजाळ उपस्थित होते.

वारजे-कोथरूड शाखेच्या कार्यकारिणी सदस्यांची नावे खालील प्रमाणे आहेत :-

अध्यक्ष- डॉ. सौ. अश्विनी धोंगडे, कार्याध्यक्ष- विजय दांडेकर, उपाध्यक्ष- मधुकर तवले, प्रमुख कार्यवाह- गोपाळ कुलकर्णी, सहकार्यवाह- सौ. वसुधा कर्दळे, कोषाध्यक्ष- ॲड. सौ. मीना राव, सदस्य- सौ. प्रतिभा पाठक, गिरीश झांबरे, चंद्रशेखर धर्माधिकारी, गजानन आराणके, सुनील महाजन, सौ. मंजिरी ताम्हणकर, श्यामराव खोले व मार्गदर्शक व सल्लागार- डॉ. माधवी वैद्य.

❖❖❖

धुळे शाखा

२७ ऑगस्ट २०१० : स्व. राजमाता पद्माराजे रघुजीराव कदम बांडे स्मृतिदिन : मसाप धुळे जिल्हा शाखा व झेड. बी. पाटील कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने नारायण सुर्वे यांच्या कविता वाचनाचा कार्यक्रम झाला. 'कवितारती'चे संपादक प्रा. पुरुषोत्तम पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सुर्व्यांचे काव्यकर्तव्य विशद केले. डॉ. एम. बी. शहा हे प्रमुख वक्ते होते. डॉ. अरुणराव साळुंके यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रा. डॉ. पी.एच. पवार यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. शशिकला पवार व आभार प्रा. के. एम्. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. वर्षा पाटील यांनी केले.

३१ ऑक्टोबर २०१० : स्व. डॉ. अनंतराव पाटील स्मृतिदिन : गरूड वाचनालय, धुळे यांच्या संयुक्त सहकार्याने 'अनंतराव पाटील यांची साहित्यसंपदा' या विषयावर प्रा. उषा पाटील यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षीय समारोप गरूड वाचनालय, अध्यक्षांनी केला. मसाप धुळे शाखेच्या अध्यक्षा प्रा. सुलभा भानगावकर यांचेही भाषण झाले. स्वागत उपाध्यक्ष श्री. सी, न. रावळे, सूत्रसंचालन प्रा. राजश्री शेलकर यांनी तर आभार प्रदर्शन विश्वनाथ मोराणकर यांनी केले.

२ जानेवारी २०११ : स्व. प्रा. सी. आय. मोरे स्मृतिदिन : गरूड वाचनालयाच्या सहकार्याने प्रा. डॉ. अनिल बैसाणे यांचे 'महाराष्ट्रातील सामाजिक स्थित्यंतरे' या विषयावर भाषण झाले. श्री. हिलाल माळी यांना २००९-१० चा जाणीव जागृती पुरस्कार प्रा. सदाशिव माळी व आमदार प्रा. शरद पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. प्रास्ताविक गणेश पाठक व सूत्रसंचालन मोहन मोरे यांनी केले. स्व. सुलभा दयाराम बावीसकर व नागराज बोरसे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'राजर्षी शाहू महाराज : व्यक्तित्व आणि कार्य' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.

११ फेब्रुवारी २०११: स्व. डॉ. शांताराम (भाऊ) देशपांडे स्मृतिदिन : कमलाबाई कन्या ह्या, धुळे यांच्या सहकार्याने 'आठवणी कथनाचा' कार्यक्रम झाला. डॉ. व्हि. जी. पुराणिक, मु. ब. शहा, प्रा. अरविंद कपोले, बॅ. रावळे यांनीही आठवणी सांगितल्या. अध्यक्ष प्रा. सुलभा भानगावकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ. सुरेंद्र मोरे यांनी सूत्रसंचालन केले व मोहन मोरे यांनी आभार मानले.

अनुक्रमणिका

६ मार्च २०११ : कुसुमाग्रज जन्मशताब्दीनिमित्ताने मसाप धुळे शाखा, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बवनराव पवार यांचे कुसुमाग्रजांच्या व्यक्तित्वाचेविविध पैलू कथन करणारे व्याख्यान झाले. प्रास्ताविक प्रा. उषा पाटील, अध्यक्षीय समारोप भानगावकर, सूत्रसंचालन डॉ. शशिकला पवार व आभार मिलिंद दीक्षित यांनी मानले.

प्रा. मंजिरी मदन सोमाणी यांचे 'ती आणि मी' या भवरलाल जैन यांच्या आत्मकथनावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी मीनाताई जगधने होत्या. स्वागत प्रा. भाग्यश्री वडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. वावुराव उपाध्ये यांनी केले. चर्चेत अनेकांनी भाग घेतला.

कार्यवाह

बार्शी शाखा

शाखेच्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त कवीसंमेलन : कार्यवाह शब्बीर मुलाणी यांनी प्रास्ताविक केले. सुदेश पाठक, मुकुंदराज कुलकर्णी, प्रकाश गव्हाणे, दत्ता गोसावी, अनुराधा केसकर, सत्यभामा जाधवर, देशमुख या कवींनी कविता सादर केल्या. केसकर यांनी सूत्र संचालन केले. कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत शेटे यांनी आभार मानले.

कार्यवाह

भिवंडी शाखा

३ एप्रिल २०१० : मृणाल देव व त्यांचे सहकारी यांनी 'मृण्मयी' या गोनिदांच्या कादंवरीचे वाचन केले.

१ ऑगस्ट २०१० : लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त प्रसिद्ध उद्योजिका सौ. मीनल मोहाडीकर, मुंवई यांचे 'व्यवसायातील संधी' या विषयावर भाषण झाले. हा कार्यक्रम टिळक वाचन मंदिर, भगिनी मंडळ या संस्थांच्या सहकार्याने झाला.

२१ ते २४ ऑक्टोबर २०१० : बा. सी. मर्ढेकर यांच्या कविता या विषयावर निर्मला लाहोटी, प्रज्ञा जोशी व पु. भा. भावे यांच्या व्यक्तित्वाचा वेध या विषयावर रविप्रकाश कुलकर्णी व मराठी व हिंदी गीतांचे सादरीकरण- श्री. अनिरूद्ध जोशी व कै. प्रा. वि. चिं. फडके यांच्या 'कॉलनीत टँकर येतो' या कथासंग्रहाचे प्रकाशन हस्ते दत्ता आण्णा कर्वे. असे विविध कार्यक्रम झाले.

८ एप्रिल २०११ : अकराव्या वर्धापनदिनानिमित्त भाऊ मराठे यांचा 'भाऊचा धक्का' हा कार्यक्रम घेण्यात आला.

२४ एप्रिल २०११ : लेखक व विचारवंत अनिल अवचट यांची 'माझा लेखन प्रवास' या विषयावर प्रज्ञा जोशी व विनायक गोखले यांनी मुलाखत घेतली.

कार्यवाह

शिराळा शाखा

१८ जानेवारी २०११ : ह. मो. मराठे यांच्या उपस्थितीत शाखेचा उद्‌घाटन सोहळा पार पडला. अध्यक्षस्थान मा. आमदार मानसिंगराव नाईक (भाऊ) यांनी भूषविले. म.सा.प. पुणेचे पदाधिकारी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमात प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य, कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे, प्रा. श्यामराव पाटील, बाबा परीट यांनी मनोगते व्यक्त केली. स्वागत व प्रास्ताविक अध्यक्ष प्रा. शिवाजी कुमार यांनी केले. संजय पाटील यांनी ओळख करून दिली. आभार आनंदा गावडे यांनी मानले.

२८ डिसेंबर २०१० : पहिली सर्वसाधारण सभा झाली. या सभेत पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांची निवड झाली.

१८ जानेवारी २०११ : कार्यकारिणीची बैठक घेण्यात आली. साहित्यिक प्रल्हाद वडेर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. संजय पाटील यांनी प्रल्हाद वडेर यांच्या साहित्याचा आढावा घेतला.

कार्यवाह

श्रीरामपूर शाखा

येथील महाराष्ट्र साहित्य परिषद शाखेतर्फे ०२-०१-२०११ रोजी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुण्यतिथीप्रसंगी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख वक्ते मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे (सी.डी.जे. कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर) होते. विषय- 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य' (चरित्रग्रंथ- गो. मा. पवार) होता. अध्यक्षस्थान मा. अविनाश आपटे यांनी भूषविले. स्वागत व प्रास्ताविक परिचय प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी करून दिला व आभार विजयराव नगरकर यांनी मानले.

या व्याख्यानानिमित्त ॲड. रावसाहेब शिंदे (अध्यक्ष) यांनी शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य डॉ. संजय कांबळे म्हणाले, विठ्ठल रामजी शिंदे हे समाजसेवकातील उपेक्षित समाजसेवक आहेत. त्यांचे सामाजिक कार्य आदर्शवत् आहे. रयत शिक्षण संस्थेसाठी त्यांनी योगदान दिले आहे. अस्पृश्यता निवारण व शेतकरी कल्याणाचे विचार महत्त्वाचे आहेत. त्यानंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी भाग घेतला. प्रा. सौ. भाग्यश्री बडे यांनी नववर्ष कविता वाचली. साहित्यिक सुभाष भेंडे व शाहीर विठ्ठल उमप यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. माजीप्राचार्य टी. ई. शेळके यांनी प्रदीर्घ विवेचन केले. शिवाजी काळे यांनी अविनाश आपटे हे हिंदसेवा मंडळ ह्या शैक्षणिक संस्थेचे मानद सचिव म्हणून सलग तिसऱ्यांदा निवडले गेले म्हणून त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. कार्याध्यक्ष शेळके यांनी सत्कार केला. डॉ. मधुकर भिडे, कचरू बोरूडे, के. एल्. खाडे, दिनकर पोखरकर, सौ. शीतल गुंजाळ, दर्शन गुंजाळ, श्री. सुरेखा कासार, डॉ. कामलजित कौर, बतरा, प्रा. ज्ञानेश्वर घोटेकर, प्रा. रमेश चौधरी, के. एस. नवले, प्रा. बारगळ, प्रा. राजेंद्र पटारे, प्रा. लता बोरूडे यांनी भाग घेतला.

'परवड' या कादंबरीवर माजी अधिक्षक सु. वि. सुकळे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्ष ॲड. रावसाहेव शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या. उपाध्यक्ष अविनाश आपटे अध्यक्षस्थानी होते. स्वागत व प्रास्ताविक प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी केले. उपस्थितांपैकी अनेकजणांनी कादंबरी वरील चर्चेत भाग घेतला. कोषाध्यक्ष डॉ. बतरा यांनी आभार मानले.

६ फेब्रुवारी २०११ : श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड स्मृतिदिनानिमित्त 'जेव्हा गुराखी राजा होतो' ह्या निंबाजीराव पवार लिखित चरित्रग्रंथावर डॉ. बाबुराव उपाध्ये यांचे व्याख्यान. पं. भीमसेन जोशींना श्रद्धांजली.

डॉ. बाबुराव उपाध्ये, प्रमुख कार्यवाह, श्रीरामपूर शाखा

पाथर्डी शाखा

२५ सप्टेंबर २०१० : सायंकाळी ६.३० वाजता पाथर्डी येथे म.सा.प. शाखा पाथर्डीच्या सहकार्याने अभिनंदन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कृष्णा भोजनालय साहित्य मित्र मंडळ हे या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मसाप शाखा- पाथर्डीचे अध्यक्ष श्री. अविनाश मंत्री होते.

पाथर्डी तालुक्याचे सुपुत्र कैलास दौंड यांच्या 'कापूसकाळ' या कादंबरीला पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साहित्य पुरस्कार व खानदेश कन्या स्मिता पाटील साहित्य पुरस्कार मिळाल्याच्या औचित्याने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

शहराच्या मध्यवर्ती असलेल्या माधवराव निऱ्हाळी सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी शहरातील अनेक जाणकार व शिक्षक उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील सात शिक्षकांचा सत्कार देखील करण्यात आला. कविता आणि स्वागत यांचा सुगम मेळ घालण्यात आल्याने कार्यक्रम उठावदार झाला. प्रा. शंकर चव्हाण, प्रा. शशिकांत शिंदे, प्रा. भारत गाडेकर, प्रविण घुले यांनी कविता सादर केल्या. त्यानंतर हेरंब कुलकर्णी यांचे 'आजचे शिक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. शहरातील बी.एड. व डी.एड. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती या कार्यक्रमास होती. म.सा.प.चे सदस्य प्रा. अशोकराव व्यवहारे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी खास परिश्रम घेतले.

(शब्दांकन :
दीपक करंदीकर
कार्यवाह, मसाप, पुणे)

प्रा. मिलिंद जोशी
प्रमुख कार्यवाह

अनुक्रमणिका

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ■ सन २०११ ते २०१६

पुण्याबाहेरील कार्यवाह



प्रा. मेधा काळे
अहमदनगर जिल्हा



श्री. रवींद्र बेडकीहाळ
सातारा जिल्हा

पुणे शहर प्रतिनिधी



डॉ. कल्याणी दिवेकर



डॉ. अरविंद संगमनेरकर



डॉ. सतीश देसाई

जिल्हा प्रतिनिधी



डॉ. पुरुषोत्तम काळे
पुणे



श्री. राजन लाखे
पुणे



श्री. पद्माकर कुलकर्णी
सोलापूर



ॲड. जे.जे. कुलकर्णी
सोलापूर



डॉ. किसन पाटील
जळगाव



श्री. पां.के. दातार
ठाणे



श्री. प्रभाकर संत
ठाणे



श्री. पद्माकर शिरवाडकर
ठाणे



श्रीमती प्रतिभा लिमये
रत्नागिरी-रायगड



श्री. राजन मुठाणे
कोल्हापूर



श्री. प्रकाश होळकर
नाशिक



डॉ. शशिकला पवार
धुळे-नंदुरबार

स्वीकृत सदस्य



श्री. महेंद्र मुंजाळ



श्री. उद्धव कानडे

Maharashtra Sahitya Patrika. Quarterly : April to June 2011
Registered with the register of Newspaper for India under No. 6398/57

प्रेषक
प्रमुख कार्यवाह,
महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, पुणे–४११०३०.
दूरभाष : ०२०–२४४७५९६३.

बुक–पोस्ट

महाराष्ट्र साहित्य परिषद